सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन गढ्या, वाडे व पुरातत्त्वीय स्थळे यांचा ऐतिहासिक अभ्यास

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

तात्विक व सामाजिकशास्त्र विद्याशाखा अंतर्गत
इतिहास विषयातील पीएच.डी.
पदवीकरीता सादर केलेला शोधप्रबंध

संशोधक
सौ. सुनिता दत्तात्रय गाजरे

मार्गदर्शक
डॉ. रविकिरण जाधव

जानेवारी २०१६

प्रतिज्ञापत्र

मी असे घोषित करते की, ''सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन गढ्या, वाडे आणि पुरातत्त्वीय स्थळे यांचा ऐतिहासिक अभ्यास'' या विषयावरील हा शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथील तात्वीक व सामाजिकशास्त्र विद्याशाखा अंतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीकरिता सादर करीत आहे.

सदर प्रबंध या किंवा इतर कोणत्याही विद्यापीठातील किंवा अन्य कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

सौ. सुनिता दत्तात्रय गाजरे
संशोधक विद्यार्थी

स्थळ : सोलापूर.

दिनांक :

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येत आहे की, ''सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन गढ्या, वाडे आणि पुरातत्त्वीय स्थळे यांचा ऐतिहासिक अभ्यास'' हा शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथील तात्वीक व सामाजिक शास्त्र विद्याशाखा अंतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीकरिता सादर केलेला आहे.

सौ. सुनिता दत्तात्रय गाजरे यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली संशोधन करुन हा शोधप्रबंध स्वतंत्रपणे पूर्ण केला असून, प्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक निदाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. यापूर्वी हा प्रबंध या किंवा इतर कोणत्याही विद्यापीठात कोणत्याही पदवीसाठी सादर करण्यात आलेला नाही.

मार्गदर्शक

डॉ. रविकिरण जाधव

स्थळ : सोलापूर.

दिनांक :

अनुक्रमणिका

प्रकरण	प्रकरणाचे नांव	पृष्ठ क्र.
	प्रस्तावना	०१
पहिले	सोलापूर जिल्ह्याची भौगोलिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी	१८
दुसरे	मध्ययुगीनकाळातील वतनदारी पद्धती आणि सोलापूर जिल्ह्यातील जहागिरदार व वतनदार	५३
तिसरे	सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन काळातील गढ्या	१०४
चवथे	सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन काळातील वाडे	१६२
पाचवे	सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन काळातील पुरातत्त्वीय स्थळे	२०९
सहावे	उपसंहार / निष्कर्ष	२३१
	परिशिष्टे	
१)	नकाशे	२४१
२)	छायाचित्रे	२४५
३)	सोलापूर जिल्ह्यातील गढ्या, वाडे व पुरातत्वीय स्थळांची यादी	२५७
४)	प्रश्नावली	२५९
५)	अ) शिलालेख व लिप्यांतर	२६१
	ब) वैराग, ता. बार्शी येथील नाईक निंबाळकरांना मिळालेली वतनी गावांचे कुलमुखत्यार पत्र	२६२
	संदर्भ ग्रंथ सूची	२६४

प्रस्तावना

वस्ती करून राहणाऱ्या माणसाला अन्न–वस्त्राइतकीच निवाऱ्याची गरज भासू लागली. जीवनविकासात हळूहळू जीवनशैली तयार झाली. आसरा ही एक वास्तूसंकल्पना बनली. मानवी जीवनात वास्तूकला ही अत्यंत उपयुक्त आणि अनिवार्य कला आहे. मानवाच्या ज्या मूलभूत गरजा– अन्न, वस्त्र, निवारा त्यापैकी निवारा निर्माण करण्याची कला आणि शास्त्र म्हणजे वास्तूकला होय. अतिप्राचीन काळापासून या क्षेत्रात मानव कार्यरत असलेला आढळतो. किंबहुना यामुळेच या कलेला सर्व कलांची जननी मानण्यात येते. ऊन, वारा, पाऊस तसेच पशू इत्यादींपासून संरक्षण मिळविण्यासाठी निवारा निर्माण केल्यानंतरच मानवाच्या मनात इतर कलानिर्मितीविषयी विचार निर्माण झाले. वास्तू कलेनेच कालौघात इतर संलग्न दृश्य कलांना जन्म दिला. उदा. चित्रकला, शिल्पकला, स्थलशिल्प (लँडस्केप आर्किटेक्चर) इ. त्यापैकी प्रमुख मानण्यात येतात. सर विन्स्टन चर्चिल यांनी या कलेचे वर्णन 'प्रथम आपण वास्तू घडवितो आणि त्या आपल्याला घडवितात', असे केले आहे. संस्कृती निर्मितीच्या प्रक्रियेत जगाच्या इतिहासात प्रथम वास्तूनिर्मिती झाली. संगीत ही एक श्राव्य अनुभूती देणारी कला आहे. तर वास्तू ही दृक संवेदनांना संगीतमय करणारी कला मानली जाते. आकार स्थिर असेल तरी त्यांच्या प्रवाही रचनाघटकांद्वारे ते गतिमानतेचा आभास निर्माण करु शकतात. दृक संगीताचा अनुभूती आणू देऊ शकतात.[१]

प्राचीन वास्तूकलेने गरज आणि उपयुक्तता यांचे मूलभूत अर्थ प्राचीन वास्तूकारांनी मानवास शिकविले. गरजेपोटी निवाऱ्यासाठी बांधलेली घरे त्या उद्देशासाठी कशी उपयुक्त करावी यासाठी प्राचीन लोकांनी पाच हजारांपेक्षा जास्त वर्षे खर्ची घातली. समाजाने ज्याप्रमाणे टप्प्याटप्प्याने अक्षरओळख, शब्दओळख, वाचन आणि नवविचार सुचण्याची वैचारिक प्रगल्भता आत्मसात केली, त्याचप्रमाणे मानवाने वास्तूशास्त्रीय अक्षर, शब्द, वाचन येथपर्यंत प्रगती केली व पुढील संस्कृतींनी नवकल्पना उत्क्रांत करीत वास्तूशिल्पे उभारली.[२]

आदिवासी मानव गुहेतून म्हणजे नैसर्गिक आश्रयातून बाहेर पडल्यावर स्वतंत्र बांधीव, किंवा रचित आकार 'घर' म्हणून उभारण्याच्या मानवी आकांक्षेपोटी वास्तूकलेचा जन्म झाला. त्यासाठी सावली देणारे झाड, डोंगरातील गुहा अशा ढोबळ कल्पना त्याच्या डोळ्यांसमोर होत्या. मग दगड, लाकडी फांदया, पालापाचोळा हे साहित्य त्याने वास्तू प्रयोगासाठी वापरले. दगडाचे तुकडे एकावर एक रचून भिंत होते किंवा बांबू, लाकडी, फांदया बांधून त्यावर पालापाचोळा ठेवला तर छत होते, हे वास्तूशास्त्रातील पहिले अलौकिक प्रयोग आहेत. तुर्कस्तानातील काही प्राचीन घरात रहिवाशी शिडीने चढत व शिडी ओढून आत घेत. संरक्षण या प्राथमिक गरजपूर्तीसाठी यथावकाश मानवास नाना युक्त्या सुचल्या. भिंत बांधल्यावर ती स्थिर उभीच राहण्यासाठी तिची जाडी वाढविली की काम होते किंवा घरात शिरण्यासाठी दार हवेच, मग त्यासाठी भिंतीला भोक पाडण्यापासून ते दाराच्या ठिकाणी लघुतुळई टाकण्यापर्यंत त्याची विचारशक्ती प्रगत झाली. दगडाचे वाहता येऊ शकतील असे तुकडे करून भिंत बांधायची, ती स्थिर राहण्यासाठी जाड करायची, अशा अनेक तंत्रांमुळे प्रत्येक साधनांचे उपयुक्ततवादी दृष्टीकोनातून निरीक्षण करायला प्राचीन मानवाने शिकविले. कुडाच्या भिंती शेणमातीचा गिलावा, फांदयांचे उतरते छप्पर, सारवून सपाट केलेली जमीन, भिंतीची बांधणी अशी अनेक मूलभूत तंत्रे ही प्राचीन मानवाची पुढील संस्कृतींना दिलेली देणगी होय. आजही अनेक देशातील आदिवासी या पद्धतीने घरे बांधतात. परंतु प्राचीन वास्तूकलेने मानवास उपलब्ध वास्तूसाहित्याचा समर्पक उपयोग करावयास शिकविले. त्याचे गुणधर्म अभ्यासातून उपयुक्त साधनात रुपांतर करण्याची कृती दाखविली. निरीक्षणशक्तीचा उपयोग करण्याची दृष्टी दिली. यानंतर पाश्चिमात्य देशांत पहिली महत्त्वाची वास्तूशैली व संस्कृती उदयास आली.[३]

वास्तूनिर्मितीची प्रक्रिया ही कला, शास्त्र व तंत्र या तीन पातळ्यावरून नियंत्रित केली जाते. यातील प्रत्येक अंग हे एकमेकाला पूरक असते व संकल्पनात्मक अवस्थेत तिन्हीचा एकत्रित विचार केला जातो. वास्तूकला व इतर कला यांमध्ये महत्त्वाचा फरक म्हणजे या क्षेत्रात कलाकृतीला प्रथम ग्राहक मिळतो व त्याच्याच आर्थिक पाठबळावर वास्तूतज्ज्ञ ती पूर्णत्वास नेतो; तर इतर कलाक्षेत्रांत कलावंत प्रथम कलाकृती पूर्ण करतो आणि मग तिचा मोबदला घेऊन विक्री

करतो. अतिप्राचीन काळापासून विद्यमान कालखंडापर्यंत वेगवेगळ्या देशांत भिन्न–भिन्न वास्तूशैली आणि तंत्रे उत्क्रांत होत गेली. देशपरत्वे त्यात स्थानिक वैशिष्ट्ये आणि तंत्रवैविध्ये यांची भर पडत गेली. प्रत्येक देशातील धार्मिक, तांत्रिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि वैचारिक अशा विविध चैतन्यस्त्रोतांचे प्रतिबिंब त्या त्या शैलीद्वारे प्रकट होणे अपरिहार्य होते. त्याचप्रमाणे भौगोलिक, भूगर्भीय तसेच स्थानिक हवामानांचा प्रभाव हा देखील शैलीचा जडणघडण होताना महत्त्वाचा ठरला.[४]

वास्तूला कलापूर्णता येण्यासाठी अनेक गोष्टींची पूर्तता होणे आवश्यक असते. माणसाने बांधलेली कोणतीही अथवा प्रत्येक वास्तू वास्तूकला मानली जात नाही. कोणत्याही बांधीव आकाराला 'वास्तूकला' म्हणून मान्यता प्राप्त होण्यासाठी काही मूलभूत निकष पार करावे लागतात. ते म्हणजे–

१) ज्या कार्यासाठी ती वास्तू बांधली आहे त्या वापरातील वास्तूची उपयुक्तता, सोय.

२) कार्यानुरुप कल्पक अवकाश रचनेची अभिव्यक्ती.

३) वास्तूच्या बांधकामातील भक्कमपणा व टिकाऊपणा.

४) देखभालीचा कमीत कमी व्याप.

५) वास्तूची कार्यानुरुप चैतन्यवृत्ती जागृत ठेवणारे अंतर्बाह्य अलंकरण.

६) बांधीव आकार व अवकाश सौंदर्य यातील सुयोग्य मेळ.

७) वास्तूकलेच्या अनेक शैली तयार झाल्या.

प्रत्येक दर्जेदार वास्तूनिर्मितीत हे निकष प्रत्ययाला येतात व म्हणूनच अशा इमारतींना वास्तूकला मानले जाते. सर्जनशील वास्तूतज्ञाने आपल्या क्रियाशीलतेची कार्य, उपयुक्तता व सौंदर्य या वास्तूशास्त्रीय निकषांशी सांगड घालून वास्तूनिर्मिती केली की, वास्तूकला निर्माण होते.[५]

शत्रूपासून संरक्षण करण्यास सुलभ जावे आणि सभोवतालच्या प्रदेशावर नियंत्रण ठेवता यावे म्हणून बांधलेल्या वास्तू इंग्रजीत कॅसल, फोर्ट, सिटॅडल, बर्ग वगैरे संज्ञांनी उल्लेख होतो तर मराठीत दुर्ग, गिरीदुर्ग, जंजिरा, गढी, कोट, गड, बालेकिल्ला वगैरे संज्ञांनी ओळखल्या गेलेल्या

वास्तू ह्या मध्ययुगीन काळात निर्माण झालेल्या आहेत. शत्रूचा हल्ला झाल्यास संरक्षणासाठी मध्ययुगीन काळात अशा वास्तूंच्या संरक्षणासाठी आधार घेतला जात असे. म्हणून बहुतेक नगरे ही किल्ल्यांच्या आसपास असत. मध्ययुगीन काळात घरांप्रमाणेच नगरांनाही तटबंदी होती. अशा वास्तूंमध्ये पाणीपुरवठा, गुप्त खजिने, धान्य गुदामे, शस्त्रागारे, दारुची कोठारे, गुप्त मार्ग इत्यादींची अत्यंत चातुर्याने व काळजीपूर्वक आखणी केली जात होती. या वास्तू अभेदय रहाव्यात म्हणून त्या वेळच्या युद्धपद्धतीनुसार बुरुज दरवाजे तटबंदी, तटबंद माची, खंदक वगैरेंची रचना करीत असत. एवढेच नव्हे तर युद्धप्रसंगी शस्त्रास्त्रे सहसुलभतेने हाताळता यावीत म्हणून ही काही खास योजना आखण्यात येत असत.[६]

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात किल्ल्यांना महत्त्व आले. महाराष्ट्रात शिवपूर्व काळापासून आदिलशाही आणि निजामशाही राजवटीमध्ये अनेक जहागिरदारांनी आपल्या संरक्षणाच्या दृष्टीने गढ्यांची उभारणी केलेली होती. गढी म्हणजे छोटासा किल्लाच असल्यामुळे यावर जहागीरदारांची पूर्ण सत्ता असे. धामधुमीच्या काळात हे जहागीरदार संस्थानिकांप्रमाणे स्वतंत्र वृत्तीने वागत. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेचा उपक्रम हातात घेतल्यावर अनेक जहागीरदारांनी महाराजांच्या मार्गात अडथळे आणण्याचा प्रयत्न सुरू केला होता. या जहागिरदारांचे सामर्थ्य गढ्यांमध्ये आहे हे शिवाजीराजांनी ओळखले होते. म्हणून जहागीरदारांनी वाडे / हुडे बांधू नये असा फतवा काढला होता. तसेच जमिनदारांनाही वाडे बांधू नयेत यासाठी प्रयत्न केले.[७]

दक्षिणेत मुघलांचे वर्चस्व निर्माण झाल्यावर औरंगजेबाच्या काळात त्याच्या लष्करी डावपेचातील महत्त्वाचा घटक म्हणजे एखादा प्रदेश ताब्यात आला की, त्याच्या बंदोबस्तासाठी मुघल सरदार तेथे लष्करी ठाणी कायम करीत. ठाण्यात पडकी गढी असल्यास ती दुरुस्त करीत नसल्यास नवी गढी बांधून काढीत. पुढे छत्रपती राजारामांच्या काळात वतनव्यवस्थेमुळे गढ्यांची निर्मिती होऊ लागली. पेशव्यांच्या काळात हीच परिस्थिती कायम होती. गढीमध्ये लपून राहण्याच्या सरदार उमराव यांच्या वृत्तीचा छत्रपती शाहूंनी धिक्कार केला आहे. पेशव्यांची गढी शनिवारवाडा बांधण्यास त्यांनी तीव्र आक्षेप घेतला. त्यांची विशेष परवानगी घेऊनच

शनिवारवाड्याचे बांधकाम पूर्ण करण्यात आले होते. महाराष्ट्रातील अनेक ऐतिहासिक गढ्यांच्या नोंदी इतिहासात आहेत. सन १६६५ ते १७०० या काळात राव जगदेव याने पळसखेड, तुळजापूर, जानेफळ (जि. उस्मानाबाद) येथे गढ्या बांधल्या. मुघल दरबाराच्या बातमीपत्रात महाराष्ट्रातील फलटण, पालम (जि. परभणी), मंगळवेढा (जि. सोलापूर), खडकवासला (जि. पुणे), आष्टा (जि. उस्मानाबाद), नळेगाव (जि. लातूर) येथील गढ्यांच्या नोंदी आढळतात. सन १६६० मध्ये शाहीस्तेखानाच्या सैन्यास चाकण येथील गढीवजा किल्ल्याने छप्पन दिवस लढा दिला होता. फ्रेंच गव्हर्नर मार्टिन याने १६९१ मध्ये पाँडिचेरीहून सुरतपर्यंत प्रवास केला. त्याच्या प्रवासवर्णनात मराठवाडा व खानदेशमधील अनेक गढ्यांचा उल्लेख आहे. औरंगाबाद ते बिदर या प्रदेशात बंदिस्त गढ्यांची गावे सोडल्यास सगळा प्रदेश उद्ध्वस्त दिसत होता. शिवाजी महाराजांनी कर्नाटक मोहिमेत छत्रपती शिवाजीराजांनी शेरखान लोदीशी लढताना ३० जून १६७९ पर्यंत वालदोरे, देवनापट्टण व इतर गढ्या ताब्यात घेतल्या होत्या. मराठे व निजाम यांच्यातील १७६० मध्ये झालेल्या उदगीरच्या लढाईचा तह तांदुळजा (जि. लातूर) येथील गढीमध्ये झाला होता. इ.स. १७९५ मध्ये मराठे व निजाम यांच्यातील संघर्षात निजामाने निंबाळकरांच्या खडी (जि. नगर) येथील गढीवजा किल्ल्यात आश्रय घेतला होता.[८]

संशोधन विषयाचे महत्त्व आणि विषय निवड :

मध्ययुगीन काळात मराठे आणि मोगल यांच्यात कित्येक वर्षे मोठ्याप्रमाणात संघर्ष चालू होता. या संघर्षाचा पहिला बळी गावातील वतनदार हा ठरे. या वतनदारांनी स्वत:च्या रक्षणासाठी गढ्यांची निर्मिती केली. गिरीदुर्ग नव्हते तेथे भुईकोट किल्ले बांधण्यात आले. भुईकोट किल्ला बांधण्यासाठी मोठी जागा आणि त्याचा खर्चही मोठ्या प्रमाणात येई. हा खर्च केवळ काही जहागिरदार आणि सरदारच करू शकत होते. या दोन्हीतील मधला मार्ग म्हणजे गढीची निर्मिती झाली. गढी ही किल्ल्यासारखीच असे; पण तिचे स्वरूप लहान असे. वतनदार हा गढीत किंवा वाड्यात राहत असे. मध्ययुगात अशा शेकडो गढ्या व वाडे महाराष्ट्रात निर्माण झाले. ब्रिटिशकाळानंतर मात्र या गढ्यांच्या दुर्दैवावस्थेला सुरुवात झाली. नवीन शस्त्रास्त्रांपुढे या

गढ्यांचा टिकाव लागणे शक्य नव्हते. त्याचप्रमाणे ब्रिटिशांची ताकद एवढी मोठी होती की, तेथील लहान सत्तेला पुन्हा डोके वर काढू देणे शक्य नव्हते. त्यामुळे या गढ्यांचे व वाड्यांचे महत्त्व संपुष्टात आले. आज जरी या गढ्यांचे महत्त्व संपुष्टात आले तरी मध्ययुगात मात्र या गढ्यांनी व वाड्यांनी महाराष्ट्राची अस्मिता जपण्यास फार मोठा हातभार लावला. शत्रूचा प्रतिकार करण्याकरिताही काही प्रमाणात गडी, वाड्यांचा उपयोग झाला. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याचे साम्राज्यात रुपांतर झाले. त्यांच्या या स्वराज्यनिर्मितीच्या प्रशासनातील कामासाठी महाराष्ट्रातील अनेक मातब्बर घराण्यांचे योगदान आहे.

अशा पुरातन गढी, वाड्यांमध्ये इतिहासाचे अवशेष दडलेले आहेत; परंतु त्या त्या घराण्यांचे वंशज आज गढी, वाड्यात वास्तव्याला आहेत. अशा अनेक वास्तू बऱ्या वाईट स्वरुपात आपले अस्तित्व टिकवून आहेत. त्यात काही भुईकोट आहेत, काही वाडे आहेत, तर काही गढ्या आहेत. सध्या यातील काही वास्तू बऱ्यापैकी अवस्थेत टिकून आहेत. या गढ्या व वाड्यांनी इतिहास पाहिला, इतिहास घडविला आणि इतिहास जपला देखील. कारण आजही काही गढ्या व वाड्यांमधून ऐतिहासिक कागदपत्रे पाहावयास मिळतात.

या गढ्या व वाड्यांच्या अभ्यासातून मध्ययुगीन काळातील राजकीय, सामाजिक, आर्थिक परिस्थिती उजेडात येईल. तसेच मध्ययुगीन काळातील स्थापत्यशास्त्राच्या दृष्टीकोनातून गढ्या व वाड्यांचे वास्तूशास्त्र तसेच उपयोजन यांच्यावर प्रकाश टाकणे गरजेचे आहे. म्हणून या विषयाची निवड केली आहे.

पूर्व संशोधन :

१) सोलापूर जिल्ह्याचा इतिहास, मराठा कालखंड (इ.स. १६०० ते इ.स. १८५०) हे गोपाळराव देशमुखांच्या ग्रंथामध्ये सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन काळातील घराणी, ऐतिहासिक लढाया तसेच सोलापूर जिल्ह्यातील ऐतिहासिक गावांची माहिती मिळते. या गोपाळराव देशमुखांच्या ग्रंथामध्ये सोलापूर जिल्ह्यात असणारे जहागिरदार व वतनदार यांच्या इतिहासाची माहिती मिळते. तसेच सोलापूर जिल्ह्याशी संबंधित बादशहाकालीन,

शिवकालीन, पेशवेकालीन, निजामकालीन विविध घटना यांची माहिती या ग्रंथातून मिळते.

२) डॉ. स्वराली कुलकर्णी यांचा सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन ऐतिहासिक स्मारकांचा टिकात्मक अभ्यास '१२०६-१८१८', सोलापूर विद्यापीठ, सोलापूर, जून २००८. या शोधप्रबंधात सोलापूर जिल्ह्यातील ऐतिहासिक मंदिरे, मशिदी, गड, वाडे, किल्ले यावर टिकात्मक अभ्यास केलेला आहे.

३) किल्ले सोलापूर हा डॉ. लता अकलूजकर यांचा ग्रंथ. या ग्रंथामध्ये संपूर्ण सोलापूर किल्ल्याचा इतिहास त्या संबंधीच्या घटना यांची माहिती मिळते. तसेच किल्ल्यामध्ये असणारे शिलालेख, मंदिर, मशीद यांचीही माहिती या ग्रंथाद्वारे उपलब्ध होते. सोलापूर किल्ल्याच्या निर्मितीपासून तो कोणकोणत्या राजकीय व्यक्तींच्या हाती गेला व त्याने कोणता इतिहास घडविला यांची माहिती या ग्रंथातून मिळते.

४) संशोधन तरंग हा आनंद कुंभारांचा ग्रंथ. या ग्रंथामध्ये लेखकाने संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातील शिलालेख व त्यांचे केलेले वाचन पहावयास मिळते. त्यामुळे सोलापूर जिल्ह्याचा इतिहास या ग्रंथातून मिळतो.

५) सोलापूर जिल्ह्यातील वीरगळांचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक दृष्टीने चिकित्सक अभ्यास हा श्री. अनिल खताळ जांभळे यांचा अप्रकाशित शोधप्रबंधात सोलापूर जिल्ह्याचा अभ्यास वीरगळांच्या संदर्भात केलेला आहे.

६) कुडलसंगम (जि. सोलापूर) येथील मंदिर समूह आणि शेजारील जिल्ह्यातील मध्ययुगीन मंदिराचा तौलनिक अभ्यास हा डॉ. संजय गायकवाड यांचा शोधप्रबंध. या संशोधनात सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन कालखंडाचा अभ्यास आहे.

७) वेळापूर येथील मंदिर समूहांचा आणि पुरातत्वीय अवशेषांचा अभ्यास हा श्री. सदाशिव रामचंद्र देवकर यांच्या अप्रकाशित लघुशोधप्रबंधात जिल्ह्याची माहिती मिळते.

८) पेशवेकालीन सोलापूर परगणे- डॉ. विलास निंबाळकर यांचा अप्रकाशित शोधप्रबंध.

यापूर्वी झालेल्या संशोधनात सोलापूर जिल्ह्याच्या इतिहासावर प्रकाश टाकलेला आहे. परंतु सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन काळातील गढ्या, वाडे आणि मध्ययुगीन पुरातत्वीय स्थळांवर क्षेत्रीय पद्धतीने कोणतेही सखोल संशोधन झालेले नाही. त्यामुळे मध्ययुगीन काळातील या गढ्या व वाडे यांचे वास्तुशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करण्यासाठी तसेच मध्ययुगीन काळातील पुरातत्वीय स्थळे प्रकाशात आणण्यासाठी अधिक संशोधनाची गरज आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

१) सोलापूर जिल्ह्याचा मध्ययुगीन इतिहासाचा अभ्यास करणे

२) सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन गढ्या व वाड्यांचे बांधकाम तंत्र व इतिहासाचा अभ्यास करणे

३) गढ्या व वाड्यांचे वास्तूकलेच्या दृष्टीकोनातून ऐतिहासिक महत्त्व प्रकाशात आणणे

४) गढ्या व वाड्यांमध्ये असलेली मंदिरे, मूर्ती, शिल्पे, कागदपत्रे यांचा अभ्यास करणे

५) गढ्या व वाड्यांचे बांधकाम तंत्रांचा अभ्यास करणे

६) सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन काळातील पुरातत्वीय स्थळांचा अभ्यास करणे

संशोधन पद्धती :

संशोधनासाठी संशोधिकेने ऐतिहासिक व पुरातत्त्वीय संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे. पुरातत्त्वीय संशोधन पद्धतीनुसार सर्वेक्षण पद्धतीद्वारे तथ्यांचे संकलन केले गेले आहे. त्यासाठी संशोधन स्थळास प्रत्यक्ष भेट देऊन निरीक्षणे व छायाचित्रीकरणाच्याद्वारे आवश्यक त्या साधनांचे संकलन केले आहे.

या संकलित साधनांच्या तथ्यांचे विश्लेषण करण्यासाठी संशोधिकेने वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. संबंधित विषयाच्या संशोधनासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे त्याचा प्राथमिक साधन म्हणून उपयोग केला आहे. तसेच गढ्या व वाड्यांचे बांधकाम तंत्र व शैली यांचा अभ्यास करण्यासाठी म्हणून दुय्यम साधनांच्या आधारे त्याचे महत्त्व

अधोरेखित केलेले आहे. याकरिता प्राथमिक व दुय्यम स्त्रोत, मुलाखती या आधारे विश्लेषणात्मक, अन्वयार्थ लावण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रबंधाच्या संशोधनासाठी संशोधन पद्धती म्हणून प्रत्यक्ष सर्वेक्षण, मुलाखत व प्रश्नावली द्वारे संशोधन केले आहे. सोलापूर जिल्ह्यातील गढ्या व वाड्यांचे सर्वेक्षण करून त्या ठिकाणी प्रत्यक्ष भेटी दिल्या आणि तेथील लोकांच्या मुलाखती घेतल्या. गढ्या व वाड्यांचे वास्तूशास्त्र, बांधकाम तंत्र, मूर्ती, भांडी किंवा इतर ऐतिहासिक माहितीचा उपयोग संशोधनासाठी केला आहे. वैशिष्ट्यपूर्ण गढ्या व वाड्यांची छायाचित्रे काढून वेगवेगळ्या संदर्भ ग्रंथांच्या आधारे मांडणी केली.

प्रस्तुत शोधप्रबंधात मूळ साधनांमध्ये गढ्या व वाड्यांना प्रत्यक्ष भेट देऊन तेथील वतनदारांच्या मिळालेल्या मूळ कागदपत्रांचा वापर केलेला आहे. पेशवे दप्तर, पुणे, सोलापूर विद्यापीठातील पुरातत्व विभाग, कर्नाटकमधील कर्नाटका विद्यापीठ इ. ठिकाणी भेटी देवून संशोधन साधने मिळविली. तसेच सोलापूर जिल्हा गॅझेटियर, सोलापूर जिल्ह्यातील शिलालेखांचे वाचन केलेले आनंद कुंभारांचे 'संशोधन तरंग' हा ग्रंथ, पुणे येथील टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथालय, सोलापूर येथील दयानंद कॉलेज ग्रंथालय, हिराचंद नेमचंद ग्रंथालय येथून मिळालेल्या संदर्भ ग्रंथांचा आधार या संशोधनासाठी घेतला आहे. तसेच या विषयासंदर्भात अभ्यास करीत असताना इंटरनेट, साप्ताहिके यांचाही आधार घेतला आहे.

सिद्धांत कल्पना :

सदर विषयाच्या संशोधनातून सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन काळातील जहागीरदार व वतनदार यांचे प्रशासनातील स्थान, त्यांची कामे आणि त्यांनी बांधलेल्या गढ्या व वाडे यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. गढ्या व वाड्यांचा बांधकामतंत्राच्या आधारे निरीक्षण करून लष्करी दृष्टीकोनातून, वास्तूशास्त्रीय दृष्टीकोनातून त्यांचे महत्त्व यावर प्रकाश टाकणे, सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन काळातील पुरातत्वीय स्थळे प्रकाशित आणणे, गढ्या व वाड्यांच्या बांधकाम तंत्राचा सध्याच्या जीवनामध्ये होणारा उपयोग यावर संशोधन केलेले आहे.

संशोधनाच्या मर्यादा :

- सदरहू संशोधन सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन इतिहासातील गढ्या, वाडे आणि पुरातत्त्वीय स्थळांशी संबंधित आहेत.
- मध्ययुगीन काळातील गढ्या, वाडे हे कालसापेक्ष नष्ट होत चालले असल्याने त्यांचे संबंधित कागदपत्रे व पुरातत्त्वीय अवशेष प्राप्त होणे जिकीरीचे होत आहे. त्यामुळे संशोधनास मर्यादा निर्माण होतात.

प्रबंधातील प्रकरणांची रुपरेषा :

प्रबंधातील प्रकरणांच्या रुपरेषेचा विचार केला असता प्रस्तूत प्रबंध हा सहा प्रकरणात विभागलेला असून प्रबंधाच्या सुरुवातीस प्रस्तावना आणि संशोधन आराखडा स्पष्ट केला आहे.

प्रकरण १ ले

सोलापूर जिल्ह्याची भौगोलिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी :–

महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्हा हे ऐतिहासिक ठिकाण आहे. मोहोळ तालुक्यातील कामती खुर्द येथे एक संस्कृत शिलालेखात इ. स. १२३८ या वर्षातील असून त्यामध्ये सोलापूर शहराचे नाव सोनालीपूर असे आहे. त्यानंतर यादवांच्या राजवटीत सोलापूरचा संदलापूर असा उल्लेख आढळतो.

सोलापूर जिल्ह्यात एकूण अकरा तालुके आणि ११५० खेडी आहेत. सोलापूरातून वाहणारी मुख्य नदी म्हणून भीमा नदीस महत्त्वाचे स्थान आहे. प्राचीन व मध्ययुगीन कालखंडातील सोलापूर जिल्ह्यातील ऐतिहासिक गढ्या, वाडे आणि पुरातत्वीय स्थळांचा अभ्यास करताना सोलापूर जिल्ह्याची आणि जिल्ह्यातील महत्त्वपूर्ण असलेल्या तालुक्यांची भौगोलिक पार्श्वभूमी अभ्यासले आहे.

सोलापूर हे धार्मिक क्षेत्र म्हणूनही ओळखले जाते. ग्रामदैवत म्हणून श्री सिद्धरामेश्वरांना मानले जाते. तसेच सोलापूर जिल्ह्यात पंढरपूर, अक्कलकोट, अरण, माढा, इ. ठिकाणे धार्मिक क्षेत्र म्हणून ओळखली जातात.

प्राचीन काळापासून ते आधुनिक कालखंडापर्यंत सोलापूरचा इतिहास हा खूप मोठा आहे. सोलापूरचा भुईकोट किल्ला सोलापूरच्या राजकीय इतिहासात महत्त्वाची भूमिका बजावत आलेला आहे. सोलापूर भागात प्राचीन काळात सातवाहनांनी दीर्घकाळ राज्य केले. तसेच त्यानंतर वाकाटक, राष्ट्रकूट, चालुक्य यांनीही सोलापूरवर राज्य केले.

मध्ययुगीन कालखंडात सोलापूरचा प्रदेश कधी आदिलशाहीकडे तर कधी निजामशाहीकडे गेला. मोगल बादशहा औरंगजेब यांचा आणि सोलापूरचा संबंध कित्येक वर्षे होता. सोलापूर शहरात बादशहा औरंगजेबकालीन दर्गा व मशिद इतिहासाची साक्ष देतात.

त्यानंतर पेशव्यांच्या काळात सोलापूरच्या भुईकोट किल्ल्यात अनेक राजकीय हालचाली घडून आल्या होत्या. मराठी सत्तेचा शेवट घडवून आणणारे मराठा–इंग्रज यांच्यातील तिसरे युद्ध सोलापूर जिल्ह्यात मोहोळ तालुक्यात आष्टी येथे घडून आले होते. सोलापूर जिल्ह्याला ऐतिहासिक राजकारणात महत्त्वाचे स्थान आहे.

प्रकरण २ रे

मध्ययुगीन काळातील वतनदारी पद्धती आणि सोलापूर जिल्ह्यातील जहागिरदार आणि वतनदार:–

मध्ययुगीन केंद्रीय प्रशासनामध्ये वतनदारी पद्धती महत्त्वाची होती. मुस्लिम राजवटीत वंशपरंपरेने जहागिरदारी दिली जात होती. छत्रपती शिवाजी महाराजांचा वंशपरंपरागत वतने देण्यास विरोध होता. कारण शिवाजी महाराजांच्या मते जहागिरदार किंवा वतनदार आपल्या सामर्थ्याच्या जोरावर राजेरजवाड्यांनाही विरोध करण्यास घाबरत नसत. म्हणून त्यांचे महत्त्व कमी करणे शिवाजी महाराजांना आवश्यक वाटत होते.

परंतु त्यानंतरच्या काळात उदाहरणार्थ शाहू महाराजांच्या काळात पुन्हा वतनदारी दिली जावू लागली. त्यावेळी महाराष्ट्रात अनेक वतनदार निर्माण झाले होते. सोलापूर जिल्ह्यात ता. मोहोळ येथील गायकवाड–देशमुख, वाघमारे–देशमुख हे दोन वतनदार होते. तसेच भाळवणीचे (ता. पंढरपूर) येथील नाईक–निंबाळकर, ता. माढा येथील रावरंभा निंबाळकर, वैराग (ता. बार्शी) येथील दर्याबाई निंबाळकर आणि नाईक निंबाळकर, ता. मंगळवेढा येथील गोविंद पटवर्धन, धामणगांव, ता. बार्शी येथील माणकेश्वर बोधले, ता. अक्कलकोट येथील फत्तेसिंग भोसले, कासेगाव (ता. पंढरपूर) येथील गोदाजी देशमुख यासारखे वतनदार मराठेकालीन राजकारणात सक्रिय होते.

केंद्रीय प्रशासनात जहागिरदार व वतनदारांबरोबरच ग्राम प्रशासनात देशमुख, देशपांडे, पाटील, चौगुले, अलुतेदार व बलुतेदारांना महत्त्व होते. खेडी ही स्वयंपूर्ण होती. त्यामुळे खेड्यांमध्ये वाड्यांची निर्मिती झाली.

प्रकरण ३ रे

सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन काळातील गढ्या :–

मराठेकालीन लष्करविषयक शिल्पकलेचा विचार करताना मध्ययुगीन काळात बांधलेल्या गढ्यांचा अभ्यास केला आहे. गढी म्हणजे मध्ययुगीन जहागिरदार व वतनदार यांच्या राहण्यासाठी व संरक्षणासाठी बांधलेली भुईकोट किल्ल्यासारखी वास्तू होय. भुईकोट गढीच्या संरक्षणासाठी बाहेरील बाजूला किल्ल्याप्रमाणेच उंच दगडी भिंत, काही वेळा विटाची तटबंदी, खंदक व भक्कम दरवाजे बांधलेले असतात. गढीचा आकार जेवढा जास्त तेवढी गढीच्या मालकाचे सामर्थ्य किंवा शक्ती जास्त असे. गढीमध्ये निवासस्थान हे जरी मुख्य असले तरी त्यामध्ये जहागिरीच्या प्रशासनाची व लष्करविषयक अनेक कामे केली जात असत. गढीमध्ये राहणारे जहागिरदार संस्थानिकांप्रमाणे स्वतंत्र वृत्तीने वागत असत. छत्रपती शिवाजी महाराजांनी जहागिरदारांना आणि वतनदारांना गढ्या, वाडे बांधण्यास विरोध दर्शविला होता.

गढीची वैशिष्ट्ये म्हणजे गढीला असणारी तटबंदी, बुरुज, गढीचे प्रवेशद्वार, जंग्या, धान्याची कोठारे, टेहळणीची जागा, पाणी पुरवठ्यासाठी असणाऱ्या बारव, तळघरे, इत्यादी होय.

या प्रकरणात सध्या सुस्थितीत असणाऱ्या खालील गढ्यांचा अभ्यास केलेला आहे.

१) मोहोळ येथील उदयसिंग गायकवाड–देशमुख यांची गढी.

२) कासेगाव (ता. पंढरपूर) येथील गोदाजी देशमुखांची गढी.

३) मंगळवेढा येथील पटवर्धनांची गढी.

४) बार्शी येथील देशपांडे यांची गढी.

५) धामणगाव (ता. बार्शी) येथील माणकेश्वर बोधले यांची गढी.

६) मोहोळ (ता. मोहोळ) येथील बाळासाहेब वाघमोडे–देशमुख यांची गढी.

७) माढा (ता. माढा) येथील रावरंभा निंबाळकरांची गढी.

८) अक्कलकोट (ता. अक्कलकोट) येथील फत्तेसिंग भोसले यांची गढी.

९) पिलिव (ता. करमाळा) येथील जहागिरदारांची गढी.

या गढ्यांना प्रत्यक्ष भेटी देवून तेथील लोकांच्या मुलाखती घेतल्या. त्यांच्याकडे असणाऱ्या वंशावळी, पारंपारिक सण–उत्सव, भांडी, वस्त्रे यांचे फोटो घेतले. गढ्यांचे फोटो व वास्तूशास्त्र यांचा निरीक्षणात्मक अभ्यास केला.

प्रकरण ४ थे

सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन वाडे :–

एखाद्या राज्याची भरभराट ओळखण्याचे साधन म्हणून विविध कलांच्या विकासाकडे पाहिले पाहिजे. मराठेशाहीत शिल्पकला, संगीत, चित्रकला या कला गुणांबरोबरच नगररचना, घरे, राजवाडे, बागा, कारंजे, बारव इत्यादींचीही वैशिष्ट्यपूर्ण रचना झालेली दिसून येते. मराठेकालीन वाड्यांची वैशिष्ट्यपूर्ण रचना आढळून येते. वाड्याचा आकार हा वाड्यात असणाऱ्या चौकांवर अवलंबून असतो. वाड्यात मुख्य प्रवेशद्वारालगत ओसरी, त्यानंतर दिवाणखाना, दरबार हॉल, रंग

महाल, वैशिष्ट्यपूर्ण खांबाची रचना करुन छप्पर, खिडक्या यांचे बांधकाम दिसून येते. वाड्यांमध्ये नक्षीकामासाठी लाकूड तसेच चुन्याचाही वापर केलेला दिसून येतो.

या प्रकरणात सध्या सुस्थितीत असणाऱ्या खालील वाड्यांचा अभ्यास केलेला आहे.

१) पंढरपूर (ता. पंढरपूर) येथील अहिल्याबाई होळकर यांचा वाडा.

२) कोरफळ (ता. बार्शी) येथील श्री. मार्तंडराव सिद्धेश्वर हागरे यांचा वाडा.

३) टेंभुर्णी (ता. माढा) येथील सदाशिव माणकेश्वर देशपांडे यांचा वाडा.

४) मोडनिंब (ता. माढा) येथील गोपाळराव पटवर्धन यांचा वाडा.

५) भाळवणी (ता. पंढरपूर) येथील नाईक–निंबाळकरांचा वाडा.

६) सोलापूर येथील देशमुख यांचा वाडा.

७) वैराग (ता. बार्शी) येथील धोंगडे यांचा वाडा.

८) पंढरपूर येथील शिंदे सरकार यांचा वाडा.

९) पंढरपूर येथील शंकरराव सुरवसे यांचा वाडा.

या प्रकरणात वरील वाड्यांना प्रत्यक्ष भेटी देवून तेथील वाड्यांच्या मालकांच्या मुलाखती घेतल्या. तेथील वाड्यांची फोटोग्राफी करुन निरीक्षणात्मक अभ्यास केला.

प्रकरण ५ वे

सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन पुरातत्वीय स्थळे :–

पुरातन मानवी संस्कृतीचा अभ्यास म्हणजेच पुरातत्त्वशास्त्र होय. मानवाचे दैनंदिन व्यवहार, त्याचे सामाजिक संबंध, त्याने निर्माण केलेल्या वस्तू आणि वास्तू या सर्वांचा अभ्यास पुरातत्त्वशास्त्र करते. भारतामध्ये अश्मयुगापासून (नवाश्मयुग, ताम्रपाषाण युगातील) मानवी जीवनाचा पुरावा सापडतो. त्याप्रमाणे महाराष्ट्रातही अनेक प्राचीन संस्कृतीचा शोध लागलेला आहे.

सोलापूर जिल्ह्यात सोलापूर विद्यापीठ आणि डेक्कन कॉलेज, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने मुंडवी, सिद्धापूर, वाकाव, कारकल, इ. ठिकाणी उत्खनने झालेली आहेत. या उत्खननात वेगवेगळ्या संस्कृतीचे अवशेष मिळालेले आहेत.

अशाच प्रकारची मध्ययुगीन काळात अस्तित्वात असलेले परंतु सध्या त्याचे रुपांतर पांढऱ्या मातीच्या टेकाड्यात झाले आहे. अशा स्थळांचा अभ्यास या प्रकरणात केला आहे.

छत्रपती शाहू महाराजांच्या घराण्यातील दर्याबाई निंबाळकर यांच्या काळात सुरडी, पानगाव येथे ज्या गढ्या बांधल्या होत्या, त्याचे रुपांतर सध्या पांढऱ्या मातीच्या टेकाड्यासारखे झालेले आहे. तसेच गुरसाळे (ता. पंढरपूर) येथील कवडे घराण्याची गढी हे एक पुरातत्त्वीय स्थळ आहे. येथील उत्खनन झाल्यास गढीचा संपूर्ण तळभाग (Ground Plan) तसेच भुयारी मार्ग आढळून येईल.

तसेच आष्टी (ता. मोहोळ) येथील येवती तलावात जिथे इंग्रज–मराठा यांची शेवटची लढाई होवून मराठी सत्तेचा शेवट झाला, तिथे आजही विहिरीचे खोदकाम चालू असताना शस्त्रे सापडतात.

अशा ठिकाणांचा अभ्यास या प्रकरणात केलेला आहे. या ठिकाणी मध्ययुगीन इतिहासाची साधने मिळू शकतात.

प्रकरण ६ वे

उपसंहार

मध्ययुगीन इतिहासात ज्या गढ्या निर्माण झाल्या त्या गढ्यांना राजकीय इतिहासात तर स्थान आहेच, परंतु सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक इतिहासातही यांना महत्त्व आहे. सामान्य जनता किंवा रयत आणि गढी यांचे एक नातं असे. परगण्यामध्ये जे काही सण उत्सव साजरे केले जात असत, त्यावेळी या वतनदारांना मोठा मान असे. गढ्यावर किंवा वाड्यावर गुढीपाडव्याला, पंचमीला मोठे सण साजरे केले जात असत, त्यावेळी गावातील लोकांना निमंत्रण असे, जेवणही दिले जात असे. त्यामुळे गढीमालक किंवा जहागिरदार–वतनदार यांचा प्रत्यक्ष प्रजेशी संबंध येत असे. केंद्रीय प्रशासनामध्ये महसूल वसूलीचे काम करणारा या वतनदार वर्गावर समाजाची आर्थिक परिस्थितीही अवलंबून असे. काही वेळेला दुष्काळ पडे किंवा इतर आपत्तींमुळे शेतीतील उत्पादने घटली तर जमीनमहसूलामध्ये सूट देण्याचा अधिकार त्यांना होता. त्यामुळे प्रजेची आर्थिक

परिस्थिती या वतनदारांच्या धोरणांवर अवलंबून होती. त्यामुळे गढ्यांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय जीवनात स्थान होते.

मध्ययुगीन काळात न्यायव्यवस्थेचे महत्त्वाचे काम जहागिरदार व वतनदार करत होते. गढी किंवा वाड्यामध्येच कचेरी असे. त्यामध्ये न्यायदानाचे काम चालत असे. त्यामुळे समाजातील तंटे सोडवून शांतता प्रस्थापित करण्याची जबाबदारी जहागिरदार व वतनदार यांच्यावर होती. अर्थातच गढी व वाडे हे स्थानिक कोर्टच होते.

आर्थिक बाबींचा विचार करता शेती महत्त्वाची होती. वतनदार हे जमीन महसूल गोळा करीत असत आणि त्याद्वारे प्रशासन चालवित असत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या अडी–अडचणी व त्यांचे शत्रूपासून संरक्षण तसेच दुष्काळ यासारख्या अडचणींच्या वेळी शेतकऱ्यांना संरक्षण देण्याची जबाबदारी ही या वतनदारावरच असे. आर्थिक परिस्थितीमध्ये व्यापारी, सावकार यांनाही महत्त्व होते. वैराग, ता. बार्शी येथील धोंगडे व्यापारी यांनी अनेकांना कर्जपुरवठा केलेला दिसून येतो.

स्वातंत्र्योत्तर काळात वतनदारांचे हक्क संपुष्टात आल्यामुळे त्यांच्या उत्पन्नाची साधने कमी झाल्यामुळे, गढीतील वारसदारांकडे ऐतिहासिक दृष्टीचा अभाव असल्यामुळे या गढ्या नष्ट होत चालल्या आहेत. काही वतनदारांच्या वारसदारांची अवस्था दयनीय झाल्याने त्यांनी गढ्या विकल्या, काहींनी गढीची माती विकली तर काही वारसदार नोकरीसाठी शहरांकडे निघून गेले. तसेच भाऊबंदकीमुळे, वाटण्यांमुळे अनेक गढ्या नष्ट झालेल्या आहेत. या मोठ्या वास्तूंचा देखभालीचा खर्च जास्त असल्याने त्याकडे दुर्लक्ष केले जाते. मध्ययुगीन काळातील अनेक ऐतिहासिक घटनांचे साक्षीदार असलेल्या या गढ्या काळाच्या ओघात नष्ट होत आहेत. त्यांचे संवर्धन होणे गरजेचे आहे. अशा ऐतिहासिक घटनांची साक्षीदार असलेल्या गढींकडे शासनानेही जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

संदर्भ :-

१) मराठी विश्वकोश (खंड १६), महाराष्ट्र राज्य निर्मिती मंडळ, मुंबई, लेख व आयडी ९९९०, पृ.क्र. ३.

२) शिवदे सदाशिव, महाराष्ट्रातील ऐतिहासिक वाडे (वास्तू आणि इतिहास), भाग पहिला, स्नेहल प्रकाशन, पुणे, २०१३, पृ. क्र. ७.

३) शर्मा श्याम, प्राचीन भारतीय कला, वास्तुकला एवं मूर्तिकला, रिसर्च पब्लिकेशन्स, जयपूर, २०१२, पृ. क्र. २.

४) माटे म. श्री., प्राचीन भारतीय कला, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पृ. क्र. ९.

५) जामखेडकर अ. प्र., महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर (महाराष्ट्र; इतिहास- प्राचीन काळ), खंड-१, भाग-२, स्थापत्य व कला, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९६७, २००२, पृ. क्र. २२१.

६) गायकवाड, सरदेसाई, थोरात, हनमाने, मराठेकालीन संस्था व विचार, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९०, पृ. क्र. ४२३.

७) पुरी सुनिल, लेख- सैनिकी वास्तूशास्त्र गढी, साप्ताहिक विवेक, पृ.क्र. २, शनि ८ मार्च २०१४, http://www.evivek.com/home/25mar2012/iekh006.html.

८) कित्ता, पृ.क्र. ४.

प्रकरण १ ले

सोलापूर जिल्ह्याची भौगोलिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी

प्रास्ताविक :

महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्हा हे ऐतिहासिक ठिकाण आहे. तब्बल दोन हजार वर्षांचा इतिहास असलेल्या या शहरात बहुभाषिक लोक राहतात. पूर्वेस आंध्र, दक्षिणेला कर्नाटक त्यामुळे कन्नड, तेलुगु या भावांचे आदानप्रदान सोलापुरात मोठ्याप्रमाणात होत आहे. मंगळवेढ्याचा कर्नाटकाशी काहीएक वेगळा संबंध सिद्धेश्वरांच्या अनुषंगाने येतो. आध्यात्मिक क्षेत्रात वारकरी व नागेश सांप्रदायांची भूमी म्हणून सोलापूर क्षेत्राची ओळख १२ व्या शतकापासूनची आहे. १८ व्या शतकापासून गिरणगाव अशी ओळख झाल्याने व्यापार, उद्योग, काम यादृष्टीने कर्नाटक, आंध्रप्रदेशात सोलापूरचे आकर्षण दिसून येते, ही सोलापूरची अत्यंत ओझरती ओळख. या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्हा परिसरातील गढी, वाड्याचा अभ्यास करणे अपेक्षित होते. तो नीट व्हावा, याकरिता सोलापूर जिल्ह्याची भौगोलिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी येथे बघावयाची आहे. आठशे वर्षांपासून आध्यात्मिक परंपरेचा वारसा जपणारे श्री सिद्धरामेश्वर मंदिर शहराच्या पुरातत्त्वाची साक्ष देत उभे आहे.

सोलापूर नावाचा इतिहास :

काही संशोधकांच्या मते सोलापूर जिल्ह्याचे नाव हे समूहवाचक आहे म्हणजे सोळा गावांनी मिळून सोलापूर हे नाव तयार झाले आहे. त्यांची नावे पुढीलप्रमाणे अशी आहेत. १) अहमदपूर २) अदिलापूर ३) चमलादेव ४) फत्तेपूर ५) जामदारवाडी ६) शेकपूर ७) सोलापूर ८) सोन्नलगी ९) सोनापूर १०) काळजापूर ११) खादरपूर १२) खंडेराववाडी १३) महमदपूर १४) राणापूर १५) संदलापूर १६) वैद्यवाडी.[१]

तर काही संशोधकांच्या मते सोन्नलगीचे अपभ्रंश होवून सोन्नलापूर व पुढे सोलापूर असे झाले असावे. शिवयोगी श्री सिद्धेश्वर महाराजांच्या काळात या शहराचे नाव सोन्नलगी होते. हे नाव

यादवांच्या राजवटीपर्यंत रूढ होते. मोहोळ तालुक्यातील कामती खुर्द येथे एक संस्कृत शिलालेख आहे. तो इ.स. १२३८ या वर्षातील असून त्यामध्ये सोलापूर शहराचे नाव *सोनालीपूर* असे दिसून येते. मध्ययुगीन काळात यादवांच्या राजवटीच्या अस्तानंतर मुस्लिम काळात सोलापूर या शहराचे संदलपूर हे नाव होते. त्यानंतर पुढे सोलापूर हे नाव रुढ झाले.[२]

सोलापूर जिल्ह्याचे भौगोलिक स्थान :

प्राचीन व मध्ययुगीन कालखंडातील सोलापूर जिल्ह्यातील ऐतिहासिक गढ्या, वाडे आणि पुरातत्वीय स्थळांचा अभ्यास करताना सोलापूर जिल्ह्याची आणि जिल्ह्यातील महत्त्वपूर्ण असलेल्या तालुक्यांची भौगोलिक पार्श्वभूमी अभ्यासणे गरजेचे ठरते. कोणत्याही कालखंडातील इतिहासाचा अभ्यास करीत असताना त्यावेळेची भौगोलिक पार्श्वभूमी अभ्यासल्याशिवाय इतिहासाचे खरे दर्शन घडत नाही. सोलापुरातील ऐतिहासिक घटनांच्या मागे काही महत्त्वपूर्ण प्रसंगाच्या मागे, तसेच काही व्यक्तींच्या कार्याच्यामागे सोलापूरच्या भौगोलिक परिस्थितीचा चांगलाच हातभार लागल्याचे दिसते. इतिहास आणि भूगोल हे दोन्ही विषय एकमेकांना साहाय्य करणारे विषय म्हणून समाजशास्त्राच्या कक्षेत अभ्यासले जातात. अनेक ऐतिहासिक घटनांवर नैसर्गिक परिस्थितीचा परिणाम झाल्याचे स्पष्ट होते. म्हणूनच इतिहासाच्या सहाय्यकारी शास्त्रामध्ये भूगोलास महत्त्वाचे स्थान मिळते. सध्याचा सोलापूर जिल्हा हा पूर्वी नगर, पुणे व सातारा या जिल्ह्यांचा भाग होता. सन १८३८ मध्ये तो अहमदनगरचा उपजिल्हा बनला. त्यामध्ये बार्शी, मोहोळ, माढा, करमाळा, इंडी, हिप्परगा व इतर उपविभागांचा समावेश होता. सन १८६४ मध्ये हा उपजिल्हा नष्ट झाला. सन १८७१ मध्ये हा जिल्हा पुन्हा नव्याने निर्माण केला.[३] त्यामध्ये पुढील उपविभागांचा समावेश होतो: सोलापूर, बार्शी, मोहोळ, माढा, करमाळा, सातारा या जिल्ह्यातील दोन उपविभाग पंढरपूर आणि सांगोला. पुढे १८७५ ला माळशिरस हा उपविभाग जोडला गेला. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सन १९५६ मध्ये राज्य पुर्नरचनेनुसार सोलापूर हे मुंबई राज्यात समाविष्ट केले गेले व नंतर १९६० मध्ये संयुक्त महाराष्ट्रातील एक प्रमुख जिल्हा म्हणून सोलापूर जिल्हा उदयास आला. सोलापूर शहर हे दोन तालुक्यांचे मुख्यालय आहे. उत्तर

सोलापूर आणि दक्षिण सोलापूर तहसील कार्यालय कामकाजाचे मुख्य केंद्र आहे. १ मे १९६४ रोजी सोलापूर महानगरपालिकेची स्थापना करण्यात आली.[४]

सोलापूर हे शहर १७°१०′ व १८°३२′ या उत्तर अक्षांशावर व ७४°४२′ व ७६°१५′ या पूर्व रेखांशावर वसलेले आहे. महाराष्ट्र, आंध्रप्रदेश आणि कर्नाटक या तीन राज्यांना जोडणारा समान दुवा म्हणजे सोलापूर. राष्ट्रीय महामार्ग क्र. एन.एच. ५६, एन.एच. १३ आणि एन.एच. २२१. हे महामार्ग सोलापूर शहरामधूनच जातात. सोलापूर शहराच्या आसपास अहमदनगर, हैद्राबाद, विजापूर, सातारा हे प्रदेश येतात. या जिल्ह्याची विभागणी एकूण ११ तालुक्यामध्ये झालेली आहे. ते पुढीलप्रमाणे आहेत : १) अक्कलकोट २) करमाळा ३) पंढरपूर ४) बार्शी ५) माढा ६) माळशिरस ७) मंगळवेढा ८) मोहोळ ९) सांगोला १०) उत्तर सोलापूर ११) दक्षिण सोलापूर.

सोलापूर जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ १४,८४४.६० चौरस किलोमीटर आहे आणि सोलापूर शहराचे क्षेत्रफळ १,७८५ चौरस किलोमीटर असून महाराष्ट्राचा विचार करता सोलापूरचे क्षेत्रफळ ४.८% आहे व करमाळा (१९०६.७ चौरस किलोमीटर) हा सर्वात मोठा तालुका आहे तर उत्तर सोलापूर (७३६.३ चौरस किलोमीटर) हा सर्वात लहान तालुका आहे. सोलापूर जिल्ह्यात ११ तालुके, ११५० खेडी व १०२८ ग्रामपंचायती आहेत.

सोलापूर जिल्ह्याच्या उत्तरेला– अहमदनगर व उस्मानाबाद, पूर्वेला– गुलबर्गा (कर्नाटक), उत्तर पश्चिमेला– पुणे, सातारा हे जिल्हे आहेत. सोलापूर जिल्हा हा सरहद्दीवरचा जिल्हा असल्यामुळे मराठी, कानडी, तेलुगु व हिंदी या भाषांचा उपयोग करणारे लोक येथे एकत्र राहतात. त्यामुळे मराठी, कानडी व तेलगु भाषिकांचा आणि त्यांच्या भिन्न संस्कृतींचा येथे संगम झालेला आहे. संस्कृतींचा संकर असल्याने अनेक प्रकारचे उत्सव, सणावारांसह खाद्यसंस्कृतीतही वैविध्य आढळून येते.

सोलापूर जिल्ह्यातून वाहणारी मुख्य नदी म्हणून भीमा नदीस महत्त्वाचे स्थान आहे. ती पुणे जिल्ह्यात भीमाशंकर येथे उगम पावून पुणे, अहमदनगर या जिल्ह्यातून वाहत सोलापूरमधून पुढे कर्नाटकमध्ये कृष्णेला जावून मिळते.

महाराष्ट्र–कर्नाटक राज्याच्या सरहद्दीवर सोलापूर जिल्हा बसला आहे. सोलापूर जिल्हा हा एका विस्तीर्ण पठारावर आहे. त्यातील बार्शी तालुक्याचा वायव्य भाग, माळशिरस तालुक्याचा ईशान्य भाग आणि करमाळा तालुका हे डोंगराळ आहेत. उरलेला जिल्ह्याचा सर्व प्रदेश सपाट आहे. तसेच सोलापूर जिल्ह्यात उजनी धरणातूनही पाणीपुरवठा होतो. हे धरण सोलापूरसाठी वरदायिनी ठरले आहे.[५]

जिल्ह्याचे हवामान सामान्यत: मार्च ते जून महिन्यात उष्णता वाढते. सोलापूर जिल्ह्याचे उन्हाळ्यामध्ये तापमान ४३° सें. पर्यंत वाढते तर हिवाळ्यामध्ये १३° सें. पर्यंत जाते. अशा भौगोलिक परिस्थितीमुळे उन्हाळा व हिवाळा हे दोन्ही ऋतु कडक असतात. सोलापूरच्या भूपृष्ठाचा अभ्यास केल्यास वरच्या बाजूने टणक व कठीण आवरण यावर दिसते. संपूर्ण जिल्ह्यामध्ये सर्वत्र बसाल्ट जातीचा खडक मिळतो. सोलापूर जिल्हा हा सर्वसाधारणपणे सपाटी प्रदेश असून, जिल्ह्यात पावसाचे प्रमाण कमी आहे. या जिल्ह्यातील प्रमुख पिकांमध्ये ज्वारी, बाजरी, गहू, मका तसेच मिरची, कापूस, शेंगा इ. पिके घेतली जातात. प्रमुख पिकामध्ये ज्वारीचे पिक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. त्यामुळे सोलापूर जिल्हा हा 'ज्वारीचे कोठार' म्हणून ओळखला जातो.[६]

धार्मिक क्षेत्र :

सोलापूर जसे इतिहासात प्रसिद्ध आहे तसेच धार्मिक व तीर्थक्षेत्र म्हणूनही प्रसिद्ध आहे. श्री सिद्धरामेश्वरांची भूमी म्हणून येथे महत्त्व प्राप्त झाले आहे. यांचा जन्म मुटगौडा व सुग्गलदेवी यांचे पोटी इ.स. ११२७ चे दरम्यान झाला. त्यांनी श्री मल्लिकार्जुनाची खडतर तपश्चर्येतून कृपा करून घेतली. सोलापूर येथे समाजसेवेचे कार्य केले, त्याचेच प्रतीक म्हणजे सोलापूर येथील सिद्धेश्वर तलाव होय.[७] चार हजार शिष्यांसह सिद्धरामेश्वरांनी तलाव खोदण्यास सुरुवात केली. सिद्धरामेश्वरांनी मल्लिकार्जुन मंदिराजवळ एक विशाल तीर्थ निर्माण केले असे रा. चि. ढेरे म्हणतात.

सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझेटियरमध्येही सिद्धेश्वर तलाव हा सिद्धरामेश्वरांच्या काळातच (११३५–११८०) बांधला गेला होता, असा उल्लेख मिळतो. या तलावाचे पाणी त्यावेळी सर्व गावास पुरत असे. या तलावास ज्याप्रमाणे पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने महत्त्व आहे, त्याप्रमाणेच धार्मिक दृष्टीनेही महत्त्व आहे.[८] संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात मल्लिकार्जुनची जुनी मंदिरे मिळतात. काही ठिकाणी ही मंदिरे हेमाडपंथी आहेत. आजही चांगल्या स्थितीत व अतिशय देखण्या रूपात आहेत. अशा शिवभक्तीच्या परिसरामध्ये श्री सिद्धरामेश्वरांचे चरित्र घडलेले आहे. आज सिद्धरामेश्वरांचेच मंदिर सोलापूर शहरामध्ये ग्रामदैवत म्हणून लोकप्रिय आहे. सिद्धरामेश्वरांनी धार्मिक, सामाजिक क्षेत्रांत मोठे काम करून सोलापूरमध्ये महासमाधी घेतली. अशा या शिवभक्ताचे समाधीस्थळ श्री सिद्धेश्वर मंदिर म्हणून सोलापूरात उभे आहे.[९]

सिद्धरामेश्वरांच्या चरित्राप्रमाणे त्यांचा विवाह हा काठ्यांशी लावला जातो. दरवर्षी १० जानेवारी ते १४ जानेवारी या दिवसात सोलापूर येथे सिद्धेश्वर यात्रा भरते. हा लग्नसोहळा चालू राहतो. सोलापूर शहरात वेगवेगळ्या ठिकाणी श्री सिद्धरामेश्वरांनी ६८ लिंगांची स्थापना केली आहे. या काळात या लिंगाचा अभिषेक केला जातो. सिद्धरामेश्वरांची ६८००० वचने सर्वांना वंदनीय आहेत. देवळे बांधणे, अन्नछत्र चालविणे (दासोह), उपदेश करणे, गरिबांचे विवाह लावून देणे, पाण्यासाठी विहिरी, तलाव बांधणे ही कामे त्यांनी केलेली होती. जवळजवळ ८०० वर्षांपासून सिद्धेश्वर यात्रा भरते. 'सिद्धेश्वर पुराण' या ग्रंथामध्ये सिद्धेश्वरांनी १०० विवाह करून दिल्याचा उल्लेख मिळतो. अशा या सिद्धरामेश्वरांचे मंदिर सोलापूरमध्ये सुस्थितीत आहे.[१०]

किल्ले सोलापूर :

सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन कालखंडातील महत्त्वपूर्ण वास्तू म्हणजे सोलापूर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेला भुईकोट किल्ला. हा किल्ला बहामनी साम्राज्याच्या कालखंडात बांधला गेला, असे कॅम्पबेल यांचे मत आहे. तर डॉक्टर हंटर म्हणतात, १३४५ साली तो बांधला. याशिवाय तोरो यांनी सचित्र महाराष्ट्र पुस्तकात किल्ल्याचा बाहेरील कोट इ.स. १३१३ मध्ये हसन गंगू बहामनी यांनी बांधला. मात्र आतील कोट हिंदू राजांनी १२ व्या शतकात

बांधला, अशी माहिती नमूद केलेली आहे.[११] बहामनी सम्राट महम्मदशहा दुसरा, इ.स. १४६३ ते १४८२ या काळात सत्तेवर होता. त्याच्याकडे महम्मद गवाण नावाचा हुशार वजीर होता. त्याच्या कारकीर्दीतच सोलापूरचा किल्ला बांधला गेला असावा. सोलापूर किल्ल्याच्या बांधणीबाबत विविध मतमतांतरे मिळतात. हा किल्ला १३४५ मध्ये बांधला असे डॉ. हंटर म्हणतात. कॅम्पबेल याने हा किल्ला १३५८ ते १३७५ या काळात बांधला असे म्हटले आहे. सोलापूरचे श्री मल्लिकार्जुनप्पा पाटील यांच्या मते १४५६ मध्ये किल्ल्याचे बांधकाम झाले असावे. या सर्व मतांवरून किल्ला बांधणी विषयीची विभिन्नता स्पष्ट होते. तथापि महम्मद गवाण यांच्या काळात हा किल्ला बांधला असावा हे मत अधिक महत्त्वाचे वाटते. या पुष्टर्थ संशोधकांनी एक आख्यायिका सांगितलेली आहे. ती अशी की, जेव्हा बहामनीचे अंमलदार किल्ला बांधण्यासाठी स्थळ संशोधन करीत होते. तेव्हा सध्या किल्ला असलेल्या जागेवर त्यांना एक दृश्य दिसले. एक कोल्हा किल्ल्यातील मल्लिकार्जुन मंदिराच्या आसपास हिंडत होता. त्यावर अंमलदाराच्या शिकारी कुत्र्याने हल्ला चढविला. तेव्हा कोल्हा पळून न जाता शिकारी कुत्र्यावर धावून गेला व त्यालाच हद्दीबाहेर पळवून लावले, हा या जागेचा गुण आहे. म्हणून बहामनींच्या अंमलदारांनी येथेच किल्ला बांधण्याचे ठरविले.[१२] सोलापूरचा भुईकोट किल्ला ३२०×१७६ यार्ड क्षेत्रफळाचा आहे. याच्या पूर्वेकडे सिद्धेश्वर तलाव असून त्याचेच पाणी या किल्ल्यातील खंदकात खेळविलेले होते. किल्ल्याचे संपूर्ण बांधकाम मध्ययुगीन काळात झालेले होते. या किल्ल्यास बाबा कादर दरवाजा, खिळ्यांचा दरवाजा, अली दरवाजा (महांकाली दरवाजा) असे ३ प्रमुख दरवाजे आहेत. किल्ल्यामध्ये जाण्यासाठी २ मोठ्या उंच दगडी स्तंभाच्यामधून जाणाऱ्या पुलावरून जावे लागते. हे स्तंभ एकमेकांपासून ४ मी. ४० सेमी. लांबीचे असून स्तंभाची गोलाई ६ मी. ५ सेमी. एवढी आहे. या दोन्ही स्तंभांना लोखंडी साखळीने बांधले जाई. स्तंभाच्या जवळपास काही फुटलेल्या, भंगलेल्या मूर्ती, खंडित वीरगळ पडलेले आहेत. यानंतर किल्ल्याचे पहिले प्रवेशद्वार लागते. बाबा कादर दरवाजा, खिळ्यांचा दरवाजा व दिल्ली दरवाजा म्हणून प्रसिद्ध असणारे हे महाद्वार संरक्षणाच्या दृष्टीने अतिशय मजबूत असून गोमुख पद्धतीने बांधलेले आहे. शत्रूवर गरम पाणी, अग्निबाण सोडण्यासाठी यावर जागा आहे. महाद्वाराची उंची ४ मी. ६ सेमी. तर रुंदी १ मी. ७० सेमी. आहे.

येथून प्रवेश केल्यानंतर बरीच मोकळी जागा दिसते. त्याला 'बुरुजसंकुल' किंवा 'बार्बीकन' असे म्हटले आहे.[१३] किल्ला बांधणीवर ग्रंथ लिहिणारे सिम्रेटॉय, एफ.यु.इ विंटर आणि प्र.के. घाणेकर यांनी बार्बीकन या शब्दांचा वापर आपल्या ग्रंथामध्ये अनेकदा करून या जागेचे महत्त्व किल्ला बांधणीत पटवून दिले आहे. ही मोकळी जागा पहारेकऱ्यांसाठी, घोडे बांधण्यासाठी तसेच किल्ल्यातील शिबंदी एकत्र करण्यासाठी वापरले जाई.

किल्ल्याचे दुसरे महाद्वार आहे. याला 'शहर दरवाजा' किंवा 'मधला दरवाजा' असे म्हटले जाई. हे प्रवेशद्वारही दोन भव्य बुरुजांच्यामध्ये असून याचा दरवाजा लाकडी आहे व यावर उत्कृष्ट नक्षीकाम केलेले आहे. येथेही पहारेकऱ्यांसाठी जागा, माथ्याशी सज्जा आणि शिलालेख असून दोन्ही बाजूस दोन व्यालशिल्पे आहे. अशी व्यालशिल्पे मध्ययुगीन कालखंडातील सर्वच किल्ल्यावर असल्याचा उल्लेख किल्लेविषयक साधनग्रंथामधून मिळतो. प्र.के. घाणेकर यांनी *'अथा तो दुर्ग जिज्ञासा'* या ग्रंथात व्यालशिल्पांचा उल्लेख केलेला आहे. हा दरवाजा ३मी. ५ सेमी. उंचीचा व १ मी. ५३ सेमी. रुंदीचा आहे. येथील लाकडी दरवाजा १५ सेमी जाडीचे आहे. संरक्षणाच्यादृष्टीने सर्व काळजी याही दरवाज्यावर घेतलेली आहे.[१४] यानंतर किल्ल्यातील दुसरे मोठे बुरुजसंकुल लागते.

तिसरे प्रवेशद्वार किल्ल्याच्या आंतरतटबंदीस असून त्यावर माथ्याशी एक शिलालेख आहे. तसेच यावर असणाऱ्या मोठ्या प्रशस्त दालनास किल्ल्यातील 'राजवाडा' असे संबोधले जाते. हा दरवाजा २ भल्या मोठ्या बुरुजांच्यामध्ये बांधलेला असून बुरुज १२ मी. १० सेमी. उंचीचे आहेत. या दरवाज्यास 'अली दरवाजा' किंवा 'महांकाली दरवाजा' असे संबोधले जाते. महाद्वारांसाठी लागणारा दगड किल्ल्यातील खंदकातून प्राप्त झाला असावा. ओबधधोबड काळ्या दगडी चिऱ्यांनी ही महाद्वारे बांधली गेलेली दिसतात. या महाद्वारांमध्ये जास्त कलाकुसर नसून त्यामध्ये संरक्षण व्यवस्था, अभेद्यपणा, कणखरताच जास्त दिसते. किल्ल्याच्या आतील अनेक भाग उद्ध्वस्त झाले असते तरी महाद्वारे मात्र आजही सुस्थितीमध्ये उभी असून ते गतइतिहासाची साक्ष देत आहेत. सोलापूर किल्ल्याची तटबंदी अतिशय भक्कम असून हा दुहेरी तटबंदीचा भुईकोट किल्ला आहे. किल्ल्यास चारी बाजुने पाण्याने सदोदीत भरलेला खंदक होता.

तसेच खंदकाची तटबंदी 'रेवणी' या नावाने सोलापूर शहरास लागून होती. आजही कोठे कोठे ही रेवणी दृष्टीपथात येते. या रेवणीमध्येच उत्तरेकडे 'रेवणी मारुतीचे मंदिर' आहे. किल्ल्याची बाह्यतटबंदी १६ व्या शतकातील, चारी बाजूचे चारी बुरुज व तटबंदी १४ व्या शतकातील आहे असा संदर्भ मिळतो.[१५]

दोन्ही तटबंदीच्या पडकोटचा भाग एवढा रुंद आहे की त्यावरून घोड्यावर बसून किंवा चालत सहज जाता येते. या तटबंदीचे बांधकाम एकाच कालखंडात झालेले नसून ते वेगवेगळ्या काळात झालेले दिसते. तटबंदीच्या माथ्याशी त्रिकोणी कंगोरे आणि त्याला जंगेही आहेत. तटबंदीप्रमाणे सोलापूर किल्ल्याचे बुरुज अतिशय मजबूत बांधणीचे, तळाशी पसरट आणि निमुळते होत गेलेले, गोलाकार, षटकोनी, अष्टकोनी आकाराचे आहेत. अतिशय भरभक्कम असे दगडी उभे आडवे चिरे वापरून हे बांधकाम झालेले आहे. तटभिंत आणि बुरुज यांच्यावर झालेल्या लढायांच्या खाणाखुणा म्हणून लहान तोफगोळ्यांची गोलाकार छिद्रे आजही दिसतात. चौकोनी आकाराचा किल्ला असल्यामुळे तटभिंतही तशाच पद्धतीने वळलेली असून बाह्य तटबंदीवर जागोजागी अनेक शिल्पे बसविलेली दिसतात. उदा. कीर्तीमुखे, राक्षसमुखे, कमलपुष्पांचे चिरे, वैष्णवांच्या प्रतिमा, द्वारपाल शिल्पे, शिखर व मंदिर प्रतिकृती, नर्तिका, यश–यक्षिणी, हत्तीमुखे गजथरमाळा, व्यालशिल्पे इत्यादि. या शिल्पांवरुन किल्ल्याच्या आसमंतात प्राचीन काळी असलेल्या हिंदू मंदिराचे अस्तित्व लक्षात येते.[१६]

किल्ले सोलापूरमध्ये अवशेषरुपाने शिल्लक असलेल्या इमारती आहेत. या किल्ल्यामध्ये मध्ययुगीन कालखंडात ३०० इमारती अस्तित्वात होत्या असे मत ग. ह. खरे यांनी मांडलेले आहे. आज मात्र या किल्ल्यामध्ये मोजक्याच इमारती शिल्लक आहेत. या किल्ल्याचा दुसरा दरवाजा ओलांडल्यानंतर डाव्या हातास जी इमारत आहे. त्यास 'धान्यकोठार' असे म्हटले जाते. ही एक लांबट आणि बसकी सपाट छताची इमारत आहे. तिसऱ्या प्रवेशद्वाराच्या माथ्याशी एक प्रशस्त मोठे दालन असून त्यावर छत नाही. या इमारतीची लांबी १४ मी. ७० सेंमी., रुंदी ८ मी. असून, उंची ३ मी. २५ सेंमी. एवढी आहे. या ठिकाणी किल्लेदार रहात असावा. तसेच राज्यकर्त्याचे मुक्काम या इमारतीत पडत असावेत. म्हणून यास *'राजवाडा'* या नावे ओळखले

जाते. या किल्ल्याचे प्राचीनत्व स्पष्ट करणारी एक इमारत उद्ध्वस्त अवस्थेत उभी असून ते *'मल्लिकार्जुन मंदिर'* आहे. उत्तर चालुक्यकालीन किंवा यादवकालीन *'भूमीज'* पद्धतीचे हे मंदिर असून ते उत्कृष्ट शिल्पकलेने नटलेले आहे. हे मंदिर खोलगट भागात आहे. कारण ते १९१७ मध्ये उत्खननाद्वारे बाहेर आलेले आहे. इ. स. १९१७ मध्ये पुराणवस्तू खात्यास या गोष्टीची कल्पना आली. त्यावेळेचे सोलापूरचे कलेक्टर श्री. सिमकॉक्स यांना पहाणी करत असताना भिंतीच्या आत बुजविलेले मंदिर झरोक्यातून दिसले. इ.स. १९१९ मध्ये लॉईड जॉर्ज या गर्व्हनर जनरलच्या परवानगीने उत्खनन करण्यात आले. तेव्हा चालुक्यकालीन हिंदू मंदिराचे अवशेष नजरेस पडले. हे मंदिर कोणी आणि केव्हा बुजवून टाकले होते, याचा पुरावा मिळत नाही. या मंदिराच्या भग्न अवशेषांवर शार्दुलांची रूपके, चौरसाकृती फुलांचे नक्षीकाम, मंदिर शिखर प्रतिकृती, मिथुन शिल्पे इ. नक्षीकाम आहे. खोलगट भागात हे मंदिर असल्यामुळे एखाद्या तळ्यातील नक्षीकाम केलेल्या नौकेप्रमाणे हे मंदिर लांबून भासते. याच मंदिराचे स्तंभ घेवून गावामध्ये मल्लिकार्जुन मंदिर बांधले गेले आहे. उद्ध्वस्त अवस्थेत असलेले हे मल्लिकार्जुन मंदिर १७ मी. १० सेंमी. लांब व ५ मी. ८५ सेंमी रुंद आहे. या मंदिराचे खंडीत भाग किल्ल्यामध्ये जागोजागी पडलेले दिसतात.[१७]

किल्ल्यामध्ये ३२ खांबी मशिद म्हणून ओळखली जाणारी एक चांगली इमारत आजही उभी असलेली दिसते. ३२ खांबावर बांधलेली ही इमारत आहे. या ठिकाणचे स्तंभ एकाच पद्धतीचे असल्यामुळे ही इमारत किल्ला बांधणीपूर्व अस्तित्वात असावी असे वाटते. ही इमारत किल्ल्यामध्ये असलेल्या मल्लिकार्जुन मंदिराच्या भक्त मंडळीसाठी बांधलेली विश्रांतीका किंवा मल्लिकार्जुन देवालयास वाहिलेले धान्य साठविण्यासाठी बांधलेले कोठार असावे, असे मत सोलापूरचे प्रसिद्ध विचारवंत श्री. बाबुराव जक्कल यांनी मांडले आहे. ही ३२ खांबी मशिद १८ मी. २५ सेंमी. लांब आणि ७ मी. ४५ सेंमी. रुंद तर उंची २ मी. ३० सेंमी. आहे. या इमारतीच्या कालखंडात बांधली गेलेली आणि किल्ल्याच्या तटबंदीच्या बाहेर असलेली *नागबावडी* ही एक उत्कृष्ट विहीर असून ती प्रथम *'भारंगबावी'* म्हणून ओळखली जाई. आज यास *'नागबावडी'* असे म्हणतात. ही किल्ल्यामध्ये असलेल्या मल्लिकार्जुन मंदिराची पुष्कर्णी होती. या किल्ल्यामध्ये

ब्रिटीशांनी बांधलेल्या काही इमारतीही आढळून येतात. त्यांना *'ब्रिटीशकालीन धान्यग्रह'* असे संबोधले जाते. ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीच्या काळातील ही धान्यग्रहे असावीत. आजमितीला किल्ले सोलापूर येथे वरील इमारती अस्तित्वात आहेत.[१८]

किल्ले सोलापूर येथील शिलालेखही किल्ल्याच्या इतिहासाची, तेथील बांधकामाची आणि किल्ल्याच्या दुरुस्तीची माहिती सांगतात. किल्ल्यामध्ये १० शिलालेख येथील स्थानिक वृत्तपत्रात सविस्तर अभ्यासले गेले होते. पहिला शिलालेख पहिल्या दरवाज्यावर पितळी पत्र्यावर होता. इ.स. १८१० मध्ये दुसऱ्या बाजीरावांनी आबाजी बल्लाळ यांच्याकडून दरवाजा दुरुस्त करून घेतल्याची माहिती मिळते. दुसरे आणि तिसरे शिलालेख उर्दुमधील असून तेही दुसऱ्या आणि तिसऱ्या दरवाज्यावर बसविलेले होते. विजापूरच्या अली आदिलशहाच्या काळात दरवाजे बांधले गेल्याची माहिती या शिलालेखांवरुन मिळते. या दहाही शिलालेखांमध्ये महत्त्वाचा असलेला ७ नंबरचा शिलालेख ईशान्य बाजूस असलेल्या तटभिंतीच्या एका विहीरीच्या तोंडाशी, बारा ओळीत मराठीत लिहिलेला आहे. यामुळे शिलालेखामध्ये *बाळदान* हा उल्लेख नसून तो *हवालदार* असा शब्द असल्याचे डॉ. वि.म. कुलकर्णी यांनी आपल्या अभ्यासपूर्ण लेखात म्हटलेले आहे. या शिलालेखांवर उलटसुलट चर्चा आजही होत राहते. इतिहास काळात दर्गोपाटील घराण्यातील एका स्त्रीस बळी दिल्याचा वारंवार उल्लेख केला जातो. तथापि शिलालेखात *'बाळदान'* हा कोठेही उल्लेख नाही. सोलापूर किल्ल्याच्या समोरच इ.स.१८१८ ला मराठेशाहीचा ऱ्हास झाला. फेब्रुवारी १८१८ मध्ये अष्ट्याची लढाई झाली. बापू गोखल्यांच्या मृत्युनंतर दुसरे बाजीराव पेशवे या किल्ल्यात २ महिने आश्रयासाठी आले होते. बाजीराव पेशवे या किल्ल्यातून निघून गेल्यानंतर इंग्रजांनी या किल्ल्यास वेढा दिला. १० मे १८१८ रोजी किल्ल्याच्या तटास शिड्या लावून शहरात इंग्रज शिरले. मराठी सैनिक आणि इंग्रज यांच्यामध्ये घनघोर लढाई झाली. गणपतराव पानसे हे मराठ्याचे तोफखाना अधिकारी होते. तर पायदळाचे प्रमुख मेजर डी पिंटो हे होते. पानसे या युद्धात ठार झाले. १४ मे १८१८ ला इंग्रजांनी हा किल्ला जिंकला. थोडक्यात मराठेशाहीचा झालेला अस्त किल्ले सोलापूरने साश्रूं नयनांनी पाहिलेला आहे.[१९]

श्री माढेश्वरी मंदिर, माढा :

माढा या गावाचे नाव पूर्वी माढे असे होते. माढेची माढेश्वरी असे म्हटले जाते. श्री माढेश्वरी देवी ही माढ्याचे ग्रामदैवत असून माढेश्वरीचे मंदिर वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना म्हटले तरी वावगे ठरणार नाही. माढा हे गाव मनकरणा नदीच्या काठावर वसले असून गावच्या उत्तरेस पूर्वमुखी असे भव्य हेमाडपंथी मंदिर आहे. पूर्वेकडील मुख्य प्रवेशद्वार कोरीव कामाने सुशोभित केले असून त्यावर नक्षीदार असे दगडी कमान आहे. मंदिराच्या समोरील बाजूला भव्य अशा दीपमाळा आहेत. तटबंदीला लागून एक बारव आहे (कल्लोळ). मंदिराच्या तटबंदीच्या भिंतीस पूर्व, पश्चिम, दक्षिण अशा तिनही बाजूस ३९ ओवऱ्या आहेत व काही खोल्यांचे बांधकाम केले आहे. मंदिराला भव्य असे शिखर आहे. मंदिराला एकूण ४८ स्तंभ असून हे सर्व स्तंभ कोरीव आहेत. गर्भगृहाच्या मधोमध देवीची मूर्ती आहे व ही मूर्ती चर्तुभूज असून उजव्या हातात सुरा, डाव्या हातात ढाल, खालच्या हातात त्रिशूल आहे. तो त्रिशूल दैत्याच्या पोटात मारलेला आहे. पाठीमागील बाजूस प्रभामंडळावर प्राचीन कला वैभवाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. तसेच नाईक निंबाळकरांचा वाडा स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमुना आहे.[२०]

अक्कलकोट येथील शस्त्रागार :

आशिया खंडातील सर्वात मोठे शस्त्रागार म्हणून याची विशेष ख्याती आहे. इतिहासकालीन युद्धसाहित्याचं मागोवा घेणारे हे शस्त्रागार अभ्यासाच्या दृष्टीने खूप महत्त्वाचे आहे. एकाच छत्राखाली दिसणारी शस्त्रांमधील विविधता या संग्रहालयाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

संग्रहालयाचा इतिहास :

वस्तुसंग्रहालयाची निर्मिती ही आधुनिक काळात विकसित होत असलेली जाणीव आहे. इतिहासाच्या अभ्यासाचे ठिकाण, राष्ट्राचे स्फूर्तिस्थान व आधुनिक काळातील महत्त्वाचे स्थान दिले जाते. महाराष्ट्रात वस्तुसंग्रहालयातील विविध वस्तूंच्या दृष्टीने तरी आंध्रचे संग्रहालय, कोल्हापूरचे शासकीय वस्तुसंग्रहालय, सातारा येथील मराठाकालीन वस्तुसंग्रहालय याच्या

मालिकेत असलेल्या महाराज तिसरे फत्तेसिंह भोसले यांनी स्थापन केलेल्या अक्कलकोटच्या वस्तुसंग्रहालयाचा क्रमांक बराच वरचा लागतो. येथील शस्त्रागारात असलेली विविध प्रकारची शस्त्रास्त्रे भारतात कोठेही एकत्रित आढळत नाहीत. प्रत्येक माणसाला जीवनात कुठल्या ना कुठल्या गोष्टीची आवड / छंद असतेच. या आवडीतूनच एखाद्या कलाकृतीचा जन्म होऊ शकतो किंवा नवीन कलाकृती निर्माण होऊ शकते. याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे अक्कलकोट येथील *'आर्मरी संग्रहालय'*. या संग्रहालयाचे प्रमुख महाराज फत्तेसिंह तिसरे यांना शस्त्रांची आवड होती. निरनिराळी शस्त्रे गोळा करणे व त्यातून एखादी कलाकृती निर्माण करणे, हा त्यांचा छंद होता. या छंदातून त्यांनी शस्त्रास्त्रांच्या साहाय्याने नवीन कलाकृती या संग्रहालयात निर्माण केलेल्या आहेत. उदा. पहिल्या दालनातील तलवारीच्या साहाय्याने उगवते व मावळते सूर्याचे चित्र तसेच १०–१२ तलवारीच्या साहाय्याने केलेले जाळीचे नक्षीकाम इ. एखाद्या वस्तूंचा एकत्रितपणे केलेला संग्रह हे पाहणे व याच वस्तूंची जेव्हा रेखीव, पद्धतशीर केलेली मांडणी, याकडे पाहण्याचा दृष्टीकोन यावरून असे वाटते की, सौंदर्य हे रेखीवपणात, प्रमाणात व मांडणीत असते. याचा खरा अनुभव म्हणजे अक्कलकोट येथील *'आर्मरी संग्रहालय'*.[२१]

श्री स्वामी समर्थ :

श्री स्वामी समर्थ हे शके १७६० मध्ये मंगळवेढा येथे प्रकट झाले. सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट येथे त्यांचे वास्तव्य २१ वर्षे होते. १८०० मध्ये त्यांनी अवतार समाप्ती केली. पारमार्थिक संदर्भाने पाहता वेदकालीन दत्तावतारी सहपुरुष श्रीपाद श्रीवल्लभ आणि नंतरचे श्री नरसिंह सरस्वती यांच्याशी ते आपली अवतार परंपरा सांगतात. श्री. नरसिंह सरस्वती ज्या कर्दळी वनातून गुप्त झाले तेथून श्री अक्कलकोट स्वामी प्रकट झाले. त्यामुळे ती दत्तविभूतीच आहे. दत्तनगर आणि वडाचे झाड हा संदर्भ या दृष्टीने महत्त्वाचा वाटतो.[२२]

शुभराय महाराज :

मूळचे मद्रास प्रांतातील असलेले परंतु सोलापुरात वास्तव्यास असणारे संत शुभराय महाराज मद्रासकडील माल्लर या गावचे. या गावातच त्यांचा जन्म १७३५ साली झाला. ते टिपू

सुलतानच्या राज्यात नायब दिवास होते. धार्मिक मतभेदामुळे नोकरी व गाव सोडले. काही काळ पंढरपुरात विठ्ठलभक्तीत रमले. १७८५ साली सोलापुरात शिष्यांच्या मदतीचे मठाची स्थापना केली. तेलुगु, कन्नड, संस्कृत, उर्दू, फारसी, अरबी, मराठी या भाषा त्यांना अवगत होत्या. ते चित्रकार, लेखक, संगीत, नृत्य, रांगोळी, कागदी कलाकृती करण्यात पारंगत होते. १७८५ साली ते सोलापूरला आले. सन्यास स्वीकारलेल्या शुभराय महाराज विठ्ठल भक्तीत रमून गेले. सोलापुरातील भुईकोट किल्ल्याचे तत्कालीन किल्लेदारर आबा कुंडले व खजिनदार बाबा जाईल यांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले. सोलापूरहून अक्कलकोट येथे जाण्यापूर्वी स्वामी समर्थांचे वास्तव्य यांच्याकडेच असे. ते तेलुगु भाषिक असूनही त्यांनी मराठीत काव्यरचना केली. नृत्यनिपुण असलेले शुभराय महाराज हे चित्रकला व काव्यरचना करण्यातही निपुण होते, म्हणून ते भाषिक ऐक्याचे प्रतीक व राष्ट्रीय एकात्मतेचे आदर्श उदाहरण होत.[२३] सोलापूर महानगरपालिकेने शुभराय महाराजांच्या स्मृतीजतनासाठी 'शुभराय आर्ट गॅलरी' बांधली आहे.

संत सावतामाळी :

हे संत नामदेवांचे समकालीन असलेले सावता माळी संतमेळ्यातील महत्त्वाचे संत होते. अरणभेंडी, ता. माढा हे त्यांचे गाव. पिता परसुबा, आई, पत्नी जनाबाई हे त्यांचे कुटुंब. शेतमळ्याच्या व्यवसायाला विठ्ठलमय करणारे हे संतकवी. एका जनार्दनी सावता तो धन्य । तयाचे महिमान न कळे काही ॥ या शब्दांत एकनाथांनी त्यांचा गौरव केलेला आहे. प्रासादिक रचना, भावपूर्ण व सरळ निवेदन ही त्यांच्या अभंगांची वैशिष्ट्ये आहेत. हरिस्मरणात स्वत:ला पूर्णपणे हरवून बसणारा हा संत त्याने आपल्या व्यवसायातच विठ्ठल पाहिला आणि सारे जीवन विठ्ठलमय करुन टाकले. सकलसंत गाथेत त्यांचे १२ अभंग उपलब्ध आहेत.[२४]

महात्मा बसवेश्वर :

बसवेश्वरांचा जन्म इ.स. ११०५ मध्ये बागेवाडी येथे एका ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव मादीराजा आणि आईचे नाव मादलांबि होते. मादिराजा हे कामेकुला येथील होते.

बसवा (बैल) या कन्नड शब्दाचा अर्थ संस्कृतमध्ये वृषभ असा होय. वृषभ हे शिवाचे वाहन म्हणून ओळखले जाते. बसवेश्वरांनी कन्नड साहित्याचा सखोल अभ्यास केला होता. बसवेश्वरांचे वडील हे या नगरीचे एक सुजाण व सूज्ञ मालक होते. त्यांनी उपनयन कार्यक्रम केला होता. ज्यावेळेस बसव ८ वर्षाचे होते, त्यावेळेस त्यांच्या जीवनाला एक वेगळेच वळण मिळाले. ब्राह्मण धर्माच्या शिकवणुकीचा तरुण बसवेश्वरांवर काहीच परिणाम झाला नाही, ते ब्राह्मण संस्कृतीच्या विरोधात होते. त्या अवस्थेत त्यांनी काही दिवस घालविले व बागेवाडीतून कुडलसंगम येथे प्रस्थान ठेवले. त्यांचे आराध्य दैवत म्हणजे संगमचे संगमेश्वर होय. इथे राहून त्यांनी संस्कृत, वैदिक भाषा, पुराण व विविध धार्मिक तत्त्वज्ञानाचे शिक्षण घेतले. संगममध्ये त्यांनी जवळजवळ २० वर्षे घालविली. त्यांच्या आदर्शाचे व कार्याचे फलद्रुप परिणाम त्या काळात दिसून येतो. त्यानंतर त्यांनी बिज्जलच्या दरबारात साहाय्यक लेखापाल म्हणून काम केले. या कामासाठी त्यांना सालाना १०१ होन मिळत असत. काही कालावधीतच ते बिज्जलच्या दरबारात सर्वोच्च स्थानी पोचले. पुढे सिद्धदंडाधिपतींचा मृत्यू झाला आणि बसवेश्वरांनी इ.स. ११४१ मध्ये सैनिकांचा प्रमुख म्हणून काम पाहिले. काही कालावधीतच बिज्जल व बसवेश्वर हे एकमेकांचे शत्रू झाले. धार्मिक व सामाजिक विचारातून बसवेश्वर हे शिवाचे परमभक्त बनले.[२५]

सोलापूरचा प्राचीन इतिहास :

सोलापूर जिल्ह्याचा प्राचीन इतिहास इ.स. पूर्व तिसऱ्या शतकापर्यंत मिळतो. इ.स.पूर्वी मध्य भारतात अनेक छोटी छोटी राज्ये अस्तित्वात होती. त्यामध्ये गोदावरी नदीच्या दक्षिणेकडे अश्मक हे राज्य होते. या अश्मक राज्यात अहमदनगर आणि बीड जिल्ह्याचा समावेश होत होता. अश्मक राज्याच्या आणखी दक्षिणेकडे असलेल्या कुंतल प्रदेशाचा नंतरच्या काळात अश्मक राज्यात समावेश झाला तर काही वेळा कुंतल प्रदेशाचे स्वतंत्र अस्तित्व होते. या कुंतल प्रदेशात सोलापूर आणि सातारा जिल्ह्यांचा समावेश होत होता.[२६]

मौर्यानंतर महाराष्ट्रावर सातवाहन घराण्याने दीर्घकाळ राज्य केले.[२७] त्या घराण्याची वैभवशाली परंपरा सोलापूरला देखील लाभली होती. डेक्कन कॉलेज, पुणे आणि शिवाजी विद्यापीठ

पदव्युत्तर शिक्षण केंद्र, सोलापूर येथील प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती आणि पुरातत्त्व विभागातर्फे माण नदीच्या काठी मुडवी येथे मार्च २००३ मध्ये उत्खनन करण्यात आले होते. त्यानुसार तसेच मंगळवेढा तालुक्यातील भीमा नदीकाठी सिद्धापूर येथे डिसेंबर २००३ मध्ये उत्खनन करण्यात आले होते. येथील संशोधनानुसार सोलापूर जिल्ह्यात सातवाहन घराण्याची सत्ता होती, हे सिद्ध झाले आहे. परदेशातून भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर माल येत असे. तेथून ती सातवाहनांची राजधानी प्रतिष्ठान म्हणजे आजचे पैठण येथे जात असे व हा परकीय माल उत्तरेकडे जात असताना त्याचा मार्ग सोलापूर जिल्ह्यातून जात असावा. सातवाहनकालीन अवशेष मुडवी येथे मिळालेले आहेत.[२८]

सोलापूर जिल्ह्याला मिळालेल्या साधनांवरून या प्रदेशात मौर्य, सातवाहन, बदामीचे चालुक्य, मानखेटचे राष्ट्रकूट, कल्याणचे चालुक्य, मंगळवेढ्याचे कलचुरी, अक्कलकोटचे शिलाहार व देवगिरीचे यादव इ. राजघराण्यांची किंवा त्यांच्या मांडलिकांची सत्ता होती.[२९]

गोदावरी नदीच्या दक्षिणेतील प्रदेशात सोलापूरचा समावेश होतो. येथील प्रदेशातील लोकांवर बंधने लादली जात होती. या प्रदेशाला राक्षसाचा प्रदेश म्हणून ओळखले जात होते, असा रामायणात उल्लेख आहे.[३०] महाभारतकालीन दंडकारण्यात काही वस्ती झालेली असावी. त्यात विदर्भ, अश्मक, कुंतल, गोपराष्ट्र, मल्लराष्ट्र, पांडूराष्ट्र, इ. प्रदेशांचा उल्लेख आहे.[३१] दख्खनच्या पठारातील मध्यभाग अनेक प्रांतामध्ये विभागला होता. त्यांना विविध नावे होती. हा प्रदेश नंतरच्या काळात कुंतलच्या प्रदेशात समाविष्ट करण्यात आला.[३२]

कुर्नुल जिल्ह्यातील इरागुडी येथील राजुला व मंडागिरी या शिलालेखावरून कुंतलचा प्रदेश सम्राट अशोकाच्या ताब्यात होता. एवढाच पुरावा येथील मौर्य घराण्याचा मिळतो. त्यानंतर कुंतल प्रदेशावर सातवाहनांचे वर्चस्व होते.[३३] सोलापूर जिल्ह्याच्या प्रदेशावर सुरुवातीला सातवाहन घराण्याची सत्ता इ.स. पूर्व २३० ते इ.स. २३० होती. सातवाहन संस्थापक सिमुख याचा भृत्य म्हणून उल्लेख आहे. भीमा नदीखोऱ्यातील म्हणजे कृष्णेच्या उपखोऱ्यातील सोलापूर, कोल्हापूर व धाराशिव या दक्षिण महाराष्ट्राच्या प्रदेशाला *कुंतल* म्हणून ओळखले जात होते. सातवाहन सम्राट स्वत:ला *'कुंतलेश'* म्हणवून घेत होते. त्यांची राजधानी गोदावरी नदीच्या काळी

असलेल्या पैठण शहरी होती. सध्याचे पैठण म्हणजेच पूर्वीचे प्रतिष्ठान होय. दीर्घकाळ त्यांची सत्ता दक्षिणेत होती. या काळात औरंगाबाद, अहमदनगर, सोलापूर, बीड इत्यादी प्रदेश भरभराटीला आलेला होता. त्यावेळी प्रतिष्ठान हे प्रमुख व्यापारी केंद्र होते.[३४] दक्षिण पथामधील पैठण ते चित्रदुर्ग हा व्यापारी मार्ग पैठणवरून निघून बीड, उस्मानाबाद जिल्ह्यातून पुढे सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तरसंग कुडलसंगम येथून चित्रदुर्ग (कर्नाटक) ला जात असावा व तेथून पुढे हा व्यापारी मार्ग चित्रदुर्गवरुन कन्याकुमारी, कन्याकुमारीवरून सुवर्णद्वीप, यवद्वीप, सिंहलद्वीप यासारख्या आग्नेय आशियातील देशांकडे जात होता.[३५] सातवाहन काळात प्रतिष्ठान बरोबरच तेर किंवा प्राचीन नाव असणारे तगर हे ही व्यापारी शहर होते.[३६]

वाकाटक घराणे आणि सोलापूर जिल्हा यांचाही संबंध दिसून येतो. ज्या वाकाटकांनी नर्मदेपासून ते तुंगभद्रेपर्यंत आणि अरबी समुद्रापासून ते बंगालच्या उपसागरापर्यंत राज्य केले. त्याच्या वंशातील सर्वात शक्तीशाली राजा म्हणून पहिला प्रवरसेन यांना ओळखले जाते. इ.स. २५० ते २७० या काळात उत्तर कुंतलातील कोल्हापूर, सातारा, सोलापूर येथे वर्चस्व प्रस्थापित केले.[३७] वाकाटक राजा नरेंद्रसेन इ.स. ४४० गादीवर आला. त्याचा विवाह कुंतल राजकन्या आज्झीत भट्टारिका हिच्याशी झाला. ही राजकन्या कुंतलेश राष्ट्रकूट नृपती देवराय याची कन्या असावी.[३८]

माणपूरच्या राष्ट्रकूट घराण्याचा संस्थापक माणक याने वाकाटकावर आक्रमण करून माणपूर हे नवीन नगर वसवले. तो प्रदेश सध्याच्या सातारा व सोलापूर जिल्ह्यात समाविष्ट होता. इ.स. ३७५ च्या सुमारास दक्षिण महाराष्ट्रात माणपूरच्या राष्ट्रकूट घराण्याचा संस्थापक मानांक राजा होता. *'हिंगणी बेरडी'* येथील ताम्रपटामधून या राष्टकूट राजाच्या घराण्याची माहिती मिळते.[३९] या ताम्रपटात उल्लेखलेल्या राजधानी माणपूर याचा संदर्भ मिराशिंना मिळालेला आहे. दक्षिण महाराष्ट्र किंवा कुंतल या देशात इ.स. ३७५ च्या सुमारास मानंक राजाने राष्ट्रकूट वंशाची स्थापना केली. त्याने माणपूर नामक नगर वसवून ते राजधानीचे ठिकाण केले. हे माणपूर सातारा जिल्ह्यातील माण तालुक्याचे मुख्य ठिकाण असावे.[४०] वेळापूरमध्ये मिळालेल्या यादवकालीन शिलालेखामध्ये माणदेशाचा उल्लेख आहे. रामचंद्र देवराय राजाचा सर्वाधिकारी श्री. जोईदेव,

त्याचा निरापित ब्रम्हदेवराणा व माणदेशासंबंधी अधिकारी बाईदेवराणा यांचा उल्लेख आलेला असून वेळापूर येथील धर्मस्थल वटेश्वर यांच्यासाठी बाईदेवाने मठ करमुक्त करून दिला. वेळापूरातील या माणदेशाच्या उल्लेखावरुन सोलापूर जिल्ह्यावरदेखील राष्ट्रकूटांची सत्ता होती, असे समजते.[४१]

त्यानंतर मान्यखेटचे राष्ट्रकूट, कल्याणचे चालुक्य, कलचुरी तसेच मंगळवेढ्याचे (कल्याणीचे) कलचुरी यांचा व कुंतल प्रदेशाचा म्हणजे सोलापूर जिल्ह्याचा संबंध दिसून येतो. कल्याणीचे कलचुरी घराण्याचे पुरावे म्हणजे मंद्रुप व भंडारकवठे येथील शिलालेख यामध्ये कल्याणीच्या अम्मुगि (इ.स. १०६७ ते इ.स. १०८०) याने जमीन दान दिल्याचा उल्लेख आढळतो.[४२] तसेच सोलापूर बुधवार पेठ येथे मिळालेल्या शिलालेखावरून दुसऱ्या बिज्जलाने कदंबाच्या हंगल किल्ल्यावर हल्ला करून तो ताब्यात घेतला. या विजयाने तो आत्मविश्वासाने पुढे शक्तीशाली बनला. कुंभारी (ता. दक्षिण सोलापूर) येथील इ.स. ११६५ ते इ.स. ११६७ या शिलालेखावरून स्वतंत्र सत्ता मिळविल्यानंतर दुसऱ्या बिज्जलाने कल्याणवरून कुंतल देशाचा राज्यकारभार केल्याचा उल्लेख मिळतो. वीरशैव लिंगायत पंथाची स्थापना करणारे महात्मा बसवेश्वर हे दुसऱ्या बिज्जलाचे मंत्री होते.[४३]

सोलापूर जिल्ह्याच्या प्रदेशावर शिलाहारांची सत्ता होती. सुरुवातीला इ.स. सातव्या शतकात शिलाहार घराणे बदामीच्या चालुक्यांचे मांडलिक म्हणून तगरला राज्य करीत होते. सोलापूर जिल्ह्यातील शिलाहार *'अक्कलकोटचे शिलाहार'* म्हणून ओळखले जातात. अक्कलकोटच्या जुन्या राजवाड्यात मिळालेल्या शिलाहार महामंडलेश्वर इंदरसाच्या शिलालेखावरून अक्कलकोटचे शिलाहार घराणे हे सर्व शिलाहार घराण्यामध्ये प्राचीन होते. शिलाहार कंदरस आणि त्याच्या घराण्यातील व्यक्तीने करजगी (तालुका अक्कलकोट) येथील देवालयासाठी जमिनी दान दिल्याचा उल्लेख मिळतो.[४४]

सोलापूर जिल्ह्याचा मध्ययुगीन इतिहास :

सोलापूर जिल्ह्याच्या प्रदेशावर चालुक्य, कलचुरी, शिलाहार राजघराण्यानंतर देवगिरीच्या यादवांची सत्ता (इ.स. ८३५ ते १३१८) आली. ते कल्याणच्या चालुक्याचे मांडलिक होते. संधी

मिळताच त्यांनी स्वातंत्र्य घोषित केले. महाराष्ट्रात एक प्रसिद्ध घराणे म्हणून देवगिरीच्या यादव घराण्याचा समावेश होतो.[४५] यादव घराण्यातील पाचवा भिल्लम याने यादवांची स्वतंत्र राजधानी म्हणून देवगिरीस मान्यता देवून येथे स्वत:चा राज्याभिषेक करुन घेतला.

मार्डी (तालुका उत्तर सोलापूर) येथे मिळालेल्या पाचव्या भिल्लमच्या शिलालेखावरून त्याने इ.स. ११८४ ला राज्याभिषेक केला. मंद्रुप (तालुका दक्षिण सोलापूर) येथील (इ.स. ११८७) शिलालेखावरून चालुक्याचे मांडलिकत्व झुगारून देण्याच्या तयारीत आहे तर दुसऱ्या शिलालेखात (इ.स. ११९१) त्याने चालुक्याचे मांडलिकत्व पूर्णपणे झुगारून दिल्याचा उल्लेख आहे.[४६] तसेच यादव घराण्यातील दुसरा सिंघण (इ.स. १२१० ते ११४७) याचे शिलालेख हुतगी, मदरे, गुंजेगाव (तालुका दक्षिण सोलापूर), बीबीदारफळ (तालुका उत्तर सोलापूर), मंगळूर (तालुका अक्कलकोट) येथे मिळालेले आहेत.[४७] त्यानंतर सिंघणचा नातू कृष्ण सत्तेवर आला. त्यानंतर महादेव (इ.स. १२६० ते १२७१) सत्तेवर आला. त्याच्या काळात हेमाडपंताची प्रधान म्हणून नियुक्ती झाली.[४८] हेमाडपंतानेच महाराष्ट्रात 'हेमाडपंती वास्तुशैली' विकसित केली.[४९] महादेवनंतर मुलगा आमणदेव अल्पकाळासाठी सत्तेवर आला. त्यानंतर रामदेव (इ.स. १२७१ ते इ.स. १३१२) याने उल्लेखनिय विजय मिळविले. त्याने दक्षिणेकडील होयसळांचे राज्य खालसा केले व साम्राज्याचा विस्तार केला. मात्र याच्याच काळात पुढे यादव सत्तेच्या ऱ्हासास प्रारंभ झाला.[५०] दिल्लीचा सुलतान जलालुद्दीन खिलजीने पुतण्या अल्लाउद्दीन खिलजीला सत्ता विस्तारासाठी दक्षिणेकडे पाठविले. इ.स. १२३४ मध्ये अल्लाउद्दीनने रामदेवाचा पराभव करून त्याच्याकडून खंडणी वसूल केली.

सोलापूर जिल्ह्यात रामदेव राजाच्या काळात हेमाडपंती मंदिरशैली निर्माण झाली. वेळापूर (तालुका माळशिरस) येथे मिळालेल्या शिलालेखावरून मंदिराला दान दिल्याचा उल्लेख आढळतो.[५१] रामचंद्रानंतर त्याचा मुलगा तिसरा सिंघणदेव सत्तेवर आला. परंतु तो नाममात्र राहिला. रामदेवाचा जावई हरपाळदेव यानेही यादवांचे राज्य वाचविण्याचे प्रयत्न केले; परंतु दिल्ली सुलतान मुबारक खानाचा सेवक खुश्रूखानने हरपाळदेवाचा वध करून इ.स. १३१८ ला देवगिरीचे साम्राज्य खालसा केले. पुढे दिल्लीचा सुलतान महंमद तुघलकाने दक्षिणेवर नियंत्रण ठेवण्यासाठी

आपली राजधानी दिल्लीहून देवगिरीला (दौलताबाद) ला आणली.[५२] दौलताबाद हे संपत्तीचे शहर होते. इ.स. १३४४ मध्ये मुहंमद तुघलखाकडे दौलताबादशिवाय कोणताही महाराष्ट्राचा भाग नव्हता. तसेच त्याच्या काळात दिल्लीमध्येही अधिकाऱ्याने गोंधळाची परिस्थिती निर्माण करुन चौहोबाजूंनी लुटालूट करण्यास सुरुवात केली होती.[५३]

बहामनी साम्राज्य :

इ.स. १२०६ ते १५२६ हा उत्तरेकडील सुलतानी राजवटीचा कालखंड होय. यामध्ये गुलाम खिलजी, तुघलक, सय्यद आणि लोदी या मुस्लिम घराण्यांनी राज्य केले होते. तुघलकाच्या काळात मुहमंद तुघलघाने आपली राजधानी दिल्लीवरून देवगिरी नंतर देवगिरीहून दिल्लीला हलविली.[५४] या सर्व राजकीय संक्रमणात दक्षिणेमध्ये हिंदू व मुस्लिम या सरदारांची बरीच संख्याही वाढली व त्यांच्यामध्ये आपापसात संघर्ष होवू लागले. दक्षिणेत प्रशासनासाठी मुहंमद तुघलकाने १३४७ मध्ये आपला सरदार जाफरखान ऊर्फ हसन यास ससैन्य दिल्लीत पाठविले. हा जाफरखान ऊर्फ हसन त्याच्या पूर्व आयुष्यामध्ये दिल्लीमध्ये एका गंगू ब्राह्मणाच्या घराच्या ओसरीवर रहात असे. गंगू ब्राह्मण हा भविष्य सांगून उदरनिर्वाह करीत असे. एकदा गंगू ब्राह्मणाने हसनचे भविष्य सांगितले की, तू फार मोठ्या साम्राज्याचा संस्थापक होणार आहेस. यावर त्याचा विश्वास बसला नाही, परंतु पुढे ते भविष्य खरे ठरले.[५५]

दक्षिणेत सर्व सरदारांना हाताशी घेऊन अफगाण शिपाई हुसेन गंगुने बंडाचा नाश केला. तो उत्तरेकडे परत गेला नाही. दक्षिणेतच त्याने बहामनी राज्याची स्थापना केली. बहामनी राज्य दक्षिणेत सुमारे १५० वर्षापर्यंत अस्तित्वात होते. बहामनी राज्याची राजधानी सोलापूरच्या पूर्वेस १०० कि.मी. असलेल्या गुलबर्गा येथे होती.[५६] इ. स. १४२६ मध्ये तेथून बिदर येथे नेण्यात आली. इ.स. १३५१ पर्यंत हुसेन गंगू बहामनी याने दिल्लीपतीच्या ताब्यात पूर्वी असलेल्या सर्व दक्षिणेतील प्रदेश आपल्या पराक्रमाने ताब्यात घेतला. इ.स. १३५७ साली दक्षिणेकडील राज्याचे ४ तरफ किंवा भाग करून त्यावर एक–एक तरफदार नेमला. सोलापूर जिल्हा हा गुलबर्गा तरफचा भाग होता. या तरफात सोलापूर, गुलबर्गा, विजापूर, रायचूर, मुद्‌गल, सागर आणि नळदुर्ग

इतक्या प्रांताचा समावेश होत असे.[५७] इ.स. १४६३ ते १४८२ या काळात बहामणी साम्राज्याचा वजीर महम्मद गवाण याने सोलापूरचा भुईकोट किल्ला बांधला.

त्यानंतर सोलापूर जिल्ह्यात (इ.स. १३७८ ते १३९७) पडलेल्या दुष्काळात लोकांना गुजरातमधून धान्य मागवून मदत केली. तसेच १४२१–२२ ला देखील सोलापूरला पडलेल्या दुष्काळामुळे जमिनी ओस पडल्या होत्या. म्हणून इ.स. १४२९ मध्ये अंमलदारांनी लोकांना लागवडीसाठी जमिनी एका वर्षाच्या कराराने फुकट दिल्या होत्या. या जमिनी लोकांकडे देण्याचे काम दादू नरसू काळे नावाच्या एका अनुभवी ब्राह्मणाकडे व एका तुर्क खोजाकडे सोपविण्यात आले होते. पुढे मुहंमदशहा बहामनी (दुसरा) इ.स. १४६३ ते १४८३ याच्या काळात महमंद गवाणने ४ तरफाचे ८ तरफात विभाजन केले. गुलबर्ग्याच्या तरफेत त्याने विजापूर व अहसनाबाद असे २ भाग पाडले.[५८]

अहसनाबाद या भागात सोलापूर मोडत असून तो भाग दस्तूर दिनार नावाच्या सिद्दी खोजाकडे होते. त्याच्या हाताखालचे सोलापूर, परांडा व इतर किल्ले वगैरे मुलुख जैनखान व कालाजहान या दोन बंधूकडे होते. परंतु पुढे महमूद गावानवर सरदारांनी राजद्रोहाचा आरोप करून त्याला फाशी देण्यात आली होती.

बहामनी साम्राज्यास इ.स. १४८९ पासून उतरती कळा लागली आणि कर्तृत्वहीन अशा बहामनी सम्राटामुळे बहामनी साम्राज्याचे विकेंद्रीकरण होवून त्याचे पाच तुकडे पडले. त्यात अहमदनगरची निजामशाही (इ.स. १४९० ते इ.स. १५०८), विजापूरची आदिलशाही (इ.स. १४८९ ते इ.स. १५११), बिदरची बरीदशाही (इ.स. १४९२ ते इ.स. १५०४), गोवळकोंड्याची कुतुबशाही (इ.स. १५१२ ते इ.स. १५०४) आणि वऱ्हाडची इमादशाही असे पाच तुकडे बहामनी साम्राज्याचे पडले. या विभाजनानंतर खरा संघर्ष झाला तो निजामशाही व आदिलशाहीत यांच्यात कित्येकदा घनघोर लढाया झाल्या.

त्यानंतरच्या काळात सोलापूर जिल्हा कधी आदिशहाकडे तर कधी निजामशहाकडे गेला. अहमदनगरचा निजामशाही राजा मलिक अहमद, विजापूरचा युसुफ आदिलशहा व वऱ्हाडचा इमाद उल्मुल्क यांच्यात इ.स. १४९८ ला राज्य विभागणीचा तह झाला. त्यानुसार परांडा व

शेजारचे प्रांत मलिक अहमदशहाकडे आले व सोलापूरचे व शेजारचे ११ प्रांत यामध्येही विभागणी झाली. एक भाग काजाजहान जो निजामशाहीखाली सोलापूरचा सुभेदार बनला होता, तर दुसरा भाग विजापूरकडे म्हणजे आदिलशहाकडे गेला.[५९] विजापूरचा युसूफ आदिलशहा हा इ.स. १५९० मध्ये निवर्तल्यावर कमलाखानाने राजपुत्र ईस्माईल आदिलशहा व त्याची आई यास कैदेत टाकून सोलापूर किल्ल्याला तीन महिनेपर्यंत वेढा दिला. अहमदनगरहून वेळेवर मदत न मिळाल्यामुळे जैनखानाचा पराभव झाला. आदिलशाही व निजामशाही या दोघांमध्ये सोलापूर किल्ल्याशी संबंधित नेहमीच युद्धे घडून आली.

विजापूरचा ईस्माईलशहा व अहमदनगरचा बुऱ्हाण शहा हे सोलापूरच्या किल्ल्यात एकमेकांशी मित्रत्वाने भेटले व तेथे दोघांमध्ये तह घडून आला. इ.स. १५२४ मध्ये आदिलशहाची बहीण मरियम हिचा विवाह अहमदनगरच्या बुऱ्हाण निजामशहाशी झाला व सोलापूरचा किल्ला व इतर प्रांत हे आंदण म्हणून निजामशहाला देण्याचे ठरले; परंतु प्रत्यक्षात हा तह पाळला गेला नाही. त्यामुळे आदिलशाही व निजामशाही मध्ये पुढे ४० वर्षे संघर्ष चालू होता.[६०]

इ.स. १५५१ साली बुऱ्हाण निजामशहाने विजयनगरच्या रामराजाच्या साहाय्याने सोलापूरचा किल्ला ताब्यात घेतला, त्याची दुरुस्ती केली. त्याच्या मृत्युनंतर मुलगा हुसेन निजामशहा गादीवर आला. त्याच्या काळात विजापूरच्या आदिलशहाने पुन्हा युद्ध पुकारले. सोलापूरजवळ दोन्ही सैन्यांची लढाई होवून युद्धात विजापूरकरांचा पाडावा झाला. पुन्हा १५५७ मध्ये विजापूरच्या इब्राहिमशहाचा मुलगा अली आदिलशहाने विजयनगरचा रामराजा व गोवळकोंड्याच्या राजाबरोबर गुप्त तह केला आणि कल्याणी व सोलापूर किल्ल्याची मागणी केली.[६१] अहमदनगरच्या निजामशाहीने ती मागणी मान्य न केल्याने तिघांनी मिळून अहमदनगरवर स्वारी केली. परंतु या लढाईत विजयनगरच्या रामराजाचे वर्चस्व वाढू लागल्याने गोवळकोंड्याच्या राजाने आपले सर्व सैन्य सोलापूरकडे वळविले. रामराजा सोलापूरचा किल्ला गिळंकृत करेल अशी भिती गोवळकोंड्याच्या राजाला वाटल्याने त्याने सैन्याचा मोर्चा नळदुर्गकडे वळविला. गोवळकोंड्याचा कुतुबशहा व आदिलशहा यांच्या कुटिल नितीमुळे मिळत असलेला विजय देखील गमवावा लागला. रामराजाच्या पराक्रमाने सोलापूरचा किल्ला आदिलशहाला मिळाला असता परंतु

रामराजा हा एक हिंदू राजा होता व त्याचा प्रभाव वाढेल म्हणून या दोघांनीही सैन्य माघारी घेवून निजामशहाकडून पराभव पत्करला.

पुढे १५६२ मध्ये बुऱ्हाणशहाचा मुलगा हुसेन निजामशहा याने आपली मुलगी चांदबिबी हिचा विवाह विजापूरच्या आदिलशहाशी लावला. तेव्हा सोलापूरचा किल्ला आंदण म्हणून आदिलशहास दिला.[६२] त्याचप्रमाणे अलीआदिलशहाची बहीण हदिया सुलतान हिचा विवाह हुसेन निजामशहाचा वडील मुलगा मुर्तीझा याच्याशी लावल्याने विजापूर व अहमदनगर दरबारात काही काळपर्यंत सलोखा निर्माण झाला. त्यानंतर दोघांनी एकत्र येवून विजयनगरच्या रामराजाचा तालीकोट येथे पराभव केला. त्यानंतर पुढील काळात निजामशहा व आदिलशहा यांच्यामध्ये झालेल्या संघर्षात परांड्यापर्यंतचा प्रांत नगर सैन्याने काबीज केला. इ.स. १५९४ मध्ये सोलापूर किल्ल्याजवळ नगर सैन्याचा उझबेकखान सेनापती ठार झाल्याने सैन्यास परत फिरावे लागले. पुढे मोगल सैन्य दक्षिणेकडे सरकू लागले. अहमदनगरचे राज्य डबघाईस आले. यानंतर इ.स. १५९९ मध्ये अहमदनगरची निजामशाही जिंकण्यासाठी मोगलांचे सैन्य पुन्हा दक्षिणेत आले.[६३] अहमदनगर मोगलांच्या ताब्यात गेले. त्यावेळी उत्तरेत मंहम खुशरु याने बंड केल्याने ही मोहिम अर्धवट सोडून सैन्य उत्तरेत परतले. याचा फायदा घेऊन निजामशाहीचा वजीर मलिक अंबर याने अहमदनगरचे वर्चस्व वाढविले. इ.स. १६२३ मध्ये मलिक अंबरने सोलापूरसह, नळदुर्ग किल्लाही काबीज केला.

उत्तरेकडे इ.स. १५२६ साली स्थापना झालेली मुस्लिमांची राजसत्ता मोगल बादशाही या नावाने सर्वपरिचित होती. त्यानंतर दक्षिण भारतातही या राजसत्तेने आपला राजकारणाचा प्रभाव पाडण्यास सुरुवात केलेली होती. विशेषत: दिल्लीचा बादशाह शहाजाह आणि औरंगजेब बादशाह यांचे या किल्ल्याशी जवळचे संबंध होते. मोगलांच्या राजकारणाचा एक भाग म्हणून दक्षिणेतील निजामशाही ही सत्ता इ.स. १६३६ साली संपत्ती या निजामशाहीच्या प्रदेशांची गडकोट किल्ल्यांची वाटणी करून काही भाग आदिलशाहीकडे तर काही मोगलांकडे सुपूर्द करण्यात आला होता. इ.स. १६३६ पासून इ.स. १६६८ पर्यंत सोलापूरवर आदिलशाहीचे वर्चस्व होते.[६४] महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली हिंदवी स्वराज्याची पायाभरणी सुरू झाली

होती. त्यावेळी मोगल बादशहा औरंगजेब हा वारंवार मराठ्यांवर लष्करी स्वाऱ्या पाठवीत होता. तसेच आदिलशाही व कुतुबशाही ही सोलापूरवर सतत आक्रमण करीत असे. कारण मराठ्यांप्रमाणे या दोनही मुस्लिम सत्ता औरंगजेबास नष्ट करावयाच्या होत्या. इ.स. १६६५ साली शिवाजी महाराज आणि मोगल सरदार मिर्झा राजे जयसिंग यांच्यात पुरंदरचा तह झाला आणि त्यामधील अटीनुसार शिवरायांना विजापूरवर चालून जावे लागले. इ.स. १६६५ साली विजापूरचे सैन्य आणि मोगलांचे व मराठ्यांचे सैन्य यांच्यात मंगळवेढाा या ठिकाणी मोठी लढाई झाली होती. या लढाईत मोगल सैन्याचा पराभव झाला होता.[६५] इ.स. १६६८ साली औरंगजेब बादशहा व विजापूरचा आदिलशहा यांच्यात एक तह झाला होता. या तहानुसार सोलापूरचा किल्ला व त्याच्या आजूबाजूचा प्रदेश मोगलांच्या ताब्यात गेला. मोगलांच्या राजवटीच्या व वास्तवाच्या बऱ्याच खाणाखुणा आजही किल्ल्यामध्ये दिसतात. मोगलकालीन काही शिलालेखही या किल्ल्यात मिळतात.

इ.स. १६८० मध्ये शिवाजी महाराजांचा मृत्यू झाला. याचवेळी उत्तरेच्या राजकारणाला वेगळे वळण लागले. औरंगजेबाचा शाहजादा अकबर याने आपल्या वडिलांविरुद्ध बंड करून तो दक्षिणेकडे संभाजी राजांच्या आश्रयाला आला होता.[६६] या गोष्टीने चिडलेल्या बादशहाने इ.स. १६८१ ला दक्षिण मोहिम हाती घेतली. तो २२ मार्च १६८२ ला औरंगाबाद येथे दाखल झाला.[६७] त्याने इ.स. १६८६ मध्ये विजापूर शहरास शेवटचा वेढा दिला होता तेव्हा जाताना सोलापूर शहरात लष्करी तळ दिलेला होता. सोलापूर येथे राहूनच विजापूरच्या वेढ्याचे नियोजन तो करीत होता. सोलापूरमधून बादशहाने आपला शाहजादा शाहाआलम यास भल्या मोठ्या फौजेसह कुतूबशाहीकडे पाठविले होते. यावरून बहामनीच्या विजापूर व गोवळकोंडा येथील उपशाखांना आपल्या दक्षिण स्वारीत नष्ट करण्यासाठी औरंगजेब बादशहा सर्व राजकीय व लष्करी हालचाली सोलापूरच्या लष्करी तळावरून करीत होता.[६८] त्यामुळे मध्ययुगीन इतिहासात सोलापूरचे स्थान महत्त्वाचे आहे. या मोहिमेसाठी लागणारी रसद बादशहाला सोलापूरमधून मिळत होती. औरंगजेब बादशहाने त्यावेळी विजापूरची आदिलशाही संपविली. औरंगजेब बादशहाच्या दक्षिण स्वारीसाठी खजिना येत असे. औरंगजेब बादशहाने त्यावेळी विजापूरची आदिलशाही

संपविली. औरंगजेबाचा सरदार राव दल्फत हा खजिना आणण्याचे काम करीत असे आणि सोलापूरला पोहचवीत असे. सोलापूरचा किल्ला बादशाही खजिना सुरक्षित ठेवण्यासाठी म्हणून उपयुक्त असलेले एक ठिकाण होते.

मोगल बादशहा औरंगजेब आणि सोलापूर जिल्हा यांचा संबंध ऐतिहासिकदृष्ट्या जसा महत्त्वपूर्ण ठरतो तसाच तो सोलापूरच्या इतिहासाचे ऐतिहासिक महत्त्व वाढविणाराही ठरतो. बादशहाच्या सत्तावीस वर्षाच्या मोहिमेत त्याचा जास्त काळ सोलापूरमध्ये गेलेला आहे. औरंगजेबाच्या वास्तव्याचा प्रभाव आजही सोलापूरवर पडलेला दिसून येतो. सोलापूरच्या विविध भागांना त्या काळात दिलेली नावे आजही चालू असल्याची दिसतात. सोलापूरच्या ज्या भागात सैन्य वास्तव्यास होते त्या भागास पाच्छा पेठ असे म्हटले जाई. तर ज्या ठिकाणी बेगमा राहत असत ते ठिकाण बेगमपेठ म्हणून आजही ओळखले जाते.[६९] औरंगजेबाने ईदचा नमाज अदा करण्यासाठी म्हणून सोलापूरमध्ये एक दर्गा बांधलेला आहे, त्यास आलमगीर दर्गा म्हटले जाई.[७०] हा दर्गा आजही किल्ल्याच्या जवळ असलेल्या पानगल हायस्कूलच्या मैदानात उभा आहे. सोलापूरमधील सर्व मुस्लिम बांधव आजदेखील येथे नमाज अदा करतात. सोलापूर किल्ल्याजवळ सिद्धेश्वर तलावास लागून असलेल्या मुस्लिम सुफी संताचा दर्गा आहे. हा दर्गाही हजरत शहा जुहूर दर्गा म्हणून ओळखला जातो. औरंगजेबाने या दर्ग्यावर असणारा नगारखाना बांधून दिलेला होता आणि या दर्ग्यास काही जमिनीही दान दिलेल्या होत्या.[७१] औरंगजेबाच्या कारकीर्दीत त्याच्या नातवाचा विवाह सोलापूरमधील जामा मशिदीत झालेला होता. सोलापुरात शुक्रवार पेठ येथे जामा मशिदीत औरंगजेब अनेकदा नमाजही पडत असे. औरंगजेबाची नातवधू ही सोलापूरी बेगम म्हणून प्रसिद्ध होती. या मशिदीमध्ये विजापूरच्या आदिलशहाचे दोन शिलालेख आढळतात. यावरून येथे शाही विवाह झालेला होता, अशी माहिती मिळते.[७२]

आपल्या दक्षिण स्वारीत औरंगजेबाने सोलापूर जिल्हा व सोलापूरच्या किल्ल्यांची निवड आपल्या लष्कराकरिता केली होती. याचा जी कारणे हाताशी येतात त्यामध्ये सोलापूरचे राजकीय आणि आर्थिक महत्त्व हे महत्त्वाचे ठरते. भौगोलिकदृष्टीने हा प्रदेश औरंगजेबास किती गरजेचा होता, हे दिसते. औरंगजेबाच्या दक्षिण स्वारीमधील ठळक व महत्त्वाची घटना म्हणजे त्याने

केलेली शंभु राजांची हत्या ही होय. या हत्येनंतर मराठ्यांमध्ये जास्त प्रेरणा निर्माण झाली व त्यांनी औरंगजेबास सतत हल्ले करून सळो की पळो करुन सोडले. औरंगजेबाच्या लष्करावर आक्रमणे करणे, उत्तरेकडील प्रदेशावर हल्ला करणे, खजिना लुटणे, इ. प्रकारांनी मोगलांच्या सैन्याला त्रास देत असत. शंभु राजांच्या हत्येनंतर सोलापूर प्रांतात देखील बादशहांविरुद्ध बऱ्याच कारवाया झाल्या. मराठ्यांचा शूर सरदार रामचंद्रपंत अमात्य यांनी सोलापूर प्रांतातून राजरोसपणे सारा वसूल करण्यास सुरुवात केली होती. म्हणूनच बादशहाला आपली छावणी सोलापूर जिल्ह्यात भीमा नदीच्या काठी ब्रम्हपुरी येथे न्यावी लागली होती. या ब्रम्हपुरीच्या छावणीत बादशहा इ.स. १६९५–९९ या काळात साडेचार वर्षे राहिलेला होता.[७३]

इ.स. १७०७ ला बादशहा औरंगजेबाचा मृत्यू झाला. त्यानंतर मोगलांच्या कैदेत असलेल्या शाहू छत्रपतींची सुटका झाली. त्यावेळी मोगलांनी छत्रपती शाहूंना दक्षिणेच्या सहा सुभ्यामधून चौथाईची वसुली करण्यासाठी सनद दिली होती. त्या सनदेमध्ये सरकार सोलापूर असा उल्लेख आहे. म्हणजेच परगणे सोलापूरमधून छत्रपती शाहूने चौथाई वसूल करावी असे मोगलांनी सांगितले होते. यावरून इ.स.१७०७ पासून सोलापूर मराठ्यांच्या अधिकाराखाली आलेला भूप्रदेश असावा.[७४] त्यावेळी दक्षिणेत निजाम उलमुल्कने हैद्राबाद येथे स्वतंत्र राज्य स्थापन केले होते. शाहूस जरी सरकार सोलापूरमधून वसूलीचे अधिकार मिळाले असले तरी त्याची अंमलबजावणी झालेली नव्हती. छत्रपती शाहूंना कैदेतून सुटून आल्यानंतर बराच काळ महाराणी ताराबाईंशी यादवी युद्ध करावे लागले आणि या यादवी युद्धाचा फायदा निजाम उलमुल्कने हैद्राबादच्या आसपास आपली सत्ता मजबूत करून घेण्यास सुरुवात केली आणि १७२४ मध्ये त्याने हैद्राबादला आसफशाही स्थापन केली व स्वत:ला आसफजांह अशी पदवी लावून घेतली.[७५] त्याने इ.स. १७२३ मध्ये सोलापूरचा भुईकोट किल्ला ताब्यात घेतला. त्यानंतर छत्रपती शाहूंनी साम्राज्यविस्ताराच्या धोरणाची अंमलबजावणी करून बाळाजी बाजीराव यांच्या कारकिर्दीत ६ जुलै १७५८ रोजी सोलापूर किल्ल्यावर व आसपासच्या प्रदेशावर आपले वर्चस्व स्थापन केले.[७६] पेशव्यांचे ज्यावेळेस सोलापूरवर वर्चस्व होते तेव्हा १७५७ ते १८५८ असलेले

किल्लेदार याप्रमाणे होते. रामचंद्र त्र्यंबक, नाना जोशी, उधोविरेश्वर, गणेश त्रिंबक, रामचंद्र शिवाजी, आबाजी बल्लाळ आणि पाश्चापूरकर असे सात किल्लेदार होते.[७७]

इ.स. १७५८ ते १८१८ या कालावधीत हा सोलापूर सरकार मराठ्यांच्या अधिकाराखाली होता. त्यानंतर पेशव्यांच्या काळात सोलापूरचा विस्तार होण्यासाठी माधवराव पेशव्यांनी त्र्याहत्तर एकर जमीन सोलापूरला जोडली होती. सोलापूरमध्ये माधवपेठ नावाची व्यापारी पेठ सुरू केली होती. आज ती मंगळवार पेठ म्हणून ओळखली जाते.[७८] माधवराव पेशव्यांच्या कारकिर्दीत सोलापूर किल्ल्यावर बाबूजी नाईक बारामतीकर हा अधिकारी होता. यांच्या भावास म्हणजे आबाजी नाईक बारामतीकर यांना बाजीराव पेशव्यांची बहीण भीऊबाई दिलेली होती. हा विवाह पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ यांच्या काळात १७१०–११ ला झालेला होता.[७९] त्याने हळूहळू आपले वर्चस्व वाढवण्यास सुरुवात करुन माधवराव पेशव्यांनाही विरोध करण्यास सुरुवात केली. तसेच बाबूजी नाईक बारामतीकर हैदरअलीला फितुर होता. याबाबतचा सर्व पत्रव्यवहार माधवराव पेशव्यांच्या हाती पडला. म्हणून माधवराव पेशव्यांनी सोलापूरचा किल्ला बारामतीकरांना ताबडतोब सोडण्यास सांगितले व किल्ल्याचा ताबा विसाजी कृष्ण बीनीवाले यांना द्यावा अशी आज्ञा माधवराव पेशव्यांनी केली. परंतु बाबुजी नाईक यांनी पेशव्यांची आज्ञा मानली नाही. तेव्हा पेशव्यांनी सोलापूरच्या किल्ल्याचा ताबा घेण्यासाठी रामचंद्र गणेश यांना लष्करासह पाठविले. त्यावेळी बाबुजी नाईक धारुरकडे पळून गेला.[८०] पेशव्यांच्या सैन्यापुढे आपले काहीच चालत नाही हे दिसताच बाबूजी नाईकने इ.स. १७६७ मध्ये किल्ला पेशव्यांच्या ताब्यात दिला.

माधवराव पेशव्यानंतर पुण्यातील पेशवाईमध्ये अंतर्गत कलहास सुरुवात झाली. अल्पवयीन नारायण पेशवे यांचे सत्तारोहण, राघोबाच्या कटकारस्थानातून नारायणरावाचा खून, बारभाई कारस्थान, सवाई पेशव्यांची कारकीर्द, त्यांची आत्महत्या अशा अनेक चित्रविचित्र घटना घडत राहिल्या. नारायणरावांच्या खूनानंतर राघोबादादांनी पेशवेपदाची धुरा उचलली. परंतु केवळ साडेचार महिनेच ते पेशवेपदावर टिकले. सवाई माधवरावानंतर दुसरे माधवराव पेशवे गादीवर आले आणि इंग्रजांच्या साम्राज्य विस्तारामुळे व दुराग्रही धोरणामुळे १८१८ मध्ये पेशवाईचा

शेवटही झाला.[८१] थोडक्यात थोरल्या माधवरावांच्या मृत्यूनंतर पेशवाईस उतरती कळा लागली. पेशवाईतील अंतर्गत यादवीचे परिणाम पेशव्यांच्या ताब्यातील सर्वच प्रदेशावर झाले. नारायणरावांच्या मृत्यूनंतर गादीवर आलेला राघोबादादा हा चंचल मनोवृत्तीचा पेशवा होता. कधी निजामशाही तर कधी इंग्रजांशी तो संगनमत करीत होता. पेशवेपद प्राप्त होताच तो हैदरअलीवर चालून जाण्यासाठी कर्नाटक मोहिमेवर रवाना झाला होता. परंतु राघोबादादाला हैदरअलीशी भांडण नको होते तर मैत्री हवी होती. म्हणूनच पुणे दरबारातून राघोबावर त्र्यंबकराव पेठे नावाचे सरदार पाठविले. पेशव्यांच्या अशा यादवीमुळे पंढरपूर, सोलापूर या भागातही अशांतता निर्माण झाली होती. पंढरपूरजवळ कासेगाव येथे राघोबादादा व पेशवे यांच्यातही युद्ध झाले होते. त्यात राघोबादादांचा पराभव झाला. पंढरपूर व सोलापूर येथील भुईकोट किल्ल्याकडे पेशव्यांचे वारंवार येणे–जाणे चालू होते. आपल्या वास्तव्यासाठी सोलापूरमध्ये माधवरावांच्या काळात पेशवेवाडा निर्माण केलेला होता. पेशव्यांचा वाडा सोलापूरमध्ये सध्या त्याच्या पडक्या भिंती अस्तित्वात आहेत. सध्याच्या गद्रे लक्ष्मी मंदिराजवळ हा वाडा होता. पेशवाईच्या अस्तानंतर हा वाडा सोलापूरातील प्रसिद्ध वैद्य श्री. माटे यांनी विकत घेतला होता. त्यांनीही बरेच वर्ष सांभाळून नंतर तो विकला. आज वाड्याच्या जागेवर आधुनिक इमारत उभी आहे.[८२]

दुसरा बाजीराव पेशवा १७९६ साली पेशवे पदावर आल्यानंतर काही घटना अशा घडत होत्या की, मराठ्यांच्या राज्यात अशांतता निर्माण झाली. अमृतराव पेशव्याचे नावे राज्यात बंडाळी माजली होती. यशवंतराव होळकरांचे सरदार व खुद्द पेशवे सरकारचे सरदार यांनी अमृतराव पेशव्याच्या नावावर पेशव्यांच्या मुलखात लुटालुट चालविली होती. सोलापूरमध्ये त्यावेळी पेशव्यांकडून तोफखान्याचे प्रमुख पानसे घराणे होते. त्यांनी पानसे यांच्या फौजावर हल्ले केले व सोलापूर प्रांतात खंडण्या वसूल करत कर्नाटककडे वळले.[८३]

आष्टीची लढाई व मराठी सत्तेचा शेवट :

पेशव्यांच्या अंतर्गत यादवीचा फायदा इंग्रजांनी पुरेपूर करून घेतला. इ.स. १७९६ साली आलेले दुसरे बाजीराव पेशवे हे पेशवेपदावरील शेवटचे पेशवे ठरले. १७९६ ते १८१८ या

काळात पेशवाईच्या अस्ताची प्रक्रिया चालू झाली. मराठ्यांच्या राज्यात अंतर्गत बंडाळ्या, दंगे धोपे, आपापसातील यादवी, लूटमार, इ. घटना चालू होत्या. खुद्द बाजीराव दुसरे यांनी इंग्रजांची मदत घेतल्याने इंग्रज त्यांच्यावर मन मानेल तसा उपयोग करुन घेवू लागले. यशवंतराव होळकर, विठोजी होळकर, बाळकृष्ण गंगाधर, इ. सरदार अधिकाऱ्यांनी पेशव्यांच्या विरोधात जावून अंतर्गत कलह निर्माण केला होता. सोलापूर परगण्यातही त्यांनी बऱ्याच वेळा जनतेला त्रास देवून लूटमार केली होती.[८४]

इ.स. १७९६ ला यशवंतराव होळकर यांचे सैन्य, अमृतराव पेशव्यांचे सैन्य दुसऱ्या बाजीरावाच्या राज्यात लुटालूट करु लागले. बाजीरावाच्याा अनेक सरदारांनी देखील या लुटालूटीला साथ दिली. इ.स. १८०० च्या दरम्यान होळकरांचे सैन्य सोलापूरमध्ये पोहचले. या सैन्याचा तळ सोलापूरच्या भुईकोट किल्ल्याच्या जवळ असलेल्या तलावाच्या काठी पडलेला होता. त्यावेळी होळकर व बाळकृष्ण गंगाधर व होळकरांचे सैन्याने सोलापूरचा किल्ला देण्यासाठी तोफखान्याचे प्रमुख गणपतराव पानसे यांच्याकडे मागणी केली. परंतु रामचंद्रपंत शिवाजी व पानसे यांनी किल्ला देण्यासाठी नकार दिला व तेथे लढाई घडून आली. बाळकृष्ण गंगाधर या बंडखोराने इतर सरदारांना मदतीला घेऊन सोलापूरच्या पेठेत लुटालूट केली, वेशी पाडून टाकल्या. सोलापूरचे रक्षण करण्यासाठी पेशव्यांच्या बाजूने बाजीराव बर्वे, परशुराम पटवर्धन यांचे दाजी व अप्पा नावाचे दोन पुत्र तसेच फडणीस, इ. लोक एकत्र आले. परंतु पानसेंनी त्यांना मदत केली नाही. तुळजापूर वेशीत सातशे ते आठशे सैन्यासह किल्लेदार रामचंद्र शिवाजी यांचे भाऊ महादेव परशुराम हे गंगाधर बाळकृष्ण बरोबर लढण्यास उभे राहिले. या अनिर्णयीत लढाईत बंडखोरांनी सोलापूरला लुटले. सोलापूरमध्ये असा दंगा चालू असताना होळकरांचे सैन्यही टोळ्याटोळ्यांनी सोलापूर, पंढरपूर भागात लुटालूट करीत होते. दुसरे बाजीराव पेशवे गादीवर आलेले अनेक सरदारांना आवडलेले नव्हते. त्यामुळे बाजीरावांचे सावत्र भाऊ अमृतराव यांनाही ही गोष्ट पटलेली नसल्याने सातत्याने अंतर्गत यादवी होत राहिली.[८५]

ज्याप्रमाणे दुसऱ्या बाजीरावांना अनेक अंतर्गत शत्रू होते त्याप्रमाणेच इंग्रजांसारखा मुत्सद्दी परकीय शत्रूही होता. तिसऱ्या इंग्रज–मराठे युद्धात इंग्रजांनी बाजीराव पेशव्यांचा पुण्याच्या

परिसरात पराभव केला. पुणे इंग्रजांनी जिंकून घेतले. पेशवे नोव्हेंबर १८१७ पासून काही फौजेसह सतत रानोमाळ भटकू लागले. त्यांच्या पाठीशी इंग्रजांचा कॅप्टन स्मिथ हा सेनापती सैन्यांसह होता. पुणे येथे पराभव झाल्यानंतर बाजीराव पेशवे पंढरपूर, सोलापूरकडे निघाले. पंढरपूरजवळ गोपाळ आष्टी येथे मराठ्यांचे व इंग्रजांचे मोठे युद्ध झाले. या युद्धात पेशव्यांचा सेनापती बापू गोखले ठार झाला. गोपाळ आष्टी येथेच मराठी राज्याची इतिश्री झाली. त्यानंतर ब्रिटिशांनी सोलापूरचा किल्लाही ताब्यात घेतला. पुणे येथील पराभवानंतर बाजीराव पेशवे, साताराचे छत्रपती प्रतापसिंह, त्यांचे बंधू राजमान्य भाईसाहेब यांनी जो सोलापूरच्या भुईकोट किल्ल्याचा सहारा घेतला होता, त्यांना तो सोडावा लागला आणि ते कुटुंबियांसह ब्रम्हावर्त (मध्य प्रदेश) कडे निघून गेले. येथे मराठेशाहीचा अंत झाला.[८६]

सारांश, वरीलप्रमाणे सोलापूर जिल्ह्याची भौगोलिक आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी संक्षिप्तपणे पाहिली. राजकीयदृष्ट्या इतिहासात सोलापूरचा भूप्रदेश स्वामित्वाच्यादृष्टीने काहीसा अस्थिर होता, असे दिसून येते. मध्येच अनेकदा दुष्काळ होता, पठारी प्रदेश असल्याने सुपीकतेचेही प्रश्न होते, आहेत. अशा अनेक कारणांमुळे फार मोठे स्तिमित करणारे राजेशाही वैभव निर्माण होऊ शकले नसावे, असे वाटते. अशा मधल्या विसाव्याच्या ठिकाणच्या सोलापूरच्या ठिकाणी तरीही काही ऐतिहासिक भग्नावशेष आहेत, काही पूर्णविशेष आहेत. ते पुरातन, मध्ययुगीन संस्कृतीचे प्रतिनिधित्त्व करीत उभे आहेत.

सोलापूर जिल्ह्याला प्राचीन काळापासूनचा इतिहास दिसून येतो. येथील भुईकोट किल्ल्यामुळे सोलापूर जिल्ह्याला इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे. मध्ययुगीन काळातच या किल्ल्याची निर्मिती झाली. किल्ल्याबरोबरच सोलापूर जिल्ह्यात इतिहासाची साक्ष देणारे अनेक पुरावे मिळतात, मोडी कागदपत्रे, शिलालेख, ताम्रपट, नाणी, मंदिरे, मस्जिद, मूर्ती, गढ्या, वाडे यासारख्या वास्तू हे इतिहासाचे पुरावे सोलापूर जिल्ह्यात आहेत.

मध्ययुगात आदिलशाही आणि निजामशाहीच्या काळात सोलापूर जिल्हा हा नेहमीच अशांततेत राहिला. बादशहा औरंगजेबचा मुक्काम हा सोलापूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी येथे साडेचार वर्षे होता. तेथून तो चाळीस किलोमीटर अंतरावर सोलापूर शहरातील भुईकोट किल्ल्यात बत्तीस

खांबी मस्जिदमध्ये प्रत्येक शुक्रवारी नमाज पढण्याकरिता येत असे. ही साडेचार वर्षे त्यानंतरही औरंगजेबाचे कुटुंब बराच काळ येथेच राहिले. त्यावेळी राजकीय घटना येथे घडल्या.

सोलापूर जिल्हा हा अनेक दृष्टीने महत्त्वाचा आहे. पेशवेकाळात सोलापूर शहराचा विकास झाला तसेच मध्ययुगीन काळातील मराठा साम्राज्यात सध्या सोलापूर जिल्ह्यातील अनेक परगण्यांमध्ये वतनदार आणि जहागिरदार होते, त्यांना केंद्रीय प्रशासनात महत्त्व होते. मराठी सत्तेचा शेवट हा पेशवे दुसरे बाजीराव यांच्या काळात झाला. ब्रिटिश कॅप्टन स्मिथ आणि पेशव्यांचे सेनापती बापू गोखले यांची लढाई आष्टी, ता. मोहोळ येथे झाली. हे ठिकाण सोलापूर जिल्ह्यातील आहे. तेथे सेनापती बापू गोखले यांची समाधी आहे. त्यामुळे ऐतिहासिकदृष्ट्या सोलापूर जिल्ह्याला महत्त्वाचे स्थान आहे.

संदर्भ ग्रंथ

१) शितोळे हरिभाऊ अंबादास, सोलापूर दर्शन, आय.व्ही. झुंजा रीगल प्रिंटींग प्रेस, सोलापूर, १९८०, पृ.क्र. ७.

२) द गॅझेटियर ऑफ इंडिया, महाराष्ट्र स्टेट, सोलापूर डिस्ट्रिक्ट, १९७७, पृ.क्र. ८७.

३) कित्ता, द गॅझेटियर ऑफ इंडिया, महाराष्ट्र स्टेट, सोलापूर डिस्ट्रिक्ट, १९७७, पृ.क्र. २०.

४) कुलकर्णी एल. जी., सोलापूर जिल्ह्याची माहिती पुस्तिका, अभय प्रकाशन, १९८८, पृ.क्र. ३०.

५) कुलकर्णी गणेश पंढरीनाथ, सोलापूर नगरपालिका शतसंवत्सरिक ग्रंथ, सोलापूर, १९३५, पृ.क्र. ४.

६) उपरोक्त, शितोळे हरिभाऊ अंबादास, पृ.क्र. २२.

७) उपरोक्त, कुलकर्णी गणेश पंढरीनाथ, पृ.क्र. ९.

८) कोट्टूरशेट्टी ए. बी., शिवयोगी सिद्धरामेश्वर कर्नाटका विद्यापीठ, धारवाड, २००४, पृ.क्र. ७८.

९) जांभळे अनिल खताळ, सोलापूर जिल्ह्यातील वीरगळांचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक दृष्टीने चिकित्सक अभ्यास, अप्रकाशित शोधप्रबंध, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर, पृ.क्र. ५५.

१०) जळकोटकर विलास, कुलकर्णी महेश, सबकुछ सोलापूर, समूह संपादक लोकल मीडिया प्रा. लि., २०१४, पृ.क्र. १५१.

११) देवळे एस. आर., महाराष्ट्रातील किल्ले, अभय प्रकाशन, पुणे, १९८१, पृ.क्र. ९५.

१२) कित्ता, देवळे एस. आर., पृ.क्र. ९७.

१३) उपरोक्त, जक्कल वि. न., पृ.क्र. ३६.

१४) उपरोक्त, जक्कल वि. न., पृ.क्र. ५०.

१५) उपरोक्त, देवळे एस. आर., पृ.क्र. ९९.

१६) कुंभार आनंद, संशोधन तरंग, नवभारत प्रकाशन संस्था, मुंबई, १९८८, पृ.क्र. ३५.

१७) कित्ता, कुंभार आनंद, पृ.क्र. ६५.

१८) उपरोक्त, कुलकर्णी एल. जी., पृ.क्र. ३०.

१९) जाधवर देवा, सोलापूर जिल्ह्याची माहिती, देवा प्रकाशन, २०१०, पृ.क्र. ४०.

२०) कित्ता, जाधवर देवा, पृ.क्र. ४०.

२१) कुलकर्णी सतीश, अक्कलकोट स्वामी दर्शन स्मरणिका, २०१०, पृ.क्र. १८.

२२) उपरोक्त, कुलकर्णी गणेश, पृ.क्र. ७८.

२३) उपरोक्त, सोलापूर गॅझेटियर, पृ.क्र. १०९.

२४) हलगणे स. गो., बसवेश्वर चरित्र, अमोल प्रकाशन, पुणे, २००४, पृ.क्र. २९.

२५) भिडे गजानन, संपादित शोधनिबंध संग्रह, शिवाजी विद्यापीठ, इतिहास प्राध्यापक परिषद, चवथे व पाचवे अधिवेशन, १९९८, पृ.क्र. ३२, ३३.

२६) मोरवंचीकर आर. एस., दक्षिण, काशी पैठण, रविराज प्रकाशन, पुणे, १९८७, पृ.क्र.१४.

२७) Excavation Report For Mudhavi, Siddapur, Deccan College Research Centre, Pune, 2004.

२८) उपरोक्त, महाराष्ट्र राज्य जिल्हा परिचय, सोलापूर जिल्हा, पृ.क्र. ५.

२९) OP. Cit., Kunte B. G., Page No. 36.

३०) जोशी महादेवशास्त्री, (संपादक) भारतीय संस्कृति कोश, खंड–७, अनमोल प्रकाशन, पुणे, १५ मे २००४, पृ.क्र. २००.

३१) Op.Cit. Kunte B. G., Page No. 36.

३२) Ibid, Kunte B. G., Page No. 38.

३३) उपरोक्त, शितोळे हरिभाऊ अंबादास, पृ.क्र. ३.

३४) गायकवाड संजय, कुडलसंगम (जि. सोलापूर) येथील मंदिर समूह आणि शेजारील जिल्ह्यातील मध्ययुगीन मंदिरांचा तौलनिक अभ्यास, अप्रकाशित शोधप्रबंध, २०११, पृ.क्र. ११.

३५) Op.Cit. Kunte B. G., Page No. 36.

३६) Ibid, Page No. 41.

३७) उपरोक्त, गायकवाड संजय, अप्रकाशित शोधप्रबंध, पृ.क्र. १३.

३८) कदम य. ना., समग्र भारताचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, एप्रिल २००३, पृ.क्र. १३५.

३९) मिराशी वा. वि., संशोधन मुक्तावली, मध्यप्रदेश संशोधन मंडळ, नागपूर, १९५४, पृ.क्र. ६५.

४०) मिराशी वा. वि., कालीदास, महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ, मुंबई, १९३४, पृ.क्र. ३९.

४१) Gopal B. R., Minor Dynastics of South India, Karnataka, Vol.-1, New Era Publication, Madras, 1982, Page No. 344.

४२) Ritti Shrinivas, Kumbhar Anand, Inscription from Solapur District, Shrihari Prakashan, Dharawad, 1986, Page No. 149.

४३) मिराशी वा. वि., शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख, खंड १ ला, डॉ.मु.चा. देवपुजारी प्रकाशन, नागपूर, १९७४, पृ.क्र. १३.

४४) जोशी लक्ष्मणशास्त्री (संपादक), मराठी विश्वकोश, खंड १४ वा, महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ, मुंबई, पृ.क्र. ३४.

४५) पानसे मु. ग., यादवकालीन महाराष्ट्र, मराठी ग्रंथसंग्रहालय प्रकाशन, मुंबई, १९६३, पृ.क्र. २४.

४६) सहस्त्रबुद्धे पु. ग., महाराष्ट्र संस्कृती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजया नगर ३०, २००३, पृ.क्र. ११०.

४७) Op.Cit., Ritti Shrinivas, Kumbhar Anand, Page No. 160.

४८) Ibid, Page No. 163.

४९) जोशी लक्ष्मणशास्त्री, उपरोक्त, मराठी विश्वकोश, खंड १४ वा, पृ.क्र. ६८.

५०) भिडे गजानन, मध्ययुगीन भारत, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०००, पृ.क्र. ५.

५१) महाजन व्ही. डी., मध्यकालीन भारत (१००० इ. स. १७६१ ई. तक), एस. चन्द, दिल्ली, २००९, पृ.क्र. १३३.

५२) महाजन व्ही. डी., कित्ता, पृ.क्र. १३७.

५३) महाजन व्ही. डी., उपरोक्त, पृ.क्र. १४०.

५४) अकलुजकर लता, किल्ले सोलापूर, संकल्प प्रकाशन, पृ.क्र. ११.

५५) उपरोक्त, महाराष्ट्र राज्य जिल्हा परिचय, सोलापूर जिल्हा, पृ.क्र. ५.

५६) कित्ता, महाराष्ट्र राज्य जिल्हा परिचय, पृ.क्र. ५.

५७) उपरोक्त, महाराष्ट्र राज्य जिल्हा परिचय, पृ.क्र. ७.

५८) देशमुख गोपाळराव, सोलापूर जिल्ह्याचा इतिहास, मराठा कालखंड, भाग–१, रेवू प्रकाशन, पंढरपूर, २००९, पृ.क्र. ४७३.

५९) कित्ता, देशमुख गोपाळराव, पृ.क्र. ४७५.

६०) उपरोक्त, अकलुजकर लता, किल्ले सोलापूर, संकल्प प्रकाशन, सोलापूर,पृ.क्र. ४४.

६१) Op.Cit., Bombay Gazetter, Solapur District, Vol. XX, Page No. 283.

६२) जक्कल विठ्ठल नरसाप्पा, सोलापूर शहराचा इतिहास, १९२८, पृ.क्र. ५९.

६३) Op.Cit., Bombay Gazetter, Solapur District, Vol. XX, Page No. 286.

६४) Ibid., Bombay Gazetter, Solapur, Page No. 287.

६५) उपरोक्त, देशमुख गोपाळराव, पृ.क्र. ४२१.

६६) उपरोक्त, अकलुजकर लता, पृ.क्र. ५१.

६७) पगडी सेतु माधवराव, मोगल आणि मराठे, ठोकळ प्रकाशन, पुणे,१९६३,पृ.क्र. ८०.

६८) कित्ता, पगडी सेतु माधवराव, पृ.क्र. ८६.

६९) सरकार जे. एम., औरंगजेबाचा इतिहास, म.रा.सा.से. मंडळ, १९७८, पृ.क्र. ५८६.

७०) कुलकर्णी एस. सी., सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन ऐतिहासिक स्मारकांचा टिकात्मक अभ्यास, शोधप्रबंध, सोलापूर विद्यापीठ, २००८, पृ.क्र. १८८.

७१) सय्यद नस्सीम फारुख, सोलापूर तारिख के आयने में ईलाही व फलाही तनजीम, सोलापूर, १९९९, पृ.क्र. ६०.

७२) कुंभार आनंद, संशोधन त्रैमासिक, राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, मार्च, २००३, लेख, पृ.क्र. १०.

७३) उपरोक्त, पगडी सेतु माधवराव, मोगल दरबार, बातमीपत्रे, खंड १ ला, पृ.क्र. १७.

७४) आपटे, कोतुरकर, महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, पृ.क्र. ८४, ८५.

७५) उपरोक्त, अकलुजकर लता, पृ.क्र. ६२.

७६) मिटीकर नानासाहेब, किल्ल्यासंबंधीची कैफियत, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, पृ.क्र. ६०.

७७) उपरोक्त, अकलुजकर लता, पृ.क्र. ६३.

७८) मुजूमदार जी. एल., त्रैमासिक, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९३८, अंक ४, पृ.क्र. ६५.

७९) सरदेसाई गो. स., मराठी रियासत, खंड ३, पृ.क्र. १९०.

८०) कित्ता, सरदेसाई गो. स., पृ.क्र. २८८.

८१) सरदेसाई गो. स., पेशवे दप्तर, खंड ४१, मुंबई सरकार सन १९३०, लेखांक २०६.

८२) उपरोक्त, अकलुजकर लता, पृ.क्र.

८३) खरे वा. य., ऐतिहासिक लेखसंग्रह, खंड १३, मिरज, पृ.क्र. ६९४७.

८४) कित्ता, खरे वा. य., पृ.क्र. ६९६०.

८५) उपरोक्त, देशमुख गोपाळराव, पृ.क्र. ३५६.

८६) पगडी सेतु माधवराव, मोगल दरबारची बातमीपत्रे, १६८५–१७००, म.रा.सा.से. मंडळ, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९७८, पृ.क्र. १६१.

प्रकरण २ रे

मध्ययुगीन काळातील वतनदारी पद्धती आणि सोलापूर जिल्ह्यातील जहागीरदार व वतनदार

प्रस्तावना :

मराठेकाळातील सरकारी अधिकारी हे केंद्रीय प्रशासन व्यवस्था प्रांतीय किंवा परगणा प्रशासनव्यवस्था आणि ग्रामपातळीवरील प्रशासनव्यवस्था या तीन स्तरांवर विभागलेल्या प्रशासनव्यवस्थेवर काम करीत असत. त्यामध्ये देशमुख व देशपांडे, कमाविसदार, मामलेदार, पाटील, कुलकर्णी, किल्ल्यांचे अधिकार, लष्करातील अधिकारी व इतर तत्सम अधिकाऱ्यांचा समावेश झाल्याचे दिसते. यातील काही अधिकारी जसे देशमुख, देशपांडे, पाटील व कुलकर्णी हे परंपरेने सरकारी अधिकारी म्हणून काम करीत असल्याचे निदर्शनास येते. तर कमाविसदार व मामलेदार हे सरकारी अधिकारी खास मराठ्यांनी आपल्या भरोशाचे म्हणून नेमल्याचे दिसते. प्रशासनावर आपला वचक राहण्यासाठी व त्याचबरोबर पारंपारिक सरकारी अधिकाऱ्यांवर नजर ठेवण्यासाठी, किंबहुना त्या त्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठीच अशा खास अधिकाऱ्यांची पेशव्याने निर्मिती केल्याचे दिसते.[०१]

मराठेकाळातील या सर्व स्तरांवरील सरकारी अधिकाऱ्यांना पारंपरिक हक्क आणि अधिकारी मानपान, वतने, खास अधिकार आणि रोख पगारही दिला जात असे. या सर्व अधिकाऱ्यांना कारभार करण्यासाठी त्या त्या विभागातील अधिकार दिल्याचे दिसते. या अधिकाऱ्यांचे हक्क, मानपान आणि दिला जाणारा पगार यातून त्यांच्यात असलेली श्रेणीबद्धता स्पष्ट होते. केंद्रीय प्रशासनातील अधिकाऱ्यांचा दर्जा हा प्रांतीय प्रशासनातील अधिकारी व ग्रामप्रशासनातील अधिकारी यांच्यापेक्षा निश्चित वेगळा असल्याचे दिसते. मराठे काळातील सर्व स्तरांवरील सरकारी अधिकारी प्रामाणिकपणे राज्याची सेवा करताना आढळतात. पण सगळ्यांचे स्वभाव, वृत्ती आणि प्रवृत्ती सारखी नसल्याने कुणाच्या तरी हातून वाईट कृत्य घडणे हे अपरिहार्य

आहे. अशातूनच राजकारणाला वेगळे वळण मिळत असे. त्यामुळे मराठेकालीन राज्यकर्ते हे आपल्या अधिकाऱ्यांच्या वर्तनाविषयी जागरुक होते.[०२]

सोलापूर जिल्हा हा मध्ययुगात मराठ्यांच्या प्रशासनात वेगवेगळ्या अधिकाऱ्यांच्या अधिकाराखाली होता. शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळातील पहिला पेशवा होण्याचा मान हा सोलापूर जिल्ह्यालाच जातो. शामराज नीळकंठ हे करमाळा तालुक्यातील हिवरे येथील होते. परांडा किल्ल्याच्या पंचक्रोशीतील हे एक छोटेसे गाव होते. पेशवेपद मिळण्याचा त्यांना पहिला मान मिळाला. त्यांचे अंगचे गुणांची पारख करूनच शहाजीराजांनी हा मान त्यांना दिला होता. सन १६४२ पासून पुढील ३० वर्षे शामराज नीळकंठ शिवाजी राजेंच्या संगती राहिले. त्यांनी शिवाजी राजांच्या स्वराज्य उभारणीचे कार्यात त्यांना मोलाची साथ दिली. तसेच तोंडले बोंडले गावचे *'हिम्मतबहाद्दर'* घराण्यातील विठोजी चव्हाण, उदाजी चव्हाण, प्रितीराव चव्हाण यांनी पुढील शंभर वर्षे प्राणांची बाजी लावून स्वराज्याची सेवा केली. भाळवणीचे नाईक निंबाळकर, दहिगावचे नाईक निंबाळकर, गुरसाळे येथील कवडे घराणे, करमाळ्याचे रावरंभा निंबाळकर घराणे, अक्कलकोटचे राजे भोसले घराणे या घराण्यातील कर्त्या पुरुषांनी इतिहासात मोलाची कामगिरी केली. अशी अनेक घराणे सोलापूर जिल्ह्यातील मराठ्यांच्या प्रशासनात कार्यरत होती. सोलापूर जिल्ह्यात मराठ्यांच्या प्रशासनात कार्यरत असलेल्या या अधिकाऱ्यांच्या, सरदारांच्या वास्तू आजही सोलापूर जिल्ह्यात इतिहासाची साक्ष देतात. या अधिकाऱ्यांच्या गढ्या, वाडे, त्यांच्या सनदा, कागदपत्रे, हत्यारे अस्तित्वात आहेत.[०३]

मराठेकालीन प्रशासन :

मराठेकालीन केंद्रीय प्रशासन पहात असताना शिवपूर्वकालीन केंद्रीय प्रशासनाचा मागोवा घ्यावा लागतो. कोणत्याही व्यक्तीला पूर्वपरंपरेला संपूर्णपणे बदलून पूर्णत: नवीन अशी कोणतीच गोष्ट करता येत नाही. शिवकालीन केंद्रीय प्रशासनावर दक्षिणेकडील मुस्लिम प्रशासनाचा प्रभाव दिसून येतो. शिवपूर्व काळात महाराष्ट्रात निजामशाही व आदिलशाही यांचे राज्य होते. मुस्लिम राजवटीमध्ये कायदा व सुव्यवस्थेचा अभाव दिसून येतो. १६३६ मध्ये मोगलांनी व आदिलशहांनी

संयुक्तपणे निजामशाहीचा नाश केला. भोसले घराण्याला वंशपरंपरेने पुणे, सुपे, बारामती व इंदापूर हे परगणे मिळाले होते. निजामशाहीच्या नाशानंतर शहाजी आदिलशाहीच्या सेवेत रुजू झाला. आदिलशाही राज्याबद्दल डॉ. एस. एन. सेन म्हणतात, ''शांतता व सुव्यवस्था राखण्या इतके विजापूरचे सरकार प्रबळ नव्हते. युद्धामुळे देशाची अपरिमित नुकसानी झाली होती. पुण्याचा परिसर निर्मनुष्य झाला होता.''[०४]

शिवपूर्वकाळापूर्वी आदिलशाही व निजामशाहीमध्ये मुलकी व लष्करी प्रशासनात अनेक दोष दिसून येतात. त्यांचा उगम केंद्रसत्तेच्या दुर्बलपणामध्ये आहे, याची शिवाजी महाराजांना जाणीव होती. मुलकी प्रशासनात सरदारांना खुष राखण्यासाठी मुसलमानी आमदानीत सरंजाम देण्याची जी पद्धती होती, तिचे दोष शिवाजीने पूर्णपणे जाणले होते.[०५] एकदा सरदारांना सरंजाम दिला म्हणजे हे सरदार प्रबळ होतात व केंद्र सरकारला न जुमानता स्वत:च्या मनाला येईल तसा कारभार करतात, याचा अनुभव त्यांना आला होता. सामान्य लोकांना कोणत्याही कारणाने जर जहागिरी दिल्या तर त्या लोकांची ताकद दिवसेंदिवस वाढत जाते म्हणून अशा लोकांना जहागिरी न देता स्वतंत्रपणे पगारी नोकरी देणे त्यांना आवश्यक वाटले. त्याने ग्रामरचनेत आमुलाग्र बदल केला नाही. परंतु हळूहळू देशमुख देशपांड्यासारख्या पिढीजात वतनदारांचे महत्त्व खची केले.[०६]

मुसलमानी आमदानीत प्रशासनातील दोषांमुळे राज्याचे संरक्षण करावयास सवड मिळत नसे. हे दोष लक्षात घेऊन शिवाजी महाराजांनी वतनदारीची पद्धत नष्ट करून सामान्य रयतेला संरक्षण दिले. संरक्षणासाठी जहागीरदारांच्यावर विसंबून न राहता स्वत:चेच सैन्य असले पाहिजे हा विचार कृतीमध्ये उतरवला.

शिवाजी महाराजांच्या केंद्रीय प्रशासनाची वैशिष्ट्ये :

शिवाजी महाराजांनी पूर्वीच्या राजवटीतील अधिकारपदे वंशपरंपरागत देण्याची पद्धत बंद केली किंवा कोणालाही जहागीर न देण्याचे धोरण स्वीकारले. तरीसुद्धा डॉ. बाळकृष्ण म्हणतात, ''देशमुख, देशपांडे, कुलकर्णी यांची वतने बरखास्त न करण्यात त्यांचा दूरदर्शीपणा दिसतो.

त्यांनी फक्त अशा अधिकाऱ्यांचे हक्क कमी केले. तथापि काही विशेष प्रसंगी त्यांनी लोकांना जहागीर दिल्याचे दिसून येते. ''[०७]

उदा.

१) व्यंकोजी व त्याची पत्नी दीपाबाई व रघुनाथपंत यांना कर्नाटकात जहागिरी दिल्या.

२) हंबीरराव मोहिते, संताजी घोरपडे, बहिर्जी नाईक यांना स्वतंत्र जहागिरी दिल्या होत्या.[०८]

छत्रपती शिवाजी मुस्लिम सत्तेशी लढा देऊन महाराष्ट्रात हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. जून १६७४ रोजी स्वत:ला त्यांनी मराठ्यांचे छत्रपती म्हणून घोषित केल्यानंतर स्वत:चा राज्याभिषेकही करवून घेतला. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यकारभार सुव्यवस्थित पार पाडण्यासाठी अष्टप्रधान मंडळाची स्थापना केली. अष्टप्रधान मंडळामार्फतच त्यांनी स्वराज्याचा राज्यकारभार केला. शिवाजी महाराजांनी जी राज्यव्यवस्था निर्माण केली त्याच राज्यव्यवस्थेवर आधारित पेशव्यांची राज्यव्यवस्था होती. छत्रपती हा राज्याचा प्रमुख होता. पेशवेकाळातही छत्रपती हा राज्याचा प्रमुख होता. परंतु छत्रपती शाहूच्या निधनानंतर छत्रपतीचे महत्त्वच संपुष्टात आले आणि अष्टप्रधान मंडळातील एक पद समजला जाणारा *'पेशवा'* हा राज्याचा खराखुरा सत्ताधीश झाला. महाराष्ट्रात *'छत्रपती'* किंवा राजा याचे स्थान सर्वश्रेष्ठ असूनही त्याचे स्थान हे १७१३ नंतर मोगल बादशहाला संपूर्णपणे दुय्यम राहिलेले दिसते. कारण इ.स. १७१३ साली ज्यावेळेस शाहू महाराजांनी बाळाजी विश्वनाथास पेशवेपद दिले त्यावेळेस पासून पेशवेपद हे वंशपरंपरेने एकाच घराण्यात चालू राहिले. शाहू महाराजांच्या कारकिर्दीतील तीनही पेशवे पराक्रमी व कर्तबगार होते. परंतु हळूहळू छत्रपतींच्या हातातील सर्व सत्ता पेशव्यांकडे गेली. त्यामुळे छत्रपती नामधारी बनले आणि स्वराज्याची खरी सत्ता पेशव्यांच्या हातात गेली.[०९]

इ.स. १७१९ साली शाहूने दिल्लीच्या बादशहाकडून स्वराज्य चौथाई व सरदेशमुखी या तीन सनदा प्राप्त केल्या. याचबरोबर त्याने एक स्वतंत्र करारही केला. ज्यात त्याला मिळालेल्या चौथाई व सरदेशमुखी हक्काच्या मोबदल्यात त्याने बादशहाला १५००० सैन्यानिशी मदत करावी असे बंधन घातले.[१०] छत्रपती शाहूंची राजा म्हणून कारकीर्द इ.स. १७०८ ते इ.स. १७४९ अशी

होती. छत्रपती शिवाजी व छत्रपती शाहू यांच्या काळातील राजेशाहीमधील फरक स्पष्ट करताना रियासतकार सरदेसाई म्हणतात, ''छत्रपती शाहूंच्या बाबतीत सर्वात प्रमुख अशी गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, त्यांच्या व्यक्तिमत्त्व व स्वभावामुळे मराठ्यांच्या धोरणावर फार परिणाम झाला. शिवाजीनंतर मराठी राज्याच्या स्थित्यंतरावर परिणाम घडविणारी व्यक्ती म्हणूनच शाहूंकडे पाहिले पाहिजे. शाहूंच्या पुढे हिंदुपदपादशाहीचे स्वप्न साकार करण्याचे कार्य होते. परंतु हे कार्य करीत असताना तत्कालीन काळाच्या संदर्भात त्याचा अर्थ लावण्यात आला व मोगलांना मदत करत जेवढे होईल तेवढेच त्यांनी हिंदूपदपादशाहीचे स्वप्न साकार केले.''[११]

छत्रपती शाहू जिवंत असेपर्यंत छत्रपतीपदाचा धाक व प्रतिष्ठा कायम राहिली. तसेच त्या पदाला लोक सन्मान, दर्जा होता. पण शाहूंच्या मृत्यूनंतर छत्रपतींचे स्थान हे संपूर्णपणे अधिकारहीन झाले. शाहूंनंतर छत्रपतीपदावर योगय व्यक्ती न आल्यामुळे छत्रपतींची उरलीसुरली प्रतिष्ठाही संपुष्टात आली आणि जो कोणी पेशवा होईल त्याला पेशवेपदाची वस्त्रे पाठविणे एवढेच कार्य छत्रपतींकडे राहिले. शेवटी शेवटी तर सातारच्या छत्रपतींची स्थिती दयनीय झाली व पेशव्यांचे स्थान व दर्जा सर्वश्रेष्ठ ठरले.[१२]

पेशवा :

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या अष्टप्रधान मंडळातील *'पेशवा'* हा एक मंत्री होय. शिवाजी महाराजांच्या काळात पेशवेपद वंशपरंपरागत नव्हते. कर्तबगार व्यक्तिचीच निवड पेशवेपदासाठी केली जात असे. त्यामुळे पेशवा या पदाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते.

इ. स. १७०७ मध्ये औरंगजेब बादशहा मरण पावला. त्याच्या मृत्यूनंतर १६८९ पासून मोगलांच्या कैदेत असणारा महाराष्ट्राचा छत्रपती शाहू महाराज यांची सुटका झाली. इ. स. १७०० ते इ.स. १७०७ या काळात मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धांचे नेतृत्व महाराणी ताराबाईने केले. शाहू महाराष्ट्रात आल्यानंतर स्वाभाविकच मोगलांच्या उद्देशानुसार शाहू व ताराबाई यांच्यात राज्यासाठी संघर्ष सुरू झाला. दोघांनीही स्वराज्यावरर आपला हक्क प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. शाहूंनी महाराष्ट्रात आल्यानंतर १२ जानेवारी १७०८ रोजी सातारा येथे स्वत:चा

राज्याभिषेक करवून घेतला. १७१० मध्ये ताराबाईने कोल्हापूरच्या राज्याची स्थापना केली. या वेळेपासून तर शाहू व ताराबाई हा संघर्ष दिवसेंदिवस तीव्र होत गेला. राजारामाच्या काळापासून महाराष्ट्रात अनेक सरदार व जहागीरदार पुन्हा निर्माण झाले होते. त्यापैकी फारच थोड्यांच्या मनात स्वराज्याबद्दल व स्वराष्ट्राबद्दल नि:स्वार्थ प्रेम होते. अशा स्थितीत शाहू छत्रपती झाल्यानंतर सुद्धा काही काळ त्यांचे राज्य अस्थिर होते. न्या. रानडे म्हणतात, ''अशा अंदाधुंदीतून सुव्यवस्था निर्माण करण्याचे काम बाळाजी विश्वनाथने केले. त्याचाच परिणाम म्हणून १६ नोव्हेंबर १७१३ रोजी बाळाजी विश्वनाथाला पेशवेपद देण्यात आले. या घटनेचे दूरगामी परिणाम इतिहासावर झाल्याचे दिसून येतात.''[१३]


प्रांतिक प्रशासन :

कोकणपट्टी, देश आणि कर्नाटक मोहिमेत जिंकलेला कर्नाटकातील भाग इतक्या प्रदेशाचा समावेश शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात होता. स्वराज्यातील प्रदेशाचे विभाग (सरसुभा), प्रांत, तालुका व मौजा असे प्रशासकीय विभाग पाडण्यात आले होते. प्रत्येक विभागावर एक सरसुभेदार असे प्रत्येक प्रांतात एक सुभेदार व एक कारकून असे प्रांताची विभागणी तालुक्यात किंवा महालात केलेली असे व त्यावरील अधिकाऱ्यास हवालदार असे म्हटले जाई. तालुकाही काही गावांच्या गटात विभागला जाई व प्रत्येक गटाच्या प्रमुखास कमाविसदार असे म्हटले जाई. प्रत्येक मुलकी अधिकाऱ्यास स्वतंत्र कचेरी असे, प्रत्येक सुभेदाराच्या हाताखाली आठ मदतनीस असत. ते असे दिवाण मुजुमदार, फडणीस, सबनीस, कारखानीस, चिटणीस, जामदार व पोतनीस यांची नेमणूक शिवाजी महाराज स्वत: करीत असत.

मुसलमान काळातील बऱ्याच पद्धती जशाच्या तशा शिवकाळात अस्तित्वात असल्याचे दिसून येते. काही लेखकांच्या मते शिवकाळ हा मुसलमानी काळास जोडून असल्याने तसेच हा काळ धामधुमीचा, लढायांचा असल्याने प्रशासनात बदल केले गेलेले नसावेत.[१४]

पेशवेकाळात प्रशासनाच्या सोयीसाठी राज्याचे अनेक विभाग पाडलेले होते. प्रशासनाचा सर्वात लहान विभाग म्हणजे मजरे, मौजे व कसबा हे होय. ज्या ठिकाणी कसबी लोक राहत

असत त्या गावाला कसबा असे म्हटले जात असे. खेड्याच्या वैशिष्ट्यावरूनच त्याला मजरे, मौजे, कसबे या नावाने ओळखले जात असे. बारा गावांची हद्द ज्या गावाला लागली आहे तो कसब्याचा गाव असेही म्हटले जात असे.[१५]



वतनदारी पद्धत :

वतनदारीची पद्धत दक्षिणेकडे पूर्वपरंपरेने चालत आलेली आहे. सबंध समाजाची उभारणीच वतनावर झालेली होती. पूर्वीच्या काळी व्यापार व उद्योगधंदे यांच्यापेक्षासुद्धा अन्नवस्त्रांसाठी वतन हेच जास्त महत्त्वाचे मानत असत.[१६]

वतनदारी म्हणजे जमीनदारीच होय. ''जमीन संपादण्याकरिता मनुष्य जिवाचे रान करीत असे. जमीन ही सुद्धा एका पिढीपुरती मिळवायची नसून एकाच घराण्यात ती पिढ्यान्‌पिढ्या चालत राही.''[१७]

खेडेगावातील अनेक अधिकाऱ्यांना वतने व जमिनी काही खास हक्काने दिलेल्या असत. हे अधिकारी खेडेगाव व सरकार यांची कामे करीत असत. खेडेगावातून पाटील, कुलकर्णी, महार, चौगुला, चौधरी, रामोशी, लोहार, सोनार, सुतार, परीट, न्हावी, कुंभार, चर्मकार, शिंपी, तेली, जोशी, काझी व महाजन यासारखे वतनदार असत. सुभ्याच्या ठिकाणी असणाऱ्या वतनदारांना देसाई, देशकुलकर्णी, देशमुख, देशपांडे इ. नावांनी ओळखत असत. या सर्व वतनदारांना वंशपरंपरेने वतने दिलेली असत. दिलेली वतने ही सारायुक्त असत किंवा क्वचितप्रसंगी नाममात्र सारा वसूल केला जात असे.

फौज सरंजाम :

ज्यावेळी एखादे वतन सैन्य पदरी बाळगण्यासाठी किंवा किल्ल्याच्या संरक्षणासाठी दिलेले असे तेव्हा त्या वतनास फौज सरंजाम म्हणत असत.[१८]

जात सरंजाम :

काही वेळा एखाद्या घराण्याच्या प्रतिष्ठेसाठी एखादे वतन दिले जात असे तेव्हा त्या वतनास जात सरंजाम म्हणत.[१९]

फौज सरंजाम व जात सरंजाम या दोन्हीही प्रकारामध्ये ते सरंजामदार येत असत. असा हा वर्ग शिवपूर्व काळातील एक प्रतिष्ठित, श्रीमंत व अधिकारी असा वर्ग मानला जात असे. या वतनदारांना विशेष हक्कच इतक्या मोठ्या प्रमाणात असत की, सामान्य रयतेवर अन्याय होत असे तसेच स्वत:च्या सामर्थ्याच्या जोरावर केंद्रसत्ता दुबळी करण्याचे कार्य ते करू शकत असे. मुसलमानी आमदानीत हे सर्व वतनदार जवळजवळ लहान राजेच झालेले होते. शिवाजी महाराजांच्या सुरुवातीच्या हालचालींमध्ये बारा मावळातील अनेक वतनदार, देशमुख देशपांड्यांचा शिवाजी महाराजांना विरोध झाला होता. अशा स्थितीत वतनदार व वतनदारी या जुन्या समाजद्रोही परंपरेविरुद्ध शिवाजी महाराजांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. सुरुवातीला त्यांनी या वतनदारांचे प्रशासनातील अधिकार काढून घेतले. वतदारांची वतने काढून न घेता नवी वतने देण्याची पद्धत त्यांनी बंद केली.

आज्ञापत्रात रामचंद्र अमात्याने वतनदारीबद्दलचे शिवाजी महाराजांचे धोरण पुढील शब्दांत स्पष्ट केले आहे, ''प्रचलित वतने चालू ठेवावीत; परंतु वतनदारांचा रयतेवरील हक्क काढून घ्यावा. या धोरणाचा शिवाजींनी अगदी योग्य वापर केला. वतनदारांच्या गढ्या पाडून टाकल्या. त्यांचे सैनिक एकतर कमी केले किंवा आपल्या केंद्रिय लष्कराकडे घेतले. वतनदारांचे सैनिक काढून घेऊन सैनिकांचा पगार व नोकरीची कालमर्यादा निश्चित करुन त्यांच्या जीवनात स्थैर्य आणले. अधिकाऱ्यांच्या बाबतीत मुलकी व लष्करी अधिकारी असे विभाजन शिवाजींनी प्रथम केले. लष्करी अधिकाऱ्यांच्या हातात कोणत्याही प्रकारची राजकीय सत्ता ठेवली नाही. या विभाजनामुळे

वतनदारी पद्धतीचा कणाच मोडला. सरनौबत, मुजुमदार, कारकून अशा लोकांना जमिनी दिल्या परंतु त्यांच्याकडून इतरांप्रमाणेच सारा वसूल केला. रयत ही कोणत्याही परिस्थितीत राजापेक्षा श्रीमंत असणार नाही याची खबरदारी घेतली.''[२०]

मुसलमानी आमदानीमध्ये महसुल गोळा करण्यासाठी मक्त्यांचा लिलाव करण्याची पद्धत होती. या पद्धतीमध्ये जी व्यक्ती सरकारात जास्तीत जास्त पैसा भरण्याची हमी घेत असे त्याच व्यक्तीला असा मक्ता मिळत असे. परंतु शिवाजी महाराजांनी ही पद्धती बंद केली व रयतवारी पद्धत सुरू करून जनता व राजा यांच्यात प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित केले.

शिवाजी महाराजांनी वतनदारी नष्ट केली. पूर्वीप्रमाणे प्रशासकीय कामासाठी किंवा लष्करी कामासाठी कोणालाही वतन दिले नाही; परंतु काही अपवादात्मक काही वतने दिली. अशा या वतनांचे स्वरूप धार्मिक दिसून येते. हिंदू–मुस्लिम देवालयांना किंवा साधुसंतांना एखाद्या खेडेगावाच्या महसुलापैकी काही भाग नेमून दिला.[२१]

१) देवालये, मशिदी, मठ, साधुसंतांच्या समाध्या, अन्नछत्रे, धर्मशाळा, इ. ना खर्चासाठी वतने दिली.

२) विद्वान ब्राह्मण पंडितांना त्यांच्या विद्याभ्यासास प्रोत्साहन मिळावे म्हणून स्वतंत्र वतने दिली.

देशमुख :

देशमुखी वतन हे सर्व वतनात श्रेष्ठ वतन आहे. याचे महत्त्व देशव्यवस्था आणि राज्यकारभारपद्धती या दोन्ही दृष्टींनी अतिशय महत्त्वाचे आहे. देशमुखी संस्थेचे काम, मानपान आणि हक्क व या संस्थेचा व्याप, तसेच या संस्थेविषयीचे अनुकूल प्रतिकूल उल्लेख पाहिले असता इतकी गुंतागुंत त्यात दिसून येते की, त्यामुळे संस्थेचा स्वरुपाविष्कार पूर्णपणे व नेमका होणेही कठीण होऊन बसले आहे. अशा या महत्त्वाच्या गुंतागुंतीच्या पण अत्यंत आवश्यक असलेल्या संस्थेसंबंधाने सामान्यत: शिवकालास अनुसरुन, येथे काही विचार मांडले आहेत.[२२]

उत्पत्ति आणि अर्थ :

'देशमुख' या शब्दातील देश व मुख हे दोन्ही पदे संस्कृत असली तरी देशमुख असा सामासिक शब्द संस्कृत वाङ्मयात नाही. तत्पूर्वी या शब्दाचे काम *'विषयपति'* या संज्ञेने होत असे. *'ग्रामपति'*, *'विषयपति'*, *'राष्ट्रपति'* अशा चढत्या संज्ञा ताम्रशिलाशासनांतून येतात. *'आहार'*, *'भूति'*, *'मंडल'*, *'देश'* याही संज्ञा मुसलमानपूर्व राजवटीत येतात आणि त्यांत देश शब्द आहे. तथापि ज्याचेपासून मुख हा शब्द साधिता येईल असा मुख्य किंवा मुखं, मुखी हा शब्द त्यास जोडलेला नाही. सारांश, *'देशमुख'* हा शब्द मुसलमानोत्तर अधिक प्रस्तृत व रुढ झाला.[२३]

देशमुख या शब्दातील देश या पदाने एक देश म्हणजे एक परगणा, एक प्रांत घ्यावयाचा. देशमुख या शब्दाच्या जोडीला देसाई, नाडगौडा, हे दोन शब्द योजिलेले आहेत. पण ते कोकणांत व कर्नाटकात अधिक प्रमाणात आढळतील. त्याबरोबर हेही लक्षात घेतले पाहिजे की, महाराष्ट्रातील देशमुख, बाहुल्याने मराठाजातीतील आहे. तसेच कोकणातील देसाई ब्राह्मण व कर्नाटकातील नाडगौडा लिंगाईत जातींतील आढळतील. कर्नाटकातील हे नाडगौडा पुढे मराठ्यांचे लिंगाईत झालेले 'नाड' म्हणजे प्रांत व गौड म्हणजे पाटील हा गौड शब्द कसा झाला हे लक्षात घेण्याजोगे आहे.

ग्रामखंड असा संस्कृत–कानडी समास ताम्रपत्रांत येतो. गंड म्हणजे पति. ग्रामगंड यापासून गाउंड, गावुंड व त्यापासून गौडा अशी या शब्दाची उत्पत्ती सांगितलेली आहे. 'गौडा' पाटील या अर्थाचा शब्द आहे म्हणून तो पाटील या अर्थी रूढ झाला. महाराष्ट्रात देशमुख म्हणजे जरी देशाचा, प्रांताचा पाटीलच आहे. देसाई शब्द देशस्वामी किंवा देशपति यापासून बनला आहे. त्यांतही देशपति ह्या शब्दापासूनच देसाई ह्याची उत्पत्ति अधिक संयुक्तिक वाटते.[२४]

देशमुखीचे महत्त्व :

''इदलशाही, निजामशाही, मोगलाई देश कब्जा केला, त्या देशांत मुलकांचे पाटील, कुलकर्णी व देशमुख यांचे हाती कुल रयत.''[२१] यावरून लक्षात येते की, शिवकालाचे प्रारंभ

देशव्यवस्था पूर्णपणे या वतनदारावर अवलंबून होती. गावची रयत, गावचे शिवार म्हणजे गावाखालील शेतीची व चराऊ अथवा पडभूमी ही सर्व पाटलांचे ताब्यात आणि परगण्यातील रयत व भूमी देशमुखांचे हाती. म्हणजे राज्य चालविण्यास राजाला जो पैसा व धान्यादी सामग्री पाहिजे ती देशमुख, देशपांडे वतनदारांकरवी मिळावयाची. देशमुख–देशपांड्यांच्या जोडीला राज्यसूत्र चालकांकडून सुभेदार नेमलेले असतात. देशमुख हे परगण्यासाठी सरकारला जबाबदार असत. त्यामुळे सरकार व रयत यांचा संबंध मुळीच नसायचा.

देशमुख वतनदारांची प्रतिष्ठा :

राजप्रधानादिक सरकारकून मंडळी आणि हे परगण्याचे वतनदार लोक जेव्हा एकत्र एखाद्या निर्णयसभेमध्ये उपस्थित असतात तेव्हा या देशमुख वतनदारांची प्रतिष्ठा केवढी मोठी आहे हे दिसून येते. देशमुख हे शाश्वत अधिकारी होते. देशमुख/देशपांडे अथवा पाटील व कुलकर्णी यांचा सरकारी कागदोपत्री उल्लेख केला जातो.[२५]

देशमुख व देशपांडे :

शिवपूर्वकाळात प्रांतिक प्रशासनात देशमुख व देशपांडे या दोन अधिकाऱ्यांना अतिशय महत्त्व होते. शिवकाळात ते काही प्रमाणात कमी झाले, परंतु संपूर्णपणे नष्ट झाले नाही. देशमुख, देशपांडे यांनाच जमीनदार असे म्हणत असत. या दोन अधिकाऱ्यांचे प्रांताप्रमाणेच खेडेगावावरसुद्धा नियंत्रण चालत असे. शिवाजीने या अधिकाऱ्यांचे हक्क काढून घेतले व पेशव्यांनी हीच पद्धत पुढे चालू ठेवली. डॉ. सेन म्हणतात की, ''देशमुख, देशपांडे यांचे अधिकार शिवकालापासून कमी झाल्यामुळे पेशवेकाळात हे अधिकारी सामान्य रयतेचे मित्र व हितकर्ते म्हणून ओळखले जाऊ लागले. पूर्वीच्या काळात उद्दामपणाने वागणारे हे अधिकारी पेशवेकाळात रयतेची गाऱ्हाणी पेशव्यांच्यापुढे मांडू लागले.''[२६]

पूर्वीच्या काळात उद्दामपणाने वागणारे हे अधिकारी पेशवेकाळात रयतेबद्दल किती आस्था बाळगत असत, याबद्दलची माहिती देणारी काही पत्रे पेशवे दप्तरात उपलब्ध आहेत. १७६०–

६१ साली राजापूर प्रांतातील सिद्दी लोकांनी सामान्य रयतेला किती त्रास दिला, याचे वर्णन करणारे एक पत्र त्यांनी पेशव्याला लिहिले आहे. राजापूर प्रांतातील देशमुख खोत व पाटील यांच्यासह पुण्याला येऊन पेशव्याला स्वत: सिद्दींनी केलेल्या नुकसानीची माहिती दिली. १७६३–६४ साली जुन्नर प्रांतातील देशमुख व देशपांडे यांनी त्या प्रांतात मोगलांनी केलेली लूटमार व जाळपोळ यांची माहिती देवून त्या लोकांना जमीनसाऱ्यात काही सूट द्यावी अशी विनंती केली. यावरून देशमुखांच्या एकंदर वागणुकीत पूर्वीपेक्षा काही फरक पडलेला दिसतो. देशमुख व देशपांडे यांच्या वतनाची पूर्वीची प्रतिष्ठा जरी कमी झालेली असली तरी पेवशेकाळात त्यांचे वतन हे निश्चितच एक चैनीची बाब नव्हती. त्यांचे अधिकार कितीही कमी झाले असले तरी एलफिन्स्टन म्हणतो त्याप्रमाणे त्यांचा उपयोग मामलेदारांवर देखरेख ठेवण्यासाठी किंवा प्रांताचे हिशोब पाहण्यासाठी केला जात असे. तसेच पेशवे देशमुख देशपांड्यासारख्या पिढीजात अधिकाऱ्यांचा वापर सरकारी नोकरांवर वचक बसविण्यासाठी करून घेत असत. देशमुखांच्याकडे वतन, इनाम व देणगीदाखल दिलेल्या जमिनी या सर्वांची कागदपत्रे ठेवली जात असत. म्हणूनच देशमुखांचा उपयोग सरकारला होत असे.[२७]

पेशवेकाळात देशमुखाला त्याच्या प्रांतातील इनाम, देणगी इ. सनदांची एक स्वतंत्र नोंद ठेवावी लागत असे. या कागपत्रांवर देशमुखांचा स्वत:चा असा शिक्का उठविला जात असे. त्यांच्याकडे प्रांताच्या कारभारातील अनेक महत्त्वाची कामे असत. ज्याप्रमाणे पाटील हा खेडेगावात मुख्य असे त्याप्रमाणे प्रांताच्या बाबतीत देशमुख हा मुख्य असे. त्यामुळे त्यास विशेष हक्क असत. देशमुख व देशपांडे यांच्या हक्कात फारसा फरक नसे. देशमुखांना प्राप्त झालेल्या हक्कांबद्दल एलफिन्स्टन आपल्या अहवालात म्हणतो की, देशमुखांना अतिशय फायदा असे. त्यांना जमिन महसुलावर ५०% इतकी रक्कम मिळत असे. १०० एकरातील ५ एकर जमीनही त्याला मिळत असे. याशिवाय त्याने गोळा केलेल्या एकंदर महसुलापैकी २०% महसुल रक्कम त्याला प्राप्त होत असे.[२८]

ग्रामप्रशासनात देशमुखाचे महत्त्व :

देशमुख हा सुद्धा पाटील–कुलकर्ण्याप्रमाणेच खेडेगावचा एक अधिकारी असे. देशमुखाचा अधिकार हा पाटलापेक्षा मोठा असे. पाटील हा जसा खेड्याचा मुख्य त्याप्रमाणे देशमुख हा सुभ्याचा मुख्य असे. सुभ्यातील पडीक जमीन लागवडीखाली आणण्याचे काम त्याला करावे लागत असे. सर्व खेडेगावातून दरवर्षी दौरा काढणे, तेथील लोकांची चौकशी करणे, त्यांच्या अडी–अडचणी समजावून घेणे हे मुख्य काम असे. काही वेळा एखाद्या खेड्यातील महसूल ठरवून देण्याचे काम करीत असे तसेच कुलकर्ण्यांचे हिशोब तपासणेचे काम करीत असे. एखाद्या वेळेस जर पाटलाने त्याची रक्कम भरली नाही तर त्याला समज देणे व वेळप्रसंगी त्याच्याकडून ती रक्कम भरुन घेणे ही कामेही त्याला करावी लागत.[३०]

देशमुख हा आपल्या सुभ्यात लोकवस्ती टिकविणे व तिचा विकास करणे या कामामध्ये मग्न असे. युद्धानंतर सबंध सुभा काही वेळा ओस पडत असे. अशा स्थितीत खेडेगावच्या रहिवाशांना पुन्हा परत बोलाविणे व त्यांना काही सवलती देवून सुभ्याचे उत्पन्न टिकविणे हे याचे काम असे. महसुलात अडचणीवेळेस शेतकऱ्यांना सूट देण्याचा अधिकार त्याला असे. खेडेगाव व सरकार यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणजे देशमुख होय.

युद्धाच्या प्रसंगी आपल्या सुभ्यातील लोकांना एकत्र आणून त्यांच्याकडून विविध प्रकारची कामे तो करून घेत असे. महसुलाच्या जोडीलाच लष्करी सेवेमध्येसुद्धा त्याला भाग घ्यावा लागत असे. त्याच्या सुभ्यामध्ये असणाऱ्या किल्ल्याशी त्याचा घनिष्ठ संबंध असे. किल्ल्यामध्ये जर काही मनुष्यबळाची आवश्यकता असेल ते बळ पुरविण्याचे काम याला करावे लागत असे. एखाद्या वेळेस जर गावात पाटील नसेल तर त्याचे काम देशमुखाला करावे लागत असे. अशावेळी त्याची खूण नांगर व त्याचे नाव व सुभ्याचे नाव तो लिहित असे.[३१]

देशमुख हा वेगवेगळी कामे करीत असे तसेच त्याला वेगवेगळे हक्कही असत. त्याच्या सुभ्यातील कोणत्याही खेड्यातून एखाद्या कारागिराची किंवा व्यापाऱ्याची मदत घेण्याचा हक्क त्याला असे. प्रत्येक खेड्याने धान्य, जनावरांना चारा त्याला द्यावा असा रिवाज असे. ज्यांच्याकडे आंब्याची झाडे असतील त्यांनी त्याला आंबे पुरवावेत असा रिवाज असल्याचे पेशवे

दप्तरावरुन दिसून येते. याशिवाय बलुतेदारांकडून कोणती ना कोणती वस्तू त्याला मिळत असे. धनगराकडून लोकर, चर्मकाराकडून वहाणा, कुंभाराकडून मातीची भांडीही त्याला मिळत असत व त्यासाठी त्याला कोणताही खर्च करावा लागत नसे.

देशमुखाला सरकारने जारी केलेल्या करापेक्षा दोन टक्के जास्त कर घेण्याचा त्याला हक्क असे. गावटका व खवष्टका हे दोन हक्क त्याला मिळत असत.[३२]

देशपांडे :

गावातील चौथा महत्त्वाचा अधिकारी म्हणजे देशपांडे होय. ज्याप्रमाणे कुलकर्णी यांच्याकडे फक्त एका गावचा हिशोब ठेवण्याचे काम असे, त्याचप्रमाणे देशपांड्याकडे आपल्या ताब्यातील सर्व गावांचा हिशोब पाहण्याचे काम असे. गावोगावच्या कुलकर्ण्यांच्या कामावर देखरेख ठेवण्याचे काम करी. याचा उल्लेख 'देश कुलकर्णी' किंवा 'देशलेखक' म्हणून सुद्धा करतात. आपल्या भागातील कोणत्याही गावचा हिशोब तपासण्याचा अधिकार याला असे. ज्याप्रमाणे गावाच्या बाबतीत कुलकर्णी हा पाटलाला दुय्यम असे त्याप्रमाणे सुभ्याच्या बाबतीत देशपांडे हा देशमुखाला दुय्यम असे. देशपांड्याला देशपांडेपणाचे सारायुक्त गाव / जमीन इनाम दिलेली असे. गावच्या बाबतीत पाटील हा देशपांडे व देशमुख यांच्या मध्यस्थीने आपल्या महसुलात सूट मिळवून घेत असे. काही वेळेला जर मामलेदार रयतेवर अन्याय करीत असेल तर पाटील हे देशमुख व देशपांडे यांच्या मध्यस्थीने आपला हेतू साध्य करीत असत.[३३] पाटील आपला महसूल सरकारात भरत असताना त्या भरण्याची नक्कल देशपांड्याकडे पाठवीत असत. थोडक्यात म्हणजे देशपांडे हा गावच्या प्रशासनातील एक महत्त्वाचा घटक मानला जात असे.

देशपांड्याला ठिकठिकाणी वेगवेगळ्या नावाने ओळखतात. वऱ्हाडात 'वऱ्हाडपांडे', तर घाटावर 'घाटपांडे' या नावाने ओळखतात. हक्काच्या बाबतीत देशमुख व देशपांडे यांच्यातील फरक हा गुणात्मक नसून संख्यात्मक आहे.[३४] पाटील, कुलकर्णी व देशमुख यांना बलुतेदारांच्याकडून जे हक्क मिळत असत ते सर्व हक्क देशपांडेला मिळत असत.

खेडेगावात जे न्यायनिवाडे दिले जात असत त्यामध्ये हरणाऱ्या व्यक्तीकडून काही फी मिळत असे तिला हारकी मिळत असे. हारकीच्या रकमेपैकी निम्मी रक्कम सरकारात जमा करीत असत व उरलेल्या निम्म्या रकमेपैकी १/३ रक्कम देशपांडेंना मिळत असे व उरलेली रक्कम देशमुखांना मिळत असत.[३५] ज्याप्रमाणे खेडेगावातील पाटील व कुलकर्णी यांचे वेतन गावकऱ्यांमधून दिले जात असे. त्याचप्रमाणे देशमुख व देशपांडे यांचे वेतनसुद्धा गावकऱ्यांकडूनच दिले जात असे. असे हे वतनदार सरकारकडून नेमलेले असत. परंतु खेडेगावाशी त्यांचा घनिष्ठ संबंध असे.

चौगुला :

परंपरेने चालत आलेल्या अधिकाऱ्यांमध्ये चौगुला हा एक अधिकारी होता. त्याचे मुख्य काम म्हणजे गावच्या कारभारात पाटलाला हरएक प्रकारची मदत करणे. गाव सोडून गेलेल्या शेतकऱ्यांना पुन्हा गावात येण्याबद्दल प्रोत्साहन देणे हेही काम त्याला करावे लागे. पाटलाप्रमाणे नांगर ही याची खूण असे. गोतसभेमध्ये पाटलाच्या खालोखाल याचा दर्जा मानला जात असे. काही वेळा जमिनीची मोजमापणी करण्याचे काम याला करावे लागे. गावचा वसूल धान्याच्या रुपात गोळा केल्यानंतर सुभ्याच्या मुख्य ठिकाणी नेऊन देण्याच्या कामात याला मदत करावी लागे. गावातील धान्याची कोठारे व खाजगी लोकांची कोठारे यांच्यावर देखरेखीचे काम हा करीत असे. जर खेडेगाव अगदीच लहान असेल तर स्वत: पाटीलच चौगल्यांचे काम करीत असे. रा. ना. जोशी म्हणतात की, 'चौगुला हा गावकामगार व मुख्य वतनदारीतील एक आहे आणि गाव वसाहतीच्या वेळेपासूनचा तो पाटलाचा हस्तक आहे. तो बहुतांश महाराष्ट्रात मराठा जातीतील आहे.' चौगुल्यांची खुणसुद्धा पाटलाप्रमाणे नांगर ही असे. गोतसभेत त्याला पाटलानंतरचे स्थान असे. काही कागदपत्रात 'देशचौगुला' असा उल्लेख दिसतो. देशमुख देशपांडे यांच्याप्रमाणे देशचौगुला हा परगण्याचा अधिकारी असावा. अशा या देशचौगुल्याला गावात मोठा मान होता.[३६]

कमाविसदार व मामलेदार :

पेशवेकाळात मौजा, तर्फ, सुभा या शब्दांचा वापर वेळोवेळी सोयीप्रमाणे केलेला दिसून येतो. पेशवाईत सुभ्याचा उल्लेख प्रांत, तर्फ व परगणा याचा उल्लेख महाल असा करण्यात आलेला आहे. प्रांताच्या छोट्या छोट्या विभागावर कमाविसदार यांची नेमणूक केलेली असे तर कमाविसदारापेक्षा मोठा अधिकारी म्हणजे मामलेदार होय. मामलेदाराची नेमणूक स्वत: पेशवा करीत असे. मामलेदार हा प्रत्यक्ष केंद्रीय प्रशासनाला जबाबदार असे. फक्त खानदेश, कर्नाटक व गुजरातमधील मामलेदार हे सरसुभेदार नावाच्या अधिकाऱ्याच्या हाताखाली नेमलेले असते.[३७]

महालातील महसूल गोळा करण्याचे काम कमाविसदाराकडे व मामलेदाराकडे असे. तसेच प्रांतातील विविध प्रकारच्या दिवाणी व फौजदारी खटल्यांची माहिती करून घेऊन त्यांचा निवाडा करणे, जरूर प्रसंगी पंचायत स्थापन करुन तिच्यामार्फत खटल्याचा निकाल लावणे व इतर सामाजिक व धार्मिक प्रश्नात जातीने लक्ष घालून त्या सोडविणे इ. कामे त्याला करावी लागत असत.[३८]

मामलतदार व कमाविसदाराच्या मदतीला तरफदार, कारकून, शिकदार यांची नेमणूक केलेली असे. तसेच दिवाण, मुझुमदार, फडणीस, पोतनीस, पोतदार, चिटणीस, कारखानीस आणि सबनीस यांचाही मंत्रीमंडळात समावेश असे.

कमाविसदारांना पगार म्हणून काही वेळेस एकरकमी रक्कम दिली जात असे. कमाविसदाराला प्रांताच्या बाबतीत पुष्कळ अधिकार असत. पण मामलेदार हा कमाविसदारापेक्षा वरिष्ठ अधिकारी असल्याने त्याला मिळणारा पगार व त्याचे हक्क निश्चितच कमाविसदारापेक्षा जास्त असत.[३९]

दरखदार :

प्रांतातील कमाविसदार आणि मामलेदार यांच्या कामावर अप्रत्यक्षपणे देखरेख करण्यासाठी दरखदार या नावाचे अधिकारी नेमलेले असत. दरखदार हे प्रांताच्या सर्व विभागांवर देखरेख ठेवीत असत. हे अधिकारी सैन्य व आरमार यांच्यावरसुद्धा देखरेख ठेवीत असत. हे

अधिकारी पेशव्यांनी नेमलेले असल्यामुळे त्यांना अधिकारावरुन दूर करण्याचा हक्क कमाविसदार किंवा मामलतदार यांना नसे. दरखदार हे पेशव्यांना जबाबदार असत आणि पेशवेही दरखदाराच्या हक्कांबद्दल जागरुक असत.[४०]

प्रांतिक प्रशासनामध्ये दरखदार म्हणजेच दिवाण, मुजूमदार, फडणीस, दफ्तरदार, पोतनीस, पोतदार, सभासद व चिटणीस हे अधिकारी होत. या अधिकाऱ्यांना थेट सरकारातून पगार मिळत असे. त्यामुळे मामलतदाराचे त्यांच्यावर नियंत्रण नसे, त्यामुळे प्रांतिक प्रशासनात हे अधिकारी आपले काम स्वतंत्रपणे करीत असत. 'दिवाण' हा मामलेदाराच्या प्रत्येक पत्रावर स्वत:ची सही करीत असे. 'फडणीस' हा सर्व दैनंदिन कागदपत्रे व हुकुमाची नोंद ठेवीत असे. प्रत्येक खेड्यातील जमीनमोजणीचा हिशोब प्रांताला सादर करीत असे. 'दफ्तरदार' हा प्रत्येक महिन्याचे दफ्तर सांभाळत असे व त्याचा सारांश मुख्यालयाला कळवीत असत. 'पोतदार' हा नाण्यांची मोजणी करीत असे. 'पोतनीस' हा जमाबंदीचा ताळमेळ ठेवत असे व जमाखर्च लिहिण्यास मदत करीत असे. 'सभासद' हा एका स्वतंत्र नोंदणी वहीत लहानसहान खटल्यांच्या नोंदी करून त्या मामलेदाराला दाखवत असे. चिटणीस हा काही पत्रे स्वत: 'जमेनीस' नावाचा अधिकारी असे. मुलकी जमाबंदी करणे, ती जिरायत व बागायत वगैरे पाहणी करून जमेनीस याला दाखविली जात असे, जमा खर्च करण्याचे काम तो करीत असे. प्रांतिक प्रशासनामध्ये दरखदार हे कमाविसदार व मामलतदार यांच्यावर पाळत किंवा देखरेख ठेवत असतच. पण त्याचबरोबर ते अप्रत्यक्षपणे स्वत: एकमेकांवरही देखरेख ठेवण्याचे काम करीत असत. अशाप्रकारे प्रांतिक प्रशासनामध्ये देशमुख, देशपांडे, शिवाय कमाविसदार, मामलतदार, दरखदार हे सरकारी अधिकारी मराठेकाळात आपली प्रशासकीय भूमिका चोखपणे बजावित होते.[४१]

खेडेगावातील प्रशासन :

१७ व्या शतकातील खेडे हा एक स्वयंपूर्ण असा घटक होता. अर्थव्यवस्था संपूर्णपणे शेतीप्रधान होती. खेडेगावातील अर्थार्जनाचा मुख्य मार्ग म्हणजे शेती हाच होता. तसेच शेती व शेतीशी संबंधित व्यवसाय चालत असत, या संदर्भात खेडेगावात सर्व व्यावसायिक हे एकमेकांशी

कोणत्या ना कोणत्या कारणाने संबंधित असत. त्यांना इतरांशी संपर्क ठेवण्याची आवश्यकता भासत नसे. खेडे हे स्वयंपूर्ण घटक होते.

खेड्याची विभागणी दोन प्रकारे करीत असत.

१) लागवडीखालील जमीन

२) वसती केलेली जमीन

उदा. 'ग्राम', 'देहे', 'मौजा', 'खेडे' इ. खेडेगावचे जर काही वाढीव भाग असतील तर त्यांचा उल्लेख 'मजरा', 'वाडी', 'पाडी' व 'खारी' इ. उल्लेख खेड्याविषयी आढळून येतात.[४२]

खेडेगाव व त्याचा वाढीव भाग यांचा उल्लेख करीत असताना 'बुद्रुक' व 'खुर्द' अशा संज्ञेने करीत असत. एखाद्या खेड्याला जोडून असलेल्या वस्तीला जर नाव द्यावयाचे असेल तर त्याला खुर्द म्हणत व मुख्य खेड्याला जोडून असलेल्या वस्तीला जर नाव द्यावयाचे असेल तर त्याला खुर्द म्हणत व मुख्य खेड्याला बुद्रुक म्हणत असत.

उदा. उपळाई बुद्रुक व उपळाई खुर्द.

काही वेळा खेडेगावाची किंवा त्याच्या वाढीव भागाची जर वाढ होत गेली तर याच संज्ञा वेगळ्या संदर्भात वापरत असत. 'बुद्रुक' व 'खुर्द' हे दोन शब्द संस्कृतमधील 'बृहत' व 'लघु' या शब्दांपासून तयार झालेले आहेत.

खेडेगावचे रहिवासी :

खेडे हा स्वयंपूर्ण घटक होता. यामध्ये काही सरकारी अधिकारी व काही परंपरेने चालत आलेले अधिकारी असत. सरकारी अधिकाऱ्यांमध्ये पाटील, कुलकर्णी, देशमुख, देशपांडे यांचा समावेश होतो तर परंपरेने चालत आलेल्या अधिकाऱ्यांमध्ये बारा बलुतेदार व मिरासदार यांचाही समावेश होतो.[४३]

पाटील :

पाटील हा गावचा मुख्य सरकारी अधिकारी होय. त्याला हा अधिकार वतनामुळे मिळत असे. म्हणून त्याचा उल्लेख वतनी अधिकारी असासुद्धा केला जातो. पाटलाचा उल्लेख गावपाटील,

मोकदम किंवा मोकदम पाटील अशा संज्ञेनेसुद्धा करीत असत. काही वेळा 'ग्रामगोपक' अशाही संज्ञा वापरलेली आढळते. पाटलांचे मुख्य काम म्हणजे गावातील पडीक जमीन लागवडीखाली आणून तिचा महसूल उत्पादनासाठी उपयोग करणे असा होता. पाटील बरोबर जोडीला कुलकर्णी नावाचा अधिकारी असे. त्याच्या सहाय्याने पाटील गावचा कारभार पहात असे. गावाचे परचक्र व दरोडेखोरांपासून संरक्षण करणे, गावात शांतता राखणे, गावाचा महसूल कुलकर्ण्यांच्या सहाय्याने ठरविणे व तो सरकारी कचेरीत जमा करणे यासाठी पाटील व कुलकर्णी दोघे एकमेकांच्या सहाय्याने पीक पाहणी करुन प्रत्येक पिकानुसार महसूल ठरवित असत. महसूल ठरवल्यानंतर गावची स्थिती लक्षात घेऊन त्यामध्ये सूट मागण्याचा हक्क पाटलाला असे.[४४]

दरवर्षी गावातील लागवडीखालील जमीन, ती कसणाऱ्यांची नावे, पिकांची नावे व त्यापासून येणारा महसूल सरकारात कळविणे. हे त्यांचे महत्त्वाचे काम असे. गावचा महसूल एकदा ठरल्यानंतर तो लोकांच्याकडून गोळा करणे व तो सरकारात भरणे हे त्यांचे प्रमुख मुलकी अधिकारी म्हणून काम असे. काही वेळा असे होत असे की, एखाद्या गावाच्या ठरलेल्या महसुलाइतका वसूल जर झाला नाहीतर ठरलेली रक्कम व झालेला वसूल यांच्यातील उरलेली रक्कम ही स्वत: पाटलाला आपल्या खिशातून भरावी लागत असे. जर तो पैसे भरू शकला नाही तर त्याचे वतन नाहीसे होत असे किंवा तो आपले वतन गहाणही टाकू शकत असे.[४५]

महसुलाशिवाय पाटलाला न्यायनिवाड्याचेही काम करावे लागत असे. चावडी हे ठिकाण पाटलांच्या न्यायनिवाड्याचे ठिकाण मानले जात. गावातील गोतसभा बोलावणे व त्याचा निवाडा करणे हे काम तो करीत असे. गोतसभेने दिलेल्या निकालावर अंतिम सही–शिक्का पाटलाचा असे. नांगर ही पाटलाची खूण असे. पाटलाला त्याच्या कामात कुलकर्ण्यांप्रमाणेच महारसुद्धा मदत करीत असे. पाटीलकीचे वतन हे बहुतेक वेळा मराठ्यांकडे असे ते क्वचितप्रसंगी ब्राह्मण व जैन लोकांना विकले जात असे. त्यामुळे काही ठिकाणी ब्राह्मण व जैन पाटील दिसून येतात.

गावातील प्रत्येक सणाच्या वेळी पाटलांचा मान पहिला असे. होळी, गणेशचतुर्थी, संक्रांत, दसरा, दिवाळी, पाडवा, पोळा या दिवशी पहिल्यांदा पाटलाला भेट द्यावी व नंतर इतरांना अशी पद्धत असे.

शिवकालीन पाटील वतन :

पाटलाचे महत्त्व :

राज्य म्हणजे जसा जुन्या काळात राजा त्याप्रमाणे गाव म्हटले की, तेथे पाटील असावयाचाच. राजा किंवा पाटील आणि राजा ही राज्याची आद्यंते आहेत. राजाचीच व राजाजोगी असलेली विशेषणे भागग्राही, ग्रामप ही पाटलांना योजिलेली आहेत. (शुक्रनीतिसार) पाटील हा छोटेखानी राजाच आहे. खेडेगांवात अशी म्हण होती की, 'उतरंडीला नसेना दाणा पण दादला असावा पाटील राणा'. ह्या म्हणीने हलाखीच्या स्थितीतही पाटलांचा सामाजिक दर्जा केवढा मोठा मानला जातो ते नेमके ध्यानी आणून दिले आहे.[४६]

पाटीलकीचा उगम :

'काळीवर पांढर रचली' त्यापासून कसबे मजकूरच्या जोसपणाची मिरास आपली आहे हे जसे वाईचित्रावांच्या कागदांत वाईच्या लिंग जोशी वलद आनंद जोशी यांनी सांगितले आहे, तसेच जेव्हापासून 'काळी' वाहितीला आली तेव्हापासून पाटीलकीची निर्मिती झाली, हे अनेक कागदातून आली आहे. दुर्गादेवीच्या मोठ्या दुष्काळानंतर जे जे गाव वसाहतीस आणले गेले ते ते प्रथम पाटलांकडूनच. जंगल तोडून, वन्य पक्षू नाहिसे करुन, पिकाकरता जमीन जेव्हा पड पाडिली तेव्हापासून जमीन ही काळी बनली व तेव्हापासूनच पाटीलकीचा प्रारंभ झाला आहे. काळी आणि पाटील हा संबंध नित्य आहे.[४७]

पाटील संज्ञा :

पाटील हे नांव 'पाटील मोकदम' असे जोड, नुसते 'मोकदम' आणि नुसते 'पाटील' अशा तीन प्रकारांनी कागदात येते. शि.चं.सा. खं. २ ले ९३ मध्ये 'राहा पाटील बिन मेग पाटील मोकदम मौजे हिंगणे बुद्रुक', 'रंभाजी मोकदम मौजे चऱ्होली', आणि 'म्हालोजी बिन खंडोजी पाटील जाधव मौजे गिरीम' अशा तिन्ही प्रकारांनी आले आहे. पैकी नुसते पाटील असे जेथे येते तेथे त्याचा अर्थ सरळ व उघडच लक्षात येतो. नुसत्या 'मोकदम' या शब्दाचा अर्थ संदर्भाने

पाटील हा घ्यावा लागतो. मोकदम शब्द पाटील ह्या हुद्याप्रमाणे इतरही बलुतेदार वगैरेंच्या नावांबरोबर येतो.

उदा. मोकदम न्हावी, मोकदम मुजेरी.[४८]

अशा ठिकाणी मोकदम शब्दाचा मुळ अर्थ पुढारी, प्रमुख असा आहे. मोकदम न्हावी म्हणजे न्हावीमंडळीतील मुख्य, मोकदम मुजेरी म्हणजे खेडूत किंवा शेत कसणाऱ्यांतील पुढारी. तसेच पाटील मोकदम म्हणजे पाटील मंडळीतील श्रेष्ठ. पाटील शब्दाशी जोडून जेव्हा मोकदम शब्द येतो तेव्हा त्याचा आणखी अर्थ असा आहे की, पाटील घराण्यांतील, पाटीलकीचा धनी, वडील घराण्यांतील व्यक्ति, टिळ्याविड्याचा व निशाणी नांगराचा अधिकारी तो 'पाटील मोकदम'. पाटील घराण्यांतील सर्वच व्यक्ति पाटील उपपदधारी होत असत. पण ज्यात जी व्यक्ती पाटील पदावर आहे तोच पाटील मोकदम असत.[४९]

मोकदम :

मोकदम या शब्दाचा मूळ वस्तूगत अर्थ म्होरक्या, प्रमुख असा आहे. मोकदम शब्द साधारणत: मेहतर ह्या शब्दासारखा आहे. मेहतर म्हणजेही श्रेष्ठ, मुख्य माळी मेहतर, तेली मेहतर, कुंभार मेहतर, परीट, कोष्टी, सुतार, महार, चांभार ह्या सर्वांत मेहतर शब्द लावल्याचे आढळते. कोठे कोठे म्हणजे श्रेष्ठ व्यक्ती दोन असतील तेथे त्या दोहांची नावे लिहून 'मेहतरीये सुतार' म्हणजे सुतार मंडळीतील ही मुख्य दोन माणसे असे नमूद केले आहे. मोकदम म्हणजेही श्रेष्ठ, प्रमुख आणि मेहतरीये म्हणजेही श्रेष्ठ. पण मेहतरी हा शब्द पाटलास लावल्याचे कोठेही आढळत नाही. मोकदम हेच विशेषण लावलेले असते. नुसता मोकदम शब्द पाटील ह्या अर्थीच घेणे जरुर आहे.[५०]

पाटील म्हणजे गावचा राजा, गावांखालील सर्व शिवार म्हणजे जमीन, पाटीला यांच्या अधिकारातील गावाच्या महसुलास पाटील एकटा जबाबदार, एवढा अधिकार पाटलाचा असताना पाटील या नावाने त्याचा उल्लेख सरकारी पत्रांतील मायन्यात न येता मुसलमानी म्हणजे फारशी

शब्द जो मोकदम त्या नांवाचा प्रयोगच झाल्यामुळे घराण्याच्या दृष्टीने पाटील संज्ञा लिहिलेली आढळते व सरकारी पत्रात मोकदम लिहिलेले आढळून येते.[५१]

पाटलाचे काम :

पाटलाचे मुख्य काम लावणी, संचणी व उगवणी ह्या त्रयीत सर्वात आढळते. राज्यव्यवहारकोशात 'अकृष्टभूमिनीकर्दि:कर्दिस्तुफलभूमिका' असे सांगितले आहे. म्हणजे नापिकी भूमि फलभूमिका करणे, उध्वस्त पांढरीची वसाहत करणे आणि गांवाची सर्व प्रकारे व्यवस्था बंदोबस्त राखणे हे पाटलाचे काम होय.

एखाद्या प्रसंगी गोत सभा करावयाची झाल्यास नायकवडी व नागल्याकडून गोतसभा करणे, गांवाची चकबंदी व टकबंदी करणे, पीक पाहणी करणे, रयत बलुतेदार यांच्या तक्रारी दूर करणे, दिवाणदस्त पुरा करुन देणे, एखाद्या प्रसंगी गावचा महसूल कुळवाराकडून पुरता बरोबर न जमा झाल्यास पाटलाने कर्ज काढून तो पूरा करुन दिला पाहिजे.[५४]

शिवभारत :

पाटीलकीचे वतन वंशपरंपरागत चालवले जायचे. वतनसाठी पिढ्यान्पिढ्या भांडणे होत असत. वतन बापाच्या नंतर मुलाकडे जावयाचे. पण पुत्रसंतती नसेल तर मुलीकडेही वतन जाई आणि म्हणून 'अवलाद अफलाद चालविजे' असे अनेक सनदांतून म्हटलेले आहे. (मुलीचा वंश) आपल्या व्यवसायातील वर्षाचे पहिले उत्पादन पाटलाला द्यावे अशी परंपरा होती. पाटलाच्या एकंदर कामगिरीबद्दल खुद्द सरकारातून काही रक्कम रोख पैशाच्या स्वरुपात किंवा वस्तूच्या स्वरुपात देत असत. सुगीच्या दिवसात पाटलाला शेतकऱ्याला मिळणाऱ्या धान्यापैकी काही धान्य हक्काने घेता येत असे, त्याला 'घुगरी' म्हणत. अशारितीने पाटलाला त्याच्या कामाबद्दल रोख पैसा किंवा वस्तूंच्या स्वरुपात काही मिळत असे. पाटलाच्या सेवेसाठी अनेक बलुतेदारांना काम करावे लागत असे.

कुलकर्णी :

कुलकर्णी हा गावचा दुसरा महत्त्वाचा मुलकी अधिकारी होय. याचा उल्लेख गावकुलकर्णी किंवा ग्रामलेखक असा केला जातो. कुलकर्णी हा शब्द 'कुल–कर्ण्य' यापासून आला असावा.[५५]

कुलकर्णीच्या वतनाला लेखनवृत्ती असेही म्हणत. ग्रामलेखी असा त्याचा उल्लेख करीत असे. ग्रामलेखी म्हणजे खेडेगावचा हिशोब लिहिणारा होय. गावातील सर्व प्रकारच्या जमिनींचा हिशोब ठेवून प्रत्येक व्यक्तीच्या नावावर असणाऱ्या जमिनीच्या महसुलाचा जमाखर्च ठेवणे हे काम त्याला करावे लागत असे. प्रत्येक पीक पाहणी केल्यानंतर प्रत्येक शेतकऱ्याच्या खात्यावर महसूल नोंदवून ठेवणे व तो पाटलाच्या मार्फत जमा करणे हे त्याच्या कामांपैकी एक महत्त्वाचे काम असे. प्रत्येक वर्षी जमिनीचा महसूल, जमा झालेली रक्कम व येणारी रक्कम यांचा हिशोब त्याला सरकार दरबारात द्यावा लागत असे. खेडेगावातील महसूल वसूल करण्यामध्ये पाटलाच्या जोडीने याच्यावर जबाबदारी असे. जर ठरलेल्या रकमेपेक्षा कमी रक्कम जमा झाली तर त्याची भरपाई पाटील व कुलकर्णी यांनाच करावी लागत असे. काही वेळा त्याने रक्कम भरली नाही किंवा हिशोब चोख ठेवले नाहीत तर त्याला कडक शासन होत असे. क्वचित प्रसंगी वतनही काढून घेतले जात असे. अनेक खेडेगावांना एकच कुलकर्णी असे याचेसुद्धा हेच कारण आहे. कुलकर्ण्यांना महसुल वसुलाच्या जोडीला शेतीमध्ये वाढ करणे याकडे लक्ष द्यावे लागत असे. गावातील पडजमिनीची नोंद ठेवून त्याची पाटलाला सूचना देणे व त्याच्यामार्फत लोकांना आकर्षित करुन जमीन लागवडीखाली आणावी लागत असे.[५६]

कुलकर्णी अनेक खेडेगावांचे हिशोब ठेवण्यासाठी वेळोवेळी त्या त्या गावांना भेट देत असत. कुलकर्णी हा पाटलाला त्याच्या कामामध्ये मदत करीत असे. खेडेगावात एक पाटील असे; परंतु कुलकर्णी असेलच अशी शाश्वती नसल्याने बरीचशी कामे तुंबलेली असत. अशावेळी तात्पुरता कुलकर्णी नेमत असत. काही वेळा कुलकर्ण्याचा निर्वंश झाला म्हणून दुसऱ्या एखाद्याला तेच वेतन विकत असत. तेव्हा त्या रकमेला शेरणी म्हणत. पाटील व कुलकर्णी यांच्या व्यवहारांमध्ये पाटील हा जरी वरिष्ठ अधिकारी असला तरी बऱ्याच वेळा तो कुलकर्ण्यावरच

अवलंबून असे. हा साक्षर असल्याने पाटलाला त्याचे म्हणणे ऐकावे लागत असे. ज्या ठिकाणी कुलकर्णी नसे त्या ठिकाणी मुतालिक नावाचा अधिकारी नेमत.[५७]

शेटे व महाजन :

शेटे व महाजन हे दोघे खेडेगावातील इतर अधिकारी असत. प्रत्येक खेड्यात हे दोन अधिकारी असतीलच असे नाही. तर ज्या गावात पेठ किंवा कसबा असेल त्या ठिकाणी हे दोन अधिकारी असत. जर एखाद्या गावाला कसब्यामध्ये किंवा पेठेमध्ये रुपांतरित करावयाचे असेल तर या दोघांना काही अभिलाषा दाखवून नवी पेठ बसवण्याबद्दल सांगत असत. शेटे व महाजन या दोघांचे मुख्य काम म्हणजे जमा होणारे धान्य गोळा करणे व ते मोजणे हे होय. गावातील प्रत्येक सार्वजनिक कार्यामध्ये यांचा सहभाग असे.[५८] यांची खूण तराजू असे.

शेटे व महाजन हे गावच्या व्यवस्थेतील वतनदारांचाच एक वर्ग होता. गावाच्या पेठेचे वंशपरंपरागत अधिकारी होते. पेठ वसविणे व पेठेचा हिशोब ठेवणे या कामासाठी त्यांना सरकारातून जमीन आणि गावकऱ्यांकडून काही हक्क मिळत. गोतसभेच्या कामकाजात ते अधिकृतपणे भाग घेत असत.[५९]

मंगळवेढे येथील पटवर्धन घराण्यातील जहागीरदार मेघ:श्याम पटवर्धन :

सन १७५० मध्ये शाहू महाराजांच्या पश्चात पेशवे मराठी दौलतीचे सर्व सत्ताधीश झाले. सातारचे छत्रपती नामधारी बनले. साताराहून चालणारा राज्यकारभार पेशव्यांनी पुण्यास नेला. पेशव्यांना शाहू महाराजांचे वेळचे वाटणारे डोईजड सरदार त्यांच्यावर शह बसविण्याची नामी संधी मिळाली. यावेळी सातारा राजधानीच्या पूर्वेकडील भाग प्रतिनिधीच्या ताब्यात होता. त्यामुळे साताराचे छत्रपती रामराजे यांच्या व्यवस्थेवर ताबा राहील अशी भिती पेशव्यांना वाटल्याने, तसेच जगजीवनराम प्रतिनिधी पेशव्यांना न जुमानणारे व पेशव्यांच्या तंत्राने न चालणारे असल्याने पेशव्यांना ते सहन झाले नाही.[७४] म्हणून पेशव्याने प्रतिनिधींचे महत्त्व कमी करण्यासाठी त्यांच्या ताब्यातील सांगोले आणि मंगळवेढे हे प्रदेश ताब्यात घेतले. प्रतिनिधींचा मुतालिक यमाजी शिवदेव

यास सांगोले येथे पाठविले. त्याने सांगोले येथे गेल्यावर छत्रपतींच्या आज्ञेशिवाय आपण हा मुलूख पेशव्याकडे देणार नाही असे जाहीर करुन लढाईची तयारी केली.[७५]

प्रतिनिधींचा डाव हाणून पाडण्यासाठी नानासाहेब पेशव्यांनी सदाशिव भाऊंची सांगोला मोहिमेवर रवानगी केली. तसेच पेशव्यांनी सदाशिव भाऊ बरोबर पुण्यास आलेल्या छत्रपती रामराजाची रवानगी साताऱ्याला केली. छत्रपती रामराज सांगोले येथे आल्यानंतर यमाजीपंत मुतालिकने त्यांची भेट घेतली. त्यावेळी नानासाहेब पेशव्याने सांगोल्याचे ठाणे छत्रपतींना दिले तर मंगळवेढे पेशव्याने स्वत:कडे ठेवले.[७६]

इ.स. १७५० पासून मंगळवेढे ठाण्यावर पेशवाई अंमल सुरू झाला. ते त्यांनी पटवर्धन घराण्यातील मेघ:श्याम पटवर्धन यास दिले. मंगळवेढे, करकंब, पंढरपूर व विजापूर हा सर्व मुलूख शाहू महाराजांनी प्रतिनिधीस दिला होता. तो पेशव्यांनी घेऊन मंगळवेढ्याची मामल श्रीमंतांनी मेघ:श्याम बापू पटवर्धन यांना दिली.[७७]

या पटवर्धन घराण्याचा मूळ पुरुष हरिभट पटवर्धन होता. त्यांना एकूण सात पुत्र होते. त्यातील सर्वात मोठा कृष्णभट होता. यांचे वंशज मंगळवेढे आंबे (ता. पंढरपूर) व जमखिंडी येथे आहेत.[७८] हे मूळचे रत्नागिरीपासून अकरा मैल अंतरावर असलेल्या कोतवडे येथे राहणारे होते. हरिभटास झालेल्या सात मुलांची नावे कृष्णभट, बाळंभट, त्रिंबकभट, गोविंदभट, रामचंद्रभट, भास्करभट याप्रमाणे होती. यातील थोरले हे मंगळवेढ्यास सन १७५०–५१ साली सहकुटुंब येवून राहिले. १७५० पासून पुढे दोनशे वर्षे ते मंगळवेढ्याच्या जहागिरीचे मालक राहिले.

मंगळवेढ्यास हरिभट पटवर्धनाचे ज्येष्ठ चिरंजीव कृष्णराव भट आले. त्यांना एकूण दोन मुली व सहा पुत्रे होते. त्यातील पहिले पुत्र नारायणराव नाना, दुसरे पुरुषोत्तम दाजी, तिसरे मेघ:श्याम बापू तर चौथे पुत्र जनार्दन म्हणून होते. हे सर्व पुत्र कर्तबगार होते. मराठा राजकारणात पुढील अनेक वर्षे पटवर्धन घराणे सक्रीय राहीले.

सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझेटियरमधून मंगळवेढ्याबाबत माहिती मिळते. शाहू छत्रपती मोगलांच्या कैदेतून स्वराज्यात आले तेव्हा सन १७१६ मध्ये बहिर्जी पांढरे या सरदाराकडे मंगळवेढा महाल होता. शाहू छत्रपतींनी १७२२ नंतर मंगळवेढे परगणा शिवदेव यांचेकडे सुपूर्त

केला. सन १७५० पर्यंत त्यांनी तो सांभाळला. नंतर मेघःश्याम पटवर्धन हे मामलेदार म्हणून या परगण्याने सन १७६४ पर्यंत काम पहात होते. सन १७६४ मध्ये गोविंद हरि पटवर्धन यांना पेशव्यांनी जो सरंजाम दिला, त्यात मंगळवेढा परगणा सामील होता. सन १८०१ पासून पटवर्धनाने भाईबंदात वाटणी झाली. त्यात हा परगणा सांगली संस्थानात वाटणी म्हणून सामील झाला.[७९]

भाळवणी, ता. पंढरपूरचे नाईक निंबाळकर घराणे :

भाळवणीचे सरलष्कर नाईक निंबाळकर यांचे घराणे इतिहासात दीर्घकाळ कार्यरत होते. फलटणच्या नाईक निंबाळकरांच्या दोन शाखा निर्माण होवून एक भाळवणी व दुसरी दहीगाव येथे जहागिरीवर होती. मुधोजी नाईक निंबाळकर फलटण यांचे ज्येष्ठ पुत्र इ.स. १६४२ मध्ये भाळवणीचे जहागिरीवर आले. त्यानंतर पुढे १५० वर्षे हे घराणे मराठी राज्यात पराक्रम गाजवित राहिले. या घराण्यातील मुधोजी नंतर सिधोजी नाईक निंबाळकर, हणमंतराव नाईक निंबाळकर, हैबतराव नाईक निंबाळकर, सुलतानजी नाईक निंबाळकर, निंबाजी नाईक निंबाळकर, खंडेराव नाईक निंबाळकर, शहाजी नाईक निंबाळकर आणि वणगोजी नाईक निंबाळकर यांचे पराक्रम इतिहासात महत्त्वाचे आहेत. या सर्वांच्या पराक्रमाची साक्ष हा भाळवणीचा वाडा आज अद्यापही देत आहे. या घराण्यातील खंडेराव नाईक निंबाळकरांनी तिसऱ्या पानिपत युद्धाच्या वेळी युद्धभूमीवर प्राणार्पण केले. आज या घटनेला २५५ वर्षे झाली. परंतु हा वाडा पाहिल्यावर या घटनांना उजाळा मिळतो.[८०]

सिदोजी नाईक निंबाळकर :

सोलापूर जिल्ह्याच्या इतिहासात शिवरायांचे सासर घराणे म्हणजे फलटणचे नाईक निंबाळकर घराणे होय. शिवाजी महाराजांच्या पत्नी सईबाईंचे हे माहेर. फलटणच्या मुधोजी नाईक यांना तीन मुले व सईबाई ही एकुलती कन्या होती. जगदेवराव साबाजी व बजाजी ही दोन मुले होती. त्यापैकी वडिलांची जहागिरी सांभाळण्याचे काम बजाजी करीत असत तर जगदेवराव नाईक

निंबाळकरांना भाळवणी महाल कारभार पाहण्यासाठी दिला आणि साबाजींना दहिगाव परगण्याचा कारभार सुपूर्त केला.

सध्या भाळवणी हे पंढरपूर तालुक्यात तर दहिगाव हे माळशिरस तालुक्यात आहे. मराठी मुलखातील प्राचीन घराण्यांपैकी नाईक निंबाळकरांचे हे घराणे आहे. शिवाजी महाराजांप्रमाणेच त्यांचे आजोबा मालोजीराजे भोसले हे सुद्धा या नाईक निंबाळकरांचे जावई होते. म्हणजे शहाजी राजांचे हे आजोळ होय. शहाजी राजांच्या मातोश्री दीपाबाई या फलटणच्या होत्या. अशा या फलटणच्या नाईक निंबाळकर घराण्यातील भाळवणी आणि दहिगाव या ठिकाणी वास्तव्यास असलेली दोघा भावांची घराणी मराठी इतिहासात कित्येक वर्षे कार्यरत राहिली. या घराण्यातील अनेक वीर पुरुषांनी स्वराज्यासाठी आपले प्राण पणाला लावले.[८१]

नाईक निंबाळकर घराण्यातील मुळ पुरुष जगदेवराव नाईक निंबाळकर यांचा पुत्र सिदोजी हा शिवरायांच्या संपर्कात आला. ज्यावेळेस मिर्झा राजेंनी फलटणवर स्वारी केली त्या काळात भाळवणीला शिवाजी महाराजांनी भेट दिली असावी. त्यावेळी जगदेवरावांचा पुत्र सिधोजी हा शिवाजी महाराजांच्या सेवेत रुजू झाला होता. सिधोजी नाईक निंबाळकरांनी साल्हेरच्या युद्धातही पराक्रम गाजविला होता. त्यावेळी ते पंचहजारी हुद्दा असलेले जहागिरदार होते.

शिवाजी महाराजांनी ज्यावेळी मोगलांचे जुन्नर, अहमदनगर, सुरत, कारंजा लुटून स्वराज्य कार्यासाठी संपत्ती आणली होती, त्यावेळी महाराजांवर मोगल सरदार चालून आले. अशाप्रसंगी महाराजांनी सिदोजीराव नाईक निंबाळकरांना मोगल सरदारांना थोपवून धरण्याचा विचार व्यक्त केला. तेव्हा सिदोजीराव निंबाळकरांनी सतत तीन दिवस छत्रपती शिवराय पट्टा किल्ल्यावर सुखरुप पोहचेपर्यंत मोगलांशी लढा दिला तेथेच ते धारातीर्थी पडले. त्यानंतर या घराण्यातील खंडेराव नाईक निंबाळकर, महादजी नाईक निंबाळकर यांना पानिपत युद्धातील पराक्रमाचा समावेश आहे.[८२]

हणमंतराव निंबाळकर :

सिधोजी निंबाळकरानंतर त्यांचे पुत्र हणमंतराव निंबाळकरांकडे भाळवणी महालाची जहागिरदारी आली. त्यानंतर औरंगजेब बादशहाच्या काळात मोगलांचे मनसबदार म्हणून काम

केले. परंतु ज्यावेळी राजाराम महाराजांनी जिंजीहून परत आल्यानंतर त्यांनी बादशहाचे ब्रम्हपुरी, ता. मंगळवेढाच्या छावणीवर इ.स. १६९९ मध्ये छापा घातला. त्यावेळी परसोजी भोसले, हणमंतराव निंबाळकर, नेमाजी शिंदे हे प्रमुख सरदार त्यांना येवून मिळाले. त्यानंतर छत्रपती राजाराम महाराजांनी परसोजी भोसलेस वऱ्हाड, खानदेश नेमाजी शिंदे यांना तर गंगाथडीला हणमंतराव निंबाळकर यांना ठेवले. राजाराम महाराजांनी हणमंतराव निंबाळकरांना सरलष्कर पदाचा हुद्दा दिला, जरीपटका दिला. त्यानंतर हणमंतराव निंबाळकरांचे पुत्र हैबतराव निंबाळकरांनी छत्रपती शाहूंना वेळोवेळी मदत करून पराक्रम केला होता. त्यांच्या मृत्युनंतर त्यांचे सरलष्करपद छत्रपती शाहूंनी त्यांचे पुत्र सुलतानजीस दिले होते. सुलतानजी निंबाळकरांनी वडिलांच्या प्रमाणे स्वराज्याची सेवाचाकरी करुन दाखविली.[८३]

परंतु त्यानंतरच्या काळात सुलतानजी निंबाळकर व शाहू छत्रपती यांच्यात संदेह निर्माण झाला व त्यांचे सरलष्कर पद काढून घेण्यात आले. तेव्हा सुलतानजी निजामाकडे गेले, त्यांना निजामाने मुख्य सेनापती म्हणून नेमले. मराठ्यांच्या इतिहासात मराठी सरदारांच्या आपापसातील मतभेदाचा फायदा नेहमीच मोगलांनी घेतलेला दिसून येतो.[८४]

निजामाच्या पदरी असताना सुलतानजी निंबाळकर यांनी खर्डे गावी गढी बांधली. गावाच्या बाहेर कोट बांधला, तो अद्याप सुस्थितीत आहे. इ.स. १७४३ साली ही गढी बांधून पूर्ण झाली. याच गढीत खर्ड्याचे लढाईत पराभव झाल्यानंतर निजामास आश्रय घ्यावा लागला होता.

खंडेराव नाईक निंबाळकर :

हिंदुस्थानातील मोठ्या लढायामधील पानिपतची लढाई प्रसिद्ध आहे. १४ जानेवारी १७६१ साली पानिपतवर झालेल्या लढाईत एका बाजूला अहमदशहा अब्दाली, नजीबखान रोहिला, सुजाउद्दोला असे मुसलमान सेनानी तर दुसऱ्या बाजूला भाऊसाहेब पेशवे, विश्वासराव पेशवे, इब्राहिमखान गारदी, मल्हारराव होळकर, जनकोजी शिंदे, गायकवाड असे प्रमुख मराठे सरदार होते. या लढाईत भाऊसाहेब पेशवे व विश्वासराव यांचा मृत्यू झाला. प्रचंड मनुष्यहानी

झाली. मराठ्यांची एक लाख बांगड्या फुटल्या. ''दोन मोती गलत, दसबीत अश्राफत, रूपयों की गणती नही'', अशी नोंद इतिहासकारांनी केली आहे.[८५]

या लढाईत सदाशिव भाऊंच्या बरोबर जे पथक होते, त्यामध्ये विठ्ठल शिवदेव, अंताजी माणकेश्वर, समशेर बहाद्दुर, मानाजी पायगुडे, खंडेराव नाईक निंबाळकर, महादजी नाईक निंबाळकर, सुभानराव माने, अमरसिंह जाधवराव, यशवंतराव पवार, दमाजी गायकवाड अशा कर्तबगार सरदारांचा समावेश होता. यातील सोलापूर जिल्ह्यातील वीर पुरूष म्हणजे खंडेराव नाईक निंबाळकर आणि महादजी नाईक निंबाळकर हे होत.

खंडेराव नाईक निंबाळकर हे पेशव्यांचे हुजुरातीचे फौजेत होते. १४ जानेवारी १७६१ रोजी अहमदशहा अब्दाली व भाऊसाहेब पेशवे यांच्यात शेवटचा संघर्ष झाला. पेशव्यांच्या घोडेस्वाराच्या फौजेस हुजुरात म्हणत. यामध्ये बावन्न पथके होती. यावेळी सदाशिवभाऊ बरोबर खंडेराव युद्धभूमीवर लढत होते. परंतु ऐनवेळी विश्वासराव पेशव्याचा गोळी लागून तात्काळ मृत्यू झाल्याने लढाईचा रंगच बदलला आणि पानिपतावर मराठ्यांचा पराभव झाला, त्यामध्ये खंडेराव नाईक निंबाळकर अखेरपर्यंत लढत राहिले. खंडेराव नाईक निंबाळकर हे भाळवणीचे नाईक निंबाळकर होते. त्यांच्यानंतर त्यांच्या पुत्रांना रामराजा छत्रपतीने जहांगिरीची सनद दिली होती.[८६]

खंडेराव नाईक निंबाळकर पानिपतावर धारातीर्थी पडले. त्यानंतर त्यांच्या मुलांना सातारच्या छत्रपतींकडून कोळेगाव हे गाव वंशपरंपरेने इनाम म्हणून मिळाले. या घराण्यातील पुढील वारसही पराक्रमी निघाले. त्यातील शहाजीराव नाईक निंबाळकर यांच्या पराक्रमाची नोंदही इतिहासात आहे. डिसेंबर १७७४ मध्ये राघोबा ज्यावेळी इंग्रजांच्या आश्रयाला गेले होते त्यावेळी २८ मे १७७५ रोजी झालेल्या लढाईत मही नदीच्या काठावर बाबा पिराचे घाटावर धारातीर्थी पडले. त्यानंतर त्यांच्या कुटुंबाच्या चरितार्थासाठी पेशव्याने त्यांना माळशिरस तालुक्यातील तांदुळवाडी हे गाव इनाम करून दिले. यामध्ये परगणे भाळवणीचा समावेश होता.[८७]

मोहोळ येथील वतनदार कमळोजी देशमुख :

सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ हे तालुक्याचे ठिकाण आहे. सोलापूर–पुणे हायवेवर सोलापूरच्या दक्षिणेला ३३ किलोमीटर अंतरावर मोहोळ हे गाव लागते. मोहोळमध्ये बाणेश्वर आणि निलकंठेश्वराची किंवा चंद्रमौळी अशी दोन हेमाडपंती मंदिरे आहेत. वैशाख किंवा एप्रिल–मे महिन्यात येथे मोठी यात्रा भरते. मोहोळचा इतिहास खूप जुना आहे. तेराव्या शतकात हिंदू–मुसलमानांच्या राजकारणात मोहोळ हे सीमेवरील गाव असल्याने याचा त्रास मोहोळला नेहमीच भोगावा लागलेला आहे.[८८]


मध्ययुगीन काळात मोहोळ हा माढा परगण्यातील एक महाल होता. या प्रदेशावर कधी मुसलमानांनी राज्य केले तर कधी मराठ्यांनी राज्य केले. अशा ऐतिहासिक मोहोळमध्ये देशमुख यांच्याकडे वतनदारी होती. मोहोळमध्ये देशमुखांची दोन घराणी आहेत. एक गायकवाड–देशमुख मुळचे मौजे शेटफळ, तालुका–जिल्हा सातारा येथील प्रसिद्ध सरदार गायकवाड घराण्यातील आहेत, तर दुसरे देशमुख–वाघमोडे हे धनगर जातीतील आहेत. या दोघांच्याही गढ्या या मोहोळ गावात अजूनही इतिहासाची साक्ष देतात.

मोहोळ येथील देशमुख–गायकवाड घराणे हे सातारा येथून छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात आले होते. त्यांना मोहोळसहित चौसष्ट गावांचा महसूल वसूल करण्याचे काम सोपविले होते.

कमळोजी देशमुखांना राजाराम छत्रपतींकडून वतनदारी मिळालेली होती. त्यावेळी मोहोळ येथे त्यांना किल्लेवजा गढी बांधून देण्यात आली होती. त्यांना वतनदारी कधी दिली याची नोंद सापडत नसली तरी १७९५ मध्ये मोहोळ महालातून नऊ हजार रूपये महसूल गोळा केल्याची नोंद या घराण्याकडे असलेल्या कागदपत्रांमध्ये आहे. मोहोळ बरोबर घाटणे, बोरगाव, हिंगणी, आष्टे, बांबेवाडी, मलिकपेठ, भोयरे, पोखरापूर, पेनूर, टाकळी सिंकदर, पाटकूल, डिकसळ, मसले चौधरी इ. गावांची वतनदारी त्यांना मिळालेली होती. या वतनामध्ये मिळालेली जमीन अजूनही घाटणे येथे देशमुखांच्या नावे आहे. या देशमुखांना पाचशे दहा रूपयांचा रूसूम निजामाच्या काळात मिळत होता. म्हणजेच त्यानंतर म्हणजे १७९५ च्या खर्ड्याच्या लढाईनंतर

येथे निजामशाही राजवट सुरू झाल्याने हा प्रदेश निजामाच्या सत्तेखाली गेला. सुलतानराव–जानोजीराव यांच्या नावे अगदी अलीकडील काळापर्यंत म्हणजे इ.स. १९४७ पर्यंत त्यांना रुसूम मिळत होता.[८९]

देशमुख–गायकवाड यांची वंशावळ[९०]



कासेगाव, ता. पंढरपूर येथील वतनदार गोदाजी देशमुख :

विजापूरच्या आदिलशाही तक्तावर दुसरा अलि आदिलशहा (सन १६५६ ते १६७२) असताना कासेगाव परगणा बहेली आणि फरासखानाच्या लोकांकडे मुकासा म्हणून होता. शिवपूर्वकाळापासून अनेक ऐतिहासिक घटनांचे साक्षीदार हे गाव आहे. परगणे कासेगाव म्हणून इतिहासात त्यांचे महत्त्व मोठे आहे. या गावचे परिसरात बऱ्याच लढाया झाल्या आहेत.[९१]

कासेगाव येथे देशमुखांची दोन घराणी तसेच देशपांडे यांचे घराणे होते. या घराण्यातील कागदपत्रांच्या अभ्यासासाठी इतिहास संशोधकांनी भेटी दिलेल्या आहेत. कासेगाव परगणा हा ४० गावांचा होता. १) कसबे कासेगाव, वाडीसह, २) मौजे मुहंम्मदापूर, ३) मौजे रांजणी शेटफळ वाडीसह, रामापूर (वाडीसह), संगेवाडी, मांजरी, वाकरी, मुंढेवाडी (वाडीसह), देवळे, कोरटी, नेपतगाव, सेगाव, चिचुंबे, उंबरगाव, सिद्धेवाडी, सेलेवाडी, मुहंमदाबाद, भोवाळी, सुरगाव (वाडीसह) टाकळी, दहीवाड (वाडीसह), सिरबाबी, तनाळी, (गुंजेगाव) गायगव्हाण, गायगाव, खर्डी, तिसंगी, वाकी, घरनिकी, गादेगांव खुर्द याप्रमाणे ही नावे आहेत. काही गावांखाली वाड्यांचाही समावेश होता. वाड्यांसह ४४ गावची देशमुखी ही कासेगावच्या देशमुखांकडे होती असे दिसून येते.[९२]

इ. स. १६७२ मध्ये कासेगाव परगण्याचे देशमुख गोदाजी असताना त्यांनी बकाजी नावडकर यांची तलवार घेतली होती. शिवाजी महाराजांचे सेनापती प्रतापराव गुजर यांनी गोदाजी देशमुखांना त्यासाठी पत्र दिले होते. प्रतापराव गुजर यांनी नावडकर यांना दिलेली तलवार दिवाणातून दिली आहे असे या पत्रात नमूद केले आहे. सरकारातून तलवार दिली म्हणजे प्रत्यक्ष ती शिवाजी महाराज यांचेकडून दिली असणार. असे असता ती तलवार गोदाजी देशमुखांनी हुनरबंदीने का घेतली व प्रतापराव गुजरांनी दिलेले पत्राप्रमाणे गोदाजी देशमुख यांनी तलवार दिली किंवा नाही याची पुढील माहिती मिळत नाही.[९३]

पंढरपूरच्या देवाच्या मूर्ती तांब्रांच्या धामधुमीमुळे गुरसाळे, चिंचोळी, देगाव या ठिकाणी प्रसंग पाहून सुरक्षिततेसाठी ठेवण्यात येत असत.[९४] तांब्रांची गडबड शांत झाल्यावर या देवाच्या मूर्ती परत मंदिरात आणत असत. त्यावेळी त्याची प्रतिष्ठापना सिंहासनावर होण्यासाठी कासेगाव परगण्याचे देशमुख आणि देशपांडे यांनी छत्रपती शाहु महाराजांकडे परवानगी मागितली. त्यानुसार शाहू छत्रपतींनी २३ ऑक्टोबर १७११ रोजी कौलनामा देऊन देवास सिंहासनी बसवून महोत्सव करण्यास सांगितले आहे.[९५] नंतर परत शाहू छत्रपतींनी सन १७१६ साली पुन्हा क्षेत्राचे समस्त ब्राह्मण, पुजारी, बडवे, मोकदम, शेटे महाजन यांना देव सिंहासनी बसविण्याचे अभयपत्र दिले आहे.

देशमुखांचे अधिकार :

पंढरपूरचे विठ्ठलाचे दैवत हे उभ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहे. त्याची सुरक्षितता व पुन: देव सिंहासनी बसविण्याबाबतची जोखीम या घराण्यांनी देशमुखांचेवर सोपविले असे यातून दिसून येते.[९६]

इतिहासकाळात वतनदारांना रयतेमध्ये फार मोठा मान होता. त्याप्रमाणेच कासेगावच्या वतनदारांचा मान मोठा होता की, ज्यांचा छत्रपतीलाही हेवा वाटावा. कासेगावच्या देशमुखांचे स्थान एखाद्या मांडलिक राजाप्रमाणेच होते. त्यांना स्वतंत्र मुद्रा होती. प्रांतातील सर्व दप्तर त्यांच्या मुद्रेशिवाय प्रमाणित होत नसे. वार्षिक जमाबंदी, कोणत्या गावाच्या शेतीवर किती शेतसारा आकारावयाचा इ. सर्व ठराव देशमुखांच्या सल्ल्यानेच सरकारी मुजुमदार व सुभेदार ह्यांनी निश्चित करावयाचे. परगण्यातील सर्व प्रकारचे तंटे–बखेडे देशमुखांनी मिटवावयाचे, गावच्या सीमा ठरविणे, गाव शिवारातील बांध कायम राखणे, पिकांवर, गुराढोरांवर आणि रयतेवर सरकारी किंवा सावकारी जुलूम होऊ न देणे, नवीन वसाहत करणे, परगण्यात कोणाला इनाम देणे, कोणाला मिरासी हक्क देणे इ. राजाप्रमाणे सर्व व्यवहार आपल्या दृष्टीखाली जो चालू ठेवतो त्यास अमात्यांनी 'स्वतंत्र देशनायक' म्हटलेले आहे.[९७]

माढा येथील जहागीरदार रावरंभा निंबाळकर :

सोलापूर जिल्ह्यातील माढा हे सध्या तालुक्याचे ठिकाण आहे. सोलापूर पासून ऐंशी ते पंच्याऐंशी किलोमीटर अंतरावर आहे. ऐतिहासिक काळात माढा हे एक परगणा किंवा महाल होते. मध्ययुगीन काळात माढा, मोहोळ हे परगणे रावरंभा निंबाळकरांकडे होते. त्यांच्या प्रशासनाचा एक भाग होता. हे निंबाळकर मूळचे सोलापूर जिल्ह्यातील रायगाव येथील मूळ निवासी होते. म्हणून निजामाने त्यांना 'रावरंभा' ही पदवी दिलेली होती. माढा येथे निंबाळकरांची मोठी किल्लेवजा गढी आहे.[९८]

अठराव्या शतकात रंभाजीराव निंबाळकर यांचे घराणे मराठ्यांच्या इतिहासात एक पराक्रमी घराणे म्हणून चांगलेच नावाजलेले आहे. शिवछत्रपतींचे जावई महादजी नाईक निंबाळकर

यांचे पुत्र रंभाजी निंबाळकर होत.[९९] मात्र रंभाजीराव हे महादजी नाईक निंबाळकर यांचे औरस पुत्र नव्हते. शाहू छत्रपती हे मोगलांच्या कैदेतून इ.स. १७०७ मध्ये महाराष्ट्रात परत आले त्यावेळी रंभाजीराव निंबाळकर हे पुणे प्रांताचे सुभेदार होते.[१००] परंतु प्रत्यक्ष कारभार रंभाजीच्या वतीने बाजी कदम हा त्यांचा हस्तक पहात असे. शाहू छत्रपतींनी बाळाजी विश्वनाथ यास प्रथम सेनाकर्ते हे पद दिले व पुण्यावर अंमल बसविण्याची कामगिरी शाहू छत्रपतींनी त्यास दिली, तेव्हा रंभाजी निंबाळकरांनी त्यास विरोध दर्शविला. परंतु सामोपचाराने बाळाजी विश्वनाथने पुण्यावर अंमल स्थापन केला. बाळाजी विश्वनाथने ज्यावेळी व्यंकोजी ढमढेरे यास पुणे प्रांताची चौथाई वसूल करण्यास पाठविले तेव्हा रंभाजी निंबाळकर नाराज होवून चंद्रसेन जाधवांबरोबर निजामाकडे गेले.[१०१] छत्रपती शाहूंनी त्यांना परत आणण्याचे प्रयत्न केले. त्यांना यश आले नाही.

रंभाजी निंबाळकर निजामाकडे गेल्यानंतर निजामाने त्यांना 'रावरंभा' हा किताब आणि जहागिरी परांडा, नळदुर्ग व तुळजापूर दिले.[१०२] रंभाजी पराक्रमी व फौजबंद सरदार होता. त्यांनी मोगलांच्या प्रदेशावर वेळोवेळी हल्ले चढविले होते. औरंगजेब बादशहाच्या मृत्युनंतर महाराष्ट्रात मोगलांच्या प्रदेशात जो अस्थिरतेचा काळ निर्माण झाला होता. त्या काळात रंभाजी निंबाळरांनी स्वत:चे स्थान निर्माण केले होते. औरंगजेबाच्या मृत्युनंतर कैदेत असलेल्या शाहुंची सुटका बादशाही सैन्य दिल्लीच्या वाटेवर असताना महाराणी ताराबाईंनी त्यांना विरोध केला होता. मराठे सरदारांना शाहूस न मिळण्यासाठी ताराबाईंकडून ताकीद देण्याचे काम चालू होते. तसेच मराठी मुलखात अशा गोंधळाच्या संधीचा फायदा घेणारे अनेक सरदार होते. कुणाचाही हुकूम न मानता मन मानेल तशी धुडगूस घालण्यास हा काळ चांगला असल्याने रंभाजी निंबाळकर यांनी मोगली प्रदेशावर हल्ला मारल्याच्या बातम्या बादशहापर्यंत पोहचल्या होत्या. मराठा राज्यात चंद्रसेन जाधव व रावरंभा निंबाळकर यांनी बंड करण्यास चालू केल्याने त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी छत्रपती शाहूंनी बाळाजी विश्वनाथास पाठविले.[१०३] परंतु त्यांच्यामध्ये छोटी लढाई झाली. शाहूंकडील खंडेराव दाभाडे हे रंभाजी निंबाळकरांवर चालून गेले. २ एप्रिल १७१६ येथे लढाई होवून त्यात रंभाजीचा पुत्र मारला गेला.[१०४] त्यानंतर पुण्याचा अंमल स्वराज्याकडे आला म्हणजे छत्रपती शाहूंनी बाळाजी विश्वनाथच्या मदतीने पुणे प्रांत ताब्यात घेतला. रंभाजी निंबाळकर यांनी २३

ऑगस्ट इ.स. १७०९ मध्ये चंदनवंदन किल्ल्यावर शाहूंची भेट घेतली. छत्रपतींनी त्यांना पोशाख व शिरपाव दिले.[१०५] परंतु रंभाजी निंबाळकरांना शाहूंचे धोरण न पटल्याने ते दुरावले गेले व चंद्रसेन जाधवांबरोबर निजामाला जावून मिळाले. शाहूंच्या विरोधात असलेल्या इतर सरदारांना हाताशी धरुन निजामाने शाहूंच्या प्रदेशात धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली. मराठ्यांकडील फौजबंद असे नामांकित सरदार चंद्रसेन जाधव, दमाजी थोरात, रंभाजी निंबाळकर हे निजामास मिळाल्याने निजामास आपले दक्षिणेतील स्थान मजबूत करण्यास त्यांचा मोठा हातभार लागला, यात शंका नाही.[१०६] इ.स. १७१५ पासून पुढील दहा–बारा वर्षांच्या काळात रंभाजी निंबाळकराने निजामाच्या प्रत्येक लष्करी मोहिमेत साथ दिल्याचे दिसून येते. याचवेळी निजामाकडून माढा, करमाळा, परांडा, मोहोळ या परगण्याची त्यास जहागीर मिळाली. इ.स. १७२७ पासून रंभाजीने आपले वास्तव्य करमाळा येथे ठेवले. रंभाजी निंबाळकर हे महादजी नाईक निंबाळकर यांचे अनौरस पुत्र होते. रंभाजी निंबाळकर इ.स. १७३५ मध्ये मरण पावले.[१०७] त्यानंतर रंभाजीच्या जहागिरीचा कारभार त्याचा पुत्र जानोजीकडे सोपविला.

मराठ्यांच्या इतिहासात हे घराणे पुढे रावरंभाचे घराणे याच नावाने पेशवाई अखेरपर्यंत टिकून राहिले. हैद्राबादच्या निजामाची दक्षिणच्या सुभेदारीवर आल्यापासून जानोजीने वेगवेगळ्या लढाईत उत्तम कामगिरी बजावली. ११ ऑक्टोबर १७२४ रोजी झालेल्या साखरखेडच्या लढाईत जानोजीने दाखविलेल्या कामगिरीबद्दल निजामाने त्याला सात हजारी मनसबा आणि सात हजार स्वारांचा मान दिला होता. ८ ऑगस्ट १७६३ रोजी जानोजीच्या मृत्यूने करमाळा जहागिरीला धक्का बसला.[१०८]

निजामाकडून मराठ्यांकडे वाटाघाटी करणारा प्रमुख हे रावरंभा निंबाळकरच होते. त्यांनी रणांगणांवर शौर्य दाखविलेच त्याचबरोबर निजाम व मराठे यांच्यात वाटाघाटी घडवून आणणारे प्रमुख सरदार होते. याची अनेक उदाहरणे इतिहासात नमूद आहेत. रावरंभाचे घराणे हे देवीचे उपासक होते, तसे ते रसिकही होते. करमाळा येथे त्यांनी बांधलेले देवीचे मंदिर त्याची उत्तम साक्ष देते. करमाळा येथील भुईकोट किल्ला, ९६ पायऱ्यांची विहीर ही त्यांचे कलेवरील प्रेम आणि निष्ठा दाखविणारी उदाहरणे आहेत. ते आजही चांगल्या स्थितीत आहेत.[१०९]

वैराग येथील सरलष्कर निंबाजी नाईक निंबाळकर :


सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील वैराग या गावाला फार मोठा इतिहास लाभलेला आहे. सोलापूर पासून चाळीस किलोमीटर अंतरावर असलेले वैराग व शेजारील पानगाव ही गावे या मध्ययुगीन काळात ऐतिहासिक घडामोडींचे केंद्र होती. वैराग हे गाव पाच ऐतिहासिक वेशी असलेले व तटबंदी असलेले गाव होते.[११०]

निंबाजी नाईक निंबाळकर सरलष्कर हे दर्याबाई निंबाळकराचे पती होते. दर्याबाई निंबाळकर ह्या कोल्हापूरचे शिवाजी महाराज पहिले यांची कन्या तर राजाराम महाराज व महाराणी ताराबाई यांची नात होय. इ.स. १७५१ साली सांगोला येथे छत्रपती व पेशवे यांच्यात जो करार झालेला होता त्यामध्ये दर्याबाईचे पती निंबाजी नाईक निंबाळकर यांना सरलष्कर पद देण्याचे पेशव्याने मान्य केले आणि तसा करार करुन दिला. त्याप्रमाणे निंबाजी नाईक निंबाळकर यांनी खालील महाल व गावे सरंजाम म्हणून दिले.

४ सरकार परांडे पैकी– १ परगणे भूम, १ परगणे बार्शी– १ परगणे, पांगरी, १ मौजे माणकेश्वर परगणे भूम, ४ प्रांत बालाघाट पैकी– १ परगणे धाराशीव, १ परगणे बेंबळी, मामले आवसे १ कसबे खळवीरे, १ कसबे घाट नांदूर, १ परगणे नीलंगे सरकार बेदर इ. तसेच पेशव्यांनी पानगाव आणि इतर महाल ही त्यांना सरलष्कर पदाबद्दल दिले होते.[१११]

पानगाव हे बार्शी तालुक्यातील ऐतिहासिक गाव असून इ.स. १७४५ ते १७५० पर्यंत दुसरे शिवाजी महाराज यांचा मुलगा रामराज यांचे वास्तव्य येथे होते. राजा शाहू छत्रपतींचा वृद्धापकाळ झाल्याने मराठी दौलतीचा उत्तराधिकारी शोधण्याचे काम चालू झाले त्यावेळी महाराणी ताराबाईंचा नातू रामराजा हा दर्याबाई निंबाळकर या आपल्या बहिणीकडे अज्ञातवासात राहिला होता. रामराजास अज्ञातवासात ठेवण्याचे कारण म्हणजे कोल्हापूरच्या राजसबाईकडून त्यांना जीवाला धोका होता. म्हणून महाराणी ताराबाईंनी आपल्या नातवास पानगाव येथे दर्याबाई निंबाळकरांकडे गुप्तरुपाने इ.स.१७४५ चे फेब्रुवारी नंतर ठेवले होते. पूर्ण अज्ञातवासात वाढलेला रामराजा शाहू महाराजांचा उत्तराधिकारी म्हणून ४ जानेवारी १७५० रोजी सातारा शहरात आला व त्याच दिवशी राज्यारोहण समारंभ झाला.[११२]

मुधोजीराव नाईक निंबाळकर (फलटण) [११३]
(इ.स. १६३०-१६४४)



पानगाव येथे बहीण दर्याबाईंच्या सहवासात रामराजा बरीच वर्षे असल्याने तीच त्यांच्या गुरुस्थानी होती.

पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धात म्हणजे इ.स. १४६८ ते १४७८ च्या काळात पानगाव परगणा परांडा सरकारात होता. यामध्ये बावीस गावांचा समावेश होता. सतरा गावचा उल्लेख इतिहासातून मिळतो. ती पुढीलप्रमाणे कसबे पानगाव, कोरफळे, दडशिंगे, सुरडी, मालवंडी, गुळपोळी, तुर्क पिंपरी, पिंपरी, हिंगणी, पिंपळगाव, साकत, काळेगाव, उंडेगाव, तडवळे, वैराग, घाणेगाव, मानेगाव, इ.

निंबाजी नाईक निंबाळकर व दर्याबाई नाईक निंबाळकर यांच्याकडे मराठी दौलतीचे सरलष्करपद देवून छत्रपतींनी या पदासाठी सरंजाम म्हणून तेरा परगणे, ११ गावे, बीड जिल्ह्यातील साडेतीन परगणे दिलेले होते. राजकन्या दर्याबाई व पुढे छत्रपती झालेले रामराजा यांच्या वास्तव्याने पानगावचे ऐतिहासिक महत्त्व मोठे आहे.[११४] सन १७५० या साली हिंदुस्थानातील राजेरजवाडे इंग्रज व इतर परकीय सत्ता या साऱ्यांचे लक्ष या पानगावाकडे लागून राहिले होते. भावी छत्रपती या गावी बरीच वर्षे राहिल्याने रामराजांचा राज्याभिषेक होईपर्यंत अनेक सरदार–फौजदार यांची ये–जा या गावी होत होती. त्यावेळी पेशव्यांची सत्ता मोठी असली तरी मराठी राज्यात गोंधळाची स्थिती होती. गुरुस्थानी असलेल्या दर्याबाईंनी आपल्या छत्रपती बनलेल्या भावास पेशव्यांच्या बाजूने राहण्याचा सल्लाा दिला. कारण त्यावेळी मराठा प्रशासनावर पेशवे प्रभावी होते. रामराजाच्या राज्याभिषेकानंतर निंबाजी नाईक निंबाळकर यांना अक्कलकोटचे भोसले यांचे सरंजामापैकी पाच लाखाचा सरंजाम मिळावी अशी अपेक्षा होती. परंतु पेशव्यांनी ती यशस्वी होवू दिली नाही.[११५]

दर्याबाई नाईक निंबाळकर यांना मानसिंग व मकरंदसिंह ही दोन मुले व कमळाबाई ही एक मुलगी होती. कमळाबाईचा विवाह दुसरे शिवाजी महाराज (सन १७६१ ते १८१३) यांच्याशी झाला. कमळाबाई व दुसरे शिवाजी यांचा पुत्र बुवासाहेब महाराज म्हणजे दर्याबाईंचे नातू हे नंतर छत्रपती बनले.[११६]

दर्याबाई नाईक निंबाळकर यांनी सातारहून परत येत असताना मानूरजवळ कसबे नागदेवचा मठ जो अक्कलकोट जहागिरीत होता. तो लुटला अशी नोंद शाहू रोजनिशीत मिळते. तसेच सन १७६१ डिसेंबर मध्ये दर्याबाई निंबाळकर यांनी काटी मारडी या प्रदेशात दंगा केल्याची माहिती मिळते. यावरून दर्याबाई निंबाळकर यांच्यामध्ये वंशपरंपरागत धाडशी, राजकारणीपणाचे गुण दिसून येतात.

छत्रपती शिवाजी दुसरे यांचे पुत्र राजाराम महाराज यांना एकूण चार राण्या होत्या. पहिली राणी श्रीमंत मातोश्री सगुणाबाई ही प्रतापराव गुजर परतूड देशमुख यांची कन्या, दुसरी श्रीमंत मातोश्री ताराऊसाहेब ही मोहिते यांची कन्या, तिसरी श्रीमंत मातोश्री राजसबाईसाहेब ही घाटगे यांची कन्या, तर चवथी मातोश्री अहिल्याबाईसाहेब ह्या पानगांवचे नाईक निंबाळकर घराण्यातील होत्या.[११७]

इ.स. १७५० साली दिलेला पानगाव परगणा सवाई माधवराव पेशव्यांच्या काळात निंबाजी नाईक निंबाळकरांकडून काढून घेण्यात आला व तो सरकारात ठेवला. हा परगणा पुढे माधवराव कृष्णा पानसे आणि भिवराव यशवंत पानसे यांच्याकडे नवीन इनाम करार करून दिला.[११८] पानसे घराण्याकडे पानगावचा मोकासा पुढे दुसरे बाजीरावाच्या काळापर्यंत चालू होता. दुसऱ्या बाजीरावाने तोफखान्याचा सरंजाम व त्या पदावरून पानशांना दूर केले व इ.स. १८११ ते १२ मध्ये त्रिंबकजी डेंगळे यांना दिले होते. इ.स. १७५९ मध्ये उदगीरची लढाई जिंकण्यासाठी तोफखान्याचे प्रमुख असलेल्या पानशांनी मोठी मदत पेशव्यांना केली होती. तसेच इ.स. १८१८ मध्ये पेशवे आणि इंग्रज यांच्यात झालेल्या दुसऱ्या इंग्रज–मराठा युद्धात मोठ्या कर्तृत्वाने तोफखान्याचे प्रमुख पानसे लढले होते. तसेच सोलापूरच्या किल्ल्यामध्येही मोठ्या शौर्याने पानसे यांनी इंग्रजांशी झुंज दिली होती.

पानगाव हा परगणा काही काळापुरता पेशव्यांना निजामास द्यावा लागला होता. नंतर इ.स. १७७३–७४ मध्ये निजामाने बीड परगण्यातील मालूर मामल्यातील एक्केचाळीस गावांच्या बदल्यात पानगाव परगणाा परत पेशव्यांना दिला तेव्हा पानगाव परगण्यावर दर्याबाई नाईक निंबाळकर यांचा मुलगा मकरंदसिंग नाईक निंबाळकर यांचा थेट अंमल होता. सन १७७६–७७

च्या सालापर्यंत पानगाव परगणा मकरंदसिंग नाईक निंबाळकर यांचेकडे होता व त्यानंतर पुन: पेशव्याने पानगाव परगणा पानसे यांना दिला.[११९]

इ.स. १७६१ मध्ये पानिपतमध्ये मराठ्यांचा प्रचंड पराभव झाला. त्यानंतरच्या काळात मराठ्यांच्या राज्यात निजामाने गोंधळ निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू केले. निजामाचा एक सरदार लाला ब्रिजनाथ दोन हजार फौज व दोन हजार गारदी यांसह पेशव्यांचे आळंद, गुंजोटी, नळदुर्ग, अक्कलकोट या भागात खंडण्या घेऊ लागला, जनतेला त्रास देवून लागला. अक्कलकोट परगण्यातील बोरगावास अनन्वीत अत्याचार करून तो धाराशिव येथे गेला.[१२०] तेथे त्याला कृष्णराव निंबाळकर सामील झाला. तसेच राजश्री मकरंदसिंग नाईक निंबाळकर हेही सामील झाले. त्यावेळी दोघेही पेशव्यांच्या विरोधात लढले होते. कारण पानगाव परगणा हा निंबाळकरांकडून काढून घेऊन पानसे घराण्याकडे दिला होता. म्हणून कदाचित मकरंदसिंग नाईक निंबाळकर निजामास जावून मिळाले असावेत.


वैरागच्या नाईक निंबाळकर घराण्याला फार मोठा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. सध्याही या घराण्यातील अनेक लोक चांगल्या पदावर काम करीत आहेत. या घराण्यातील श्री. दत्ताजीराव ऊर्फ काकासाहेब शहाजी नाईक निंबाळकर हे सोलापूर जिल्हा लोकल बोर्डचे प्रेसिडेंट म्हणून काम पाहिले, श्री. चंद्रकांत दत्ताजीराव हे विधानसभेचे सदस्य (१९८०–८५, १९९०–९५) होते, विनायकराव ऊर्फ भाऊसोा मालोजीराव व श्री. वसंतराव दत्ताजीराव यांनी वैरागचे सरपंच म्हणून काम पाहिले. श्री. विठ्ठलराव दत्ताजीराव यांनी भोगावती सहकारी साखर कारखाना, वैराग येथील संचालक पदी होते. कृष्णराव विनायकराव हे सहाय्यक आयुक्त, अन्न आणि औषध प्रशासन या पदावर कार्यरत होते तर त्यांच्या पत्नी डॉ. सुवर्णाताई कृष्णराव नाईक निंबाळकर यांचेही शैक्षणिक क्षेत्रातील कार्य मोठे आहे. त्यांच्या प्रेरणादायी कार्यामुळे त्यांना बार्शी तालुका भूषण पुरस्कार आणि महाराणी ताराबाई पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आलेले आहे. तसेच श्री. मकरंद भगवंतराव नाईक निंबाळकर यांच्याकडे सोलापूर जिल्ह्याचे आरोग्य व शिक्षण खाते आहे. यावरून या घराण्याचा कर्तृत्वाचा ठसा ऐतिहासिक काळापासून आजही समाजावर पडलेला आहे.

अक्कलकोटचे जहागिरदार फत्तेसिंग भोसले :

अक्कलकोट हे सोलापूर जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण असून ते सोलापूरच्या आग्नेय बाजूस आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमेवरील हा तालुका सोलापूर पासून चाळीस किलोमीटर अंतरावर आहे.[१२१]

अक्कलकोट संस्थानचे संस्थापक फत्तेसिंग भोसले हे शाहू महाराजांचे मानसपुत्र होते. शाहू महाराजांची बादशहाच्या कैदेतून सुटका झाल्यानंतर ते दक्षिणेकडे येत असता त्यांच्याबरोबर असलेल्या सैन्याला पारद या गावी सयाजी लोखंडे या पाटलाने प्रतिकार केला. शाहूंचे सोबत असलेले सैन्य या पाटलांवर चालून गेले. या गावी छोटी लढाई होवून त्यात पारद गावचा पाटील मारला गेला. त्यावेळी त्यांच्या विधवा पत्नीने नुकतेच जन्माला आलेले मूल शाहूच्या पायावर घालून अभय मागितले. शाहू महाराजांनी त्या मुलाचा स्वीकार करून त्याचे नाव फत्तेसिंग असे ठेवले. शाहूंनी लढाईत प्रथमच विजय मिळवला होता म्हणून या मुलाचे नाव फत्तेसिंग ठेवले होते. शाहू छत्रपतींची एक राणी बिरुबाई ही फत्तेसिंग भोसले यांना पुत्रवत मानीत असे. शाहू महाराजांनी खंडेराव दाभाडे १७०८ मध्ये ताराबाईंच्या पक्षात गेल्यानंतर त्यांचे वतन काढून घेऊन फत्तेसिंग भोसले यांना दिले. त्यात जुन्नरपासून सासवड पर्यंतच्या प्रदेशातील ७२० गावांच्या सरपाटीलकीचे वंशपरंपरेने दिलेले वतन होते. वयाच्या अठराव्या वर्षी फत्तेसिंग भोसलेंनी कनार्टक मोहिम पार पाडली. त्यावेळी दक्षिणेतील सहा सुभ्यांपैकी महत्त्वाचा असा हा कर्नाटक सुभा मराठ्यांकडे परत आला. शाहू महाराजांकडून फत्तेसिंग भोसलेंना युवराजा समान मान मिळत असे. त्यांच्याबरोबर स्वारीत प्रतिनिधी व प्रधान यांना जाण्यास निर्बंध केला होता. यावरून फत्तेसिंगांना मोठा मान असल्याचे दिसून येते.[१२२]

अक्कलकोटचे फत्तेसिंग भोसले यांची वंशावळ [१२३]



मराठेशाहीतील सांगोला करारात शाहू छत्रपतींच्या वेळचे दरबारी सरंजामदार सरदार याचे नेमणुकीत, दर्जात आणि स्वत: छत्रपतींच्याही दर्जात मोडतोड मोठ्या प्रमाणात झाली. त्याचा फटका फत्तेसिंग भोसले यांचे जहागिरीसही बसला. शाहू छत्रपतींच्या काळात फत्तेसिंग भोसले यांचेकडे असलेले मोकासे काढून घेण्यात आले. कृष्णा आणि तुंगभद्रा या दुआबात पंचमहाल हा सुपिक प्रदेश त्यांचेकडे होता. तो काढून घेण्यात आला तो पेशव्यांनी स्वत:कडे ठेवला. मोकासे काढून घेऊन व जहागिरीचे प्रदेशाची छाटणी करून फत्तेसिंग भोसले यांची लहानशा अक्कलकोट संस्थानात बोळवण झाली. शाहू छत्रपतींचे काळात फत्तेसिंग भोसले मोहिमेवर निघाले म्हणजे पेशवा आणि प्रतिनिधी त्यांच्याबरोबर आपले सैन्य घेऊन जात असत. शाहू छत्रपतींचे तसे आदेश होते. परंतु शाहू महाराजांच्या निधनानंतर पेशव्यांनी अधिकाराच्या जोरावर त्यांना अक्कलकोट संस्थानात पाठविले.[१२४]

फत्तेसिंग भोसले यांना शाहू छत्रपतींच्या काळात जी जहागीर आणि मोकासे होते त्यावर एकूण वीस हजाराचे सैन्य ठेवता येईल अशी स्थिती होती. सांगोला कराराचा परिणाम म्हणजे ती १०० स्वार ठेवण्या एवढीच छोटी झाली. नानासाहेब पेशव्यांचे फत्तेसिंग भोसल्यांचा किती सरंजाम काढून घ्यावा तो कुणाकुणाला कसा द्यावा व आपण किती घ्यावा याची माहिती दर्शविणारी काही पत्रेही आहेत. ''फत्तेसिंग भोसल्याचा सरंजाम राखावा पण त्याच्यापासून आठ लाखाचा सरंजाम घेऊन त्यापैकी तिहींचा संभुसिंगास, एकाचा पिराजी नाईकास, बाही चहुचा राहिला तो आपण घ्यावा.'' पेशव्यांचे हे पत्र २७ जुलै १७५० रोजी नाना पुरंदरे यास लिहिलेले होते. फत्तेसिंग भोसले यांनी इ.स. १७१२ पासून १७६० पर्यंतच्या कारकिर्दीत बाळाजी विश्वनाथ, बाजीराव व बाळाजी बाजीराव या तिन्ही पेशव्यांच्या कारकीर्दीत पाहिल्या. स्वतंत्रपणे व त्यांच्याबरोबर अनेक मोहिमेत आपले शौर्यतेज प्रकट केले. परंतु शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर फत्तेसिंग भोसले उदास झाले. ते अक्कलकोट येथे निवास करू लागले. पेशव्यांच्या होत असलेल्या राज्यकारभाराच्या घडामोडीपासून त्यांनी स्वत:ला दूरच ठेवले.[१२५]

फत्तेसिंग भोसले यांच्या मृत्यूनंतर जहागीर त्यांचे दत्तकपुत्र शहाजीराजे यास मिळावी म्हणून अक्कलकोटकरांचे पूर्वीचे सरदार त्रिंबक हरी यांनी प्रयत्न केले. त्यावेळी नानासाहेब

पेशव्याने शहाजी भोसले यांच्याकडून तीस हजार मोहरांचा व जवाहीर असा भरघोस नजराणा घेतला. शहाजी राजे भोसले यांना अक्कलकोट जहागिरीचा कारभार जास्त काळ करता आला नाही. त्यानंतर त्यांचे चिरंजीव फत्तेसिंग भोसले यांच्या नावे जहागिरीच्या सनदा पेशव्यांनी करून दिल्या. या जहागिरीच्या सनदा मिळण्यासाठी फत्तेसिंग भोसले यांना श्रीमंतांपुढे सात लाख रुपयांचा नजराणा द्यावा लागला. तसेच दरबार खर्च व इतर खर्च मिळून साडेतीन लाख रुपये खर्च करावे लागले.

अक्कलकोट हे सोलापूर जिल्ह्यातील जुने संस्थान असून आकाराने व उत्पन्नानेही ते सर्वात मोठे संस्थान होय. सन १८११–१२ साली फत्तेसिंग भोसले अक्कलकोटकर यांची जहागीर एकूण पाच लाखाची असलेचे दिसून येते. त्यांनी एक हजार सैन्य पदरी ठेवून पेशव्यांची चाकरी करावी लागली.[१२६]

सारांश, गढीं व वाड्यांच्या अभ्यासासाठी सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन कालखंडातील वतनदारी पद्धती, जहागिर आणि वतनदार यांची संक्षेपाने पाहणी केली. कारण यांच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीशिवाय गढी, वाडे नीट समजून घेता आले नसते. या जहागिरदार, वतनदार यांना गढी व वाडे असणे त्यांच्या पदासाठी व संरक्षणासाठी आवश्यक होते. ते कसे हे पुढील प्रकरणांत पहावयाचे आहे.

मध्ययुगीन काळातील सोलापूर जिल्हा हा परगणा म्हणून ओळखला जात होता. याबरोबरच मंगळवेढा, कासेगाव, भाळवणी, पिलीव, अक्कलकोट, पानगाव, मोहोळ, माढा, वैराग असे परगणे होते. छत्रपती शाहू महाराजांच्या काळात आणि नंतर पेशव्यांच्या काळात सध्याच्या सोलापूर जिल्ह्यातील हे परगणे वेगवेगळ्या वतनदारांकडे किंवा जहागिरदारांकडे होते. त्यांच्या अधिकाराखाली जो प्रदेश येत असे तेथील प्रशासनाचे कार्य ते करत असत, तसेच न्यायव्यवस्था, महसूल व्यवस्था, लष्कर भरती, इ. कामे हे वतनदार करीत असल्याने त्यांचा रयतेशी प्रत्यक्ष संबंध येत असे.

हे जहागिरदार आणि वतनदार आपापल्या प्रदेशात राजाच म्हणून वावरत असत. त्यांच्याकडे स्वत:चे लष्कर, शस्त्रास्त्रे असल्याने त्यांची ताकद वाढत असे. त्यामुळे त्यांनी

आपलया प्रदेशात गढ्यांची निर्मिती केली. शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्यात किल्ल्यांना महत्त्व दिले, परंतु त्याप्रमाणे किल्ले बांधणे मध्ययुगीन काळातील वतनदारांना शक्य झाले नसावे, कदाचित किल्ला बांधणीचा खर्च जास्त असल्याने किल्ल्याप्रमाणेच दिसणाऱ्या परंतु आकाराने लहान गढ्यांची निर्मिती केली. त्यामध्ये लष्करी व्यवस्थेबरोबरच धान्य कोठारे, पाणीपुरवठा, भुयारी मार्ग, कचेऱ्या, मंदिरे यांचीही सोय केली. गढीचा आकार जरी किल्ल्याप्रमाणे मोठा नसला तरी त्याची तटबंदी, बुरूज हे अगदी भक्कम होते. बाहेरून शत्रूने हल्ला केला तरी गढीतील लोक सुरक्षित राहून बाहेरील शत्रूवर आतून हल्ला करण्याची सोय केलेली दिसून येते. त्यासाठी गढीच्या तटबंदीवर तोफा ठेवण्यासाठी सोय केलेली असे. तसेच तटबंदीला जंग्याही असत, त्यातून बाहेरील शत्रूवर हल्ला करत येत असे. त्यामुळे या जहागिरदार आणि वतनदार यांना मध्ययुगीन प्रशासनामध्ये महत्त्वाचे स्थान होते.

संदर्भ ग्रंथ

१) मराठी विश्वकोश खंड–१५, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, २०११, लेख आणि आयडी– ११४३३, पृ.क्र. २.

२) कित्ता, पृ.क्र. ३.

३) Sen S. N., Administrative System of the Marathas, Calcutta, K. P. Bagchi and Company, 1976, Page No. 149.

४) Op.Cit., Sen S. N., Page No. 17.

५) गायकवाड आर. डी., सरदेसाई बी. एन., थोरात टी. डी., हनमाने व्ही. एन., मराठेकालीन संस्था व विचार, फडके बुकसेलर्स, १९९०, पृ. क्र. १८५.

६) कित्ता, गायकवाड आर. डी., सरदेसाई बी. एन., थोरात टी. डी., हनमाने व्ही. एन., पृ. क्र. १८५.

७) कित्ता, गायकवाड आर. डी., सरदेसाई बी. एन., थोरात टी. डी., हनमाने व्ही. एन., पृ. क्र. १८६.

८) सावंत बी. एस., जाधव व्ही. के., मराठ्यांचा प्रशासकीय, सामाजिक व आर्थिक इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, १९९७, पृ. क्र. ६२.

९) Sen S. N., Page No. 112.

१०) गुणे वि. व्यं., मराठ्यांची शासन व्यवस्था : पेशव्यांचा राज्य कारभार, मराठ्यांचा इतिहास, खंड दुसरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, ३०, १९८५, पृ. क्र. २५८.

११) भावे वा. कृ., शिवराज्य व शिवकाल, पृ. क्र. ११६.

१२) उपरोक्त, गायकवाड, सरदेसाई, थोरात, हनमाने, पृ. क्र. २१०, २११.

१३) भावे वा. कृ., शिवराज्य व शिवकाल, पृ. क्र. २१६.

१४) उपरोक्त, गायकवाड, सरदेसाई, थोरात, हनमाने, पृ. क्र. २०९.

१५) कित्ता, पृ. क्र. २०९.

१६) कुलकर्णी अ. रा., शिवकालीन महाराष्ट्र– मराठ्यांचा इतिहास, खंड–१, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, ३०, १९८४, पृ. क्र. ३४१.

१७) कित्ता, पृ. क्र. ३४२.

१८) जोशी शंकर नारायण यांच्या निवडक लेखांचा संग्रह, मराठेकालीन समाजदर्शन, अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, १९६०, पुणे, पृ. क्र. ५१.

१९) कित्ता, पृ. क्र. ५२.

२०) उपरोक्त गायकवाड, सरदेसाई, पृ. क्र. २१९

२१) सभासद, शिवचरित्र, पृ. क्र. २९.

२२) http://marathivishwakosh.in/khandas/kand15/index.php/24/1/2015.

२३) उपरोक्त, गायकवाड, सरदेसाई, पृ. क्र. २११.

२४) कित्ता, गायकवाड, सरदेसाई, पृ. क्र. २१२.

२५) Elphinstone, A Report on the territion conquered from the Peshwa, P.No. 21, 22.

२६) उपरोक्त, गायकवाड, सरदेसाई, पृ. क्र. २१९.

२७) कठारे अनिल मुरलीधर, मराठेकालीन सरकारी अधिकारी आणि त्यांचे गैरवर्तन, सुगावा प्रकाशन, पुणे, १९९५, पृ. क्र. ४.

२८) Grant Duff, History of Maratha, Vol. 1, Page No. 17.

२९) भावे वा. कृ., शिवराज्य व शिवकाल, पृ. क्र. ११५.

३०) Kulkarni A. R., Maharashtra in the Age of Shivaji, Diamond Publication, Page No. 44.

३१) राजवाडे वि. का., मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड २०, पृ. क्र. १७५.

३२) सावंत बी. एस., जाधव व्ही. के., मराठ्यांचा प्रशासकीय आणि सामाजिक, आर्थिक इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, १९९७, पृ. क्र. १५२.

३३) Op.Cit., S. N. Page No. 151, 52.

३४) Op.Cit., Elphinstone, Page No. 43.

३५) गॅझेटीयर ऑफ इंडिया, पृ. क्र. २२३.

३६) उपरोक्त, कठारे अनिल मुरलीधर, पृ. क्र. २०.

३७) Op.Cit., Sen S. N., Page No. 156.

३८) जोशी शंकर नारायण, मराठेकालीन समाजदर्शन, निवडक ग्रंथसंग्रह, अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, १९६०, पुणे–२, पृ. क्र. २१५.

३९) Kulkarni A. R., Maharashtra in the Age of Shivaji, Diamond Publication, Page No. 24.

४०) राजवाडे वि. का., मराठ्यांच्या इतिहासाची साधने, भा.इ.सं. मंडळ, पुणे, खंड १५, पृ. क्र. ३४०.

४१) ओतुरकर रा. वि., मराठ्यांच्या साम्राज्याचे स्वरुप, मराठ्यांचा इतिहास, खंड–२, १९८५, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०, पृ. क्र. २६३.

४२) भारत इतिहास संशोधन मंडळ, त्रैमासिक, वर्ष १३, अंक ३, पृ. क्र. ७३.

४३) कित्ता, भारत इतिहास संशोधन मंडळ, पृ. क्र. ८५.

४४) जोशी, आदर्श मराठी शब्दकोश, पृ. क्र. ७०६.

४५) उपरोक्त, कठारे अनिल, पृ. क्र. २३.

४६) उपरोक्त, जोशी शंकर नारायण, पृ. क्र. ८.

४७) कित्ता, जोशी शंकर नारायण, पृ. क्र. ९.

४८) Op.Cit., Sen S. N., Administrative System of the Maratha, Page No. 129.

४९) Op.Cit., Sen S. N., Page No. 307.

५०) Op.Cit., Kulkarni A. R., Page No. 35.

५१) उपरोक्त, जोशी शंकर नारायण, पृ. क्र. २१८.

५२) राजवाडे वि. का., मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड २०, पृ. क्र. १७५.

५३) सावंत बी. सी., जाधव व्ही. के., मराठ्यांचा प्रशासकीय, सामाजिक आणि आर्थिक इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, १९९७, पृ. क्र. १५२.

५४) कित्ता, सावंत बी. सी., जाधव व्ही. के., पृ. क्र. १५३.

५५) कित्ता, श्रीनिवास परशुराम, पृ. क्र. २३७.

५६) उपरोक्त, श्रीनिवास परशुराम, पृ. क्र. २३९.

५७) आपटे गो. चि., संस्थानिक पटवर्धन घराण्याचा इतिहास, प्रकाशक आपटे गो. चि., वाई, शके १८४१, पृ. क्र. ३१.

५८) कित्ता, आपटे गो. चि., पृ. क्र. ८८.

५९) उपरोक्त, गॅझेटियर ऑफ सोलापूर डिस्ट्रीक्ट, पृ. क्र. ८६४.

६०) उपरोक्त, देशमुख गोपाळ, पृ. क्र. २६.

६१) सरदेसाई गो. स., ऐतिहासिक घराण्याच्या वंशावळी, मुंबई सरकार, पृ. क्र. ७३.

६२) ग्रॅट डफ, हिस्ट्री ऑफ मराठा, तुकाराम जावजी, निर्णय सागर प्रेस, १९१६, पृ. क्र. ११५.

६३) उपरोक्त, सरदेसाई गो. स., पृ. क्र. ७१.

६४) देशमुख विजय, शककर्ते शिवराय (उत्तरार्ध), छत्रपती सेवा प्रतिष्ठान प्रकाशन, नागपूर, दुसरी आवृत्ती, १९८६, पृ. क्र. ५८७.

६५) कित्ता, देशमुख विजय, पृ. क्र. ३४१.

६६) उपरोक्त, ग्रॅट डफ, पृ. क्र. ११५.

६७) पारसनीस द. ब., शाहू महाराज रोजनिशी, भाग–१, परिच्छेद ३४५, पृ. क्र. २००.

६८) कित्ता, पारसनीस द. ब., पृ. क्र. २०१.

६९) Gazetteer of the Bombay Presidency Sholapur District, (Facsismile Reproduction), Vol. XX : Government of Maharashtra, Page No. 414.

७०) देशमुख गोपाळ, सोलापूर जिल्ह्याचा इतिहास, रेवू प्रकाशन, पंढरपूर, पृ. क्र. ५८५.

७१) फत्तेसिंग देशमुख यांच्याकडील मूळ वंशावळ.

७२) Khocharkar, V. G., Records of the Shivaji Period, 1974, Govt. of Maharashtra, Page No. 132.

७३) उपरोक्त, देशमुख गोपाळ, पृ. क्र. ५२८.

७४) कित्ता, पृ. क्र. ५२८.

७५) भारत इतिहास संशोधन मंडळ, त्रैमासिक, वर्ष ३८, अंक १–४, शिवचरित्र साहित्य, खंड ११ वा, १९५७–५८, पृ. क्र. ५५.

७६) कित्ता, भारत इतिहास संशोधन मंडळ, पृ. क्र. ५८.

७७) कित्ता, भारत इतिहास संशोधन मंडळ, पृ. क्र. ६९.

७८) कित्ता, भारत इतिहास संशोधन मंडळ, पृ. क्र. ७३.

७९) Gazetteer of the Bombay Pesidency Sholapur District (Facsimile Reproduction), Vol. XX, The Government Photozirco Press, Pune, 1884, Page No. 413.

८०) सरदेसाई गो. स., ऐतिहासिक घराण्याच्या वंशावळी, पृ. क्र. ७३.

८१) सरदेसाई गो. स., मराठी रियासत, खंड ३, पृ. क्र. ९१.

८२) कित्ता, सरदेसाई गो. स., पृ. क्र. १२६.

८३) बेंद्रे वा. सी, महाराष्ट्र इतिहासाची साधने, विभाग दुसरा, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या इ.इ. मंडळाची ग्रंथमाला, १०, १९६६, पृ. क्र. ३१९.

८४) खोबरेकर वि. गो., महाराष्ट्राचा इतिहास, (मराठा कालखंड) भाग २ रा, १७०७ ते १८१८, म.रा.सा.से. मंडळ, प्रथमावृत्ती, १९८८, पृ. क्र. १७.

८५) उपरोक्त, सरदेसाई गो. स., पृ. क्र. १२६.

८६) कित्ता, सरदेसाई गो. स., पृ. क्र. ६९.

८७) कित्ता, सरदेसाई गो. स., पृ. क्र. १२५.

८८) कित्ता, सरदेसाई गो. स., पृ. क्र. १२६.

८९) पगडी सेतु माधव, मराठे व निजाम, उर्दू, फारसी साधने, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, इ.स. मंडळ मुंबई, ग्रंथ क्र. १, प्रथम आवृत्ती, १९६१, पृ. क्र. १५.

९०) खरे बा. वा., ऐतिहासिक लेखसंग्रह, खंड २, पृ. क्र. ५६५.

९१) उपरोक्त, सोलापूर जिल्हा गॅझेटियर, पृ. क्र. ५०३.

९२) पुरंदरे कृ. वा., पुरंदरे दप्तर भाग १, पृ. क्र. ३७१.

९३) सरदेसाई गो. स., गर्गे स. मा., मराठी रियासत, खंड ४, पॉप्युलर प्रकाशन, १९९०, पृ.क्र. २३७.

९४) सरदेसाई गो. स., मराठी रियासत, खंड २, पृ. क्र. १९९. शिलालेख, जुने फिरंगाई मंदिर, कुरकुंभ, ता. दौंड, जि. पुणे.

९५) उपरोक्त, देशमुख गोपाळ, पृ. क्र.

९६) गर्गे स. मा., करवीर रियासत, गो. य. राणे प्रकाशन, पुणे, १९८०, पृ. क्र. २५१.

९७) कित्ता, गर्गे स. मा., पृ. क्र. ४२८.

९८) भावे ल. वि., आपटे द. वि., मराठे दप्तर, रुमाल दुसरा, पृ. क्र. ७१.

९९) पानसे के. र, पानसे म. भा., पानसे घराण्याचा इतिहास, भा.इ.सं.मं. पुरस्कृत ग्रंथमाला क्र. २०, १९७८, पृ. क्र. २३७.

१००) कित्ता, पानसे के. र., पानसे म. भा., पृ. क्र. २३७.

१०१) उपरोक्त, देशमुख गोपाळराव, पृ. क्र. ५९६.

१०२) Op.Cit., Gazetteer of the Bombay Presidency, Sholapur District, Page No. 505.

१०३) उपरोक्त, सरदेसाई गो.स. मराठी रियासत, खंड–३, पृ.क्र. २७.

१०४) अक्कलकोट येथील शस्त्रागारातील वंशावळ.

१०५) उपरोक्त, देशमुख गोपाळ, सोलापूर जिल्ह्याचा इतिहास मराठा कालखंड, पृ.क्र. २०८.

१०६) कित्ता, पृ.क्र. २१४.

१०७) कित्ता, पृ.क्र. ३२२८.

प्रकरण ३ रे

सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन काळातील गढ्या

प्रस्तावना :

''सरंजामशाही'' हे मध्ययुगीन इंडो इस्लामिक युगाचे खास वैशिष्ट्य होय. तत्कालिन समाजात या वतनदार किंवा जहागिरदारांनी एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान, खास करुन सामाजिक, राजकीय स्थान मिळविले होते. त्यांच्या जहागिरीचे ते राजेच होते. ते खूपच शौकी राहणीमान अवलंबणारे होते. म्हणून त्यांना राहण्यासाठी, निवासासाठी व प्रशासनासाठी इमारतींची गरज भासू लागली. याचे फलित म्हणजे, राजवाड्यासारख्या अनेक इमारती उभारल्या जाऊ लागल्या, ज्याला गढी (सभोवताली संरक्षक तटबंदी असलेली वास्तू) असे संबोधले जाऊ लागले. या जहागिरदार आणि वतनदारांसारख्या महत्त्वाच्या व्यक्तींच्या राहत्या वास्तूलाही संरक्षणासाठी तटबंदीची आवश्यकता मोठ्या प्रमाणावर भासू लागली आणि सर्वच ठिकाणी लष्कर ठेवणे अशक्य झाले तेव्हा त्या त्या गावातील प्रमुख व्यक्तींनी गढींची उभारणी केली. महाराष्ट्रात सर्वत्र असणाऱ्या गढ्या हे याचे उत्तम उदाहरण आहे.

मध्ययुगीन कालखंडात शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात (त्यानंतरच्या पेशवेकाळात) महाराष्ट्रातील अनेक मातब्बर घराण्यांचे योगदान आहे. त्यातील काही घराण्यांचे वंशज आजही त्या वास्तूमध्ये राहतात. सोलापूर परगण्यात अनेक सरदार व वतनदारांनी स्वराज्यासाठी कार्य केले. त्यांनी बांधलेल्या गढ्यांमध्ये काही गढ्या अस्तित्वात आहेत, काही पूर्णत: ढासळलेल्या किंवा जमीनदोस्त झालेल्या आहेत. सोलापूर जिल्ह्यात असलेल्या गढ्या या सरदार वतनदारांच्या कर्तबगारीची साक्ष देतात.

मराठेकालीन लष्करी शिल्पकला :

या प्रकरणात मराठेकालीन लष्करविषयक शिल्पकलेचा विचार करीत असताना गढी, नागरी संरक्षण व्यवस्था व किल्ले यांचा प्रामुख्याने विचार करावा लागतो.

गढी :

गढी ही खास राहण्यासाठी बांधलेली वास्तू होय. लहान आकाराचा मातीचा भुईकोट किल्ला किंवा संरक्षक कोट असलेले राहण्याजोगे घर अशा सोप्या शब्दांत गढीची व्याख्या करता येते. ही गढी सर्व सोयींयुक्त असे. गढीमध्ये राहणाऱ्या व्यक्तीचे महत्त्व व त्यांच्याकडे असलेली संपत्ती यानुसार गढीचा आकार व ताकद ठरत असे. त्याच्या भौगोलिक रचनेनुसार त्याची मजबूती अवलंबून असे.[१]

मराठ्यांनी आपल्या राजवटीत अनेक गढ्या बांधल्या. १७ व्या शतकात छत्रपती राजारामाच्या काळापासून जहागिरीची पद्धत पुनरुज्जीवित झाली. त्यामुळे अनेक सरदार उदयास आले. त्यांना दिलेल्या जहागिरीत त्यांनी आपल्या सोयीनुसार गढ्या बांधल्या.[२]

गढी व किल्ला यातील फरक :

गढी हा प्रकार जवळजवळ किल्ल्यासारखाच असतो. परंतु गढी ही प्रामुख्याने सरदारांचे निवासस्थान असते. त्यामुळे त्यामध्ये राहणाऱ्या उच्च व्यक्तीला राहावयास योग्य अशा नागरी सुविधा त्यामध्ये निर्माण केलेल्या दिसून येतात. गढीच्या संरक्षणासाठी बाहेरच्या बाजूला किल्ल्याप्रमाणेच उंच दगडी भिंत. काही वेळा विटाची तटबंदी, खंदक व भक्कम दरवाजे बांधलेले असतात. गढीचा मुख्य उद्देश जरी निवासस्थानासाठी असला तरी प्रत्यक्षात गढीचा बाह्यदेखावा एखाद्या किल्ल्याप्रमाणे वाटतो.[३] गढीचा आकार व तिची शक्ती ही तिच्या धन्याच्या सामर्थ्यावर अवलंबून असते. ज्यावेळी एखादा सामर्थ्यवान धनी गढी बांधतो तेव्हा या गढीचे स्वरूप एखाद्या किल्ल्याप्रमाणे भासते.

उदा. शनिवारवाडा सुद्धा एक गढीच आहे. परंतु पेशव्यांनी त्यांचे उत्तम प्रकारे बांधकाम केल्याने त्याला किल्ल्याचे स्वरूप प्राप्त झाले.

तर किल्ला हा टेहळणी नाका असतो व सैनिकी डावपेचाच्या दृष्टीने बांधलेला असतो. एखादा महामार्ग, महत्त्वाचे शहर, गाव किंवा विस्तारित मैदान किल्ल्याच्या अधिकारात येते. तेथून किल्ल्याचा अधिकारी भोवतालच्या परिसरावर नियंत्रण ठेवतो. किल्ल्यामध्ये राहण्यासाठी घरांना

नेहमीच दुय्यम स्थान दिले जाई. किल्ल्यामध्ये शिबंदी जेमतेम ठेवता येईल अशा स्वरुपाची घरे असतात. किल्ला हा संपूर्णपणे संरक्षणाच्या दृष्टीने व लष्करी हेतूनेच बांधलेला असतो. त्यामध्ये संरक्षणाची व्यवस्थाच ही तेथील मुख्य बाब असते. तटबंदी, बुरूज, दरवाजे, पाणीपुरवठा इत्यादींना महत्त्व असते.[४]

थोडक्यात गढी व किल्ला यांच्या रचनेमध्ये व कार्यामध्ये मुलभूत फरक आहे.

मुस्लिमांचे भारतात आगमन झाल्यानंतर युद्धपद्धती, युद्धतंत्र व संरक्षण तंत्रात झपाट्याने बदल होऊ लागले. मध्ययुगीन भारतातील तटबंदी ही प्रामुख्याने सैनिकी स्थापत्य स्वरुपाची असून संरक्षणदृष्ट्या त्याची वेगळी रचना पाहून शत्रूवरही दडपण येत असे. तटबंदीचे विविध प्रकार, वैशिष्ट्यपूर्ण बुरूज, प्रवेशद्वाराची रचना, नागमोडी द्वारमार्ग, विशिष्ट ठिकाणी असलेल्या जंग्या ही तत्कालीन दुर्गरचनेची वैशिष्ट्ये होत.[५] मध्ययुगीन काळात संपूर्ण गावाला तटबंदी असे. त्याचबरोबर गावातील महत्त्वाच्या व्यक्तीच्या राहत्या वास्तूलाही तटबंदी असे. संरक्षणासाठी अशा तटबंदीची गरज भासत असे. जेव्हा गुन्हेगारीचे प्रमाण वाढले तेव्हा संरक्षणाची आवश्यकता वाढत गेली. सर्वच ठिकाणी लष्करी व्यवस्था निर्माण करणे अशक्य झाले. तेव्हा त्या गावातील प्रमुख व्यक्तींनी गढीची उभारणी केली. महाराष्ट्रात सर्वत्र असणाऱ्या गढ्या व वाडे हे याचे उत्तम उदाहरण आहे.[६]

विशेषत: पहिला बाजीराव व नानासाहेब यांच्या कारकीर्दीत जहागिरी व जहागिरदार यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली. जहागिरदारांची वाढ झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात लोकांना खेडी व शहरे यामध्ये रस निर्माण झाला. तसेच सोयीच्या दृष्टीने एखादे ठिकाण ताब्यात असण्याची आवश्यकता भासू लागली. त्यामधून अनेक गढ्या निर्माण झाल्या. उदा. दरेकरांची दरेवाडीची गढी किंवा रांझ्याची देशपांड्यांची गढी.[७]

गढीचे उपयोजन :

गढीमध्ये मराठा सरदार हा स्वत:च्या संरक्षणासाठी विविध प्रकारची साधनसामग्री ठेवीत असत. मराठ्यांनी आपल्या सरहद्दीवर काही सरदारांना स्वतंत्रपणे जहागिरी देवून सरहद्दीच्या

संरक्षणासाठी गढ्या निर्माण केल्या. अशा गढ्यांमध्ये पटवर्धनांच्या तासगाव सांगली येथील गढ्या विशेष लक्षणीय आहेत. गढीमध्ये निवासस्थान हे जरी मुख्य असले तरी त्यामध्ये जहागिरीच्या प्रशासनाची व लष्करविषयक अनेक कामे केली जात असत. काही वेळा गढीला आधुनिक स्वरूपही प्राप्त झाल्याचे दिसून येते. गढीचा ज्याप्रमाणे राज्याच्या संरक्षणासाठी उपयोग होत असे. त्याचप्रमाणे एखाद्या सरदाराला छत्रपतीं विरुद्ध कारस्थाने करण्यास गढीचा उपयोग होत असे.[८]

छत्रपती शाहू महाराजांना सरदारांनी गढी बांधणे ही कल्पना मान्य नव्हती. इतकेच नव्हे तर शहराभोवती तटबंदी करण्याबद्दल सुद्धा शाहू महाराज अनुकूल नव्हते. याचा अर्थ एवढाच की, गढीचा वापर हा त्या सरदाराच्या राजाविषयी वाटणाऱ्या निष्ठेवर अवलंबून असे. महाराष्ट्रात शिवपूर्व काळात आदिलशाही आणि निजामशाही राजवटीमध्ये अनेक जहागिरदारांनी आपल्या संरक्षणाच्या दृष्टीने गढ्यांची उभारणी केली. गढी म्हणजे छोटासा किल्लाच असल्याने त्यावर जहागिरदारांची पूर्ण सत्ता असे.[९]

धामधुमीच्या काळात हे जहागिरदार संस्थानिकाप्रमाणे स्वतंत्र वृत्तीने वागत. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेचा उपक्रम हातात घेतल्यावर अनेक जहागिरदारांनी महाराजांच्या मार्गात अडथळे आणण्याचा प्रयत्न सुरू केला. या जहागिरदारांचे सामर्थ्य गढ्यामध्ये आहे हे शिवाजी राजांनी ओळखले. म्हणून जहागिरदारांनी वाडे/हुडे बांधू नये असा फतवा त्यांनी काढला. त्यांच्या धोरणांविषयी सभासद लिहितो, मिरासदार पैकेकरी होऊन गावास हुडे, वाडे, कोट बांधून प्यादे बंदुकी ठेवून बळकाविले... त्यास राजियाने देश काबीज करुन हुडे, वाडे, कोट पाडिले... जमिनदारांनी वाडा, बुरुजाचा बांधू नये, घर बांधूनी रहावे ऐसा मुलकाचा बंद केली.[१०]

दक्षिणेत मुघलाचे वर्चस्व निर्माण झाल्यावर औरंगजेबाच्या काळात त्याच्या लष्करी डावपेचातील महत्त्वाचा घटक म्हणजे एखादा प्रदेश ताब्यात आला की, त्याच्या बंदोबस्तासाठी मुघल सरदार तेथे लष्करी ठाणी कायम करीत. ठाण्यात पडकी गढी असल्यास ती दुरुस्त करीत नसल्यास नवीन बांधून काढीत. पुढे छत्रपती राजारामांच्या काळात वतन व्यवस्थेमुळे गढ्यांची निर्मिती होऊ लागली. पेशव्यांच्या काळात हीच परिस्थिती कायम होती. गढीमध्ये लपून राहण्याच्या सरदार उमराव यांच्या वृत्तीचा छत्रपती शाहूंनी धिक्कार कला. पेशव्यांची गढी

शनिवारवाडा बांधताना त्यांनी तीव्र आक्षेप घेतला होता. त्यांची विशेष परवानगी घेवूनच शनिवारवाड्याचे बांधकाम पूर्ण करण्यात आले.[११]

गढीची वैशिष्ट्ये :

गढीची बाह्यरचना :

आराखडा :

गढ्यांचे सूक्ष्म निरीक्षण व अभ्यास केला असता त्यामध्ये तिच्या बांधणीचा आराखडा स्पष्ट होतो. एक विशिष्ट प्रकारचा आराखडा गढ्यांना आहे. त्या बहुतेक करून चौकोनी किंवा समचतुष्कोनी आढळून येतात. त्यांच्या बंदोबस्तासाठी किंवा संरक्षणासाठी तटबंदी दिसून येते. सासवड व पुणे येथील गढ्या चौकोनी आहेत. त्या आकाराने लहान आहेत तर कराड, रांझे व दरेवाडी येथील गढ्या समनुष्कोनी असून त्या मोठ्या आहेत. कधी कधी गढीचे बांधकाम हे लष्करी हेतूने जास्त नसून ते सरदाराच्या मोठेपणाचे प्रतिक होते.[१२]

गढीची तटबंदी :

गढी बंदिस्त असे. त्यासाठी गढीच्या बाहेरील बाजूने मजबूत भिंत बांधलेली असे, तिलाच तटबंदी म्हणत. ही तटबंदी विटा, माती, दगडांच्या सहाय्याने उभारली जाई. तटबंदीची उंची साधारणपणे ४० फुटापर्यंत तर काही ठिकाणी कमी–जास्त आढळते. तटावर गस्तीसाठी पहारेकऱ्याला फिरण्यासाठी तटाची उंची रुंद ठेवली जाई. (उदा. दावणगाव व कटखेली, ता. उदगीर) शिरूर अनंतपाळ येथे १९ फूट रुंद आहे. तटबंदीला वापरलेल्या विटावर भूमितीतील विविध आकृत्या काढलेल्या असत. तटबंदीला ठिकठिकाणी जंग्या ठेवलेल्या असत. या जंग्यामधून गढीवर आक्रमण करणाऱ्या शत्रू सैनिकावर बाण व तोफा डागण्याची व्यवस्था केली जात असे. तटबंदीजवळ कमीत कमी ३०० फुटापर्यंत शत्रू येणार नाही, अशी योजना असे.[१३]

गढीचे बुरूज :

गढीचे वैशिष्ट्य म्हणजे तिला असणारे बुरुज. गढीला असणाऱ्या बुरूजाचा उपयोग गढीच्या संरक्षणासाठी होतो. पुणे व सासवड येथील गढीच्या भिंतीपासून १०० किंवा अधिक फुटाच्या जागेत तटापासून बाहेरच्या बाजूस पुढे आलेले अर्धगोलाकृती किंवा इतर आकाराचे भरीव बांधकाम म्हणजे बुरूज होय. तटाच्या मानाने याची बांधणी मजबूत आणि माथ्यावर जास्त मोकळी औरस–चौरस जागा असे. तटाजवळ येऊन भिडणाऱ्या सैनिकांवर शस्त्रांस्त्रांचा मारा करता येई. तोफा, तोफेसाठी लागणारा दारुगोळा व इतर सामान, तोफ उडविणारे सैनिक यांना सामावून घेतले जाई. बुरुजांचा आकार अर्धगोलाकृती, चौकोनी, षटकोनी किंवा अष्टकोनी असत. सासवडच्या गढीच्या प्रवेशद्वारास दोन्ही बाजूस एक–एक असे दोन बुरुज आहेत. त्याला जंग्या आहेत.[१४]

गढीचे प्रवेशद्वार :

गढीच्या प्रवेशद्वारावर वर्चस्व मिळविले की, गढी जिंकल्यातच जमा होई. त्यामुळे प्रवेशद्वार जेवढे मजबूत संरक्षक तेवढी गढीची सुरक्षितता चांगली. घोडेस्वार सहजपणे बसून आत येईल एवढ्या उंचीची प्रवेशद्वारे असत. शक्यतो जाडजूड, मजबूत लाकडी फळ्यांनी, लोखंडी पट्ट्यांनी एकमेकांना जोडून दरवाजा तयार केलेला असे. त्यासाठी टिकाऊ सागवानी किंवा उंबराचे लाकूड वापरले जाई. या दाराच्या पाठीमागे दगडी भिंतीमध्ये आतून अडसर घातली की, दरवाजा बाहेरून उघडणे अशक्यच असे. त्याचबरोबर दरवाजाला कडी–कुलूपेही असत. त्यामुळे असे मोठमोठे दरवाजे उघडणे व लावणे एका व्यक्तीला अशक्य असे. त्यासाठी मोठ्या दरवाजात खालच्या बाजूला एका व्यक्तीला प्रवेश करता येईल असा छोटा दरवाजा असे, त्यास दिंडी दरवाजा म्हणत.[१५]

कोणत्याही गढीला कमीतकमी दोन तरी प्रवेशद्वारे असत. त्यापैकी एक प्रवेशद्वार सामान्यत: उत्तरेकडे असे, त्याला दिल्ली दरवाजा असे म्हणत असत. दुसरे प्रवेशद्वार पूर्वेला असे. प्रवेशद्वारे किती असावीत यासाठी बंधन नव्हते. इतिहासप्रसिद्ध शनिवारवाड्याला पाच प्रवेशद्वारे

होती. तर तासगावच्या गढीला तीन दरवाजे होते. हे दरवाजे उंच व टोकाला निमुळती होत गेलेली असत. काही प्रवेशद्वारामधून हौद्यासह हत्ती जाण्याची व्यवस्था असे. प्रवेशद्वाराच्या दोन्हीही बाजूस पहारेकऱ्यांच्या खोल्या असून त्या खोल्या दगडी असत. प्रवेशद्वारावर नगारखाना असे. या नगारखान्याच्या दर्शनी भागावर विविध प्रकारची नक्षी काढलेली असे. प्रवेशद्वारावर शत्रूचा हल्ला होणार नाही याची सर्वतोपरी काळजी घेतली जात असे. प्रवेशद्वाराच्या आतल्या बाजूला लाकडी तक्तपोशी केलेली असे.[१६]

जंगी :

जंगी म्हणजे तटातून खाली बंदुकीचा मारा करण्यासाठी ठेवलेले छिद्र असून ते खालच्या बाजूस तिरकस असे. त्यातूनच बंदूकीने मारा करता येत असे. ज्या गढीला दगडी तटबंदी आहे. अशा ठिकाणी याचा उपयोग अधिक होत असे.[१७]

आंतररचना :

धान्य कोठारे :

गढीमध्ये प्रामुख्याने वतनदार रहात असत. ज्या वतनदारांचे उत्पन्न जास्त किंवा जमा होणारा महसूल धान्याच्या रुपात असेल तर गढीमध्ये लादण्यांची किंवा तळघरांची संख्या जास्त दिसते.[१८]

टेहळणीची जागा :

टेहळणीची जागा म्हणजे गढीतील सर्वात उंच ठिकाण. अशा जागेवरून संपूर्ण गढी किंवा गाव दृष्टिक्षेपात येते. उदा. वडवळ, जि. लातूर.

पाणीपुरवठा :

किल्ल्याप्रमाणे गढीचा सुद्धा सतत संरक्षणासाठी उपयोग होत असे. गढीभोवती शत्रूचा वेढा कधी, व किती काळ पडेल हे सांगता येत नसे. अशा स्थितीत लोकांना पाणीपुरवठा अव्याहत चालू राहण्यासाठी कायम स्वरुपाची काहीतरी व्यवस्था करावी लागत असे. त्यासाठी गढीमध्येही विहिरी खोदल्या जात. ज्या गढीत पाण्याची सोय नसे ती गढी परिपूर्ण नसे. गढीवर पुरेसे अन्नधान्य, रसद, शस्त्र, दारुगोळा व गोड्या पाण्याचा खात्रीशीर स्त्रोत असणे आवश्यक असते. काही वेळा गढीच्या बाहेरून पाटाचे पाणी नेले जात असे. शनिवारवाड्याला कात्रजच्या घाटातून नळांद्वारे पाणी नेले होते. पाणीपुरवठ्याच्या सोयीअभावी शत्रूला तोंड देणे शक्य नसते. १६६५ मध्ये कर्नाटकचा सुभेदार सय्यद कासीम खान याने दोड्डेरीच्या गढीत आश्रय घेतला होता. रसद न मिळाल्याने उपासमारीमुळे कासीम खानाने आत्महत्या केली व मुघल सैन्य संताजी घोरपडेस शरण आले होते.[१९] त्यामुळे गढीमध्ये अन्नधान्य व पाणीपुरवठ्याच्या बाबतीत लक्ष दिले जात असे.

गढीचे स्वरूप व वैशिष्ट्ये :

गढी हे गावातील एका महत्त्वाच्या व्यक्तिचे राहण्याचे ठिकाण असल्यामुळे गाव व गढी यांचे नाते रहायचे. गढी बांधण्यासाठी गावाची रचनाही लक्षात घेतली जाई. गावाच्या पश्चिम बाजूला सहसा गढीचे स्थान असायचे. गढीतील लोकांना वारा व हवा मिळावी हा त्यामागचा उद्देश असे. सहसा गढी गावापेक्षा जास्त उंचीच्या ठिकाणी बांधली जायची. काही ठिकाणी कृत्रिम रितीने उंची वाढविली जाई. बहुतेक ठिकाणी गढीतील प्रवेशासाठी चोपेवरून जावे लागे. गढी बनविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मातीच्या विटांना भेंडे म्हणत. गढीची सर्व शक्ती भेंड्यांमध्ये असे. गढीचा पाया भक्कम करण्यासाठी त्यात दगड गोटे भरले जात व भिंतीची रुंदी जास्त ठेवत असत. त्यामुळे भिंतीला तडा जात नसे. गढीचा खालचा १५ फुटांचा भाग दगडाचा ठेवला जाई. त्यामुळे उंचीपर्यंत खिडकी नसायची. शस्त्रांस्त्रांमध्ये झालेल्या बदलांचा परिणाम गढीच्या बांधकामावर होत गेला. त्यामुळे गढीची उंची व रुंदी वाढत गेली. काही ठिकाणी पूर्णपणे दगडी

बांधकामाच्या किल्ल्यासारख्या गढ्या आहेत. (माढा, ता. माढा, जि. सोलापूर) मजबूत तटबंदी, बुरुजावर तोफेसाठी बांधलेले ओटे, तटबंदीच्या बाहेर असणाऱ्या जंग्या अशा प्रकारची व्यवस्था आढळते. तटबंदी असलेले गढीचे आवार चौकोनी किंवा आयताकृती असे. छोट्या गढीचा आकार चौकोनी तर मोठ्या गढीचा आकार आयताकृती असे. पुणे–सासवड येथील गढीचा आकार चौकोनी व कऱ्हाड, जाधववाडी येथील गढ्या आयताकृती आहेत. लष्करीदृष्ट्या कोणत्या गढीचा आकार योग्य असे ठरलेले नव्हते. मुघल काळात बांधकामासाठी बेलदार व अधिकारी वर्गाची नेमणूक केली जात असे.[२०]

दरवाज्याची चौकट :

मध्ययुगीन कालखंडातील इतर कलाकृतीबरोबरच गढीच्या आतील खोल्यांना असणारी दारे ही सुद्धा कलात्मकतेने केलेली असत. बहुसंख्य गढी / वाड्याची द्वारे दोन पद्धतीची होती. मुख्य दरवाजा अतिशय मोठा, मजबूत व भक्कम असायचा. परंतु आतील दरवाजा हा लहान असायचा. दर्शनी भागाच्या चौकटीवर नक्षीकाम असायचे.[२१]

घराचे छत (Roof) :

गढीतील घरांच्या छतासाठी लाकडी फळ्या, चुना, माती यांचा उपयोग केला जात असे. लाकडी फळ्यांबरोबर चुनामिश्रीत चिकणमाती वापरून छत तयार केले जाई. त्याला पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी योग्य पद्धतीने उतार दिला जात असे. अशा लाकडी छताला माळवद म्हटले जात असे.[२२]

तळमजला (Flooring) :

काही गढ्या व वाड्यांमध्ये तळमजला आढळून येतो. त्यावरही चिखल, दगड, विटा याद्वारे छत तयार केले जाई. त्यावर लाकडी बांधकाम होत असे.[२३]

नक्षीकाम :

गढी / वाड्यांना सुशोभित करण्यासाठी नक्षीकाम केले जाई. नक्षीकाम हे वाड्यातील / गढीतील खांब, कमान, खिडक्या, चौकटी अशा भागांवर केले जाई.

प्रवेशद्वारातून आत आल्यावर उघडा चौक लागतो. चौकाच्या सभोवताली छताला आधार म्हणून मोठ्या स्तंभांची रचना केलेली असते. मध्ययुगीन काळात लाकडी खांब व तुळई (Beam) नक्षीकामाने सुशोभित केलेली असे. खांब हे भार धारण करणारे असल्यामुळे त्याची बांधणी काळजीपूर्वक केली जात असे. उभ्या खांबावर आडवी तुळई असे. चौकाच्या तिन्ही बाजूंनी छताच्या पुढे येणाऱ्या लाकडी भागावर नक्षीकाम केलेले असे.[२४]

गढीतील / वाड्यातील आतील इमारती :

गढीतील घराची रचना साधारण चौकोनी किंवा आयताकृती असे. चौकास केंद्र समजून त्याभोवती बांधकाम केले जात असे.

चौक :

गढीमध्ये प्रवेशद्वारामधून प्रवेश केला की, आतल्या बाजूस सरळ समोर चौक दिसून येतो. या चौकाच्या तिन्ही बाजूंनी बांधकाम करीत असत. चौकाचे बांधकाम घराच्या उंचीशी सुसंगत असून पायाच्या बाजूने बांधकाम कोरीव दगडाचे असायचे. दगडी बांधकामाचे जोड अतिशय बारीक असायचे. चौकाच्या समोर एक बैठकीची खोली असे. यालाच दिवाणखाना असेही म्हणत. याचा उपयोग स्वागत कक्षासाठी होत असे. दिवाणखान्यात पाठीमागे दोन्ही बाजूंना घरगुती वापरासाठी अनेक खोल्या असायच्या. उदा. स्वयंपाकगृह, देवघर, सारवण खोली, स्त्रीकक्ष, स्नानगृह, इ.[२५]

स्वयंपाकगृह :

दिवाणखान्याच्या सलग किंवा बाजूला स्वयंपाकगृह असायचे. यांच्या भिंती दोन मजली उंचसुद्धा असत. हवेशीर राहण्यासाठी ही सोय असायची. स्वयंपाकगृहावर बांधकाम होत नसे. छताच्या ठिकाणी एक झरोका असे. स्वयंपाकगृहाच्या कोपऱ्यात सांडपाण्याची नाली असे, त्याद्वारे पाणी बाहेर जात असे.[२६]

बैठक / पाया / जोते :

घराचा उद्देश राहण्यासाठी, सुरक्षिततेसाठी असायचा. त्याच्या बांधकामाचे तंत्र म्हणजे प्रचंड विस्तारित भिंती व दरवाजे भक्कम असत. रुंद भिंतीतून खोल पायऱ्या करून त्यावरती भिंतीचे बांधकाम करत. जोत्याच्या बांधकामात प्रकाश येण्यासाठी जोत्याची उंची वाढवलेली असायची. तळघराच्या भिंती घडीव दगडाच्या बांधलेल्या असत. त्या मजबूत व सुशोभित असत.[२७]

जोत्यावरचा दर्शनी भाग :

जोत्यावरच्या पहिल्या मजल्याचे बांधकाम दगडी आणि चुनखडीत किंवा पांढऱ्या मातीच्या चिळलात केले जात असे. बांधकामाच्या मजबूतीसाठी चुना वापरत असत. दगडी बांधकाम कोरीव असे. चुन्याव्यतिरिक्त घडीव दगडाचे बांधकाम उत्कृष्ट समजत. दर्शनी भागाच्या भिंती साधारणपणे ४ फूट रुंदीच्या असत. काही ठिकाणी याची रुंदी कमी–जास्त असे. घरातील आतल्या भिंतींना गिलावा केलेला असे.

वाड्याच्या / गढीच्या दर्शनी भागावरील चौकटीवर आकर्षक बनविण्यासाठी नक्षीकाम कोरण्यात येई. अशा चौकटी इतर भागाच्या मानाने किंचित पुढे आलेला असत.

तसेच वाड्यात उंच व लाकडी नक्षीकामयुक्त कमानी असत. कमानी तीन प्रकारच्या असत. १) छोट्या कमानी, २) मध्यम कमानी, ३) विस्तारित मोठ्या कमानी. कमानी ह्या बैठकीच्या ठिकाणी असत. त्याच्या आकारमानानुसार नक्षीकाम लहानमोठे केले जात असे.[२८]

खिडक्या :

गढी / वाड्यामधील खिडक्या लाकडी व लहान असत. त्याची बांधणी विटामध्ये केलेले असे. तळमजल्याला खिडक्या नसत. जेथे महिलांचा वावर असे तेथे फक्त छोटासा झरोका असे. अती उंचीवरती छोट्या खिडक्या असायच्या. मुख्य प्रवेशद्वारावर खिडकी असे, त्यास झरोकादर्शन या नावाने ओळखले जात असे.

अक्कलकोट येथील फत्तेसिंग भोसले यांची गढी :

अक्कलकोट संस्थानातील फत्तेसिंग भोसले यांची चार बुरुजांची गढी अजूनही उभी आहे. इ.स. १७१२ मध्ये फत्तेसिंग भोसले यांना अक्कलकोट संस्थान मिळाले असले तरी ते शाहूंच्या मृत्यूनंतर राजकारणात निर्माण झालेल्या गोंधळातून बाजूला पडण्यासाठी इ.स. १७४९ मध्ये अक्कलकोट संस्थानात आले. त्यावेळी त्यांनी अक्कलकोट येथे मजबूत व सुंदर गढी बांधली.[२९]

गढीची तटबंदी व बुरूज :

गढीच्या तटबंदीची उंची साधारणपणे चाळीस ते बेचाळीस फूट उंच व पाच ते सहा फूट रुंद आहे. संपूर्ण तटबंदी घडीव दगड व चुना यांनी भक्कम बांधलेली आहे. त्यामुळे ती अजूनही



मजबूत आहे. साधारणपणे पाच ते साडेपाच एकर जागेमध्ये असलेल्या गढीमध्ये अनेक इमारती आहेत. गढीच्या तटबंदीप्रमाणेच गढीचे बुरुजही संपूर्ण घडीव दगडी बांधकामात भक्कम बांधलेले दिसून येतात. गढीच्या चारीही बुरुजावरती वरील बाजूस दगडी गोटपट्टी कोरुन त्यावर फुलांच्या पाकळ्याच्या आकाराचे दगडी नक्षीकाम केल्याने ते आकर्षक दिसतात म्हणजे बांधकामात भक्कमपणाबरोबरच कलात्मकतेचाही विचार केलेला दिसतो. प्रत्येक बुरुजावर जाण्यासाठी दगडी जिना आहे.[३०]

गढीचे प्रवेशद्वार :

गढीला एकूण तीन प्रवेशद्वारे आहेत. मुख्य प्रवेशद्वार पूर्व बाजूस आहे. मुख्य प्रवेशद्वाराचे संपूर्ण बांधकाम चाळीस फूटापर्यंत उंच आहे. त्यातील वरील दहा फुटाचे बांधकामात लाकडी खांब व लोखंडी तुळ्यांचा उपयोग करून झरोका दर्शनासाठी बांधकाम केलेले आहे.

प्रवेशद्वाराला दहा फूट उंचीचा लाकडी दरवाजा आहे. ललाटबिंबावर श्रीगणेश कोरलेला आहे. दरवाजाला दिंडी दरवाजा देखील आहे. दरवाज्याच्या पाठीमागे भक्कम अशी आगळ आहे. संपूर्ण दरवाजा हा चाफाकृती दगडी बांधकामात बसविलेला आहे. मुख्य प्रवेशद्वारा समोरील भागात डाव्या बाजूला काही पडलेल्या खोल्यांचे बांधकाम आहे. कदाचित तेथे प्रशासकीय अधिकारी रहात होते. या गढीचे जोते आठ फूट उंचीचे आहे आणि त्यावर चाळीस फूट उंचीचे भक्कम प्रवेशद्वाराचे बांधकाम आहे. त्यामुळे प्रवेशद्वारापर्यंत जाण्यासाठी एकोणीस दगडी पायऱ्या चढून जावे लागते. या प्रवेशद्वारासमोर दोन्ही बाजूला दोन लोखंडी लँप (दिवे) उभे आहेत. त्यावर नक्षीकाम केलेले दिसून येते. एका खांबावर तीन दिवे लावता येत होते. त्या दिव्यांची उंची दहा फूट आहे. प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला वरच्या मजल्यावर झरोके सोडलेले आहेत. त्यास लाकडी खिडक्या किंवा लोखंडी जाळ्या बसविलेल्या दिसतात.

दुसरे प्रवेशद्वारही पूर्व बाजूस असून साधारणपणे मुख्य प्रवेशद्वारापासून सातशे मीटर अंतरावर आहे. या प्रवेशद्वाराची उंची तीस फूट पर्यंत असून त्यावरील भाग ढासळलेला आहे. प्रवेशद्वाराच्या वरती सुंदर झरोके आहेत. त्यामध्ये लाकडी खांबाचा उपयोग केलेला आहे. लाकडी

प्रवेशद्वाराच्या सागवानी चौकटीच्या ललाटबिंबावर गणेश आहे. प्रवेशद्वारातून प्रवेश केल्यानंतर सुंदर असे दगड, माती व चुन्यामध्ये बांधलेले गणेश मंदिर आहे. गणेश मंदिराला गाभारा असून त्यावर तीन टप्प्यात असलेले शिखर दिसते. शिखराच्या चोहोबाजूंनी देवकोष्टे व प्रत्येक देवकोष्टाला कळस दिसतात आणि या कळसांना तांब्याचे कळस लावलेले आहेत. गाभाऱ्यात दोन गणेशमूर्ती आहेत. जुनी तुटलेली मूळ गणेशमूर्ती उजव्या बाजूला दगडी चौथऱ्यावर ठेवलेली असून दुसऱ्या गणेशमूर्तीची स्थापना केलेली दिसते.

गणेश मंदिराच्या सभामंडपात असलेल्या खांबाचे तळखडे मात्र शिल्पक आहेत.

गढीची अंतर्गत रचना :





मुख्य प्रवेशद्वारातून आत प्रवेश केल्यावर डाव्या बाजूला चौकी पहारे आहेत आणि शेजारी आतील चाफाकृती बांधकामातील लाकडी प्रवेशद्वार आहे. हे प्रवेशद्वार सैनिकांसाठी किंवा पहारेकऱ्यांसाठी होते.

मुख्य प्रवेशद्वारातून सरळ पुढे आल्यावर १० पायऱ्यांचा मार्ग आहे. तेथून पुढे गेल्यावर गढीतील मधल्या भागात मोकळी जागा आहे. ती साधारणपणे सहाशे फूट ×

सहाशे फूट (६००× ६००) आहे. त्याच्या डाव्या बाजूला फूलझाडे आहेत. कदाचित याही जागेत बाग असावी असे दिसते. या चौकाच्या तिन्ही बाजूंनी दुमजली इमारती आहेत.

प्रवेशद्वाराच्या कमानीतून आत गेल्यानंतर समोरील बाजूस म्हणजे गढीच्या पश्चिम बाजूस एकमजली दगडी इमारत दिसते. या इमारतीच्या मधोमध दगडी जिना आहे. तेथून वरच्या मजल्यावर आणि टेरेसवर देखील जाता येते. या जिन्याला बाहेरील बाजूंनी रंगीत काचांच्या खिडक्या आहेत. त्या लाकडी चौकडीत बसविलेल्या आहेत. तसेच इमारतीच्या पाठीमागच्या बाजूला खोल्या असून समोरील भाग व्हरांड्यासारखा मोकळा आहे आणि त्यापुढे दगडी चाफाकृती कमानी करून त्यामध्ये लाकडी चौकटीत हवा खेळती राहण्यासाठी खिडक्यांची रचना केलेली आहे. अशा पद्धतीच्या खिडक्यांची रचना आजच्या आधुनिक युगातही केली जाते.



चौकोनी लाकडी चौकटीवर चाफाकृती लाकडी कमान बसवून त्यामध्ये रंगीत काचा व लाकडी पट्ट्या यांचे सुंदर नक्षीकाम केल्यासारखे दिसते.



चुन्याचे नक्षीकाम :

जिन्याच्या एका बाजूला दगडी बांधकाम तर दुसऱ्या बाजूस दगडी बांधकामावरून चुन्याचे नक्षीकाम संपूर्ण जमिनीलगत व पहिल्या मजल्यावरील समोरील भिंतीवर केलेले आहे. भिंतीवरील खालील दोन खिडक्या आणि पहिल्या मजल्यावरील दोन्ही खिडक्यांच्या दोन्ही बाजूंनी

वेलबुट्टीचे आकर्षक नक्षीकाम केलेले दिसते. दोन्ही खिडक्यांदरम्यान स्तंभाचे नक्षीकाम, स्तंभशीर्ष ही सुंदर बनविले आहे. त्यामुळे इमारतीची समोरील बाजू लक्ष वेधून घेते.

गढीमध्ये काटकोनाकृती खोल्यांची रचना केलेली दिसून येते. तळमजल्यावर चौदा खोल्या असून पहिल्या मजल्यावर सोळा खोल्या दिसून येतात. विशेष म्हणजे प्रत्येक खोलीच्या दरवाजे व खिडक्यांच्या वरती विटांची सुंदर कमान दिसून येते. तर पहिल्या मजल्याच्या दरवाजे व खिडक्यांवरती विटांच्या कमानीबरोबरच लाकडाची कमळाकृती बॉर्डर करून मध्ये रंगबिरंगी काचा बसविल्यामुळे इमारतीचे सौंदर्य वाढलेले दिसून येते. तसेच पहिल्या मजल्यावरील बाल्कनीच्या बांधकामात लाकडी स्तंभांचा जास्त वापर केलेला दिसून येतो तसेच बाल्कनीची शोभा वाढविण्यासाठी खालील व वरील बाजूस लाकडाची सुंदर नक्षीकाम केलेली पट्टी बसवलेली आहे. बाल्कनीच्या समोरील बाजूस संरक्षणासाठी सुंदर नक्षीकाम केलेली बिडाच्या पट्ट्या लावलेल्या आहेत. त्यामुळे त्या अजूनही चांगल्या स्थितीत आहेत.

पाणी पुरवठ्याची सोय :

अक्कलकोटची गढी ही नैसर्गिकरित्या सुंदर आहे. गढीच्या पश्चिमेस मोठा तलाव आहे. त्यामुळे तेथून गढीमध्ये पाणी आणले जात असे. तसेच गढीच्या आत आड आहे. या आडातील पाण्याचा उपयोग पिण्यासाठी केला जात होता.

सांडपाणी वाहून जाण्यासाठी दगडी भुयारी गटारांची योजनाही दिसून येते. अक्कलकोटचे राजे फत्तेसिंग भोसले यांचे हत्तीदल, घोडदल सुसज्ज होते. घोड्यांची पागा अजूनही आहे. त्यावेळी ते चांगल्या जातीचे घोडे पाळत असून त्यांच्यासाठी गुळ तसेच इतरही पौष्टीक खाद्य खाऊ घालत असत. वाड्याच्या आतील भागात घोडे बांधण्यासाठीच्या लोखंडी कड्या अजूनही भिंतीला आहेत.





गढीतील अंतर्गत खोल्यांची रचना

मोहोळ येथील देशमुख–गायकवाड यांची गढी :

सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ हे तालुक्याचे ठिकाण आहे. सोलापूर–पुणे हायवेवर सोलापूरच्या दक्षिणेला ३३ किलोमीटर अंतरावर मोहोळ हे गाव लागते. मोहोळमध्ये बाणेश्वर आणि नीलकंठेश्वराची किंवा चंद्रमौळी अशी दोन हेमाडपंती मंदिरे आहेत. वैशाख किंवा एप्रिल–मे महिन्यात येथे मोठी यात्रा भरते. मोहोळचा इतिहास खूप जुना आहे. तेराव्या शतकात हिंदु–मुसलमानांच्या राजकारणात मोहोळ हे सीमेवरील गाव असल्याने याचा त्रास मोहोळला नेहमीच भोगावा लागलेला आहे.[३१]

मध्ययुगीन काळात मोहोळ हा माढा परगण्यातील एक महाल होता. या प्रदेशावर कधी मुसलमानांनी राज्य केले तर कधी मराठ्यांनी राज्य केले. अशा ऐतिहासिक मोहोळमध्ये देशमुख यांच्याकडे वतनदारी होती. मोहोळमध्ये देशमुखांची दोन घराणी आहेत. एक गायकवाड–देशमुख मुळचे मौजे शेटफळ, तालुका–जिल्हा सातारा येथील प्रसिद्ध सरदार गायकवाड घराण्यातील आहेत तर दुसरे देशमुख–वाघमोडे हे धनगर जातीतील आहेत. या दोघांच्याही गढ्या या मोहोळ गावात अजूनही इतिहासाची साक्ष देतात.[३२]

तटबंदी :

या गढीची तटबंदी जमिनीपासून चौदा फुटापर्यंत बांधीव घडीव दगडातील आहे आणि वरील सात ते आठ फूट बांधकाम भाजलेल्या पक्क्या विटांचे आहे. या तटबंदीला पहिल्या मजल्यावरील विटांच्या बांधकामात ठिकठिकाणी झरोके ठेवलेले आहेत. या झरोक्यावर विटांचीच चाफाकृती कमानी आहेत. या झरोक्यांची रुंदी २ फूट असून उंची ५ फूट आहे. तसेच या तटबंदीमध्ये दगडी बांधकाम व विटांचे बांधकाम या मधोमध पाण्याचा निचरा होण्यासाठीचे भिंतीमध्ये दिसून येतात. तटबंदीची लांबी ६०० फूट तर उंची २० फूट आणि रुंदी ६ फूट इतकी आहे. बांधीव दगड, भाजलेल्या विटा आणि माती व चुना वापरून ही तटबंदी बांधलेली दिसते. विटकामाच्या आतल्या बाजूने दगड वापरलेले दिसून येतात.

बुरुज :

या गढीला चार बुरूज होते, त्यापैकी दोन पूर्णपणे नष्ट झालेले असून पश्चिमेकडील दोन बुरूज काही प्रमाणात अस्तित्वात आहेत. हे बुरुजही जमिनीपासून पंधरा फुटापर्यंत बांधीव दगडात असून वरील भागात पूर्णपणे माती दिसते आहे.[३३]

प्रवेशद्वारे :



गढीला एकूण तीन प्रवेशद्वारे होती. उत्तरेला मुख्य प्रवेशद्वार असून त्याची दगडी कमान चाफाकृती भक्कम दिसून येते. दसरे प्रवेशद्वार पश्चिमेला असून ते चौकोनी आकाराच्या दगडी कमानीत आहे. येथील लाकडी दरवाजा नवीन बसविलेला असला तरी चौकट मात्र जुनीच आहे, हे त्यावरील कोरलेल्या काष्ठशिल्पावरुन दिसून येते.



गढीचे मागील प्रवेशद्वार व तटबंदी

गढीचे तिसरे प्रवेशद्वार म्हणजे पश्चिमेला सर्वात छोटे असलेले द्वार होय. ते चार फूट



उंचीचे असून अडचणीच्या काळातच या दरवाजाचा उपयोग केला जात असे. आणीबाणीच्या काळात गढीतून बाहेर पडण्यासाठी ठेवलेला तो मार्ग होता.





गढीचे वैशिष्ट्य म्हणजे दिवाणखान्यातील काष्ठशिल्पे :

या गढीमध्ये जवळजवळ ४८ खांबाचे तळखडे आहेत. त्यापैकी २४ खांब आजही चांगल्या स्थितीत आहेत. सध्या या सागवानी खांबाचा उपयोग करुन नवीन बांधकामात वापरलेले आहेत. हे सात फुट उंचीचे चौकोनी असून स्तंभशीर्षाचा भाग मूळ स्तंभापेक्षा मोठा चौकोनी असून फुलाच्या पाकळ्यांचे नक्षीकाम आहे. या चौकोनी काष्ठशिल्पामधून खांबावर झालर लावल्याप्रमाणे नक्षीकाम दिसून येते. या स्तंभशीर्षाचे तीन कप्पे नक्षीकाम केलेले कप्पे अगदी सुंदर कोरल्याने आकर्षक दिसतात. प्रत्येक कप्प्यातील नक्षीकाम फुलाच्या एकात एक पाकळ्या असल्यासारखे आणि या स्तंभशीर्षाला जणू काही नक्षीदार झालर बांधलेली आहे असे वाटते. प्रत्येक कप्प्याच्या खाली व वर लाकडी गोटपट्टी कोरलेली आहे.

हस्त :



साध्या खांबासोबत येणारे हस्तही साधेच चौकोनी ठोकळे असतात. परंतु दिल्लीशैली किंवा मुघलशैलीतील स्तंभ पाहता त्यामध्ये उलटसुलट कमलपुष्पे व त्यावर

शृंखला कोरलेली असते. हा हस्ताचा सर्वसामान्य प्रकार होय.[३४] तथापि या गढीतील मोहोळ येथील हस्त प्रसिद्ध आहेत, ते त्याच्या वरील मयुराकृतीसाठी या सोबत कमलपुष्पे, लोलक / झुंबर, नक्षीदार साखळी, पिंपळाची पाने, कलश, इ. सुबक कोरलेले आहे.



गढीतील खांबावरील काष्ठशिल्पे



गढीतील तळघरे :

गढीत प्रवेश केल्यानंतर समोर कचेरी नावाची इमारत लागले. ही इमारत ढासळलेली असली तरी त्याखाली असणारी तळघरे अस्तित्वात आहेत. तळघरात जाण्यासाठी जिनाही आहे. तसेच गढीच्या आतील भागातही ४ मोठी तळघरे असून त्यात उतरण्यासाठी दगडी पायऱ्यांचा जिना बांधलेला आहे. ही तळघरे भव्य व प्रशस्त असून त्यामध्ये दोन तळघरात दोन मोठमोठ्या खोल्या बांधलेल्या आहेत. त्यामध्ये पाचशे पोती धान्य साठविण्याची क्षमता आहे.

भुयारी मार्ग :

गढीच्या आतील भागातील तळघरातून दोन भुयारी मार्ग आहेत. त्याची लांबी अनुक्रमे ३ किलोमीटर व २ किलोमीटर आहे. हे भुयारी मार्ग देशमुखांच्या शेतातील वाड्यांमध्ये जाणारे आहेत. संरक्षणाच्या दृष्टीने संकटकालीन मार्ग म्हणून यांचा उपयोग होत असे. परंतु सध्या शेतातील वाडेही पडले आहेत आणि भुयारी मार्गही वापरत नाहीत.

कचेरी :

या गढीत कचेरी नावाची इमारत होती. येथे कार्यालयीन कामकाज, बैठका होत असते. येथूनच लोकांना ७/१२ उतारे देण्याचेही काम चालत असे आणि कचेरी खाली असणाऱ्या तळघरात कैद्यांना डांबून ठेवण्याची व्यवस्था केलेली होती.

मंदिरे :

या गढीत दोन मंदिरे आहेत. गढीच्या उत्तरेला बल्लाळेश्वरांचे मंदिर तर पश्चिमेला नरसोबा मंदिर आहे. या मंदिरात अजूनही वंशपरंपरागत पूजाविधी होते. तसेच तटबंदीच्या बाहेरील बाजूस उत्तरेला मुख्य प्रवेशद्वाराला लागून हनुमान मंदिर आहे. ते शक्तिदेवतेचे प्रतीक म्हणून तिथे स्थापन केलेले आहे.

गढीमध्ये अजूनही पारंपरिक सण व उत्सव एकत्र साजरे केले जातात. नागपंचमी, गवर सारखे सण या गढीमध्ये मोठ्या प्रमाणात साजरे होतात.

बारव :

गढीच्या उत्तरेला हनुमान मंदिराशेजारी बांधीव बारव आहे. यातूनच गढीतील लोकांना पाणीपुरवठा होत असे. मोटेच्या साहाय्याने बारवेतील पाण्याचा उपसा केला जात असे.

ही गढी चौकोनी आकाराची असून बांधकामामध्ये बांधीव दगड, विटा व चुनखडीचा वापर केलेला आहे. ती मराठेकालीन गढी अंदाजे ३०० वर्षापूर्वीची आहे. या गढीसाठी लागणारा दगड कर्नाटकातून आणलेला आहे, हे तेथील लोकांच्या सांगण्यावरून समजते.


पिलीवची किल्लेवजा गढी :

सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील पिलीव हे गाव ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण आहे. पंढरपूर–सातारा रोडवर पंढरपूर पासून ४० किलोमीटर तर सोलापूर पासून ८० किलोमीटर अंतरावर पिलीव हे गाव आहे.[३५]

पूर्वी पिलीव अक्कलकोट संस्थानचा एक भाग होता. पिलीवच्या जहागीरदारांच्या अधिपत्याखाली बारा ते तेरा गावे होती. सन १६९० साली धनाजी जाधव व मोगल सरदार लुत्फुल्लाखान यांची लढाई झाली. या लढाईत मराठा सरदार धनाजी जाधव यांनी अपुऱ्या साधनसामुग्रीनिशी यशस्वी टक्कर दिली. परंतु यामध्ये धनाजी जाधवांना वीर मरण आले व मराठ्यांना माघार घ्यावी लागली.[३६]

अक्कलकोटचे पहिले फत्तेसिंग भोसल्याचा वारसदार म्हणून शहाजी भोसले हे पिलीव घराण्यातून सन १७६० मध्ये अक्कलकोटच्या गादीवर आले. त्यांनी सन १७७७ पर्यंत जहागीरदारीचा कारभार सांभाळला. हैदरअलीने मराठ्याचा शिवाजीच्या वेळचा स्वराज्याचा भाग बळकावून त्रास दिल्याने माधवराव पेशव्याच्या काळात तेथे दरवर्षी लढाया होवून मुलुख सोडवून घेण्याचे कष्ट करावे लागले. हैदरअलीच्या तिसऱ्या स्वारीत अक्कलकोटचे शहाजी भोसले पेशव्यांबरोबर जवळपास दोन वर्षे कर्नाटकात होते. त्यावेळी हैदरबरोबर पेशव्यांच्या झालेल्या लढाईत शहाजी भोसले यांच्या बरोबर पिलीवचे भगवानराव भोसले हेही आपले पन्नास स्वारांचे पथक घेऊन हजर होते. अक्कलकोटचे शहाजी भोसलेंबरोबर पुढे उत्तर हिंदुस्थानात अल्ली बहाद्दरच्या सैन्यात हे भगवानराव भोसले त्यांच्याबरोबर स्वारीत गेले असण्याचा संभव आहे.[३७]

पिलीव येथील जहागीरदार घराण्याची वंशावळ



पिलीव येथील जहागीरदारांची गढी अगदी मजबूत स्थितीत आहे व ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण आहे.

गढीची तटबंदी :

पिलीव येथील जहागीरदारांच्या गढीची तटबंदी अजूनही चांगल्या स्थितीत व भक्कम आहे. दगड व चुन्याचा वापर करुन ही तटबंदी बांधलेली आहे.

गढीच्या बांधकामासाठी वापरण्यात येणाऱ्या चुन्याच्या घाणी अजूनही गढीच्या समोरील बाजूस अस्तित्वात आहेत.



गढीची भक्कम तटबंदी व बुरुज

गढीचे बुरूज :

गढीला एकूण पुढील बाजूस ३ व मागील बाजूस ३ असे ६ बुरूज आहेत. त्यातील दोन बुरुजांवर जाण्यासाठी असलेल्या पायऱ्या ढासळलेल्या आहेत. परंतु इतर बुरुजांवर जाणाऱ्या पायऱ्या चांगल्या स्थितीत असल्याने वर जाता येते. प्रवेशद्वाराच्या बाजूला निशाण बुरूज आहे. तेथे चैत्र पाडव्याच्या दिवशी अजुनही नवीन निशाण चढविले जाते.

बुरुजावरती माची आहेत, तोफा ठेवण्याची जागा आहे. तसेच दोन्ही बुरुजांच्या मध्ये सुद्धा तोफ ठेवण्याची व्यवस्था केलेली आहे. तेथे अजुनही तोफेचे अवशेष शिल्लक आहेत. पूर्ण तटबंदीला संरक्षणाच्या दृष्टीने समोरील शत्रुंवर हल्ला करता येण्यासाठी जंग्या ठेवलेले आहेत. बुरूजाचे बांधकाम दगडी असून भक्कम अवस्थेत आहे. तटबंदीच्या भिंतीत व बुरूजांवरती ठिकठिकाणी जंग्या आहेत. आजही हे बुरूज चांगल्या स्थितीत आहेत. बुरूजांवर वेळोवेळी डागडुजी केल्याचे बांधकामावरुन दिसून येते.[३८]



गढीचे प्रवेशद्वार :

गढीचे प्रवेशद्वार चांगल्या स्थितीत आहे. प्रवेशद्वारावर कमान दिसून येते. प्रवेशद्वाराचा

दरवाजा हा अलीकडील काळात बदललेला दिसून येतो. ते गजपृष्ठाकृती आहे. प्रवेशद्वार साधारणपणे १० फूट उंच आहे. मुख्य प्रवेशद्वारातून आत गेल्यानंतर दोन प्रवेशद्वार दिसून येतात. परंतु सध्या एक प्रवेशद्वर चांगल्या स्थितीत आहे. डावीकडील प्रवेशद्वारातून आत गेल्यावर तेथे जहागीरदारांचे वंशज राहतात. सध्या गढीमध्ये जहागीरदारांची चार कुटुंबे राहत आहेत. तर उजवीकडील प्रवेशद्वाराद्वारे पाण्याच्या अष्टकोनी विहिरीकडे जाता येते. परंतु तो भाग सध्या वापरात नाही.

गढीतील ऐतिहासिक शस्त्रास्त्रे :

गढीमध्ये सध्या रहात असलेल्या जहागीरदार कुटुंबाकडे भाल्यांची टोके, तसेच ढाली, तलवारी आहेत. तसेच इंग्रजांच्या काळातील दोन पिस्तुले आहेत. जहागीरदारांच्या म्हणण्याप्रमाणे गढीतील सर्व शस्त्रे ही अक्कलकोट येथील शस्त्रास्त्रे संग्रहालयात ठेवण्यात आलेली आहेत.









म्हसोबा मंदिर :

गढीच्या पश्चिमेकडील बुरुजाजवळ बाहेरील बाजूस म्हसोबाचे मंदिर आहे. गढीचा बुरूज चढत नव्हता. तेव्हा म्हसोबा स्वप्नात आल्याने लोटेवाडीच्या म्हसोबाचे स्थान म्हणून तेथे मंदिर उभे करण्यात आले. आज तो नवसाला पावणारा म्हसोबा म्हणून ओळखला जातो व नित्यनियमाने पूजाअर्चा केली जाते.

बारव :

गढीमध्ये पाणी पुरवठ्यासाठी निर्माण केलेली उल्लेखनीय अशी एक अष्टकोनी बारव



आहे. अशी वैशिष्ट्यपूर्ण बारव क्वचितच पाहायला मिळते. विहिरीकडे जाण्याचा मार्ग व विहिरीचे बांधकाम अगदी सुव्यवस्थित आहे. त्यामुळे विहिरीच्या मार्गाने अगदी तळापर्यंत जाता येते. बारव सध्या गाळ साचल्याने कोरडी आहे.

गढीतील लोकांना अगदी व्यवस्थित पाणी पुरवठा या विहिरीद्वारे होत असे. विहिरीला जाणाऱ्या मार्गातून ठिकठिकाणी मोठमोठे कमानयुक्त कोनाडे आहेत. साधारणपणे ६० ते ७० पायऱ्या उतरून आपण विहिरीच्या तळापर्यंत जावू शकतो. विहिरीचे संपूर्ण अष्टकोनी बांधकाम दगड व चुना वापरून केलेले आहे.[३९]

चुन्याची घाणी :



गढीच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या बाजूला दोन चुन्याच्या घाणी आढळून येतात. या गढीच्या बांधकामासाठी वापरण्यात येणारा चुना हा या ठिकाणी असणाऱ्या चुन्याच्या घाणीतून तयार केला जात असावा.

गढीतील इमारती :

गढीमध्ये सध्या अस्तित्वात असलेल्या इमारतीमध्ये अंबराखाना व शस्त्रागार हे तटबंदीला लागूनच आहेत व सध्या ते बंद केलेले आहे. गढीचा आकार मोठा आहे. साधारणपणे ५.३० ते ६ एकर जागेमध्ये ही गढी बांधलेली आहे. सध्या गढीची विभागणी ही चार बंधूंमध्ये झालेली आहे.[४०]

माढा येथील रावरंभा निंबाळकर यांची किल्लेवजा गढी :

रावरंभा निंबाळकरांच्या कलेचा व शौर्याचा एक उत्कृष्ट नमुना म्हणजे माढा येथील असणारी किल्लेवजा गढी. चार ते पाच एकर जागेत असणारा हा किल्ला इतिहासाची आजही साक्ष देतो आहे.[४१]

बुरूज :-



या किल्ल्याला चार भक्कम बुरूज आहेत. संपूर्ण दगडी बांधकामात असणारे बुरुज त्यावर उगवलेल्या झाडांझुडपांमुळे

दुभंगलेले आहेत. प्रत्येक बुरुजावर जाण्यासाठी आतून जिना आहे. चारही बुरूज सुस्थितीत आहेत. साधारणपणे साठ ते सत्तर फुट उंच असणारे बुरुज पाहून मराठेकालीन बांधकामाच्या मजबूतीची कल्पना येते. सध्या या चारही बुरुजावर जाता येते. बुरुजांचे वैशिष्ट्य ते तळापासून वरती निमुळते होत गेलेले आहेत आणि एकदम वरच्या टोकाला वीटांचे सुंदर नक्षीकाम केलेले आहे. म्हणजे मजबूतीबरोबर कलात्मकतेचाही विचार केलेला दिसून येतो.

तटबंदी :

या किल्ल्याची तटबंदी ही बुरुजांप्रमाणेच उंच व मजबूत आहे. संपूर्ण बांधकाम हे दगडी आहे. तसेच रुंदी पाच ते सहा फूट आहे. सध्याही ही तटबंदी अगदी सुस्थितीत आहे.

प्रवेशद्वार :

येथील किल्ल्याचे मुख्य प्रवेशद्वार दक्षिणेला आहे. हे प्रवेशद्वार चाफाकृती असून ते साधारणपणे वीस फूट उंचीचे आहे. वरील भाग पडलेला आहे. प्रवेशद्वाराचे दोन्ही लाकडी दरवाजे शाबूत आहेत आणि त्याला असणारा दिंडी दरवाजाही आहे. या प्रवेशद्वाराला हत्ती दरवाजा असेही म्हणतात. म्हणजे त्या प्रवेशद्वारातून हत्ती हा माहूताबरोबर आत जावू शकतो. या प्रवेशद्वारावरील असणारा सज्जा ढासळलेला आहे.



दिवाणखाना :

मुख्य प्रवेशद्वारातून आत गेल्यानंतर समोर मोठा दिवाणखाना होता. सध्या या दिवाणखान्याचे जे खांब होते त्या खांबांचे / स्तंभांचे तळखडे फक्त शिल्लक आहेत. ते चौकोनी आकारात अस्तित्वात असल्याने तेथे मोठा हॉल असल्याचे लगेच लक्षात येते. कदाचित त्या तळखड्यावर लाकडी स्तंभ असतील ते नाहीसे झाले असावेत, असे वाटते.

किल्ल्यातील बाहेरील बुरुज व तटबंदी मजबूत आहे. परंतु आतील सर्व भाग ढासळलेला आहे. इ.स. २००५ पर्यंत तिथे शासकिय वसतीगृह चालविले जात होते. परंतु सध्या तिथे काहीही नाही.



गढीच्या आतील भाग

पाणीपुरवठ्याची सोय :



या किल्ल्यात पाण्याच्या सोयीसाठी एक आड आहे. ते दगडी बांधकामात तयार केलेले आहे. तसेच त्या आडाच्या वरच्या बाजूला रहाट लावण्यासाठी एक लांब चपटी शिळा असून तिला एक गोल भोक पाडलेले आहे. त्यावरून येथे रहाटाद्वारे पाणी ओढले जात असल्याचे दिसून येते.[४२]

गजलक्ष्मीची मूर्ती :



या किल्ल्यातील गजलक्ष्मीची दगडी मूर्ती सध्या बाहेरील बाजूस लावलेली आहे. ही मूर्ती म्हणजे समृद्धतेचं प्रतीक मानले जाते. याप्रमाणेच येथे अजूनही काही मूर्ती सापडण्याची शक्यता आहे. या मूर्तीची उंची साधारण एक ते दीड फूट उंच आहे. दोन्ही बाजूला दोन हत्ती असून मध्ये लक्ष्मी पद्मासनात बसलेली आहे. गजलक्ष्मीची ही मूर्ती कलात्मकतेचा उत्कृष्ट नमुना आहे.

कासेगावमधील देशमुखांची गढी :

कासेगावमध्ये असलेले देशमुखांची गढी ही मध्ययुगीन काळात अत्यंत देखणी असावी असे तिचे प्रवेशद्वार पाहिल्यावर वाटते. ४०० वर्षांपूर्वीचे प्रवेशद्वार आजही चांगल्या स्थितीत आहे. त्यावरून बांधकामाच्या भक्कमपणाचा अंदाज येतो. सध्या या गढीचा पाठीमागचा भाग पाडून आत बांधकाम सुरु केले आहे. परंतु आतील ठेवण तशीच स्वरुपात ठेवलेली आहे. या गढीचा विस्तार सरासरी ३० गुठ्यांमध्ये आहे.[४३]

प्रवेशद्वार :



गढीला दोन प्रवेशद्वारे आहेत. उत्तरेला मुख्य प्रवेशद्वार तर दक्षिणेला दुसरे प्रवेशद्वारे होते. दुसरे प्रवेशद्वार आता बंद केले आहे. मुख्य प्रवेशद्वाराच्या दोन्ही

बाजूला दोन डौलदार बुरूज आहेत. या बुरुजावर जाण्यासाठी गढीच्या आतील भागातून जिना आहे.

प्रवेशद्वार भक्कम आहे. लाकडी चौकट ही फार जुनी असून त्यावर गणेश प्रतिमा कोरलेली आहे. तसेच प्रवेशद्वाराच्या वरती दगडी शिळावरही गणेश कोरलेला दिसून येतो. ही गढी वतनदारांच्या राहण्याच्या रुबाबाचे प्रतिनिधित्त्व करताना दिसते.



प्रवेशद्वारातून आत प्रवेश केल्यानंतर दोन्ही बाजूला मोठ्या ओसऱ्या आहेत. तिथे परगण्यात खास लोकांच्या बैठका होत असत. तसेच पंढरपुरात विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या कारभाराच्या बैठका अजूनही तिथे होतात. पंढरपूरमध्ये होणाऱ्या रथयात्रेचा मान आजही या देशमुख घराण्याला आहे.

भिंतीची जाडी :

प्रवेशद्वार व तटबंदीच्या भिंतीची रुंदी ही ४ फूट पर्यंत आहे. त्यामुळे आजही ही तटबंदी व प्रवेशद्वार दिमाखात उभे आहे. प्रवेशद्वारावरील वरच्या मजल्यात जाण्यासाठी दोन्ही बाजूंनी दोन अरुंद दगडी जिने चांगल्या अवस्थेत आहेत. वरच्या बाजूला दोन्हीकडे व दरवाज्यावरती असे तीन झरोखे दिसून येतात.

घोडयांची पागा :

मुख्य प्रवेशद्वारातून प्रवेश केल्यावर ओसरी लागते व त्यानंतर आतमध्ये घोड्यांची मोठी पागा दिसून येते. घोड्यांना बांधण्यासाठी वापरलेल्या कड्या अजूनही आहेत. आतील प्रवेशद्वार हे मुख्य प्रवेशद्वारापेक्षा लहान असून त्यातून प्रवेश केल्यानंतर आत मोठा चौकोन दिसून येतो. ही गढी दोन मजली होती, हे उंच भिंतीवर असलेल्या दरवाजे व खिडक्यावरुन दिसून येते.

अंबरखाना :

आतील प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला तळघरे आहेत. त्याचा धान्य साठवण्यासाठी उपयोग होत होता. सध्या ते बंद आहेत. अंबरखान्याला दोन छोटे लाकडी दरवाजे आहेत.



गढीमध्ये असलेली मूर्ती :–

सध्या गढीमध्ये जुन्या दोन मूर्ती आहेत. एक शेषशाही विष्णू व दुसरी कृष्णाची आहे. त्या तांब्याच्या आहेत. त्यांची परंपरागतरित्या पूजा होते.[४४]





तलवारी व शिक्के :

कासेगाव परगणा मोठा होता. त्यामुळे गढी मालकाकडे कासेगांव परगण्यातील प्रशासनासाठी लष्करही असे. सध्याही त्यांच्याकडे जतन केलेल्या तलवारी आज अस्तित्वात आहेत. तसेच प्रशासनातील सर्व कारभार त्यांच्या अधिकाराखाली असल्याने त्यांच्या नावाचे शिक्केही त्यांच्याकडे आहेत.







गढीचा आतील भाग

मंदिर :

गढीमध्ये कालिकादेवीचे मंदिर आहे. त्याची परंपरागत पूजा केली जाते.

पाणीपुरवठ्याची सोय :

गढीमध्ये पश्चिमेला आड आहे. त्यातून पाणीपुरवठ्याची सोय होते. तसेच पाण्याचा निचरा होण्यासाठी भुयारी गटारेदेखील होते. ते पाणी त्यातून गावाच्या बाहेर सोडले जाई.

सध्या गढीमालकाकडे २५० एकर शेतजमीन आहे. आजही त्यांना गावात मोठा मान आहे. पंढरपूरच्या यात्रेत मान आहे. कासेगावमधून पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरापर्यंत भुयारी मार्ग असल्याचे ते सांगतात.

मराठेकालीन वारसा असलेली कासेगावची गढी अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहे. या गढीमध्ये असणारे शिक्के, मोडी कागदपत्रे, शस्त्रास्त्रे हे इतिहासाचा पुरावा देतात. वास्तूशास्त्राच्या दृष्टीकोनातून गढीचे बांधकाम आकर्षक आहे. ही गढी देशमुखांच्या वास्तव्यासाठी बांधलेली होती. यामध्ये पंढरपूरच्या विठ्ठलमंदिरा संदर्भात असलेली कामकाजे व बैठका होत असत. आजही तो वारसा परंपरेने चालू आहे.

मंगळवेढा येथील गढी :

सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा हे तालुक्याचे ठिकाण आहे. मंगळवेढा तालुका सोलापूरच्या पश्चिमेला पंच्चावन्न किलोमीटर अंतरावर असून पंढरपूरपासून दक्षिणेला पंचवीस किलोमीटर अंतरावर आहे. मंगळवेढा येथील ज्वारी संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे.[४५]

मंगळवेढ्याला संतांची भूमी म्हटले जाते. संत दामाजी, संत कान्होपात्रा, संत चोखामेळा यासारखे महान संत मंगळवेढ्यात होऊन गेले. चौदाव्या शतकात मंगळवेढ्याला संत दामाजी, संत चोखामेळा, संत गाडगेबाबा, संत गोपाबाई, संत कान्होपात्रा, श्री स्वामी समर्थ आणि श्री सीताराम महाराज यांसारख्या संतांचा सहवास लाभलेला असल्याने ही भूमी पावनभूमी समजली जाते.

मंगळवेढे येथील गढीवजा किल्ला हा साधारण सात ते आठ एकर जागेमध्ये आहे. सध्या या किल्ल्यात तहसील कार्यालय आहे. किल्ल्याच्या आतली बांधकामे नवीन बांधलेली आहेत. किल्ल्याची तटबंदी व बुरुज बऱ्यापैकी उभे आहेत.[४६]

प्रवेशद्वारे :

मंगळवेढे येथील गढीला एकूण चार प्रवेशद्वारे चारी बाजूला होती. परंतु सध्या पूर्वेकडील आणि दक्षिणेकडील प्रवेशद्वारे अस्तित्वात असून बाकी दोन्ही दगडी बांधकाम करून बंद केलेली आढळून येतात.

गढीचे मुख्य प्रवेशद्वार पूर्वेला असून ते बऱ्यापैकी शिल्लक आहे. ते साधारणपणे वीस फूट उंचीचे असून प्रवेशद्वाराच्या भिंतीची जाडी सात ते आठ फूट असल्याने ते भक्कम आहे.

तटबंदी :

मंगळवेढे येथील किल्लेवजा गढीची तटबंदीची उंची साधारणपणे वीस फूटापर्यंत अस्तित्वात आहे. या तटबंदीचे दोन थर वेगवेगळ्या काळात तटबंदीचे बांधकाम किंवा दुरुस्ती झाल्याचे दर्शविते. या तटबंदीच्या बांधकामात दगड आणि मातीचा वापर करुन भक्कमपणा आणलेला आहे. तटबंदीची रुंदी पाच ते सहा फुटापर्यंत असल्याने साहजिक या तटबंदीवरुन सैनिकांना पहारा देता येत असावा. उभे–आडवे दगड वापरून तटबंदीचे बांधकाम केलेले आहे.



बुरूज :



किल्ल्याला किंवा गढीला असणारे बुरुज हे किल्ल्याचा किंवा गढीचा भक्कमपणा दर्शवितात. मंगळवेढे येथील गढीला चार बुरूज आहेत. या बुरूजांची उंची साधारणपणे पंचावन्न ते साठ फूटापर्यंत असून बुरूजाचा पंधरा फूटापर्यंतचा भाग उभे–आडवे दगड वापरुन बांधलेला आहे. त्यावरील संपूर्ण बांधकाम माती व वीटांनी पूर्ण केलेले दिसते. गढीच्या चारही बुरूजांचा वरील भाग ढासळलेला आहे. वरती फक्त मातीचे ढिगारे दिसतात.

बुरूजांचे वैशिष्ट्य :

मंगळवेढे येथील गढीला असणाऱ्या बुरुजांचे वैशिष्ट्य म्हणजे या प्रत्येक बुरुजावरून पाण्याचा निचरा होण्यासाठी पन्हाळी केलेली दिसतात, जे इतर बुरुजावर दिसत नाही.

बारव :



या किल्लेवजा गढीमध्ये चौकोनी आकाराची दगडी बांधकामात बांधलेली बांधीव बारव आहे. या बारवेचा गढीतील लोकांसाठी पाणीपुरवठा होत असे.[४७] यास तळापर्यंत पायऱ्या आहेत. तसेच

वरती रहाट बसविलेला असल्याने त्याद्वारेही पाणी काढता येते. या बारवेच्या बाजूला रहाटाजवळ एक छोटा दगडी हौद आहे. यामध्ये रहाटातून काढलेले पाणी साठविले जात असावे.

गणेश मंदिर :

गढीच्या पश्चिमेच्या प्रवेशद्वाराच्या आतील बाजूस गणेश मंदिर आहे.

भुयारी मार्ग :

गढीतील गणेश मंदिर आणि बारव यांना जोडणारा भुयारी मार्ग या गढीमध्ये होता. आडातून पाणी घेऊन मंदिरात पूजेला जाण्यासाठी हा मार्ग वापरला जात होता, तो साधारणपणे चारशे ते पाचशे मीटरपर्यंत होता.

गढीमध्ये आढळलेल्या इतर मूर्ती :



मंगळवेढे येथील गढीमध्ये आतील बांधकामे अस्तित्वात नसली तरी काही अवशेष इतिहासाची, कलात्मकतेची साक्ष देतात. तेथे सध्या जे तुळशी वृंदावन केलेले आहे, त्याचा खालचा भाग हा एखाद्या मंदिराच्या स्तंभासारखा दिसतो. तो स्तंभ अतिशय कलात्मकतेने बनविलेला आहे. अशा स्वरुपाचे कलात्मक दगड गढीच्या बुरुजामध्ये आणि तटबंदीच्या बांधकामामध्येही आढळून येतात. यावरुन तेथे एक मंदिर भग्न झालेले असावे. त्यातील दगडी शिळांचा उपयोग गढीची दुरुस्ती करताना वापरले असावेत असे वाटते. त्या तुळशीवृंदावनाजवळ एक सतीबिरगळ व दगडी मूर्ती आहे. ती ध्यानस्थ अवस्थेत पद्मासनात आहे. तसेच तीन नागदेवतेच्या दगडी प्रतिमाही आहेत.

गढीच्या पश्चिमेकडील भिंतीला लागून एक चौकोनी दगडी पाया असलेला भाग दिसतो. कदाचित तिथे मंदिर असण्याची शक्यता आहे. तेथे सप्तमातृकापट्ट देखील आहे.[४८]



नागशिल्पे



सप्तमातृकापट्ट

बार्शी येथील देशपांडे यांची गढी :

सोलापूर जिल्ह्यातील बार्शी हे गाव तालुक्याचे ठिकाण आहे. सोलापूरपासून नव्वद किलोमीटर अंतरावर असलेले बार्शी हे गाव मध्ययुगात परगणा म्हणून होते. तसेच बार्शी हे भगवंताच्या मंदिरामुळे साऱ्या महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. येथेच भगवंताच्या मंदिराच्या शेजारीही एक ऐतिहासिक गढी आहे.[४९]

ऐतिहासिक पार्श्वभूमी :

परगणे बार्शीची जहागिर मुधोजी नाईक आणि कृष्णाजी नाईक निंबाळकर यांजकडे चालत आलेली होती. परंतु ती निंबाळकरांकडून बहिरोरान याने बार्शी घेतल्याची तक्रार पेशव्यांकडे केलेली होती. या बहिरोरान याने बार्शी परगण्यातील मौजे बावी, मौजे सौंदरे, तांदुळवाडी व शेलगाव ही चार ठाणी घेतली होती. परंतु पेशव्यांनी १७४६-४७ साली बावीच्या ठाण्याखेरीज बाकीची ठाणी निंबाळकरांना परत करण्याचा हुकूम दिला होता. हा बहिरोरान करकंबचा ठाणेदार होता. तसेच राक्षभुवनच्या लढाईच्या वेळी माधवराव पेशवा निजामाकडे जात असताना वाटेत जो मोगलांचा मुलुख लुटीत नासधूस करीत जाता होता त्याने बार्शी, पानगाव, काटी, मार्डी या

परगण्याची खराबी फार केली. एप्रिल १७६३ मध्ये माधवराव निजामाच्या मुलकात नासधूस करीत होता. हा सारा मुलुख त्यावेळी पीकपाणी चांगले आले असल्याने सुखी होता. परंतु पेशव्यांनी या भागाची वाताहात केली.[५०]

माधवराव पेशवे ज्यावेळेस हैदर अलीवरील पहिल्या स्वारीसाठी निघाले होते त्यावेळेस राघोबा नाशिककडे होते. पेशव्यांच्या माघारी राघोबा काही कटकारस्थाने करतील या भितीने पेशव्यांनी राघोबाला त्यांच्याकडे कर्नाटकात बोलावले. त्यावेळी परत जात असताना राघोबाचा मुक्काम १७ डिसेंबर १७६४ रोजी भुईज पिंपरी म्हणजेच आजची बार्शी येथे होता. त्यावेळी बार्शी पानगाव हे निंबाळकरांच्या जहागिरीचे मालक होते. या महालातून राघोबा पेशव्याने घासदाणा म्हणून पावणेतीन लाखांची खंडणी निंबाळकरांकडून घेतली. राघोबाचे मनात यावेळी निजामाच्या मदतीची काही अपेक्षा होती. परंतु तो नंतर निजामाकडे वळला.

सन १७९५ मध्ये ज्यावेळी पेशवे आणि निजाम यांच्यात खर्ड्याची लढाई झाली त्यावेळी खर्ड्याकडे जाताना निजामाच्या सैन्याने बार्शीची पेठ लुटून जाळपोळ करुन नासधूस केली होती. तसेच औरंगजेब बादशहाच्या काळातही बार्शीचे भगवंताचे मंदिर पवित्र मंदिर म्हणून प्रसिद्ध होते.

बार्शीमध्ये भगवंत मंदिराच्या शेजारी निंबाळकरांची गढी होती. सध्या ती देशपांडे यांच्याकडे आहे. ही गढी दोन ते तीन एकर जागेमध्ये आहे. देशपांडे यांच्या अगोदर ही गढी कृष्णाजी रामचंद्र जोशी यांच्याकडे होती. त्यानंतर त्यांनी गढीचा काही भाग विष्णू माधव देशपांडे यांना विकला. बार्शीच्या या गढीचे वैशिष्ट्य म्हणजे या गढीवर मुस्लीम वास्तूकलेचा प्रभाव जाणवतो.[५१]

प्रवेशद्वारे :



गढीला एकूण तीन प्रवेशद्वारे आहेत. मुख्य प्रवेशद्वार हे उत्तरेला आहे. म्हणून त्याला दिल्ली दरवाजा

असेही म्हटले जात होते. सध्या या प्रवेशद्वाराची उंची साधारणपणे तीस फूट असून वरील भाग ढासळलेला दिसतो. हे प्रवेशद्वार वास्तूकलेचा उत्तम नमुना आहे. प्रवेशद्वाराच्या वरील बाजूस गजपृष्ठाकृती एकात एक अशा तीन कमानी आहेत. त्यामुळे ते आकर्षक दिसते. प्रवेशद्वाराच्या बांधकामात मुख्यत: माती व विटांचा जास्त वापर केलेला दिसून येतो. प्रवेशद्वाराचा दरवाजा मात्र सध्या शिल्लक नाही. परंतु प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला बुरुज आहेत.



गढीच्या आतील प्रवेशद्वारे

गढीमध्ये मुख्य दरवाजातून प्रवेश केल्यानंतर डाव्या बाजूला एकासमोर एक असे काही अंतरावर दोन प्रवेशद्वारे आहेत. त्यातील पहिल्या प्रवेशद्वाराचा भाग ढासळलेला आहे तर दुसरे प्रवेशद्वार चांगल्या स्थितीत आहे. प्रवेशद्वाराचा लाकडी चौकट व दरवाजा बऱ्यापैकी आहेत. प्रत्येक प्रवेशद्वारावर चापाकृती कमान दिसून येते. प्रवेशद्वाराचा जो उंबरा आहे तो लाकडी नसून दगडी आहे व त्यावर अर्धवर्तुळाकृती नक्षीकाम आहे तसेच प्रवेशद्वाराच्या बाजूला जे दगडी कट्टे आहेत त्या कट्ट्यांना दगडामध्ये कोरलेल्या नक्षीकाम दिसून येतात.

गढीचे बुरुज :



या गढीला एकूण चार बुरुज आहेत. ते अजूनही चांगल्या स्थितीत आहेत. हे बुरुज साधारणपणे साठ ते सत्तर फूट उंचीचे असून जमिनीपासूनचे वीस फूटापर्यंतचे बांधकाम दगडी आहे तर त्यावरील भाग वीटांनी बांधलेला आहे. बुरुजांच्या वरच्या टोकाला कमळासारखा आकार देवून त्यांचे सौंदर्य वाढविल्याचे दिसते. बांधकामात वापरलेल्या विटांचा वापर कलात्मकतेने केलेला दिसतो.

गढीमध्ये असणारी मशीद :



मुख्य प्रवेशद्वारातून प्रवेश केल्यानंतर पुढे गेल्यास डाव्या बाजूला एक छोटी मशीद आहे. आजही या वाड्यातील लोक मोहरमच्या दिवसात फकिराला जेवण देतात. तो त्यांचा कुळधर्म अजूनही मानला जातो. तसेच गढीच्या समोरही मशीद वा पीर आहेत.

नगारखाना :

मुख्य प्रवेशद्वाराच्या वरती नगारखाना होता. सध्या तो ढासळलेल्या अवस्थेत आहे. परंतु नगारखान्यावर जाणारे जिने अस्तित्वात आहेत.

तुळशी वृंदावन :



गढीमध्ये सध्या ज्या कट्ट्यावर तुळशी वृंदावन आहे. ते पूर्वी कदाचित समाधीचे स्थान असावे. कारण तुळशी वृंदावनाखाली असलेल्या बुजविलेल्या कमानीवरून दिसून येते. हे तुळशी वृंदावन ५ × ५ फूट आहे आणि तुळशी वृंदावनावरील दगडी नक्षीकाम सुबक आहे. हे नक्षीकाम त्रिदलीय स्वरुपाचे आहे. त्यामुळे ते आकर्षक दिसते आहे. हा कट्टा पाच फूट उंचीचा असून त्यावर सध्या आधुनिक पद्धतीचे तुळशी वृंदावन बांधलेले आहे.

पाणीपुरवठा :

या गढीला पाणीपुरवठ्यासाठी दोन ठिकाणी सोय केलेली होती. एक म्हणजे गढीच्या आतल्या बाजूस पूर्व दिशेला एक आड होती. ते सध्या बुजविली गेली आहे तर दुसरे म्हणजे गढीच्या बाहेर उत्तर दिशेला एक बारव आहे. त्यातून आजही पाणीपुरवठा होत आहे.

भुयारी दगडी गटारे :

गढीमध्ये अजूनही सांडपाणी वाहून जाण्यासाठी दगडी भुयारी गटारे आहेत. त्यामधून सांडपाणी गढीबाहेरील गटारांना मिळते.

तळघर :

या गढीत तळघर खूप मोठे होते. परंतु सध्या ते बुजवून टाकले गेले आहे.

भुयारी मार्ग :

या गढीतील राहणाऱ्या लोकांच्या सांगण्यावरून तिथे एक भुयारी मार्ग होता जो परांडा किल्ल्यावर जात होता.

या गढीबद्दल किंवा गढींच्या मालकीबद्दल कोणतेही कागदपत्रे किंवा पुरावा मिळत नाही. त्यामुळे ही गढी निश्चित कोणाच्या मालकीची होती हे सांगता येत नाही. गढीतील लोकांच्या सांगण्यावरुन मुस्लीम राजवटीत या गढीचा व कुतुबशहा तसेच मादाण्णा व आकाण्णा यांचा संबंध होता. त्यामुळे या गढीवर मुस्लीम प्रभाव जास्त आढळून येतो. गढीची प्रवेशद्वारे गढीत असणारी मशीद, तेथील लोकांचा पाळला जाणारा कुळधर्म यावरून या गढीवर मुस्लीम प्रभाव प्रकर्षाने जाणवतो. दुमजली असणारी बार्शी शहरातील ही गढी सध्या आतल्या बाजूने पूर्णपणे नष्ट झाली असली तरी गढीची तटबंदी, प्रवेशद्वारे व उंच असलेले बुरूज इतिहासाच्या शोधाची वाट बघत आहेत.

धामणगावची गढी :

सोलापूर जिल्ह्यातील तालुका बार्शीमधील धामणगाव हे बार्शी–वैराग रोडवरील गाव आहे. धामणगाव सोलापूर पासून ४० किलोमीटर अंतरावर आहे. धामणगावचा इतिहास म्हणजे सोळाव्या शतकात शिवकालीन इतिहासातील सासवड घराण्यातील सरदार भानाजीराव जगताप हे सासवडहून आपल्या कुटुंबासह महाराष्ट्राचे कुलदैवत श्री तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी तुळजापूरला निघाले. वाटेत त्यांचा मुक्काम बार्शी तालुक्यातील वैरागजवळ असलेल्या धामणगाव या लहानशा खेडेगावी पडला. या मुक्कामी भानाजीरावांची पत्नी प्रसुत झाली. भानाजीरावांना धामणगाव मुक्कामी झालेले अपत्य म्हणजेच माणकोजी होय. याचवेळी या गावचे त्यांचेच गोत्रज जगताप पाटील हे या गावचे वतनदार होते.[५२]

माणकोजी हे तेथील रहिवासी बनले. जगताप पाटील यांच्यानंतर धामणगावची वतनदारी माणकोजी यांच्याकडे आली.

धामणगाव येथील माणकोजी बोधले महाराजांची गढी ही सध्या मठामध्ये रुपांतरित झालेली आहे. या गढीचे बांधकाम हे चारशे वर्षापूर्वी झालेले आहे.

गढीची तटबंदी :

धामणगाव येथील गढीची तटबंदी मजबूत स्थितीत आहेत. तटबंदीचे बांधकाम दगड व चुना वापरून झालेले आहे. या बांधकामाचे दोन वेगवेगळे थर दिसून येतात. यावरुन वरचा थर हा नंतरच्या काळात बांधला गेल्याचे दिसून येते.

प्रवेशद्वार :

गढीचे मुख्य प्रवेशद्वार हे पूर्वेकडे आहे. हे प्रवेशद्वार साधारणपणे तीस फूट उंच आहे. ते गजपृष्ठाकृती आहे. गढीच्या प्रवेशद्वाराला नवीन दरवाजे बसविलेले आहेत. प्रवेशद्वार संध्याकाळी बंद केले जाते. ते सकाळी उघडले जाते.



आगळ :

प्रवेशद्वाराला पाठीमागील बाजूंनी मोठी आगळ आहे. दरवाजाच्या मजबूतीसाठी या आगळचा उपयोग केला जात आहे.

ओसरी :

मुख्य प्रवेशद्वारातून आत प्रवेश केल्यानंतर दोन्ही बाजूंनी ओसरी लागते. त्या ओसरीच्या भिंतींना गजपृष्ठाकृती आकार आहे. हे सर्व बांधकाम दगडी आहे.

नगारखाना :

मुख्य प्रवेशद्वाराच्या आतील बाजूस असणाऱ्या ओसरीमधून वरती जाण्यासाठी दोन दगडी पायऱ्या असलेले जिने आहेत. मुख्य प्रवेशद्वारावरती नगारखाना आहे. पूर्वीपासून आतापर्यंत या नगारखान्याचा उपयोग केला जात आहे.

वावड्या :

गढीला असलेल्या तटबंदीला लागून लोकांना राहण्यासाठी खोल्या म्हणजेच वावड्या आहेत. सध्या या गढीचे रुपांतर मठात झालेले आहे. श्री. माणकोजी महाराजांचा उत्सव साजरा करण्यासाठी आलेल्या लोकांना राहण्यासाठी या वावड्यांचा उपयोग केला जातो.

तळघर :

मुख्य प्रवेशद्वारातून आत गेल्यानंतर तळघर लागते. या तळघरातच श्री. माणकोजी बोधले महाराजांनी जिवंत समाधी घेतली. त्यानंतर धामणगावच्या गढीमध्ये पश्चिमेला ओळीने चार समाधी स्थाने निर्माण झालेली आढळून येतात. पहिली समाधी माणकोजी महाराजांची, दुसरी समाधी धर्मादास महाराज व भागीरथी बाई यांची, तिसरी समाधी त्यांचा मुलगा भगवंत महाराज तर त्यानंतर भानोजी व विठोजी महाराजांची समाधी स्थाने निर्माण केलेली आहेत. या समाधी स्थानांची बांधकाम शैली उल्लेखनीय आहे. या सर्व समाधी स्थानांना वरती घुमटासारखे आकार दिले गेलेले आहेत. त्यामुळे सर्व बांधकाम हे मुस्लिम शैलीचे वाटते.

धर्मेश्वराचे मंदिर :

गढीमध्ये मुख्य प्रवेशद्वारातून आत गेल्यानंतर डाव्या बाजूला धर्मेश्वराचे लिंग मंदिर आहे. या मंदिराच्या प्रवेशद्वारावर गणेश पट्टी दिसून येते.




गढीमधील असणारी समाधीस्थळे

बारव :

गढीमध्ये पाणीपुरवठ्यासाठी आतल्या बाजूस उत्तर दिशेला बारव आहे. तिचा आकार मोठा असला तरी सध्या त्यामध्ये पाणी नाही. परंतु पूर्वी याच बारवचा उपयोग गढीतील पाणीपुरवठ्यात होत होता. सध्या बाहेरून पाणी आणले जाते.[५३]

बाळासाहेब देशमुख–वाघमोडे यांची गढी :

मोहोळ येथील दुसरी गढी बाळासाहेब देशमुख–वाघमोडे यांच्या मालकीची आहे.



मोहोळ येथील देशमुखांची ही गढी अठ्ठ्याऐंशी गुंठे एवढ्या जागेत आहे. या घराण्याकडे मोहोळची मुलकी पाटीलकी होती तर त्यानंतरच्या काळात कोळेगावचे पोलिस पाटील म्हणून काम पाहिले. अजूनही मोहोळ येथे पाडव्याला शासकीय शस्त्रपूजा होते. तेव्हा या पूजेचा मान या देशमुखांना असतो तसेच वडवळ व मोहोळ येथील नागनाथ यात्रेचा पहिला मान या देशमुख–वाघमोडेंचा आहे. देशमुखांच्या गढीचा बराचसा भाग ढासळलेला आहे.[५५]

गढीचे मुख्य प्रवेशद्वार :

मोहोळ येथील देशमुख–वाघमोडे यांच्या गढीचे उत्तरेला असलेले मुख्य प्रवेशद्वार साधारणपणे वीस फूट उंचीचे असून त्यावर गजपृष्ठाकृती कमान आहे. हे प्रवेशद्वार पूर्ण दगडी बांधकामातील असून प्रवेशद्वाराच्या माथ्यावर विटांनी कमान करून आकर्षक बनविलेले आहे. दोन्ही बाजूला विटांचे छोटे छोटे स्तंभ आकर्षक दिसत आहेत.



गढीचे मुख्य प्रवेशद्वार

प्रवेशद्वाराच्या आतील भागात लाकडी स्तंभाचा वापर केलेला आहे. प्रत्येक स्तंभ हा वरती निमुळता होत गेलेला आहे. स्तंभाचे हस्त आकर्षक आहेत. स्तंभाच्या हस्तावरती फुला–पानांचे नक्षीकाम केलेली आहे.[५६]



मुख्य प्रवेशद्वाराच्या आतील लाकडी स्तंभ

गढीचे बुरूज :

या गढीला एकूण चार बुरूज होते. त्यातील एक पूर्ण नष्ट झालेला असून तीन बुरूज शिल्लक आहेत. या बुरुजांची उंची साधारणपणे पंधरा फूट आहे. दहा फूटापर्यंत दगडी बांधकाम तर वरील पाच फुटामध्ये मातीचा थर दिसतो.

तटबंदी :

गढीची दोन बाजूंची तटबंदी पडलेल्या अवस्थेत शिल्लक असून बाकी तटबंदी पूर्ण नष्ट झालेली आहे. या तटबंदीची उंची दहा फुटापर्यंत असून रुंदी पाच फूट इतकी आहे.

या गढीत अंबारखाना, घोड्यांची पागा, स्वयंपाक घर होते, ते भाग आता ढासळलेले आहेत.

तळघर :

सध्या गढीतील जी जागा स्वयंपाकासाठी वापरतात त्या स्वयंपाक घराखाली तळघर आहे. त्या तळघरातील दरवाजातून पाहिले असता पायऱ्यावरून दिवे लावण्यासाठी दगडी कट्टे दिसून येतात.

पाणी पुरवठा :

गढीमध्ये राहणाऱ्या लोकांसाठी पाणी पुरवठ्याची सोय म्हणजे विहिर. विहिरीतून शेंदून पाणी गढीतील हौदामध्ये साठविले जाई. गढीतील न्हाणीघरात असलेला हौद हा भिंतीलगत दगडामध्ये तयार केलेला आहे. तसेच एक बाहेर ठेवलेला दगडी हौदही दिसून येतो. तसेच सांडपाण्यासाठी (दगडी हौदांचा फोटो) दगडी गटारांची योजनाही दिसून येते.





पाण्याचा दगडी हौद

दगडी वजन :



येथे एक दगडी वजन आहे. त्याच्यामध्ये ते वजन उचलण्यास सोपे जावे म्हणून ते तयार करतानाच मध्ये दगडी रचना करून बनविले आहे. ते पंचवीस किलो वजनाचे आहे परंतु त्यावर तशी काहीही खूण किंवा लिहिलेले दिसत नाही.

गढीतील लाकडी स्तंभ :

या गढीतील मुख्य प्रवेशद्वाराच्या कमानीमध्ये सुंदर कोरीव लाकडी स्तंभ अजूनही उभे आहेत. या गढीच्या कमानीमध्ये उभे चार आणि आडवे चार असे आणि मधे दोन स्तंभावरती काष्ठ शिल्पे कोरलेली आहेत. या स्तंभांचे तळखडे चौकोनी आकाराचे दगडी आहेत. तळखड्यांची अंदाजे उंची १.५ फूट आहे. हे स्तंभ ११.५ फूट उंचीचे असून ७.५ फूट उंचीपर्यंत चौकोनी

आहेत व वरील स्तंभाचा भाग हा षटकोनी आहे. स्तंभाच्या ज्या भागावर चौकोन संपून षटकोनी आकार दिलेला आहे. त्या सुंदर काष्ठशिल्प कोरलेले आहे. सर्वसाधारणपणे स्तंभ व छंद या दरम्यान हस्त असतात. परंतु या वाड्यात हस्ताच्या ठिकाणी लाकडी चौकोन आहेत आणि त्यावर सुंदर अशी कलात्मक नक्षीकाम केलेले आहे.



कमानी :

दोन खांबांना जोडून येणारा भाग म्हणजे कमानी होय. या कमानी साध्या किंवा कोरलेल्या असतात. या वाड्याच्या प्रवेशद्वारामधील लाकडी स्तंभांच्या कमानी वक्राकार बाणाप्रमाणे आहेत. कमानीच्या बरोबर मध्यभागी लाकडी लोलक थोडा मोठा आणि त्याच्या दोन्ही बाजूला दोन छोटे छोटे लोलक कोरलेले आहेत. त्यामुळे कमानीचे सौंदर्य वाढते.

या गढीच्या आतील स्तंभावरतीही काष्ठशिल्पे कोरलेली आहेत. या संपूर्ण स्तंभावर शिल्पे दिसून येतात. स्तंभाच्या चारी बाजूंनी अर्ध्यापर्यंत स्तंभाला थोडासा खच पाडून आडव्या रेषांचे नक्षीकाम केलेले आहे. त्याच्यामध्ये डायमंड आकाराचे नक्षीकाम केलेले आहे. त्याच्यामध्ये डायमंड आकाराचे नक्षीकाम दिसते. त्यावर सुंदर कलशासारखी नक्षीकाम पुन्हा लाकडी फुलांचे नक्षीकाम केलेली गोटपट्टी त्यावर चौकोन आणि स्तंभशीर्षावर हस्त आहेत. हे हस्त अगदी कलात्मकतेने कोरून त्यावर पानांचे नक्षीकाम आहे.

मध्ययुगीन काळातील सोलापूर परगण्यात अनेक गढ्यांची निर्मिती झाली. सोलापूर परगण्यातील केंद्रीय प्रशासनात या जहागिरदार किंवा वतनदारांना मानाचे स्थान होते. त्यांच्या अधिकाराखाली असलेल्या प्रदेशातील महसुलापासून न्यायालयीन व्यवस्थेपर्यंतची सर्व कारभार वतनदारांकडे किंवा जहागिरदारांकडे असे. त्यांच्याकडे लष्करी व्यवस्था देखील असल्याने त्यांचा रयतेशी प्रत्यक्ष संबंध येत असे.

सोलापूर जिल्ह्यातील या गढ्या अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहेत. गढ्यांची बांधकामाची भव्यता, पद्धती, गढी बांधण्यासाठी वापरलेले साहित्य गढीतील सोयी यावरुन त्या गढीतील मालकाचे शौक, विचारसरणी याची कल्पना येते. उदाहरणार्थ अक्कलकोट येथील गढी भव्य व आकर्षक तर आहेच परंतु या बांधकामात रंगीत काचांचा उपयोग करुन इमारतीची सुंदरता वाढविलेली आहे, तसेच गढीच्या मुख्य प्रवेशद्वाराबाहेरील आकर्षक दिव जे आजही तुटलेल्या अवस्थेत उभे आहेत ते गढीची शोभा वाढवितात. तसेच गढीच्या इमारतीच्या भिंतीवर चुन्याचे नक्षीकाम केलेले आहे. यावरुन त्यावेळी बांधकामामध्ये चुन्याचा उपयोग बांधकामाला भक्कमपणा आणण्यासाठी तर केला जात होताच, त्याचबरोबर चुन्याचे नक्षीकाम करुन भिंतींची शोभा देखील वाढविली जात होती.

अशाच प्रकारे बांधकामातील चुन्याच्या वापराचा पुरावा पिलीव, ता. पंढरपूर येथील गढीजवळ दिसून येतो. तेथे गढीच्या प्रवेशद्वाराच्या जवळ बैलाने ओढल्या जाणाऱ्या चुन्याच्या घाणी दिसून येतात. अक्कलकोट गढीतील उल्लेखनीय बाब म्हणजे गढीच्या बुरुजावर असलेली माची जी फत्तेसिंग भोसले यांनी बांधली होती. फत्तेसिंग भोसले यांना खगोलशास्त्राचा अभ्यास करण्याची आवड होती. त्यावेळी ते तेथील जागेवर जावून दुर्बिणीद्वारे आकाशातील ताऱ्यांचे निरिक्षण करीत असत. साधारणपणे सर्वच गढ्यांमध्ये मंदिरे आढळून येतात. अक्कलकोटच्या गढीमध्ये श्रीगणेशाचे मंदिर हेमाडपंथी शैलीतील असून त्याच्या कळसास सोनेरी पत्रा लावला आहे. तसेच फत्तेसिंग भोसले यांना हत्ती, घोडे व पाळण्याची खूप हौस होती, हे तेथील असलेला हत्तीखाना, घोड्यांच्या पागेवरुन दिसून येते. घोड्यांची पागा ही सर्वच गढ्यांमध्ये दिसून येते. परंतु अक्कलकोट गढीतील घोड्यांची पागा आकारमानाने मोठी आहे.

बांधकाम तंत्राच्या दृष्टिकोनातून पाहिले असता सर्व गढ्यांची तटबंदीच्या भिंतीची रुंदी पाच ते सहा फुटापर्यंत आहे. त्यामुळे ती तटबंदी खूप भक्कम होत असे. तटबंदी आणि बुरुजांच्या बांधकामात दगड, माती व चुना यांचाच वापर जास्त दिसून येतो. काही गढ्यांचे बुरुज जमिनीपासून वरपर्यंत घडीव काळ्या दगडांमध्ये बांधलेले आहेत तर काही अर्ध्यापासून वरची बाजू वीटांचा वापर करुन बांधलेली दिसते. तसेच गढ्यांची तटबंदी रुंद असल्याने तटबंदीवरुन सैनिकांना पहारा देणे सोपे जात होते. तटबंदीला ठिकठिकाणी जंग्याही दिसून येतात.

गढीतील आतील भागातील सौंदर्य वाढविण्याच्या दृष्टीने लाकडी स्तंभ व त्यावर नक्षीकाम केले जात असे. उदाहरणार्थ ता. मोहोळ येथील देशमुख–गायकवाड यांच्या गढीतील लाकडी स्तंभांच्या हस्तावर निर्माण केलेली काष्ठशिल्पे अतिशय सुबक, रेखीव व आकर्षक आहेत. त्यांच्या गढीमध्ये असलेल्या जेवण करण्याच्या टेबलचे (डायनिंग टेबल) तुटलेले आकर्षक पाय अजूनही आहेत. अशा वैशिष्ट्यपूर्ण गढ्या सोलापूर जिल्ह्यात पहावयास मिळतात.

संदर्भ ग्रंथ सूची :-

१) मराठी विश्वकोश खंड १७ वा, सूची २, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, लेख व आय.डी. ९९०.

२) पाटील नि. रा., जळगाव जिल्ह्यातील किल्ले आणि गढ्या, सुमेरा प्रकाशन, डोंबिवली, ३ डिसेंबर २००८, पृ.क्र. ७.

३) पुरी सुनिल, सैनिकी वास्तूशास्त्र गढी, साप्ताहिक विवेक, ८ मार्च २०१४.

४) शहा जी. बी., दुर्ग जागले, सुमेरु प्रकाशन, डोंबिवली, २००८, पृ.क्र. २.

५) कित्ता, पृ.क्र. ७.

६) http://www.evivek.com/home/25mar2012//lekh006.html

७) Mate M. S., Maratha Architecture, Continental Publication, Page No. 52.

८) गायकवाड, सरदेसाई, थोरात, हनमाने, मराठेकालीन संस्था व विचार, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९०, पृ.क्र. ४२४.

९) कित्ता, पृ.क्र. ४२४.

१०) चिटणीस मल्हार रामराव, सभासद बखर.

११) Optic, http://www.evivek.com/home/25mar2012//lekh006.html

१२) उपरोक्त गायकवाड, सरदेसाई, पृ.क्र. ४२५.

१३) उपरोक्त सुनिल पुरी, पृ.क्र. ४.

१४) तेंडुलकर महेश, शिवकाळातील दुर्ग व दुर्ग व्यवस्था, स्नेहल प्रकाशन, पुणे, २००९, पृ.क्र. २१.

१५) शिवदे सदाशिव, महाराष्ट्रातील ऐतिहासिक वाडे (वास्तू आणि इतिहास) (भाग पहिला), स्नेहल प्रकाशन, पुणे, २०१३, पृ.क्र. १३७.

१६) कित्ता, शिवदे सदाशिव, पृ.क्र. १३८.

१७) तेंडुलकर महेश, शिवकाळातील दुर्ग व दुर्ग व्यवस्था, स्नेहल प्रकाशन, पुणे, २००९, पृ.क्र. १३६.

१८) कित्ता, पृ.क्र. १३८.

१९) महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, महाराष्ट्र इतिहास व प्राचीन काळ, खंड १, भाग २, स्थापत्य व कला, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, २००९, पृ.क्र. २२७.

२०) Op.Cit. Mate M. S., Page No. 60.

२१) उपरोक्त, शिवदे सदाशिव, पृ.क्र. १६.

२२) उपरोक्त, गायकवाड, सरदेसाई, पृ.क्र. ४२६.

२३) कित्ता, गायकवाड, सरदेसाई, पृ.क्र. ४२६.

२४) Op.Cit. Mate M. S., Page No. 75.

२५) उपरोक्त, गायकवाड, सरदेसाई, पृ.क्र. ४२६.

२६) कित्ता, पृ.क्र. ४२६.

२७) उपरोक्त, शिवदे सदाशिव, पृ.क्र. २३२.

२८) कित्ता, पृ.क्र. २३७.

२९) Gazetteer of the Bombay Presidency, Solapur District, Volume XX, The Government Photozinco Press, Pune, 1884, Page No. 509.

३०) Kamalapur J. N., THE DECCAN FORTS, A Study in the Art of Fortification in Mediaeval India, Popular Book Depot, Bombay, 7, 1961, Page No. 97.

३१) महाराष्ट्र राज्य, जिल्हा गॅझेटियर, पृ.क्र. ३५.

३२) Optic, Gazetteer of The Bombay Presidence, Solapur District, Page No. 414.

३३) Kamalakar J. N., The Deccan Forts, Page No. 97.

३४) मोरवंचीकर रा. श्री., पैठण येथील काही ऐतिहासिक वास्तु, 'भारत इतिहास संशोधन मंडळ', त्रैमासिक, महाराष्ट्र इतिहास परिषद, पुणे (निबंध), १९८३, पृ.क्र. २२०.

३५) Optic, Gazetteer of The Bombay Presidence, Page No. 329.

३६) देशमुख गोपाळ, सोलापूर जिल्ह्याचा इतिहास, मराठा कालखंड, भाग १, रेवू प्रकाशन, पंढरपूर, २००९, पृ.क्र. ५६७.

३७) खरे वा. वा., ऐतिहासिक लेखसंग्रह, खंड ४ था, मिरज, पृ.क्र. १४६९.

३८) http://en.wikipedia.org/wiki/piliv.30/05/2014.

३९) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, महाराष्ट्र : इतिहास प्राचीन काळ, खंड १, भाग २, स्थापत्य व कला, जामखेडकर अ.क्र., दार्शनिक विभाग, सांस्कृतिक कार्यविभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००९, पृ.क्र. २२८.

४०) प्रत्यक्ष क्षेत्रभेट व मुलाखतीतून मिळालेल्या माहितीद्वारे.

४१) राजवाडे वि. का., मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड २०, राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, २००३, पृ.क्र. ३६१.

४२) उपरोक्त, महाराष्ट्र शासन गॅझेटियर, पृ.क्र. २२८.

४३) उपरोक्त, देशमुख गोपाळ, पृ.क्र. ५३४.

४४) खरे ग. ह., मूर्तिविज्ञान, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, पृ.क्र. १८१.

४५) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, इतिहास प्राचीन काळ (खंड १), संपादक– चंद्रपाठक अरुण, दार्शनिक विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २०१०, पृ.क्र. ३०४.

४६) देशमुख गोपाळराव, दोन राजधान्य मंगळवेढा, ब्रम्हपुरीचा इतिहास, कौसल्या प्रकाशन, २०१४, पृ.क्र. ६.

४७) उपरोक्त, महाराष्ट्र शासन गॅझेटियर, पृ.क्र. २२९.

४८) खरे ग. ह., मूर्तिविज्ञान, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, पृ.क्र. १८१.

४९) Optic, Gazetteer of The Bombay Presidency – Solapur District, Page No. 392.

५०) बाळाजी बाजीराव पेशवे रोजनिशी लेखांक, १९०, पृ.क्र. १३३.

५१) सरदेसाई गो. स., गर्गे स. मा., मराठी रियासत, पॉप्युलर प्रकाशन, खंड ५ वा, १९९०, पृ.क्र. ७८.

५२) Optic, Gazetteer of The Bombay Presidency, Solapur District, Page No. 351.

५३) प्रत्यक्ष मुलाखत.

५४) मूळ वंशावळीची अस्सल प्रत.

५५) Optic, Gazetteer of The Bombay Presidency, Solapur District, Page No. 414.

५६) उपरोक्त, मोरवंचीकर रा. श्री., पृ.क्र. २२१.

प्रकरण ४ थे

सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन काळातील वाडे

प्रस्तावना :

मध्ययुगीन काळात छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य निर्माण केले, त्याचे पुढे साम्राज्यात रुपांतर झाले. त्या कामासाठी महाराष्ट्रातील अनेक मातब्बर घराण्यांचे योगदान आहे. स्वराज्याच्या केंद्रीय प्रशासनामध्ये मध्ययुगातील सोलापूर परगण्यातील अनेक सरकार, वतनदार, जहागिरदार यांचा केंद्रीय प्रशासनात सहभाग होता. तसेच त्यांनी निर्माण केलेल्या गढ्या / वाड्यांना स्थान होते. मध्ययुगीन काळातील अनेक वाडे सोलापूर परगण्यात आहेत. अनेक पारंपारिक कलेप्रमाणे वाड्यांची संस्कृती निर्माण झालेली दिसून येते. अठराव्या–एकोणिसाव्या शतकातील वैशिष्ट्ये म्हणजे राजवाडे, महाल, मोठी घरे किंवा वाडे निर्माण झाले. वाडा संस्कृतीस एक शोभेची वास्तू समजले जावू लागले. जरी वाड्यांची रचना आणि सजावट ही पारंपारिक असली तरी त्यात अनेक बदल झाले, तरी वाड्यांच्या काही वैशिष्ट्यांमध्ये समानताही आढळते.

मराठेकालीन कला :

मराठेकालीन विविध राजकीय संस्था व कला यांचा अभ्यास केला असता मराठी राज्याचे खरे स्वरुप कळते. मराठेकालीन कला हा विषय तसा दुर्लक्षित राहिलेला आहे. यासाठी जास्त संशोधनाची गरज आहे. एखादया राज्याची भरभराट ओळखण्याचे साधन म्हणून विविध कलांच्या विकासाकडे पाहिले पाहिजे. मराठेशाहीत शिल्पकला, संगीत व चित्रकला या कलागुणांना बऱ्याच प्रमाणात संधी मिळाल्याचे दिसून येते.[१]

मराठेकालीन नागर शिल्पकला :

मराठेकालीन नागर शिल्पकलेमध्ये नगररचना, रस्ते, पूल, घरे, राजवाडे, बागा, कारंजे, पाणी पुरवठ्याची व्यवस्था, आरोग्याच्या सुविधा, विहिरी इ. चा समावेश होतो. प्रत्येकाची रचना व वैशिष्ट्ये ही वेगवेगळी दिसून येतात.[२]

नगररचना :

नगररचना ही भारतात प्राचीन काळापासून अस्तित्वात असल्याचे दिसते. यात मोठ्या जागेची निवड, जागेप्रमाणे नगराचा आकार इ. गोष्टी येतात. त्यानंतर घरे/मंदिरे, वाडे बांधताना जागेची निवड, भूमीपक्षहक्षा असे नियम आहेत. तसेच या बांधकामासाठी आवश्यक प्राथमिक अशी बाब म्हणजे मापन पद्धती लहान, मोठ्या वास्तूंचा विचार करून कनिष्ठ, मध्यम, उत्तम जागा, त्यासंबंधी नियम येतात. वास्तूनिर्मितीसाठी आवश्यक अनुभव व तंत्रज्ञान असणारे कुशल कारागीर यांचे नावेही प्राचीन ग्रंथामध्ये येतात.

उदा. स्थपति – सर्व शाखांची माहिती असणारा.

सूत्रग्राहीन – मापन पद्धतीचा तंत्र.

तक्षक – सुतार.

वर्धकी – चित्रकार / आलेखक.[३]

प्राचीन काळात कौटिल्याने आपल्या 'अर्थशास्त्र' या ग्रंथात नक्षररचनेच्या विविध अंगोपांगाचा विचार केला आहे. तसेच मन्सारने लिहिलेल्या 'शिल्पशास्त्र' या ग्रंथात नगररचनेसंबंधी माहिती तसेच शहरातील बाजारपेठा रस्ते, गल्ल्या, बोळ, राजवाडे, देवालये, कमानी, पाणपोई सर्वासंबंधी सविस्तर चर्चा केली आहे. शहर सुंदर दिसण्यासाठी ठिकठिकाणी उक्षाने तयार केली पाहिजेत अशी सूचनाही मन्सारने केली आहे. इ.स. च्या पहिल्या १ हजार वर्षात नगररचनेबद्दल विविध प्रकारचे विचार व कल्पना प्रस्तुत झाल्या आहेत. इ.स. १० व्या शतकापासून भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणी नवी शहरे निर्माण करण्याकडे राज्यकर्त्यांचा कल होवू लागला. असे हे शहर राज्यमार्गावर असावे, संरक्षणाची सोय चांगली असावी, एकंदर

समाजरचनेनुरूप विविध वर्गातील लोकांनी आपले जीवन सुव्यवस्थितपणे व्यतीत करावे अशाप्रकारची नगररचना करण्याचा प्रयत्न असे. आधुनिक काळातील नगररचनेची सर्व तत्त्वे जरी त्या काळात लागू नसली तरी त्या काळात सुंदर शहराची कल्पना होती.

मध्ययुगापासून महाराष्ट्रातील राजकीय जीवन हे संघर्षात्मक स्वरुपाचे होत गेले. महाराष्ट्र ही रणभूमी बनल्याने वारंवार स्थित्यंतरे होऊ लागली. तेव्हा स्वाभाविकच नगररचनेची कल्पना काय होती, योजना काय होत्या याविषयीची पुरेशी माहिती मिळत नाही.[४]

मराठेकालीन वाड्यांची वैशिष्ट्यपूर्ण रचना :

मराठेकालीन वाडा हा अनेक चौकांनी मिळून होत असे. कोणत्याही वाड्यामध्ये प्रवेश केल्यानंतर ठिकठिकाणी चौक ठेवलेले दिसून येतात. वाड्यातील चौकांची संख्या वाड्याच्या आकारावर अवलंबून असे. काही वेळा वाडा लहान असला तरी चौक जास्त दिसून येतात. उदा. फडके वाडा सात चौकांचा आहे तर शनिवारवाड्याला फक्त चारच चौक आहेत.[५]

अशा चौकांच्या भोवती वेगवेगळे खांब उभे करून त्यामध्येच सभा मंडप व वेगवेगळ्या खोल्या बांधलेल्या असत. चौकातील मोकळ्या जागेचा उपयोग हा सोयीप्रमाणे होत असे. या चौकाला लागून व्हरांडा असे. अशा व्हरांड्याचा उपयोग ऑफिससाठीही केला जात असे. तेथे कारकून काम करीत. वाड्याच्या डाव्या कोपऱ्यात देवघर असे. वाड्याच्या समोरच्या बाजूला स्वत: मालकाचे ऑफिस असे. इतर खोल्यांचा वापर खाजगीसाठी केला जात असे. वाड्यामध्ये सदर–दिवाणखाना, दरबार दिवाणखाना, रंगमहाल, चित्रमहाल व आरसेमहाल असे सोयीप्रमाणे कमी–जास्त दिवाणखाने किंवा महाल असत.

सदर दिवाणखाना :

वाड्यातील मुख्य सभास्थान म्हणजे दिवाणखाना. या ठिकाणी सरकारी कामकाज किंवा न्यायदानाचे काम चालत असे. प्रवेशद्वारासमोरच दिवाणखाना असे. दिवाणखान्याची रचना इंग्रजी अक्षर T प्रमाणे असे यांच्या दोन्ही बाजूला असत. दिवाणखान्यात असणाऱ्या खांबावर वेगवेगळे नक्षीकाम कोरलेले असे. दिवाणखान्याच्या शेजारी स्त्रियांना बसण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था असे.[६]

दरबार हॉल :

दरबार हॉल काही महालामध्ये पहायला मिळतो. महत्त्वाच्या सरदार मंडळीच्या वाड्यात दरबार हॉल असे. तेथे प्रशासकीय कामे चालत असत. याची रचना दिवाणखान्यासारखीच असे. फक्त त्याचा आकार मोठा असे. प्रवेशद्वारावर चुन्याचा गिलावा, त्यावर चांगले नक्षीकाम पहायला मिळते. अशा दरबारी हॉलला एखाद्या देवतेचे नावही दिलेले दिसून येते. उदा. गणेश महाल. जेवढे नक्षीकाम जास्त तेवढे त्याचे ऐश्वर्य जास्त असे समजले जाते. काही ठिकाणी सिंह, हत्ती कोरलेले दिसून येतात. वेळोवेळी नक्षीकामावर पॉलिश करून चकचकीत ठेवण्याचा प्रयत्न असे.[७]

आरसे महाल :

प्रतिष्ठित व्यक्तींच्या वाड्याचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्यात असणारा आरसेमहाल. वाड्याच्या पहिल्या मजल्यावर आरसेमहाल असे. पहिल्या मजल्यावर दिवाणखान्याच्या भिंतीवर व छताला आरसे लावून हा महाल तयार केला जात असे. सबंध आरसेमहालात किंचितही जागा मोकळी सोडली जात नसे. सातारा येथील जलमंदिर व अदालत वाडा या ठिकाणी असे आरसेमहाल आहेत. शनिवारवाड्यात पेशव्यांनी मोठा आरसेमहाल केला होता.[८]

रंग महाल :

रंगमहाल म्हणजे त्या वाड्याचे वस्तूसंग्रहालय असे. त्यामध्ये त्या घराण्यातील अनेक लोकांच्या तसबिरी भिंतीवर अनुक्रमाने लटकवून ठेवलेल्या असत. तसेच मुलुखगिरीवर गेल्यानंतर ज्या ठिकाणी संग्राह्य वस्तू मिळतील. त्या आणून रंगमहालात ठेवल्या जात असत. काही सरदार समकालीन लोकांच्या चित्रांचा संग्रह करीत असत. तसेच महाकाव्ये व पुराणातील प्रसंगाची चित्रेही रेखाटून ठेवीत असत. असे रंगमहाल तासगांव, मेणवली येथे दिसून येतात.

अस्मानी महाल :

अस्मानी महाल म्हणजे वाड्यातील सर्वात उंचीवरील दिवाणखाना होय. या महालामध्ये बसून आसपासच्या प्रदेशावर देखरेख ठेवता येत असे. राजे लोक या महालाचा उपयोग संध्याकाळच्या वेळेस शोभा पाहण्यासाठी करीत असे. उदा. तासगाव येथील पटवर्धनांचा वाडा व जाधव वाडा, शनिवार वाडा.[९]

बांधकाम :

वाडा बांधण्यासाठी दगड, विटा व चुन्याचा गारा यांचा वापर करीत असे. सुरुवातीला चार ते सहा फूट उंचीचे दगडी जोते बांधल्यावर त्याच्यावर वाड्याचे बांधकाम करीत असत. क्वचितप्रसंगी असे जोते दहा ते पंधरा फूट उंचीचे असे. अशा जोत्यावर विटा व चुन्याचा गारा किंवा विटा व माती यांचा वापर करीत असत. मातीचा वापर गिलाव्यासाठी केला जात असे. गिलाव्याच्या मातीत ताग कुटून टाकत असत. गवंडीकाम अतिशय सुबक केले जाई. लाकूडकाम सोडून इतर भागावर गिलावा केला जाई. गिलावा करण्याचीही एक कला असे.

बांधकामात लाकडी तुळई हे वैशिष्ट्य असे. जाड चौकोनी तुळ्यांच्याशिवाय बांधकाम होत नसे. भिंतीची रुंदी कमीत कमी ३ फूट असे. संरक्षणासाठी व घरातील वातावरण थंड राहण्यासाठी भिंतीची जाडी जास्त ठेवली जात असे.

बांधकामात वापरलेल्या विटांना वेगवेगळे आकार देवून बांधकामात कलात्मकता व नक्षीकाम निर्माण केले जात असे.

खांब :

अशा बांधकामात जास्त लाकडाचा वापर केला जात असे. बांधकामात लाकडी तुळ्या असत. मोठ्या आकाराच्या खोल्या तसेच दिवाणखान्यात लाकडी तुळ्या व खांब वापरले जात असे.

छप्पर :

बांधकामात वेगवेगळ्या छपरांचा वापर केलेला दिसून येतो. जास्त पावसाच्या प्रदेशात तेथे उतरते छप्पर असलेले तर कमी पावसाच्या प्रदेशात धाब्याचे छप्पर असे. मोठ्या वाड्यांमध्ये तक्तपोशीवर कामट्या किंवा फळ्या वापरून त्यावर चुन्याचा दोन किंवा तीन इंच जाडीचा थर देत असत. काही वेळेला विटा ठेवून त्यावर चुना पसरत असत.

सजावट :

या काळातील घरे, राजवाडे हे सुंदर दिसण्यासाठी प्रयत्न केले जात होते. त्यासाठी खांबावर, तुळईवर, कपाटांवर सुंदर नक्षीकाम कोरले जात असे. पाने, फुले तसेच पोपट, मोर अशा पक्षांची देखील चित्रे कोरली जात असत. वाड्याच्या कमानीवर महिरपी असत. उदा. पुण्याचा विश्रामबागवाडा.[१०]

खिडक्या :

खिडक्यांमध्येही जास्त लाकडाचाच उपयोग केला जात असे. खिडक्यांच्या दारावर कमळाचे नक्षीकाम असे.

जाळीदार काम :

लाकडावर जाळीदार नक्षी काढून त्याचा उपयोग मोठ्या दिवाणखान्यात सोयीसाठी दोन भाग करावयाचे असतील तर तो लाकडी तक्ता वापरला जात असे. मोठ्या दरबारांमध्ये असे लाकडी जाळीदार तक्त वापरून स्त्रियांसाठी सोय केलेली दिसते. किंवा इतर कारणांसाठीही अशा जाळीदार लाकडी तक्त्यांचा उपयोग केला जात होता.[११]

सन्दला किंवा चुन्याचा गिलावा :

वाड्यांमध्ये चुन्याचा गिलावा करून त्यावर वेगवेगळे नक्षीकाम कोरण्याची पद्धत प्रचलित होती. काही वेळा वाड्यावर कळस बांधत असत. कळस चांगला दिसण्यासाठी सन्दल्याचा वापर करीत असत. अशा शिखरावर काही वेळा पितळेचा कळस खोचून बसवत असत.[१२]

चित्रकला :

वाड्याच्या सजावटीमध्ये चित्रकलेचा उपयोग केला जात असे. वाड्यातील मुख्य दिवाणखान्यात किंवा चित्रमंदिरात विविध प्रकारची चित्रे काढीत असत. ही चित्रे साधारणपणे पुराणे व महाकाव्यातील प्रसंगावर आधारित असत तसेच पाने, फुले, कमळ, मोर, पोपट यांचाही या चित्रामध्ये समावेश असे. ही चित्रे पांढऱ्या, किरमिजी किंवा तपकिरी रंगामध्ये काढली जात असत. काही वाड्यांमध्ये किचकट चित्रे पहायला मिळतात, तसेच चित्रकलेत भडकपणा जाणवतो.

दर्शनी भाग :

वेगवेगळ्या वाड्यांचे वेगवेगळे दर्शनी भाग आढळून येतात. वाड्याच्या बांधणीचाही त्यावर परिणाम आढळतो. दर्शनी भागाचे पुढील प्रकार आढळून येतात.१३

१) ५ ते १० फुटाचे उंच दगडी जोत्यावर विटांचे बांधकाम करीत असत. त्याचा उद्देश पुरापासून वाड्याचे संरक्षण व्हावे असा होता.

२) काही ठिकाणी पाच फुटापेक्षा कमी दगडी जोते व त्यावर लाकूडकाम केलेले दिसते.

३) दगडी जोते पाच फुटापेक्षा कमी उंचीचे बांधून त्यावर विटांचे बांधकाम करीत असत.

४) दगडी जोते पाच फुटापेक्षा कमी असून त्यावर लाकडी बांधकाम व पहिल्या मजल्यासाठी विटांच्या भिंती तर तळमजल्यावरील खांबांना दोन्हीही बाजूला खोल्या व मध्यभागी चौक असे.

५) पाच फुटापेक्षा कमी असलेल्या दगडी जोत्यावर लाकडीकाम, मध्यभागी चौक असून त्यापलीकडे दुतर्फा चौकोनी खांब असत. पहिल्या मजल्यावर लाकडी सज्जा, त्यावरचे वैशिष्ट्यपूर्ण छप्परावरील नक्षीकाम दिसून येते. उदा. पुण्याचा विश्रामबागवाडा.

बागा व कारंजी :

मराठेकालीन नगररचनेची वैशिष्ट्ये म्हणजे त्यामध्ये असणाऱ्या बागा. बागा व कारंजे हे मोगलांकडून मराठ्यांकडे आलेल्या दिसतात. वाड्यामध्ये बागा व कारंजी हे श्रीमंतीचे प्रतीक झाले. मध्ययुगात बागा व कारंजी मोठ्या प्रमाणात तयार केली गेली.

वाड्याच्या बाहेरच्या भागात एक लहानसे तळे करून त्यामध्ये कारंजी तयार केली जात. पुण्याच्या शनिवारवाड्यात अशा प्रकारची कारंजी बसविलेली होती. शनिवारवाड्याच्या मुख्य दालनासमोर प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला दोन चौकोनी तळी तयार केली होती व मुख्य चौकात एक छोटेसे कारंजे होते. मुख्य दालनाच्या पूर्वेला चिमणबाग व पश्चिमेला हजारी कारंजे होते. या कारंजाचा आकार कमल पुष्पासारखा होता. मधल्या चौकातील तलावाला 'पुष्करणी' म्हणत. पुण्यामध्ये उद्यानयुक्त वाडा बांधणारा नानासाहेब हा पहिलाच पेशवा होता. त्यांनी बांधलेला वाडा हिराबाग वाडा म्हणून ओळखला जातो. पर्वती तळे, तळ्याच्या मध्यभागी असलेले गणेश मंदिर आणि हिराबाग वाडा हे सर्व एकाच वास्तूचे भाग होते.[१४]

पाणी पुरवठा :

नगररचना किंवा गढी–वाड्यांच्या रचनेमध्ये पाणी पुरवठ्याच्या योजना एक वैशिष्ट्य होते. प्राचीन काळापासून पाणी पुरवठ्यासाठी नदीचा प्रवाह कोणत्या ना कोणत्या मार्गाने शहरात आणून त्यापासून शहराला पाणी पुरवठा करण्याची पद्धत होती. त्यासाठी नदीवर घाट बांधण्यास सुरुवात झाली. नदीप्रमाणेच विहिरी, तलाव यांचासुद्धा उपयोग पाणीपुरवठ्यासाठी करीत असत. मराठेकालीन बहुतेक मोठ्या शहरात मोठे हौद किंवा तलाव खोदलेले दिसतात. त्या हौदात बाहेरून पाणी आणून भरत असत. पुण्यात सदाशिव हौद, पुष्करणी हौद, नानू हौद, काळा हौद

आहेत. १७८१ मध्ये जावडेकर यांनी इंदापूर येथे अशाच तऱ्हेचा हौद बांधला. दिवा घाटाजवळ पहिल्या बाजीरावाने मस्तानी तलाव बांधला. पुढे तलावाप्रमाणेच नदीवर धरण बांधून त्याचा उपयोग शेती व पिण्याच्या पाण्यासाठी करीत असत. नागपूरकर भोसल्यांनी अंबाझरी व तेलीनखेरा अशी दोन धरणे बांधली. १७५० मध्ये नानासाहेब पेशव्याने कात्रजला अशाच प्रकारचा बंधारा बांधला व पुणे शहराला पाण्याची व्यवस्था केली. एकंदरीत शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी दगड, विटा व चुना यांच्या बांधकामातून ठिकठिकाणी तळी बांधलेली असत. विहिरी, पायऱ्या असलेल्या विहिरी बांधून पाणीपुरवठा केला जात असे.[१५]

आरोग्याच्या सोयी :

आरोग्याच्या सोयीमध्ये वैशिष्ट्यपूर्ण म्हणजे भुयारी गटारांची योजना होय. सांडपाणी रस्त्यावर येऊ नये यासाठी दगडी चर बांधून त्यामधून सांडपाणी सोडत असत.

पंढरपूर येथील होळकर वाडा :

भारतामधील महाराष्ट्र राज्यातील पंढरपूर हे सोलापूर जिल्ह्यातील एक तालुक्याचे ठिकाण आहे. सोलापूरपासून पश्चिमेस एक्काहत्तर किलोमीटर अंतरावर भीमा नदीच्या (चंद्रभागा) उजव्या तीरावर पंढरपूर वसले आहे.[१६] पंढरपुरातील विठ्ठल मंदिरामुळे हे वारकऱ्यांचे तीर्थक्षेत्र म्हणून प्रख्यात आहे. पंढरपूरला पंढरी असेही म्हटले जाते. दरवर्षी आषाढी एकादशीच्या सुमारास अनेक भाविक येथे वारी करण्यासाठी व विठ्ठल रखुमाईचे दर्शन घेण्यासाठी पायी चालत येतात. क्षेत्रमहात्म्यामुळे पंढरपूरला दक्षिण काशी व तसेच विठ्ठलाला महाराष्ट्राचे कुलदैवत म्हणतात. पंढरपूरचे देवालय व देव अत्यंत पुरातन असून अनेक वेळा मंदिराची पुनर्बांधणी झाली आहे. शालिवाहन वंशातल्या प्रतिष्ठान राजाने या देवळाचा इ.स. ८३ मध्ये जीर्णोद्धार केला. ताम्रपटांवरून इ.स. ५१६ मध्ये राष्ट्रकूटांच्या काळात पंढरपूर हे चांगली लोकवस्ती असलेले ग्राम असल्याचा पुरावा मिळतो. देऊळ व मूर्ती यांवर अनेकदा मुसलमानी आक्रमणे झाली व प्रत्येक वेळी मंदिर परत बांधण्यात आले. काहींच्या मते हे स्थान मूलत: शिवाचे होते तर वैष्णव पंथीय हे

विष्णूचे स्थान मानतात. जैन धर्मीय त्यास नेमीनाथ समजतात तर बौद्धांच्या मते हा अवलोकितेश्वर आहे. सूर्याचा अंशही या दैवतास मानतात.[१७]

अशा या प्राचीन इतिहास असलेल्या पंढरपुरात अहिल्याबाई होळकर यांचा वाडा आहे. अहिल्यादेवी होळकर (इ.स. १७२५ ते इ.स. १७९५) या मराठा साम्राज्यातील महत्त्वाच्या व्यक्ती होत. अहिल्यादेवींचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी या खेड्यात झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे त्या गावचे पाटील होते. त्याकाळी स्त्रीशिक्षण फारसे प्रचलित नसतानाही तिच्या वडिलांनी लिहिण्या–वाचण्यास शिकविले होते. बाजीराव पेशव्यांचा एक सरदार मल्हारराव होळकर हे माळवा प्रांताचे जहागीरदार होते. ते पुण्यास जाताना चौंडी येथे थांबले होते. आख्यायिकेनुसार, ८ वर्षाच्या अहिल्यादेवींना, मल्हाररावांनी एका देवळात बघितले. मुलगी आवडल्यामुळे त्यांनी तिला स्वत:चा मुलगा खंडेराव याची वधू म्हणून आणले. त्या मराठा साम्राज्याच्या माळवा प्रांताचा कारभार पहात असत. मल्हारराव होळकरांनी मुलाच्या मृत्यूनंतर अहिल्यादेवींना सती जावू दिले नाही. मल्हाररावांनी त्यांना प्रशासकीय व सैन्याच्या कामात पारंगत केलेले होते. त्या आधाराने अहिल्याबाईंनी इ.स. १७६६ ते इ.स. १७९५ म्हणजे त्यांच्या मृत्यूपर्यंत माळव्यावर राज्य केले.[१८]



राणी अहिल्यादेवी यांनी भारतभर अनेक हिंदू मंदिरे आणि नदिघाट बांधले, अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार केला, अनेक तीर्थक्षेत्र, धर्मशाळांचे बांधकाम केले. त्यात द्वारका, काशी, उज्जैन, नाशिक, परळी वैजनाथ यांचा प्रामुख्याने समावेश आहे. अहिल्यादेवी वारंवार तीर्थक्षेत्र पंढरपूरला भेट देत असत. त्यावेळी त्यांनी बांधलेला राजवाडा अजूनही त्यांच्या पुण्याईची साक्ष देतो आहे.

राणी अहिल्यादेवी होळकर यांनी पंढरपूर येथे जो टोलेजंग वाडा बांधला तो अजूनही सुस्थितीत आहे. होळकरांचा हा वाडा साधारणपणे दोन एकर जागेमध्ये बांधलेला आहे. सध्या या वाड्याच्या देखभालीसाठी श्री. चंद्रकांत पुरुषोत्तम दंडवते हे दिवाणजी म्हणून नेमलेले आहेत. ते चाळीस वर्षांपासून या वाड्याच्या देखभालीचे काम पाहतात.

होळकर वाडा व दुमजली असून सध्या वरच्या मजल्यावरील काही भाग ढासळलेला असला तरी बाकी बांधकाम सुस्थितीत आहे. या वाड्याची समोरील बाजू साधारणपणे ६०० फूट लांब तर रुंदी ३०० फूट इतकी आहे.

प्रवेशद्वारे :

होळकरांच्या वाड्याला एकूण चार प्रवेशद्वारे आहेत.

मुख्य प्रवेशद्वार :



पश्चिम दिशेला वाड्याचे मुख्य प्रवेशद्वार असून ते २० ते २५ फूट उंचीचे आहे. या प्रवेशद्वाराचे बांधकाम दगड व विटांचे आकर्षक डिझाईन करुन ते डौलदार बनविले आहे. या प्रवेशद्वाराचे १५ फूटापर्यंतच्या बांधकामात दगडी स्तंभ एकामागे एक आल्याने दगडी कप्पे तयार झाले आहेत व वरती आडव्या पद्धतीने विटांचे बांधकाम करून त्यावर कोनाकृती वीटांची नक्षी तयार केलेली आहे.

प्रवेशद्वाराचा चौकट व दरवाजा लाकडी स्वरुपाचा असून चौकटीवर सुंदर लाकडामधील बेलबुट्टीचे नक्षीकाम पहायला मिळते. दरवाजाला एकात एक अशा तीन चौकटी दिसून येतात. त्यामुळे तो आणखी मजबूत वाटतो. मधली चौकट सपाट असून बाहेरील व आतल्या चौकटीच्या वरील भागात नक्षीकाम केलेले आहे.

प्रवेशद्वार क्र. २ :

वाड्याचे दूसरे प्रवेशद्वार मुख्य प्रवेशद्वाराच्या विरुद्ध दिशेला म्हणजे पूर्वेला असून ते मुख्य



प्रवेशद्वारापेक्षा लहान आहे. या प्रवेशद्वारातून पाहिले असता पुढे चंद्रभागा नदीचे दर्शन होते. या प्रवेशद्वाराची उंची साधारणपणे ७ फूट आहे.

प्रवेशद्वार क्र. ३ :



अहिल्याबाई होळकर यांनी ज्यावेळेस वाड्याचे बांधकाम सुरू केले त्यावेळी वाड्यामध्ये शिवाचे मंदिर बांधण्याचे ठरविले होते. परंतु खोदकामावेळी श्री हनुमानाची हात जोडलेली स्वयंभू मूर्ती सापडल्याने अहिल्यादेवींनी वाड्यात राममंदिर बांधले. या राम मंदिरासाठी दक्षिणेला बाहेरून हे प्रवेशद्वार ठेवण्यात आले.

मुख्य प्रवेशद्वाराच्या वरच्या बाजूला खोल्या आहेत. बाहेरील बाजूंनी पहिल्या मजल्यावरील विटांच्या बांधकामात बांधलेले झरोके (खिडक्या) दिसून येतात. त्याची कमानयुक्त नक्षीकाम लक्ष वेधून घेते.

वाड्यातील अंतर्गत रचना :

मुख्य प्रवेशद्वारातून आत आल्यावर प्रवेशद्वाराच्या आतून आगळ लावण्याची जागा आहे. दोन्ही बाजूस (उत्तर व दक्षिण बाजूस) ढाळज असून याचे मोजमाप १० फूट रुंद आणि २५ फूट लांब आहे. या ढाळजेला लागूनच दक्षिणेला राम मंदिराची भिंत येते तर उत्तरेला खोल्या आहेत. त्याला बैठकीची खोली म्हणतात. ढाळजेच्या जोत्याची उंची तीन फूट आहे. पुढे कमान आहे व एक मोठा चौक आहे. कमानीतून आत आल्यावर समोर पूर्व बाजूस आणखी एक प्रवेशद्वार आहे. या प्रवेशद्वाराच्या बाहेरील बाजूस १०×१० (लांबी × रुंदी) च्या दोन–दोन खोल्या आहेत तर आतील बाजूस दगडी कमान आहे. या प्रवेशद्वाराचे जोतेदेखील तीन फूट इतके उंचीचे आहे.

मधल्या प्रवेशद्वारामधून आत गेल्यानंतर प्रवेशद्वाराच्या समोर ३५ फूट लांब (उत्तर–दक्षिण) व २५ फूट रुंदी (पूर्व–पश्चिम) असलेला आयताकार चौक लागतो. या चौकाच्या तळमजल्याचा भाग फरसबंदी आहे. चौकाच्या चारी बाजूंनी तीन फूट उंचीचा चौथरा आहे. या दोन्हीच्या मध्ये खालील चौकात दगडी भुयारी गटारांची व्यवस्था केलेली आहे.

या चौकात पश्चिम बाजूस मागील प्रवेशद्वाराजवळ स्नानगृह व शौचालय बांधलेले आहे. या मध्यभागी असणाऱ्या चौकाच्या चारी बाजूंनी जो चौथरा आहे या चौथऱ्याच्या बांधकामात पूर्ण लाकडी स्तंभाचा वापर केलेला दिसतो.

होळकर वाड्यातील काष्ठशिल्पाचे स्थापत्य शास्त्रीय बारकावे :

लाकडाचा वापर हा जगभरात केला जातो. यामुळे मानवाच्या सांस्कृतिक जडणघडण संबंधीचे अनेक धागेदोरे मिळतात. लाकडाचा वापर माणूस जेव्हा रानटी अवस्थेत होता तेव्हापासून ते आजतागायत होत आहे.



मध्ययुगीन काळात मोठाल्या इमारतीमुळे लाकडी कामास खूप वाव मिळाला. या निवासी इमारतीत विविध विभाग असत, त्यात कचेरी, दिवाणखाना, नौबतखाना, खलबतखाना, हमामखाना व दौलतखाना असे अनेक विविध भाग असत. लाकूड हे सजावटीचे बनू लागले. त्यामुळे खूप मोठ्या प्रमाणावर उच्चप्रतीचे लाकडी कोरीव काम होवू लागले. या लाकडी कोरीव कामाच्या प्रतीवर एखाद्या वाड्याच्या मालकांची (वतनदारांची, सरदारांची, सावकारांची) इभ्रत समाजात ठरू लागली.[१९]

पंढरपूर येथील होळकर वाड्याच्या सजावटीमध्ये काष्ठ शिल्पाचा उपयोग केला आहे. स्तंभ (खांब), हस्त, दरवाजे व चौकटी यावरती लाकडी कोरीव काम केलेले दिसून येते.

दरवाजे / दाराच्या चौकटी :

वाड्याचा दर्शनी भाग उठावदार व इतर भागापेक्षा जास्त आकर्षक आहे. प्रवेशद्वाराचा मुख्य दरवाजा मोठा व मजबूत आहे. प्रवेशद्वार हे सपाट लाकडी फळ्या व त्यावर लाकडी चौकोनी तुकडे वापरून केलेले चौकोन हे आकर्षक तर दिसतातच परंतु त्यामुळे दरवाजाला आणखी भक्कमपणा प्राप्त झालेला दिसून येतो. वाड्याच्या आतील खोल्यांचे दरवाजे देखील अशाच प्रकारचे तयार केलेले आहेत.

मुख्य प्रवेशद्वाराला तीन लाकडी चौकटी बसविलेल्या आहेत. या लाकडी चौकटींच्या ललाटाचा भागात काष्ठशिल्पे कोरलेली असल्याने ते सुंदर दिसतात. आतील खोल्यांच्या चौकटींच्या ललाटावर काष्ठशिल्पांबरोबरच गणेशमूर्ती देखील कोरलेल्या आहेत.

खिडक्या :

सर्वसाधारणपणे मध्ययुगीन वाड्यामध्ये खिडक्यांची रचना नसे, फक्त लहान झरोखे प्रकाश हवेसाठी सोडले जात. याच्या रचनेमागचा हेतू म्हणजे सुरक्षितता होय. तळमजल्याचा विचार करता एकही खिडकी या मजल्यावर सोडल्या जात नसे. मुख्य प्रवेशद्वाराच्या वरती साधारणपणे खिडक्या सोडल्या जात असत, त्यास झरोखा दर्शन असे म्हटले जात.

होळकरांच्या वाड्याच्या मुख्य प्रवेशद्वाराचा वरचा भाग पडलेला आहे. परंतु त्या जागेत झरोखा दर्शन होते. तसेच त्यालगत या वाड्याच्या ज्या खोल्या आहेत त्या प्रत्येक खोलीतून एक-एक झरोखा दर्शन / खिडक्या आहेत. या खिडक्या बाहेरील बाजूने आकर्षक दिसतात. खिडक्यांच्या दोन्ही बाजूने दोन मातीचे स्तंभ व त्यावर कमान आहे. अशाच प्रकारच्या खिडक्या वाड्याच्या पहिल्या मजल्यावर पूर्व-पश्चिम व दक्षिणेला दिसून येतात.[२०]

खांब (स्तंभ) :

होळकर वाड्यात प्रवेशद्वारातून आत प्रवेश केल्यानंतर दोन्ही बाजूला ढाळज व पुढे चौक आहे, ढाळजे मध्ये मजबूत खांबाच्या योजना केलेली आहे. परंतु सध्या हे खांब बांधकामात झाकले गेले आहेत.

खांब हे दोन प्रकारचे असतात. गुजराती किंवा मुघल किंवा दिल्ली (मुसलमानी पद्धती) गुजराती शैलीचे खांब चौकोनी आकाराचे असतात. हा चौकोनी खांब खालून मध्यापर्यंत जवळपास साधा असतो. अनेक पारंपरिक फुला-पानांच्या कोरीव कामाने ही खांबे मध्यापासून वरपर्यंत सजविलेले असतात. वर चढत जाणारी वेल व त्याचा शेवट हा मोराच्या रचनेने केलेला असतो.[२१] यानंतर स्तंभशीर्ष येते, या स्तंभशीर्षावर अतिशय सुंदर मोर, फुले किंवा भौमितिक आकृत्या सुबकपणे कोरलेल्या आढळतात. होळकरांच्या वाड्यातील स्तंभशीर्षावर वेलबट्टी, मण्यांची माळ, फुले फारच कौशल्याने कोरलेले आहेत. या स्तंभावरूनही त्यांची सौंदर्यदृष्टी व वास्तूंचा शैली प्रकार ठरविण्यास मदत होते.

दिल्ली शैलीतील गोलाकार खांब खालून फुगीर व वरती थोडे कमी फुगीर अशी असते. यावर अनेक टोकदार झाडांच्या पानाची रचना कोरलेली असते. खांबाच्या खालच्या बाजूस एखाद्या कुंड्याची रचना तयार केलेली असते (कोरलेली असते). यात दोन कमळे आतील बाजूंना झुकल्यासारखी दर्शविली जातात. वरील बारीक होत जाणारा खांब शक्यतो साधा ठेवलेला असतो. दिल्ली शैली ही सुरू किंवा सायप्रस (Cypress) या नावाने ओळखली जाते. हे सुरुदार खांब प्रामुख्याने दगडी नक्षीदार तळखड्यावर बसविलेले असतात. या तळखड्यावर वेलपत्री, कमल पुष्प, कमलकालिका असतात. दिल्ली शैलीतील स्तंभांचा प्रभाव या वाड्यातील झरोखा दर्शन/खिडक्याच्या बाहेरील रचनेत तयार केलेल्या स्तंभावर दिसून येते.[२२]

सर :



सर हे भार सहन करणारे मुख्य घटक आहेत. म्हणून त्यांच्यावर कोरीव काम केले जात नाही, जर केले तर ते खूप कमी प्रमाणात केले जाते. सर्वसाधारणपणे जी काही सजावट केली जाते ती लांबट पद्धतीमध्ये पाना-फुलांच्या वेलबुट्टीसहित केले जाते.



काही ठिकाणी या वेलींना आंबे लटकावलेले दाखविलेले असतात.

होळकर वाड्यातील सर अतिशय साधे असून त्यावर कोणतेही नक्षीकाम केलेले नाही.

हस्त :



साध्या खांबासोबत येणारे हस्तही साधेच चौकोनी ठोकळे असतात. तर गुजराती खांबाबरोबर येणारे हस्त तरंगाचे असून त्यामध्ये उलट–सुलट कमल पुष्पे व त्यावर शृंखला कोरलेली असते. हा हस्ताचा सर्वसामान्य प्रकार होय. होळकर वाड्याच्या स्तंभावरील हस्त एखाद्या कलात्मक पानाचा अर्ध्या भागाप्रमाणे कोरलेले आहेत. या सोबत झुंबर अडकविण्यासाठी गोल लोखंडी कड्याही काही ठिकाणी दिसतात.[२३]

स्तंभशीर्ष :

स्तंभ व हस्त यांना जोडणारा भाग म्हणजे स्तंभशीर्ष होय. होळकर वाड्यातील स्तंभशीर्षावर अतिशय कलात्मक मण्यांची माळ, कमळाचे फुले, पाने कोरलेली आहेत. त्यामुळे स्तंभाचा, छतांचा भाग आकर्षक दिसतो.

तळखडे :

गुजराती शैलीतील तळखडे आणि दिल्ली शैलीतील स्तंभांचे तळखडे हे वेगवेगळे दिसून येतात. सर्वसाधारणपणे लाकडी स्तंभाचे तळखडे दगडी घडीव स्वरुपाचे असतात. अशाच प्रकारचे दगडी घडीव तळखडे होळकरांच्या वाड्यातील सर्व स्तंभाखाली आहेत.

छत :

छत हे अतिरिक्त फळीचा भाग असून फार मोठा भाग छताने व्यापलेला असतो. हे फार वेगवेगळ्या पद्धतीने कोरलेले असतात. छताचा भार सरावर असतो. सराच्या वर कडे असतात. त्या कड्या दोन सरावर टेकलेले (आधारलेले) असतात. त्या कड्यावर छतावरील मातीचा भाग सहन करण्यासाठी तक्ता (दोन कड्यामधील पूर्ण फळी) किंवा फळ्यांचे छोटे छोटे तुकडे करुन टाकले जातात. यालाच लोखंडाच्या किंवा तांब्याच्या हलकड्या लावल्या जातात आणि त्या तुकड्यावर किल्चन (लाकडाचे छिलके) टाकले जातात आणि त्यावर नंतर अर्धा किंवा एक इंच पांढऱ्या मातीचा थर व त्यावर पांढऱ्या मातीच्या विटाचा थर टाकला जातो. (त्याला माळवद असे म्हटले जाते.) ही पांढरी माती उन्हाळ्यात उष्णता रोधकाचे काम करते किंवा त्यामुळे उन्हाळ्यात माळवद थंड राहते. होळकर वाड्याचे छत विचारात घेता ते खुप साधे आहे. छताच्या पुढे आलेल्या सज्जाच्या लाकडी भागाला पानपट्टी नक्षी कोरलेली आहे.

वाड्यात असणारी मंदिरे :

वाड्याचा पाया खोदत असताना हनुमानाची हात जोडलेली (नमस्कार स्थिती) स्वयंभू मूर्ती सापडल्याने अहिल्याबाई होळकरांनी वाड्यात राममंदिर स्थापन केले. राम, लक्ष्मण आणि सीता अशा गारेच्या सुंदर मूर्ती या मंदिरात आहेत. वाड्याच्या दक्षिण बाजूस हे मंदिर आहे.[२४] या मंदिराची पूर्व–पश्चिम लांबी २०० फूट पर्यंत असून पूर्वेला रामाचे मंदिर आणि त्याच्या अगदी विरुद्ध दिशेला रामाच्या समोर हनुमान मंदिर पश्चिमेस स्थापन केलेले आहे आणि त्या मंदिरात

हनुमानाची स्वयंभू एक पाषाणी मूर्ती जी वाड्याचे काम चालू असताना मिळाली. त्या मूर्तीची स्थापना केलेली आहे.

अहिल्याबाई होळकर या शिवभक्त होत्या. त्यांनी वाड्यात शिवमंदिर स्थापना करण्यासाठी जी शिवपिंड व नंदी तयार केले होते ते राममंदिरासमोर उजव्या बाजूला एका कट्ट्यावर ठेवलेले आहेत.





वाड्यातील भुयारी गटारांची योजना :-



मानवी वस्ती म्हटले की, सांडपाण्याची व्यवस्था महत्त्वाची असते. होळकर वाड्यामध्ये सांडपाणी वाहून जाण्यासाठी दगडी गटारांची योजना उत्तम स्वरुपाची आजही कार्यरत आहे. स्वयंपाकघरातून तसेच मंदिरातून भुयारी दगडी गटारातून पाणी वाहून मागील चौकात येते आणि मागील प्रवेशद्वाराखालून बाहेर पर्यंत दगडी गटारे आहेत.



वाड्यात पाणीपुरवठा हा चंद्रभागेतून केला जात होता. पश्चिमेला

असलेल्या मागील दरवाजा समोरच चंद्रभागा वाहते. अर्थातच त्यामुळे हा परिसरही रमणीय आहे.

वाड्याचा मागील भाग :-



वाड्याचा मागील भाग म्हणजे पश्चिमेकडील जेथून चंद्रभागा नदीचे विशाल पात्र दिसते. या प्रवेशद्वाराला दिंडी दरवाजाही आहे. प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूला एक लोखंडी कलात्मकरित्या तयार केलेला जिना आहे.[२२] पायऱ्यांचा हा जिना नागमोडी वळणे घेत वरच्या मजल्यावर जातो. या पायाऱ्यांचे वैशिष्ट्य म्हणजे या जिन्याची प्रत्येक पायरी वेगळी करता येते. एकात एक हुक अडकविल्याप्रमाणे या पायऱ्या बसविलेल्या आहेत. वाड्याची पश्चिमेकडील तटबंदी नाहीशी झालेली आहे.



वाड्यातील तळघरे व भुयारी मार्ग :

मध्ययुगीन काळातील वाड्यांना तळघरे पहायला मिळतात. काही तळघरांचा अजूनही वापर होताना दिसतो. या तळघरातून भुयारी मार्ग देखील असतात. होळकर वाड्यात दोन तळघरे आहेत. ही तळघरे वाड्याचा दुसरा चौक जो पाठीमागील पश्चिमेकडील प्रवेशद्वाराअगोदर लागतो. त्या चौकाखाली दोन तळघरे आहेत, त्याचे छोटेसे प्रवेशद्वारही तिथे आहे आणि सध्या अडगळीचे सामान ठेवण्यासाठी त्या तळघरांचा वापर केला जातो. या तळघरातूनच अहिल्याबाईंनी पांडुरंग दर्शनासाठी एक भुयारी मार्ग तयार केलेला होता. साधारणपणे ४०० मीटर पर्यंत लांब हा भुयारी मार्ग आहे, परंतु सध्या तो बंद आहे.[२५]

कोरफळ येथील हागरे–पाटील यांचा वाडा :

सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील कोरफळ हे गाव बार्शीपासून पंधरा किलोमीटर अंतरावर आहे. पूर्वी बार्शी हा तालुका एक परगण्याचा भाग होता. तो निंबाळकरांच्या जहागिरीचा भाग होता. कदाचित यांच्याकडून या हागरे–पाटलांना पाटीलकीचे वतन मिळाले असावे. सध्या या हागरे–पाटलांकडे त्यांच्या वतनाचा काहीही पुरावा नाही आणि सध्या त्यांची परिस्थिती बेताचीच आहे. परंतु त्यांचा कोरफळ येथील वाडा त्यांच्या वतनदारीची साक्ष देतो आहे.[२६]



हा वाडा एक मजली असून प्रवेशद्वाराच्या बाजूचा वरचा मजला चांगल्या स्थितीत आहे. या वाड्याचे संपूर्ण बांधकाम हे दगड, वीट व

मातीमध्ये केलेले आहे आणि आतील बाजूस लाकडाचा उपयोग करुन कलात्मक स्तंभ उभे केलेले आहेत. हा वाडा आयताकृती आहे.

वाड्याचे प्रवेशद्वार :

या वाड्याला दोन प्रवेशद्वारे आहेत. मुख्य प्रवेशद्वार दक्षिणेला असून आठ ते नऊ फूट उंचीचे आहे. मुख्य प्रवेशद्वाराचे बांधकाम आकर्षक आहे. लाकडी दरवाजा मजबूत स्थितीत असून या दरवाजाच्या मजबूतीसाठी दरवाजाच्या पाठीमागे आगळ आहे.

पाठीमागचे प्रवेशद्वार :

वाड्याच्या उत्तरेला पाठीमागचे प्रवेशद्वार असून त्यामागे मोकळे पटांगण आहे. कदाचित पूर्वी तेथे बाग होती.

वाड्याची तटबंदी :



कोरफळ येथील वाड्याची तटबंदी दगड व मातीने बांधलेली मजबूत स्थितीत आहे. साधारणपणे अडीच ते तीन एकर जागेमध्ये असणाऱ्या वाड्याची तटबंदी सुस्थितीत आहे.

वाड्यातील ढाळज :

वाड्यात मुख्य प्रवेशद्वारातून प्रवेश केल्यानंतर दोन्ही बाजूला दोन ढेलजा लागतात. त्या लाकडी स्तंभावर उभ्या आहेत. त्या ढेलजामधून दोन्ही बाजूला वरती माडीवर जाण्यासाठी दगडी जिने आहेत.

तळघरे / अंबारखाना :


या वाड्यात असणाऱ्या ढेलजांच्या खाली सध्या तळघरे आहेत. या तळघरात अजूनही जाता येते. परंतु सध्या ती बंद ठेवलेली आहेत. या तळघरांचा उपयोग धान्य साठविण्यासाठी केला जात होता. परंतु अपघातात या तळघरामध्ये या घराण्यातील एका पुरुषाचा मृत्यू झाल्याने तेव्हापासून ते बंदच ठेवण्यात आले आहे.




वाड्यातील मोठे चौक :

वाड्याच्या मुख्य प्रवेशद्वारातून प्रवेश केल्यानंतर ढेलजांच्या पुढे एकामागे एक असे दोन मोठे चौक आहेत. या दोन्ही चौकांच्या मध्ये एक दरवाजा आहे. पहिल्या चौकाला लागून दोन्ही बाजूला तीन तीन खोल्या आहेत. तसेच त्यामागे असणाऱ्या दुसऱ्या चौकाच्या दोन्ही बाजूला तीन–तीन खोल्या अशा एकूण बारा खोल्या या वाड्यात आहेत. हे चौक साधारणपणे ३० × ३० चे आहेत.

पाणीपुरवठ्याची सोय :

या वाड्यात मागील चौकात एक आड आहे. ते दगडी बांधकामात रेखीव असे बांधलेले दिसून येते. तेथून शेंदून पाणी काढले जाते. आज अजूनही या वाड्यातील लोक या आडातून पाणी शेंदून काढतात. या आडाच्या वरच्या बाजूस दोन गोल छिद्र असणाऱ्या दगडी शिळा आहेत. यावरून येथे पाणी काढण्यासाठी रहाट असावेत असे दिसून येते.

स्वयंपाकघर :



वाड्यातील पहिल्या चौकातील डाव्या बाजूला असलेल्या तीन खोल्यातील मधल्या खोलीमध्ये स्वयंपाकघर आहे. या खोलीतील ज्या चुलीवर स्वयंपाक केला जातो त्यावर एक जुन्या प्रकारची चिमणी बसविली आहे. ज्याद्वारे त्या चुलीतून निघणारा धूर त्या चिमणीतून वरपर्यंत निघून वाड्याच्या वरती जाण्याची सोय केलेली आहे. ती एक जुन्या प्रकारची व वैशिष्ट्यपूर्ण चिमणी आहे.

भुयारी मार्ग :



वाड्यातील दुसऱ्या चौकातून डाव्या बाजूला एक भुयारी मार्ग आहे तो कोरफळ येथील चौकात बाहेर निघतो, असे वाड्याच्या मालकाचे म्हणणे आहे.

दगडी पाट :



या वाड्यात असणारा दगडी पाट एक चांगल्या कलेचे उदाहरण आहे. हा पाट ३ × ३ फूट असा आहे. हा पाट न्हाणी घरात असून त्याचा उपयोग आंघोळीसाठी व कपडे धुण्यासाठी केला जातो.

भुयारी गटारे :

या वाड्यातील न्हाणी घरातून बाहेर येणाऱ्या पाण्यासाठी दगडी भुयारी गटारांची योजना वैशिष्ट्यपूर्ण आहे.

हा वाडा एक एकर जागेमध्ये असून यामधील जे दोन चौकोनी चौक आहेत ते २० × २० फूट आहेत. तर असणाऱ्या खोल्या साधारणपणे १० × १५ फूट आहेत. प्रत्येक खोलीला चौकात उघडणारे दरवाजे आहेत.

वाड्याचा पहिला मजला :



वाड्याचा वरचा मजला फक्त समोरचा भाग वगळता सर्व पडझड झालेली आहे. या मजल्यावर जाण्यासाठी ढेलजामधून दोन्ही बाजूला असलेल्या जिन्यातून वर जाता येते. वरच्या मजल्यावर लाकडी स्तंभाचा जास्त वापर केलेला आहे. तसेच बाहेरील बाजूंनीही वाड्याला आकर्षक बांधकाम केलेले आहे. तसेच कौलांचाही वापर केलेला आहे.

सध्या या वाड्यामध्ये श्री. मार्तंडराव सिद्धेश्वर हागरे यांचे वंशज राहत आहेत. परंतु त्यांना स्वत:च्या इतिहासाची जास्त माहिती नाही.

टेंभुर्णी येथील देशपांडे यांचा वाडा :

सोलापूर–पुणे रस्त्यावर टेंभुर्णी हे महत्त्वाचे व्यापारी उलाढालीचे स्थान आहे. टेंभुर्णीमध्ये सदाशिवराव भाऊ माणकेश्वर यांनी बांधलेली गढी, वेस, हवेली आणि तसेच इतर वाडे, गावालगतची तटबंदी अजून बऱ्यापैकी चांगल्या अवस्थेत आहे.[२७]

टेंभुर्णी गावास छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर व औरंगजेब बादशहा दक्षिणेत आल्यानंतर खूपच राजकीय गोष्टी घडून आल्या आहेत. ३ जानेवारी १६८३ रोजी बादशहांनी रुहल्लाखानास बजाजी नायकाचा मुलगा महादजी यास टेंभुर्णीहून निघून पेडगावास पोहचवून पूर्वीप्रमाणे शहराच्या संरक्षणाबाबत सावध असावे असे लिहिण्याचा हुकूम आला. १६८३ जानेवारीमध्ये औरंगजेब बादशहाचा मुलगा आज्जमशहाने बादशहाकडे अर्ज केला. हुकुमाप्रमाणे माणिक घाटी उतरून इकडे आलो. टेंभुर्णी मार्गे पेडगावास येऊ इच्छितो.[२८]

शहाजादा आज्जम हा औरंगजेबाचा पुत्र टेंभुर्णी येथे २ ऑक्टोबर १६८२ रोजी मराठ्यांचा पाठलाग करीत असता मुक्कामास थांबला त्यावेळी भीमा नदीपलीकडे होते. पेडगाव येथे दख्खनच्या सुभेदाराचा यावेळी मुख्य तळ असे. शहाजादा आज्जम यास मराठ्यांनी पेडगावास त्रास देवू नये म्हणून बादशहा काळजी घेताना दिसतो आहे. त्यावेळी छत्रपती संभाजी राजे होते. २२ ऑक्टोबर १६८२ रोजी टेंभुर्णी येथे शहजादा आज्जमचा तळ पडला असता किलीचखान व सफदरखान हे त्यांचे बरोबर १३ हजारांचे सैन्य घेऊन भीमा नदीच्या पलीकडे मराठ्यांचा पाठलाग केला.[२९]

टेंभुर्णी गाव उत्तर पेशवाईच्या काळात मराठ्यांच्या राजकीय पटलावर प्रकाशझोतात आले. त्याला कारण पेशव्यांचे कारभारी सदाशिव माणकेश्वर यांचेमुळे होय. सवाई माधवराव पेशव्याच्या काळात सदाशिवराव भाऊ माणकेश्वर हे पुण्यास येऊन ठेवले. अंगी कीर्तनाचे उत्तम गुण असल्यामुळे पुण्यात लवकरच सवाई माधवराव आणि नाना फडणीस यांच्या राजकीय

प्रवाहात शिरले.[३०] माधवरावांच्या मृत्यूनंतर पेशवेपद रघुनाथरावांकडे गेले आणि सदाशिव माणकेश्वर हेही दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या पक्षात गेले. नाना फडणीसाच्या मृत्यूनंतर सदाशिवराव भाऊ हे बाजीरावांचा निकटवर्ती असल्याने पेशव्याने त्यांना अधिकार दिले. याच काळात पेशव्यांचे शिक्के कट्यारीच प्रत्यक्ष कारभारी म्हणून त्यांच्या हाती आला. त्यांनी नाना वाड्याजवळ स्वत:च्या मालकीचा वाडा बांधला.[३१]

२० मार्च १८०१ रोजी सदाशिव माणकेश्वर यांना अंबारीचे हत्ती इजायपतीची वस्त्रे दिली.[३२] मराठेशाहीतील प्रसिद्ध मुत्सदी व दीर्घकाळ कारभारी असलेले नाना फडणीस यांचा मृत्यू १३ मार्च १८०० रोजी पुण्यात झाला.[३३] त्यानंतर एक वर्षांनी सदाशिव माणकेश्वर हे मराठी दौलतीचे कारभारी झाले. त्यानंतर त्यांचा व हैद्राबादचा निजामाचा संबंध येऊन टेंभूर्णी हे गाव निजामाने त्यांना इनाम म्हणून दिले.[३४]

सदाशिव माणकेश्वर यांच्यावरर बाजीरावाची मर्जी सन १८१४–१५ पर्यंत कायम होती. त्यानंतर पुढे बाजीरावाने त्रिंबकजी डेंगळेला कारभारपदी नेमले आणि माणकेश्वर दिवाण मागे पडले. माणकेश्वर दिवाणांनी टेंभूर्णी येथे दोन वाडे बांधले. सन १८०० च्या सुमारास तीन मजली वाडा बांधला.[३५] एक राहता वाडा आणि सैन्य घोडे यांना राहण्या, उतरण्यासाठी दुसरा वाडा बांधला. त्यास हवेली असे म्हणतात. ही हवेली सध्या अस्तित्वात नाही. त्याच्याभोवती सहा दगडी बुरूज होते ते आता काळाच्या ओघात हळूहळू नष्ट झाले आहेत. अगदी मागच्या वर्षापर्यंत ते बुरुज चांगल्या अवस्थेत होते, असे तेथील ग्रामस्थांकडून कळते.

माणकेश्वर नंतर त्यांचा दत्तक पुत्र भाऊसाहेब देशपांडे त्यांच्यानंतर भाऊ गोविंदराव देशपांड्यांनी कारभार पाहिला. सध्या वाड्यामध्ये मंगल गोविंद देशपांडे व माई गोविंद देशपांडे या दोघीच राहतात.

टेंभुर्णी येथील माणकेश्वरांचे दोन वाडे होते. त्यापैकी एक म्हणजे हवेली म्हणून ओळखला जायचा. तो सध्या अस्तित्वात नाही. तिथे टंकसाळ होती अशी माहिती माई गोविंद देशपांडे यांनी सांगितली. परंतु त्यांच्याकडे त्याचा काहीही पुरावा नाही.

सध्या जो वाडा अस्तित्वात आहे. तो माणकेश्वरांनी राहण्यासाठी बांधलेला तीन मजली वाडा होता. सध्या त्याचा फक्त पहिला मजला अस्तित्वात आहे. परंतु त्याचीही पडझड झालेली दिसून येते. पहिला मजल्याचे बांधकाम हे विटांचे आहे. तर त्याखालील सर्व बांधकाम दगडी स्वरुपात असून भक्कम आहे. बाहेरील भिंतीची रुंदी ३ ते ४ फूट असल्याने ती मजबूत आहे. हा वाडा ७०० खणांचा आहे.

वाड्याचे प्रवेशद्वार :





वाड्याला दोन प्रवेशद्वारे आहेत. मुख्य प्रवेशद्वार पूर्वेला आहे. साधारणपणे ९ ते १० फूट उंचीचे प्रवेशद्वार अतिशय सुंदर आहे. लाकडी दरवाज्यावरती बारीक नक्षीकाम केलेले आहे आणि



दरवाजा अजूनही चांगल्या अवस्थेत आहे. पाठीमागच्या बाजूला दरवाजा बंद केल्यानंतर आगळ लावली जाते जेणेकरुन दरवाजा सहजासहजी कोणाला उघडता येवू नये आणि त्याची मजबूती वाढावी हा उद्देश होता.

मुख्य प्रवेशद्वारामधून प्रवेश केल्यानंतर दरवाजाच्या दोन्ही बाजूला ढेलजा आहेत.



त्यामधून दोन्ही बाजूंनी वरती जाण्यासाठी दगडी पायऱ्यांचे जिने आहेत. परंतु सध्या ते बंद आहेत. त्या जिन्यांमधून वाड्याच्या गच्चीत जाता येत होते. गच्चीचे वैशिष्ट्य म्हणजे त्यामध्ये चुन्याचे नक्षीकाम भिंतीवर कोरलेले आहे. सध्याही ते काही प्रमाणात अस्तित्वात आहे.



दगडी उखळ



दगडी पाट

ओसरीतून आत गेल्यानंतर वाड्याचा मोठा चौक लागतो. त्यामध्ये घोड्यांना बांधण्याच्या कड्या आहेत. या चौकाचे जोते दगडी असून भक्कम आहे. यामधील चारही बाजूंनी असलेले

लाकडी स्तंभ व त्यावरील नक्षीकाम लक्ष वेधून घेते. वाड्याचे वरील मजले पडले तरी लाकडी बांधकाम अजूनही चांगल्या स्थितीत आहे.

तसेच येथे असणारा मोठा दगडी चौरंग व दगडी उखळ लक्ष वेधून घेते. तसेच याच ठिकाणी बैल पोळा, गौराईचे सण राजेशाही स्वरुपात पार पाडले जायचे.

तळघर व भुयारी मार्ग :



या चौकातूनच ढेलजांच्या खाली तळघर आहे. यामधून आत पाहिले असता मशाली लावण्यासाठी दगडी कड्या दिसून येतात. देशपांडे यांनी सांगितलेल्या माहितीवरुन या तळघरात अजूनही भांडी व इतर साहित्य आहे. पण भितीपोटी तेथे कोणी जात नाही.

तसेच या तळघरातूनच एक भुयारी मार्गही आहे की जो नरसिंगपूरच्या मंदिराजवळ निघतो.

कुलदैवत :

सदाशिव माणकेश्वरांचे कुलदैवत नरसिंगपूरचे असल्याने वाड्यामध्ये नरसिंहाचे मंदिर आहे. तेथे अजूनही पारंपारिकरित्या पूजा केली जाते. वाड्यामध्ये सध्या एक जूना लाकडी देव्हारा आहे.



पाणी पुरवठ्याची सोय :

वाड्यामध्ये ४ × ४ चे ७० ते ८० फूट खोल असलेले आड आहे. त्या आडातून अजूनही वाड्यातील लोकांना पाणीपुरवठा होतो.

भुयारी गटारे :



वाड्याचे वैशिष्ट्ये म्हणजे येथे असणारी दगडी भुयारी गटारे. न्हाणी घरातून थेट बाहेरपर्यंत दगडी गटारे होती. तसेच सांडपाणी वाहून जाण्यासाठी दगडी बांधकामातच तशी योजना केलेली दिसून येते.

तसेच सध्या या वाड्यामध्ये दिवाणखाणा, स्वयंपाघर (आजघर, माजघर) आहेत.[३६]

मोडनिंब येथील पटवर्धनांचा राजवाडा :

सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील मोडनिंब हे गाव प्रमुख असे बाजारपेठेचे गाव



आहे. सोलापूरपासून सत्तर किलोमीटर अंतरावर असलेले मोडनिंब येथे मिरजेचे पटवर्धन जहागिरदारांचा राजवाडा आहे.[३७] राष्ट्रीय महामार्गावर असलेले मोडनिंब हे गाव पूर्वीपासूनच दळणवळणाचे केंद्र आहे. मिरज जहागिरीत मोडनिंब हे तालुका केंद्र होते. येथील राजवाडा भव्य व प्रेक्षणीय असा आहे.[३८]

मिरज येथील पटवर्धन घराण्यातील गोपाळराव गोविंद पटवर्धन यांची पत्नी सरस्वतीबाई गोपाळराव पटवर्धन यांनी सन १७८४ मध्ये काशीयात्रा केली होती. तेव्हा विधीच्या वेळी गयावळ यांनी सरस्वतीबाईंना जमिनीचे दान मागितले. परंतु त्यांनी सरस्वतीबाईंनी पेशवे सरकारातून

मिळालेल्या जमिनीचे दान देता येईना. त्यामुळे मिरज जहागिरीपैकी मोडनिंब तालुक्यातील गोविंद हरिच्या खाजगत इनामापैकी शंभर रुपये आकाराची जमीन त्यांनी इनाम दिली. अद्याप त्यांचेकडे आहे.[३९]

मोडनिंबगावापासून तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या आरण गावात ही पटवर्धनाची जमीन आहे. ती अरण–भेंड रस्त्याला लागून असून तिला शेरी म्हणून ओळखले जाते. शेरी म्हणजे पटवर्धनाची खाजगी मालकीची जमीन होय.

मोडनिंबच्या सध्याच्या मुख्य बाजारपेठेजवळच हा राजवाडा दुरावस्थेत आहे. हा वाडा साधारणपणे साडेतीन ते चार एकर जागेमध्ये असून सध्या फक्त थोडाच भाग शिल्लक आहे.



जेवढे वाड्याचे बांधकाम वरती होते, तेवढ्याच आकाराचे तळघर या वाड्याला होते. परंतु सध्या ते बंद आहे. सोलापूर जिल्ह्यातील मोडनिंबचा हा राजवाडा एक वैशिष्ट्यपूर्ण असा आहे.

दहा वर्षापूर्वीपर्यंत वाड्याला जे पाच मजले होते ते पूर्णपणे चांगल्या अवस्थेत होते. वरती तीन ते चार फूट उंचीचा कट्टा सुरक्षिततेसाठी होता. या राजवाड्याचे प्रवेशद्वार दगडी बांधकामात

होते. प्रवेशद्वारातून आत गेल्यानंतर मोठा चौकोनी दिवाणखाना होता. दिवाणखान्यातून पुढे गेल्यास मध्ये मोकळा चौक होता आणि चौकाच्या दोन्ही बाजूला खोल्यांची रचना केलेली होती.

मोडनिंबच्या राजवाड्याच्या बांधकामात जास्त प्रमाणात काचेचा उपयोग केलेला होता. वरच्या मजल्याला संपूर्ण काचा बसविलेल्या होत्या, त्यामुळे हा राजवाडा अत्यंत शोभनीय होता. तसेच या राजवाड्याच्या बांधकामात लाकूड, लोखंड व दगड, विटा, चुना, मातीचा उपयोग करून वाड्याचे मजबूत व कलात्मक बांधकाम केल्याचे दिसते. वाड्याचा प्रत्येक भाग हा कलात्मकतेच्याच दृष्टीकोनातून बनविलेला दिसतो. सध्या वाड्याचे तीनच मजले शिल्लक आहेत.

मोडनिंबच्या या राजवाड्याच्या पाणीपुरवठ्यासाठी बाहेरील बाजूला एक बारव आहे. तेथून या वाड्यात पाणीपुरवठा केला जात होता. अशा या सुंदर वाड्याचे वैभव सध्या लोप पावले आहे. परंतु इतिहासाच्या या राहिलेल्या खुणा मिटू नयेत असे वाटते.

भाळवणी येथील निंबाळकरांचा वाडा :

भाळवणी हे गाव सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यामध्ये आहे. पंढरपूर–सातारा रोडवर हे गाव आहे.[४०] सोलापूरपासून साधारणपणे ४० किलोमीटर तर पंढरपूरपासून १५ किलोमीटर अंतरावर वसलेले आहे. पंढरपूरपासून साताऱ्याला जाताना डाव्या बाजुला पाहिले असता भाळवणीच्या निंबाळकरांच्या वाड्याचे भले मोठे प्रवेशद्वार व तटबंदी लक्ष वेधून घेते.

भाळवणीचा वाडा ऐतिहासिकदृष्ट्या खूप महत्त्वाचा आहे. भाळवणीच्या नाईक निंबाळकरांचा इतिहास व पराक्रम खूप मोठा आहे.[४१]



वाड्याचे प्रवेशद्वार :

वाड्याला दोन प्रवेशद्वारे होती. भाळवणीच्या नाईक निंबाळकरांच्या वाड्याचे उत्तरेकडील प्रवेशद्वार अत्यंत भव्य आहे. हे प्रवेशद्वार गजपृष्ठाकृती आहे. साधारणपणे पंधरा ते वीस फूट उंचीचे प्रवेशद्वार अजूनही दिमाखात उभे आहे. प्रवेशद्वाराची



रुंदीही दहा ते पंधरा फूट आहे. प्रवेशद्वाराचे दरवाजे अजूनही भक्कम आहेत. दरवाज्याला उभे लांब खिळे अजूनही आहेत. शत्रूने आक्रमण केल्यास किंवा हत्तीच्या साहाय्याने दरवाजा तोडण्याचा प्रयत्न केल्यास ते अणकुचीदार खिळे हत्तीला घुसावेत व दरवाजा तोडला जावू नये असा संरक्षणात्मक उपाय केला जात होता. तो अजूनही शाबूत आहे.



दिंडी दरवाजा :



उत्तरेला असलेल्या मुख्य प्रवेशद्वाराला दिंडी दरवाजाही आहे. कारण भाळवणीचा नाईक निंबाळकरांचा वाडा हे मराठ्यांचे राजकारणाचे महत्त्वाचे ठाणे होते. वाड्यातून होणारी वर्दळही जास्त होती. त्यामुळे किरकोळ कारणांसाठी प्रत्येक वेळी वाड्याचे प्रवेशद्वार उघडले जात नव्हते. त्यासाठी दिंडी दरवाजाचा उपयोग केला

जात होता. दिंडी दरवाजा म्हणजे मोठ्या दरवाज्यालाच खालच्या बाजूला छोटा दरवाजा केला जात असे.

वाड्याची तटबंदी :

भाळवणीचा वाडा जवळजवळ चार एकर जागेमध्ये होता. या वाड्याला मजबूत अशी तटबंदी होती, ती अजूनही सुस्थितीत आहे. वाड्याची तटबंदी ही साधारणपणे चार ते साडेचार फूट रुंदी इतकी असल्याने ती अजूनही मजबूत आहे. वाड्याचीही दगडी तटबंदी सध्या दहा फूट उंची इतकी आहे. वरील भाग पडलेला आहे.

पाणीपुरवठ्याची सोय :

भाळवणीच्या निंबाळकरांच्या वाड्यात पाणीपुरवठ्यासाठी दोन ठिकाणी सोय केलेली होती. वाड्याच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूला मोठी बांधीव बारव आहे. ती चौकोनी आकारात बांधलेली असून तिला सध्याही बारमाही पाणी आहे. तसेच वाड्याच्या पाठीमागील तटबंदीच्या आतील बाजूस एक आड आहे. तेथील पाण्याचा उपयोग स्वयंपाकासाठी व इतर कामासाठी केला जात होता. सध्या याही आडात पाणी आहे. हे आड साधारणपणे शंभर फूट खोल व दगडी बांधकाम केलेले सुस्थितीत आहे.





या वाड्याच्या पूर्वेला व पश्चिमेला दोन उंचावरती टेहळणीसाठी जागा केलेली होती. त्यामुळे बाहेरील हालचालींवर लक्ष ठेवता येत असे. तसेच या वाड्यातील स्त्रियांना वाड्याच्या पाठीमागच्या तटबंदी जवळ फिरण्यासाठी व्यवस्था केलेली होती.[४२]

वैराग येथील प्रसिद्ध व्यापारी धोंगडे यांचा वाडा :



सोलापूर जिल्ह्यातील ता. बार्शी येथील वैराग गावाचा इतिहास तसा मोठा आहे. सोलापूर पासून मध्ययुगीन कालखंडात सरलष्कर निंबाजी नाईक निंबाळकर यांचे जहागिरीचे ठिकाण होते तेथे त्यांची मोठी गढी होती. सध्या या गढीचे महाद्वार शिल्लक आहे.[४३]



वैराग येथील व्यापारी श्री. गणपत धोंगडे यांचा वाडा अंदाजे पाच एकर जागेमध्ये असून त्यास एकूण चार मोठी प्रवेशद्वारे आहेत. वाड्याच्या आतील इमारती दोन मजली असून त्यातील बराचसा भाग ढासळलेल्या स्थितीत आहे. वाड्याची तटबंदी ही काही ठिकाणी ढासळलेली असली तरी वाड्याच्या प्रवेशद्वारावरुन वाड्याची भव्यता लक्षात येते. पेशव्यांच्या काळात हे धोंगडे व्यापारी लोकांना कर्जवाटपाचे काम करीत असत. जे लोक कर्ज परत फेडू शकत नसत त्यांची जमीन धोंगडे व्यापाराकडे जात असे. त्यामुळे ते वैराग येथील श्रीमंत व्यापारी धोंडगे म्हणून ओळखले जात होते. त्यांचा मूळ व्यापार हा कापसाचा होता. इंग्रजांच्या कारकीर्दीत हळूहळू त्यांची सर्व जमीन इंग्रजांच्या ताब्यात गेली.[४४]

वास्तूशास्त्राच्या दृष्टीकोनातून हा वाडा वैशिष्ट्यपूर्ण आहे. या वाड्याच्या पूर्वेकडील दरवाज्यातून प्रवेश केल्यानंतर डाव्या बाजूला दगडी ओसरी आहे तर उजव्या बाजूला दोन मजली इमारत आहे. उजवीकडील प्रवेशद्वारातून आत प्रवेश केल्यावर दरवाज्याच्या दोन्ही बाजूला वरच्या मजल्यावर जाण्यासाठी दगडी अरुंद जिने आहेत. ही इमारत चौकोनी असून ती साधारणपणे ४००० स्क्वे.फूट आहे. आतमध्ये प्रवेश केल्यावर अगदी मधोमध चार लाकडी स्तंभ १० × १० च्या चौकोनात चार ठिकाणी उभे आहेत. चारी बाजूंनी वाड्यातील खोल्यांची रचना असून हा मधला भाग अगदी वरपर्यंत मोकळा आहे. म्हणजे त्यावरती वाड्याचे छत येत नाही. त्यामुळे सूर्यप्रकाश व हवा वाड्यामध्ये खेळती रहाते आणि हा वरपर्यंत जाणारा चौकोनी भाग



तयार करताना उत्कृष्ट असे लाकडी नक्षीकाम केलेले दिसते. त्यासाठी सागवानी लाकूड वापरलेले असल्याने ते अगदी मजबूत आहे.

वैराग येथील धोंगडे यांचा वाडा हा वास्तुशास्त्राच्या दृष्टीकोनातून वैशिष्ट्यपूर्ण आहे. दुसरे वैशिष्ट्य म्हणजे या वाड्यात धान्याचाही व्यापार चालत असे. वाड्यातील दुसऱ्या मजल्यावर धान्याचे कोठार होते. सर्वसाधारणपणे धान्याचे कोठार तळघरात असते. परंतु येथे दुसऱ्या मजल्यावर धान्य साठविले जाई. परंतु या कोठाराची रचना अशी होती की, कोठाराच्या पश्चिम बाजूस असणाऱ्या खोलगट जागेत धान्य टाकले तर ते तळघरातील एका



खोलीमध्ये येत असे.

पाणीपुरवठ्याच्या सोयीसाठी इतर वाड्यांप्रमाणे आड आहे. तसेच सांडपाण्यासाठी दगडी गटारांची योजना केलेली आहे.



तसेच त्यांच्याकडे अनेक फारसी, मोडी कागदपत्रे अस्तित्वात आहेत, इंग्रजांच्या काळातील नाणी ही आहेत. त्या नाण्यांवर राणी व्हिक्टोरियाची प्रतिमा असून ते इ.स. १८४० मधील आहे. ते नाणे ईस्ट इंडिया कंपनीचे आहे. आजही अशी नाणी त्यांच्याकडे आहेत.

पंढरपूर येथील शिंदे सरकारचा वाडा :

पंढरपूर येथे महाद्वार घाटावर जो होळकरांचा वाडा आहे, त्याजवळच शिंदे सरकारचा



मोठा भव्य असा वाडा आहे. या वाड्याचेही प्रवेशद्वार भक्कम दिसून येत असले तरी वरील भाग ढासळलेला दिसून येतो.



पानिपतच्या युद्धात मराठ्यांचे सरदार ग्वाल्हेरचे जनकोजी शिंदे यांना वीरमरण आले. त्यानंतर शिंद्यांची सरदारी व जहागिरी राघोबाने स्वत:च्या अधिकारात १ जुलै सन १७६४ रोजी मानाजी शिंदेस तीन लक्ष रुपये नजराणा घेऊन दिली होती. हा मानाजी फाकडा पुणे दरबारात जी दुफळी निर्माण झाली होती, त्यावेळी राघोबाच्या बाजूने होता. परंतु माधवराव पेशव्यांनी ग्वाल्हेरची सरदारी व जहागिरी पुढे मानाजीकडून काढून घेतली व ती जहागिरी महादजी शिंद्यास देऊन राघोबाची कृती अमान्य केली.[४५]



पंढरपूर येथे महाद्वार घाटावर शिंदे सरकारचा मोठा भव्य असा वाडा आहे. या वाड्याच्या आत द्वारकाधिशाचे मंदीर बायजाबाई शिंदे या ग्वाल्हेरच्या राणीसाहेब यांनी बांधले. इ.स. १८४९ साली बांधलेल्या या मंदिराला दोन लाख रुपये खर्च त्यावेळी आला होता.[४६] बायजाबाई यांचा जन्म सन १७८४ साली सखाराम घाटगे कागल यांच्या पत्नी सुंदरबाईंच्या पोटी झाला. महादजी शिंदे यांच्या मागून दत्तक पुत्र म्हणून ग्वाल्हेरच्या गादीवर आलेले अलीजाबहाद्दर दौलतराव शिंदे यांच्याशी त्यांचा विवाह पुणे येथे १७७८ च्या मार्च महिन्यात झाला.[४७]



पंढरपूरच्या विठ्ठल भक्तीचा महिमा हा मोठा असल्याने ते विठ्ठल दर्शनासाठी वेळोवेळी येत असत व येथे मुक्काम करीत असत. त्यासाठी हा वाडा बांधला होता आणि आजही तो भक्तिसांप्रदायांसाठी खुला आहे. वाड्याच्या देखभालीचा सर्व खर्च हा ग्वाल्हेरच्या ट्रस्टकडेच आहे.

सोलापूर शहरातील श्री. सोमशेखर देशमुख यांचा वाडा :

सोलापूर शहराचा सर्वात जुना आणि मूळ भाग असलेला कसबा परिसर ही शहरातील जुनी आणि एकमेव वस्ती होती. सुमारे एक हजार वर्षांपासून शहराच्या सर्व घडामोडींचा साक्षीदार असलेला देशमुखांचा वाडा याच ठिकाणी म्हणजे दक्षिण कसब्यात अजुनही उभा आहे. सुमारे एक

हजार वर्षांपूर्वी सोलापूरवर देशमुख यांच्या पूर्वज चामलादेवी देसाई या राणीची सत्ता होती. त्या आधीपासून म्हणजे इ.स. ९३० पासून सोलापूरवर देशमुख घराण्याचा अंमल होता. या काळात अनेक साम्राज्ये आली अन् गेली. परंतु देशमुख यांच्या वतनदारीला कुठल्याही साम्राज्याने धक्का लावला नाही. बहामनी साम्राज्यापासून ते मराठ्यांच्या सोलापूर जिल्ह्यात झालेल्या पराभवापर्यंत सोलापूरचे कर्तेकरविते म्हणून सर्व अधिकार देशमुख घराण्याकडे होते.[४८]

सोलापूरात प्रसिद्ध असलेला भुईकोट किल्ला साधारण १४ व्या शतकात बहामनी साम्राज्यात बांधला असल्याचे अनेक पुरावे इतिहासकारांकडे आहेत. हा किल्ला बांधण्याचे आदेश बहामनी साम्राज्याने देशमुख यांच्या पूर्वजांना दिले आणि त्यांच्या देखरेखीखाली हा किल्ला बांधण्यात आल्याचे कागदपत्रांवरून सांगितले जाते.

पूर्वी देसाई आडनाव असलेल्या देशमुख घराण्याला त्यांची जहागिरी आणि सोलापूरची वतनदारी यामुळे देशमुख ही पदवी लागली ती आजतागायत आहे. शहरातील अनेक धार्मिक, सामाजिक, कौटुंबिक आणि इतर उत्सवाची सुरुवात करण्याचा मान आजही देशमुख घराण्याकडे आहे. सध्या हा वाडा श्री. सोमशेखर देशमुख यांच्याकडे आहे.[४९]

सोलापूर आणि परिसराच्या इतिहासकालीन घडामोडींची कागदपत्रे मिळविण्यासाठी देशातील इतिहास मंडळांनी देशमुख यांच्या वाड्याला भेट दिली होती. इ.स. १९५० साली ग.ह. खरे, बाबासाहेब पुरंदरे यांनी या वाड्यात येऊन कागदपत्रांची पाहणी केली होती. तेव्हा सर्व दस्तऐवज त्यांच्याकडून इतिहास मंडळाने अभ्यासासाठी नेले.

देशमुखांचे अधिकार :

देशमुखांना एक हजार वर्षांपासूनचा श्री सिद्धरामेश्वरांच्या पूजेचा मान आहे. देशमुखांकडे सोलापूर व आसपासच्या चाळीस गावांचा महसूल गोळा करुन तेथील प्रशासन व्यवस्था पाहण्याचे अधिकार होते. तसेच वाड्यांमध्ये न्यायव्यवस्थेचे कामकाज पाहण्यासाठी कचेरी होती. देशमुखांकडे सोलापूर, लांबोटी, बेलाटी, पाथरी, नंदूर, अर्जुनसोंड, तिऱ्हे, उळे, राणेगाव,

भइटणे, निंबर्गी, भंडारकवठे, कडबगाव, हिप्परगे, सावळेश्वर, कोंडी, सीरापूर, डोणगाव, हगलूर, बोरामणी, दोड्डी, शेळगी, बाळे इ. गावे होती.[५०]

सुमारे ३०० वर्षांपूर्वी ३ एकराच्या परिसरात असणारा देशमुखांचा वाडा म्हणजे सोलापूरचे चालते बोलते सरकार होते. चुना आणि सिमेंटचा शोध लागण्यापूर्वी केवळ दगड–





मातीने उभारण्यात आलेल्या या वाड्यामध्ये वेळोवेळी बदल करण्यात आले, परंतु त्याचा मूळ गाभा आजही तसाच आहे.

पूर्वी वाड्यात कचेरी, न्यायालय, तुरुंग, घोड्याचा पागा आणि तेथे काम करणाऱ्यांसाठी निवासस्थाने होती. सध्या अस्तित्वात असलेली महानगरपालिकेची ३ नंबर शाळा पूर्वी देशमुख वाड्याचा एक भाग होती.

पाणीपुरवठ्याची सोय :

देशमुखांच्या वाड्यात पाणीपुरवठा हा सिद्धेश्वर तलावातून होत असे. पाणीपुरवठा हा पखाली मार्फत होत असे. वाड्याच्या पश्चिमेला असलेल्या तटबंदीला बाहेरील बाजूला एक दगडी





वाटी आहे तर आतील बाजूला एक दगडी हौद आहे. बाहेरील दगडी वाटीत पाणी ओतले की ते आतील दगडी हौदात पडत असे. या दगडी हौदाला सुंदर गोमुख आहे, नंतर या गोमुखातून पाणी



वाड्यातील वेगवेगळ्या भागातील छोट्या-छोट्या हौदांत जात असे, तशी व्यवस्था केलेली होती.[५१] देशमुखांच्या या वाड्याची धार्मिक परंपरा ही खूप मोठी आहे. हजार वर्षांपासून देशमुख वाड्यात असलेली सिद्धेश्वरांची कावड आजही श्रीशैलला जाते. तेथून आल्यावर सोलापूर शहरात मिरवणूक होवून ती परत वाड्यात आणली जाते. तसेच ८०० वर्षांपूर्वीचा सिद्धरामेश्वरांचा चांदीचा योगदंड आजही देशमुख वाड्यांत मनोभावे पुजला जातो. श्री किरीटेश्वर महाराज ज्यांची नेहमी देशमुखांवर

कृपादृष्टी होती, त्यांनी वाड्याच्या शेजारी जिवंत समाधी घेतली त्यांचा जुना किरीट देशमुखांच्या देवघरात पुजला जातो.

जानेवारी महिन्यात सिद्धरामेश्वरांच्या यात्रेत पहिला मान देशमुखांना मिळतो. ही परंपरा अनेक वर्षांपासून आजही चालते आहे.





देशमुख वाड्याची मुख्य प्रवेशद्वाराची कमान चांगल्या स्थितीत असून दरवाजे मात्र अलीकडील काळात बनविलेले आहेत. मुख्य प्रवेशद्वाराच्या आत वाड्यातील जुनी जात्यांची पाळे तसेच उखळ ठेवून सजावट व बाग केलेली आहे.

सोलापूर शहरातील देशमुखांचा जुना वाडा आपली परंपरा व मान अजुनही टिकवून आहे. त्यांच्याकडे जुनी काही शस्त्रे आहेत. वाड्याच्या आतील भागात त्यांनी बरेच बदल केले असले तरी मुख्य प्रवेशद्वार, आतील प्रवेशद्वार, वाड्याची ओसरी, चौक व त्यावरील लाकडी स्तंभ वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

सोलापूर जिल्ह्यातील म्हणजे मध्ययुगीन सोलापूर परगण्यात अनेक वैशिष्ट्यपूर्ण वाड्यांची निर्मिती झाली. वाड्यांच्या बांधकामात, आकारमानात बरेच साम्य आढळते. गजपृष्ठाकृती, चापाकृती प्रवेशद्वारे, दगडी तटबंदी, आतील ढाळज, खोल्यांची व्यवस्था, अरूंद

जिने यामध्ये बऱ्याच वाड्यात साम्य दिसून येते. तसेच पाणीपुरवठ्यासाठी आड, दगडाला चीर पाडून तयार केलेली सांडपाणी बाहेर वाहून जाण्यासाठी केलेली व्यवस्था दिसून येते.

अहिल्यादेवी होळकर यांच्या पंढरपूर येथील वाड्यातील चौकात मजबूत लाकडी स्तंभ असून हस्तावरील नक्षीकाम सुंदर आहे. तसेच या वाड्याच्या खिडक्या, जिनाही आकर्षक व मजबूत आहे. मध्ययुगीन वाड्यांच्या संस्कृतीत खिडक्यांना, सज्जांना सौंदर्य आणण्यासाठी बाहेरील बाजूंनी आकर्षक कमानी बांधलेल्या दिसून येतात. वाड्यांमध्ये घोड्यांची पागा व कचेऱ्याही असत. भाळवणीचा नाईकनिंबाळकरांचा वाडा, सोलापूर शहरातील देशमुखांचा वाडा यांच्याकडील वतनदारीत मोठा प्रदेश होता, त्यामुळे तेथील प्रशासन त्यांच्या अधिकाराखाली येत असे. महसूल गोळा करणे, न्याय–निवाडा करणे यांसारखी कामे ते करीत. त्यामुळे त्यांच्याकडे अनेक व्यावहारिक कागदपत्रे आहेत. वैराग, ता. बार्शी येथील धोंगडे व्यापारी यांच्याकडेही हिशोबाच्या अनेक वह्या आहेत. कर्जे दिलेली मोडी कागदपत्रे आहेत. तसेच या धोंगडे व्यापाऱ्यांचा वाडाही भव्य आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. मध्ययुगीन काळात हे व्यापारी अतिशय श्रीमंत व प्रसिद्ध होते. शेतकऱ्यांना कर्ज वाटत असत. जे शेतकरी कर्ज फेडू शकत नव्हते, त्यांना जमिनी विकाव्या लागत असत. त्यामुळे त्यांच्याकडे जमिनीचे क्षेत्रही मोठे होते, परंतु इंग्रजांच्या काळात त्यांची जमीन काढून घेण्यात आली. परंतु त्यावेळी त्यांनी बांधलेला वाडा आकर्षक आहे. त्याची भव्य प्रवेशद्वारे, वाड्यातील सुंदर लाकडी चौक वाड्याची शोभा वाढवतो. तसेच बांधकामतंत्राचा विचार केला असता वाडा वैशिष्ट्यपूर्ण आहे.

संदर्भ ग्रंथ सूची :-

१) मराठी विश्वकोश, खंड १६, सूची २, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, लेख व आय.डी. ९९९०.

२) कुलकर्णी अ. रा., खरे ग. ह., मराठ्यांचा इतिहास खंड दुसरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, ३०, पृ.क्र. ४०१.

३) माटे मा. श्री., प्राचीन कलाभारती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पृ.क्र. १०३.

४) Mate M. S., Maratha Architecture, Continental Publication, Page No. 17.

५) गायकवाड, सरदेसाई, थोरात, हनमाने, मराठेकालीन संस्था व विचार, फडके बुक सेलर्स, १९९०, पृ.क्र. ४१५.

६) कित्ता, पृ.क्र. ४१५.

७) उपरोक्त, गायकवाड, सरदेसाई, हनमाने, थोरात, पृ.क्र. ४१६.

८) घाणेकर प्र.क., पेशव्यांचे अधिकृत निवासस्थान- शनिवारवाडा, स्नेहल प्रकाशन, पुणे, २०१३, पृ.क्र. २६.

९) उपरोक्त, गायकवाड, सरदेसाई, पृ.क्र. ४१७.

१०) कित्ता, पृ.क्र. ४१६.

११) कित्ता, पृ.क्र. ४१७.

१२) कित्ता, पृ.क्र. ४१८.

१३) कित्ता, पृ.क्र. ४१९.

१४) उपरोक्त, घाणेकर प्र.के., पृ.क्र. ३७.

१५) उपरोक्त, कुलकर्णी अ.रा., खेर ग.ह., मराठ्यांचा इतिहास खंड-२, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, ३०, पृ.क्र. ३७५.

१६) Gazetteer of the Bombay Presidency, Solapur District, Facsimile Reproduction, Vol. XX, The Government of Maharashtra, Mumbai, 1997, Page No. 415.

१७) Mr. wikipedia.org/wiki/पंढरपूर (११/१२/२०१४)

१८) Op.Cit. Gazetteer of the Bombay Presidency, Page No. 416

१९) माटे एम.एस., डेक्कन वुडवर्क, पुणे, १९६७, पृ.क्र. ४१४.

२०) मोरवंचीकर रा. श्री., पैठण दर्शन पुरातत्व व वस्तूसंग्रहालयाचे विभाग, मुंबई, १९८५, पृ.क्र. ७१.

२१) मोरवंचीकर रा.श्री., मॅनासिन्स ॲण्ड मोनोस्टोरीज ऑफ पैठण, शिवाजी ॲण्ड फॅसिट ऑफ मराठा कल्चर, संपादक सरयु जोशी, मार्ग पब्लिकेशन्स, मुंबई, १९८२, पृ.क्र. ११३.

२२) मोरवंचीकर रा.श्री., वुडवर्क इन वेस्टर्न इंडिया.

२३) मोरवंचीकर रा. श्री., पैठण येथील काही ऐतिहासिक वास्तू, भारत इतिहास संशोधन मंडळ, त्रैमासिक, महाराष्ट्र इतिहास परिषद, पुणे (निबंध), १९८३, पृ.क्र. २१६.

२४) Optic, Gazetteer of Bombay Presidency, Page No. 416.

२५) प्रत्यक्ष मुलाखत– श्री. चंद्रकांत पुरुषोत्तम दंडवते.

२६) प्रत्यक्ष मुलाखत– श्री. मार्तंडराव सिद्धेश्वर हागरे–पाटील.

२७) Optic, Gazetteer of Bombay Presidency, Page No. 503.

२८) खरे ग. ह., कुलकर्णी गो. त्र., ऐतिहासिक फारसी साहित्य खंड ६ वा, औरंगजेबाच्या दरबारचे अखबार, भा.इ.सं.मं. स्वीय ग्रंथमाला क्र. १६६, १९७३, पृ.क्र. २४४.

२९) कित्ता, पृ.क्र. २५५.

३०) अकलुजकर सरस्वतीबाई, वैद्य सरोजिनी, राजहंस प्रकाशन, २०००, पृ.क्र. ३.

३१) कित्ता, पृ.क्र. ४.

३२) खरे य. वा., ऐतिहासिक लेखसंग्रह खंड १३, मिरज, पृ.क्र. ६८९३.

३३) खोबरेकर वि. गो., महाराष्ट्राचा इतिहास, मराठा कालखंड (भाग २) (१७०७ ते १८१८) म.रा.सा.सं. मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती, १९८८, पृ.क्र. ५१५.

३४) अकलुजकर सरस्वतीबाई, वैद्य सरोजिनी, आठवणी काळाच्या..... माणसाच्या, राजहंस प्रकाशन, २०००, पृ.क्र. ५.

३५) कित्ता, पृ.क्र. १, ७.

३६) प्रत्यक्ष मुलाखत– माई गोविंद देशपांडे.

३७) सोलापूर जिल्हा गॅझेटियर, पृ.क्र.

३८) खरे वा. वा., ऐतिहासिक लेखसंग्रह, ७, पृ.क्र. ३८०२.

३९) देशमुख गोपाळ, सोलापूर जिल्ह्याचा इतिहास, मराठा कालखंड भाग–१, (इ.स. १६०० ते इ.स. १८५०), रेवू प्रकाशन, पंढरपूर, पृ.क्र. ५२७.

४०) महाराष्ट्राचे जिल्हे, सोलापूर जिल्हा, पृ.क्र. १७.

४१) उपरोक्त, देशमुख गोपाळ, पृ.क्र. १७.

४२) प्रत्यक्ष मुलाखत– श्री. राजेंद्रसिंह पांडुरंग नाईकनिंबाळकर.

४३) पानसे के. र., संपादक, पानसे म.भा. पानसे घराण्याचा इतिहास, भारत इतिहास संशोधक मंडळ पुरस्कृत ग्रंथमाला, २०, १९७८, पृ.क्र. २३७.

४४) प्रत्यक्ष मुलाखत, श्री. गणपत धोंगडे.

४५) देशमुख गोपाळराव, दोन राजधान्या, मंगळवेढा, ब्रम्हपुरीचा इतिहास, कौसल्या पब्लिकेशन, सोलापूर, पृ.क्र. १४०.

४६) पारसनीस द. ब., बायजाबाई शिंदे यांचे चरित्र, प्रकाशक बाबाजी सखाराम आणिा कंपनी, मुंबई, पृ.क्र. २४.

४७) कित्ता, पृ.क्र. २९.

४८) खरे ग. ह., सोलापूरची ऐतिहासिक कागदपत्रे, लेखांक ३, १९५४, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे.

४९) सबकुछ सोलापूर, किल्ल्याहूनही जुना देशमुख वाडा, लोकमत, सोलापूर, १८ डिसेंबर २०१३.

५०) वतन कागदपत्रांचे केलेले भाषांतर.

५१) प्रकट मुलाखत, श्री. सोमशेखर देशमुख.

प्रकरण ५ वे

सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन काळातील पुरातत्त्वीय स्थळे

भारताला कला–संस्कृती जपणारा देश म्हणून ओळखले जाते. येथे प्राचीन मध्ययुगीन अनेक वस्तू आणि वास्तू आहेत. भारतामध्ये डोळ्यांचे पारणे फिटविणाऱ्या या आकर्षक कलाकृती पाहण्यास देशविदेशातून अनेक पर्यटक येतात. भारतामध्ये इ.स. १७८४ साली एशियाटीक सोसायटीची स्थापना झाली आणि त्यानंतर पुरातत्त्व शास्त्राच्या अभ्यासाला गती आली. सर विल्यम जोन्स हे त्यावेळी प्रमुख होते. १८६० साली आर्किऑलॉजिकल सर्वे ऑफ इंडियाची स्थापना झाली. अलेक्झांडर कॅनिंग हॅम हे या खात्याचे महानिदेशक होते. बर्जेस, सर जॉन मार्शल, रावबहादुर दीक्षित, सर मार्टिमर व्हीलर इत्यादींनी पुरातत्त्व खात्याचे महानिर्देशक म्हणून काम पाहिले. तसेच भारतात महत्त्वाची उत्खनने त्यांच्या मार्गदर्शनाखाली झाली.[१]

पुरातन मानवी संस्कृतीचा अभ्यास म्हणजेच पुरातत्त्वशास्त्र होय. दैनंदिन व्यवहार, त्यांचे सामाजिक संबंध, त्याने निर्माण केलेल्या वस्तू आणि वास्तू या सर्वांचा अभ्यास पुरातत्त्वशास्त्र करते. सोलापूर जिल्ह्याला प्राचीन ऐतिहासिक परंपरा आहे. येथे असलेल्या प्राचीन पुरातत्त्वीय अवशेषांमध्ये प्राचीन मंदिरे, शिल्पे, मूर्ती, विरगळ, शिलालेख, मस्जिद हे मोठ्या प्रमाणात आहेत. तसेच सोलापूर शहरात मोठा भुईकोट किल्ला आहे. या सर्वांचा अभ्यास वेगवेगळ्या संशोधकांनी केलेला आहे.[२]

सोलापूर जिल्ह्यात सोलापूर विद्यापीठ पुरातत्त्व विभागाच्या पुढाकाराने चार ठिकाणी उत्खनने झालेली आहेत. मुंढवी, सिद्धापूर, ता. मंगळवेढा, वाकाव, ता. माढा आणि कारकल, ता.द. सोलापूर येथे उत्खननाद्वारे वेगवेगळ्या संस्कृतीचे पुरावे मिळाले आहेत. संशोधिकेने वाकाव आणि कारकल येथील उत्खननात स्वत: सहभाग घेतला आहे.

सोलापूर जिल्ह्यात पुरातत्त्वीय अवशेष मोठ्या प्रमाणावर आहेत, परंतु संशोधिकेने विषयास अनुसरून सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन काळातील गढ्या आणि वाडे यानुसार पुरातत्त्वीय स्थळांविषयी अभ्यास केला आहे. सोलापूर जिल्ह्यात मध्ययुगीन काळात मराठे आणि

मोगल यांच्यात कित्येक वर्षे मोठ्या प्रमाणात संघर्ष चालू होता. या संघर्षाचा पहिला बळी गावातील वतनदार हा ठरे. तेव्हा या वतनदारांनी स्वत:च्या रक्षणासाठी गढ्यांची निर्मिती केली. भुईकोट किल्ला बांधण्यासाठी मोठी जागा आणि त्याचा खर्चही मोठ्या प्रमाणात येई. त्यामुळे त्याला पर्यायी मार्ग म्हणून गढीची निर्मिती झाली. गढी ही किल्ल्यासारखीच असे, पण तिचे स्वरूप लहान असे. वतनदार हा गढीतच आपल्या राहण्याची व्यवस्था करीत असे. मध्ययुगात अशा शेकडो गढ्यांची निर्मिती महाराष्ट्रात झाली. ब्रिटिशकाळानंतर मात्र वतनदार जहागिरदारांचे अधिकार काढून घेण्यात आले. त्यामुळे गढ्यांच्या दुर्दशेस सुरुवात झाली.[३] नवीन शस्त्रास्त्रांपुढे या गढ्यांचा टिकाव लागणे शक्य नव्हते, त्याचप्रमाणे ब्रिटिशांची ताकद एवढी मोठी होती की, ते तेथील लहान सत्तेला डोके वर काढू देणे शक्य नव्हते. अतएव या गढ्यांचे महत्त्व संपुष्टात आले. आज जरी या गढ्यांचे महत्त्व संपुष्टात आले तरी मध्ययुगात मात्र या गढ्यांनी महाराष्ट्राची अस्मिता जपण्यास फार मोठा हातभार लावला होता. शत्रूचा प्रतिकार करण्यात त्यांनी मोठे धैर्य दाखविले होते. शत्रूला पाणी पाजून आपले स्वातंत्र्य राखले होते.[४]

आज ह्या गढ्या आणि वाडे जेव्हा पहावयास जातो तेव्हा तेथील अवस्था फार वाईट दिसून येते. गढ्या, वाड्यांची पडझड झालेली दिसून येते. ज्या गढ्या आणि वाडे नष्ट होत चालले आहेत. ते पुन्हा कधीही निर्माण होणार नाहीत. त्यासाठी अशा गढ्या आणि वाड्यांचे जतन होणे आवश्यक आहे.

सोलापूर जिल्ह्यातील पुरातत्त्वीय स्थळांमध्ये गुरसाळे, ता. पंढरपूर येथील कवडे–पाटील यांची गढी, सुरडी, ता. बार्शी येथील नाईक निंबाळकर यांची गढी, पानगाव, ता. बार्शी येथील दर्याबाई नाईक निंबाळकर यांची गढी विशेष उल्लेखनीय आहेत. या गढ्या जमीनदोस्त झालेल्या असून यांची तळघरे व त्यावर ठिकठिकाणी मातीचे ढिगारे साचलेले दिसून येतात. गढीचे मालक हे दुसरीकडे रहायला गेल्याने तो भाग ओसाड पडलेला आहे. त्याचबरोबर औरंगजेब बादशहाची छावणी असलेले ब्रम्हपुरी, ता. मंगळवेढा, माचणूर, ता. मंगळवेढा येथील किल्लेवजा गढी आणि इंग्रज–मराठा यांचे शेवटचे युद्ध झालेले ठिकाण म्हणजे आष्टी, ता. मोहोळ ही ठिकाणे पुरातत्त्वीय स्थळे आहेत. येथे अजूनही मध्ययुगीन इतिहासातील अनेक अवशेष मिळतात.

ब्रम्हपुरी (इस्लामपुरी), ता. मंगळवेढा येथील औरंगजेब बादशहाची छावणी :

मंगळवेढा तालुक्यातील ब्रम्हपुरी हे छोटेखानी गाव असून भीमा नदीच्या दक्षिण तिरावर वसलेले आहे. सोलापूर पासून चाळीस किलोमीटर अंतरावर असलेले हे गाव जरी आता उपेक्षित स्थितीत असले तरी सतराव्या शतकातील राजकीय घडामोडी घडलेले महत्त्वाचे ठिकाण आहे.[५]

ब्रम्हपुरी हे नाव भाळवणीच्या कन्नड शिलालेखात *'ब्राह्मणांची वस्ती'* या अर्थाने तो शब्द वापरलेला आहे.[६] ब्रम्हपुरी येथे शहेनशहा औरंगजेब सन १६९५ ते १६९९ पर्यंत या गावी छावणी करुन राहिला होता. मोगलांचे साम्राज्य यावेळी काबुल कंदाहारपासून ते थेट दक्षिणेकडील प्रदेशात पसरलेले होते. त्या सर्व भूप्रदेशावर सत्ता गाजविणारा बादशहाच आपला कुटुंब कबिला, सुना, नातवंडे आणि प्रमुख अमीर उमराव यांचेसह याठिकाणी छावणी करुन होता. साऱ्या मोगल साम्राज्याचा कारभार 'ब्रम्हपुरी' च्या तळावर केंद्रित झालेला होता. बादशहा चार–साडेचार वर्षाच्या वास्तव्यानंतर जरी मराठ्यांचे गड किल्ले घेण्यासाठी सन १६९९ ला बाहेर पडला तरी तेथून पुढील चार वर्षे बादशहाची बेगम, त्याची कन्या, शहाजादा कामबक्ष आणि मोगल साम्राज्याचा वजीर असे सर्वजण सन १७०३ पर्यंत याच छावणीत होते. बादशहाची छावणी ब्रम्हपुरी गावी २१ मे १६९५ रोजी आली. या काळात ब्रम्हपुरीचे नाव बदलून ते *'इस्लामपुरी'* असे करण्यात आले.[७] ईस्लामपुरी तथा ब्रम्हपुरी या छोटेखाली गावास त्यावेळी परगण्याचा दर्जा दिला होता. हा दर्जा १७०५–०६ पर्यंत दिला गेल्याचे दिसून येते.[८]

दिल्लीच्या तख्तावर सन १६५८ पासून औरंगजेब आलमगीर गाजी पदवी धारण करून राज्यकारभार करीत होता. शहजादा अकबरने आपल्या बापाविरुद्ध बंड केले आणि तो छत्रपती संभाजी राजांच्या आश्रयाला दक्षिणेत आला. त्यासाठी औरंगजेब दक्षिणेत आला होता.[९] अकबराने संभाजीबरोबर साधलेली युती म्हणजे मोगल साम्राज्याला निर्माण झालेला एक प्रचंड मोठा धोका होता. त्यामुळे बादशहाला आपल्या सर्व शक्ती दक्षिणेकडे एकवटाव्या लागल्या आणि खुद्द त्यालाच या कार्यासाठी दक्षिणेकडे प्रयाण करावे लागले.[१०] औरंगजेब बादशहा दक्षिणेत आला तो त्याचा पुत्र अकबराने केलेले बंड चिरडून टाकण्यासाठी. पण पुत्र अकबर बादशहाच्या हाती लागलाच नाही. मराठ्यांची मदत घेऊन पुन: उत्तरेकडे जाण्याचा त्याचा बेतही सफल झाला नाही.

त्याने हिंदुस्थानची भूमी सोडली. सन १६८७ च्या फेब्रुवारीत राजापूर येथे इंग्रजी गलबतावर तो स्वार झाला. त्याने मस्कत गाठले. पुढे इराणच्या बादशहाने त्यास आश्रय दिला. त्याच ठिकाणी त्याचा मृत्यू पुढे सन १७०४ मध्ये झाला.[११] अजमेरहून सन १६८१ च्या सप्टेंबरमध्ये बादशहा दक्षिणेकडे निघाला तेव्हा त्याचे एकमेव ध्येय म्हणजे काहीही होवो, शहाजादा अकबराला आश्रय देणाऱ्या संभाजीचा नाश करणे हा होता. त्यासाठी छत्रपती संभाजींविरुद्ध बादशहाने युद्ध पुकारले होते.[१२] विजापूरचा आदिलशहा, गोवळकोंड्याचा कुतुबशहा व छत्रपती संभाजीराजे या दक्षिणेतील सर्व सत्ताधिशांना सन १६८९ पर्यंत बादशहाने जिंकले. जिंकलेला सर्व प्रदेशामुळे मोगल साम्राज्यास निर्विवाद सार्वभौमत्त्व प्राप्त झाले.

औरंगजेबाला मिळालेले हे यश मात्र प्रत्यक्षात फक्त देखावा असण्यापुरतेच होते. त्याच्या सर्व नाशांची ती केवळ सुरुवात होती. कारण इ.स. १६८९ वर्षाच्या अखेरला मराठ्यांचा नवा छत्रपती राजा राजाराम जिंजीच्या किल्ल्यात जाऊन पोहोचल्याची बातमी बादशहाकडे आली. यापुढे पूर्व किनाऱ्यावरील मराठ्यांच्या चढाईचे जिंजी हे प्रमुख ठिकाण बनले. त्यामुळे बादशहाच्या अडचणी वाढल्या. जरी मराठ्यांचे मध्यवर्ती सरकार आणि राज्याची धुरा वाहणारा शास्ता यांचा अस्त झाला होता तरी मराठ्यांचा प्रत्येक अधिकारी स्वत:च्या हिंमतीवर आपल्या सैनिकानिशी लढे व मोगल राज्याच्या वेगवेगळ्या प्रांतात छापे घाली. औरंगजेब बादशहाने सर्वात मोठा मुलगा शहाआलम याला मोगल साम्राज्याच्या वायव्येकडील प्रदेशावर म्हणजे पंजाब, सिंध व अफगाणिस्तान यावर राज्यकारभार करण्यासाठी रवाना केले. त्याने स्वत: इस्लामपुरी येथे पुढील साडेचार वर्षे मुक्काम केला.[१३]

मराठ्यांचा छत्रपती राजाराम जिंजीच्या किल्ल्यात होता त्यावेळी मोगलांचा सेनाली झुल्फीकार खान याने जिंजीला वेढा दिला होता. संताजी, धनाजी हे मराठे सेनाली मोगलांच्या सेनेचा ठिकठिकाणी वचपा काढीत होते. त्यासाठी लष्करी हालचाली सुकर होणे, देखरेख करणे, सैन्यसामुग्री वेळेवर पोचणेसाठी बादशहाने ब्रह्मपुरी येथे छावणी केली होती. या छावणीचा विस्तार प्रचंड होता. छावणीत एकंदर २५० बाजार असून तिचा विस्तार तीस मैलांपर्यंत असे. एकंदर छावणीचा परीघ कधी पाच तर कधी साडेसात मैल असे, असेही छावणीचे वर्णन नोंदलेले आहे.[१४]

औरंगजेबाची छावणी म्हणजे नुसती एका सेनापतीची युद्धाची जय्यत तयारी असलेली छावणी नव्हती, तर ती राजधानीच होती. राज्याचे सर्व खाते प्रमुख छावणीत असत. दप्तरखाना, किताबखाना, महसुल संरक्षण, न्याय, इनामे असलेले सर्व व्यवहार छावणीत चालत असत. स्वत: बादशहा कचेरीत बसून प्रकरणे निकाली काढी. छावणीत निरनिराळे अधिकारी, सरदार, त्यांच्या कचेऱ्या, त्यांची पथके, सैनिक शिपायांची बायकामुले, नोकरचाकर, धान्याचा बाजार इ. ची गर्दी असे. हत्ती, घोडे, गाड्या, तोफा इ. कारखाने असत. छावणीच्या व्यवस्थापकाला कोतवाल म्हणत असत.[१५]

छावणीच्या मधोमध बादशहाची कचेरी व निवासस्थान असे, यास दौलतखाना म्हणत. निवासस्थान, दिवाणे आम, दिवाणे खास, अंत:पुर इ. असत. निवासस्थानाचा घेर निदान एक कोसाचा असे. त्याच्या भोवती लाकडी फळ्यांचे कंपाऊंड असे. या फळ्यांचा रंग गुलालाचा असल्यामुळे बादशहाच्या निवासस्थानाला *'गुलाल बार'* म्हणत. मराठ्यांच्या हल्ल्यापासून छावणीचे रक्षण करण्यासाठी छावणीच्या भोवती मातीच्या भिंती उभ्या करीत अगर काटेरी कुंपण घालीत.[१६]



बादशहाचे निवासस्थानाभोवती चार–पाच हजार स्वरांचा पहारा असे. पहाऱ्याचे काम प्रतिष्ठित उमरावाकडे पाळीपाळीने देण्यात येई. बादशहा दक्षिणेकडे आपले कुटुंबीय नातेवाईक आणि नातेवाईकांची कुटुंबीय मंडळी यांचेसह आला. शहजादा कामबक्ष, बंडखोर शहाजादा

अकबर याची दोन मुले, शहाजादा आज्जमची दोन मुले, बादशहाचा वजीर म्हणजे मुख्य प्रधान आसदखान, त्याचा मुलगा झुल्फीकार खाान हा मोगल सैन्याचा सेनापती होता. आसदखानाचा मामेभाऊ बहरामंद खान हा बादशहाच्या मावसबहिणीचा म्हणजे हमीदाबानुचा मुलगा रुहुल्लाखान हा बादशहाचा खानसामा होता.

मुमताजमहल ही बादशहाची आई होय. आईकडील नातेवाईक सुहराब खान व त्याचा मुलगा आकिबत महमुद सजावरखान, शाईस्तेखानाचा मुलगा खुदाबंदा खान, दिलरासाबानु बेगम ही बादशहाची पत्नी असे अनेक नातेवाईक बादशहा औरंगजेब बरोबर ब्रम्हपुरीच्या छावणीत होते.[१७] तसेच मराठे मनसबदारही बादशहाच्या छावणीत होते. छत्रपती शाहू यांना बादशहाने सप्तहजारी मनसब व राजा ही पदवी दिली, त्याचप्रमाणे कान्होजी शिर्के, अचलोजी महाडीक, नागोजी माने, बहिर्जी पांढरे, सटवाजी डफळे, जगदेवराव जाधव अशी मंडळी बादशहा बरोबर छावणीत असत. तसेच बादशहाच्या छावणीत रजपूत राजांमध्ये बुंदेलखंडातील रावदलपत बुंदेला व ओछ्र्याचा अवधुतसिंग, बेकानेरचा राजा सुजानसिंग होता.[१८] मात्र रजपुत काय किंवा मराठे काय बादशहा त्यांना स्वतंत्र मोहिमा देत नसे. त्यावेळी मराठ्यांच्या बाजूने छत्रपती राजारामाला सल्लामसलत देणारे रामचंद्रपंत अमात्य, सेनापती संताजी घोरपडे, सेनापती धनाजी जाधव यांच्याकडे बादशहाला तोंड देऊन प्रतिकार करण्याचे नेतृत्व दिले होते.[१९]

वजीर आसदखान याचा मुलगा इतिकादखान याने १९ ऑक्टोबर १६८९ रोजी रायगड हा राजधानीचा किल्ला जिंकला. त्याने छत्रपतींच्या राणी सकवारबाई साहेब, महाराणी येसुबाई साहेब, बाल शाहुराजे, छत्रपती संभाजीराजे व राजाराम महाराजांच्या मुलास व बायकास कैद केले.[२०] इतिकादखानाने या सर्वांना त्यावेळी बादशहाचा तळ तुळापुरास होता तिकडे नेले. शाहुंबरोबर रायगडावर कित्येक मराठा सरदारांची कुटुंबे झुल्फीकारखानाने कैद केली. त्यात प्रतापराव गुजराचे कुटुंब होते. छत्रपती शिवरायांच्या राणीसाहेब सकवारबाई याही बादशहाच्या कैदेत होत्या. त्यानंतर सर्वजण ब्रह्मपुरीतील छावणीत आले. बादशहाच्या कैदेत असताना शाहू महाराजांना सप्तहजारी मनसबीबरोबर स्वतंत्र नगारा, निशाणा बादशहाने दिले होते.[२१]

शाहू महाराज यांचे बरोबर विठ्ठल विश्वनाथ घैसास होता. ब्रह्मपुरी येथे तो शाहू महाराजांसोबत राहून एकनिष्ठपणे सेवा करीत होता. शिवाय ज्योत्याजी केसकर, उद्धव योगदेव, मोरोपंत सबनीस, कारभारी, कारकून, कारखानदार इ. पाचशे पर्यंत लोक कैदेत करुन ब्रम्हपुरी येथे ठेवले होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राणीसाहेब सकवारबाई साहेब ब्रह्मपुरीच्या छावणीत होत्या. शिवछत्रपतींच्या पूजेतील बाण त्यांच्याकडे या छावणीत होता. त्याची मनोभावे त्या दररोज पूजा करीत असत. त्यावरुन ब्रह्मपुरीपची ही छावणीची जागा मराठी माणसाला पवित्र आहे.[२२]

बादशहाच्या छावणीतील राजकन्या आणि बेगमा यांचे राहणीमान, दागदागिने, कपडेलत्ते यावरील खर्च विलक्षण होता. तो एक कोटीपेक्षा कमी नव्हता. यातूनच सरदारांना आणि अधिकाऱ्यांना मानाची वस्त्रे देण्याचा खर्च बादशहा भागवितो. फुले, सुगंधी द्रव्ये, विड्याच्या पानांवर खर्च होत असे, मौल्यवान रत्नांची खरेदीही नेहमी चालू असे. अंत:पुरामध्ये स्त्रियांना जडजवाहीर वापरण्याची मोठी हौस होती. त्यांच्या दागिन्यात कपाळावर मोत्यांचा झुबका आणि फुलाच्या आकाराची रत्ने आणि मोती, माणके यांचा समावेश होता. तसेच कपड्यांवरही मोत्यांच्या सरा रुळलेल्या असत, असे वर्णन इटालियन प्रवासी मनुचीने केलेले आहे.[२३] याच ब्रम्हपुरीच्या छावणीत अनेक लग्नसमारंभ पार पाडले.

ब्रम्हपुरी, ता. मंगळवेढा येथील औरंगजेबाची छावणी ही इतिहासातील महत्त्वाची घटना आहे. येथे अनेक राजकीय घडामोडी घडल्या. या छावणीच्या तळावर आजही अनेक वस्तू सापडतात. तेथील जागेत अनेक लोकांना सोन्या–चांदीच्या वस्तु, नाणी सापडलेली आहेत. त्यामुळे भीमा नदीच्या काठावर असलेली औरंगजेब बादशहाची छावणी असलेले ठिकाण एक ऐतिहासिक पुरातत्त्वीय स्थळ आहे. तेथे अजूनही मध्ययुगीन अवशेष सापडण्याची शक्यता आहे.

माचणूर येथील औरंगजेब बादशहाने बांधलेली किल्लेवजा गढी :

औरंगजेब बादशहाचा तळ ब्रह्मपुरी व माचणूर, ता. मंगळवेढा येथे इ.स. १६९४ पासून सन १७०२ पर्यंत होता. यास ब्रह्मपुरीचा तळ म्हणूनच संबोधले जाते. स्वत: बादशहा या ठिकाणी सन १६९८ पर्यंत वास्तव्य करुन होता. ब्रम्हपुरी व माचणूर या गावातील अंतर एक मैलाच्या आसपास आहे.[२४] पेशवाईच्या काळात मंगळवेढा परगण्यावर पटवर्धनाची नेमणूक पेशव्यांनी केली. थोरले माधवराव पेशवे आणि त्यांचे चुलते राघोबा यांचे उभयतांचे मतभेद वाढून युद्ध होऊन माधवराव पेशवा राघोबाच्या नजरकैदेत राक्षसभुवनच्या युद्धापर्यंत होता. याच दरम्यान राघोबाने पटवर्धनाचा मिरज किल्ला लढाई करुन ताब्यात घेतल्याने गोपाळराव पटवर्धन निजामाला मिळाले होते. साताराचे प्रतिनिधी पिराजी नाईक, निंबाळकर, घाटगे, घोरपडे, पवार आदि सरदार व नागपूरचे भोसले हेही निजामाला सामील झाल्याने पेशव्यांचे समोर अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला होता.[२५]

नवाब निजामअलीने गोपाळराव पटवर्धन त्यांचेकडे सामील झालेने माचणूर ठाणे पटवर्धनाकडे दिले होते. या ब्रह्मपुरीत शिवमंदिराच्या शेजारी औरंगजेबाचे चार ते साडेचार वर्षे वास्तव्य होते. या काळात ब्रम्हपुरी आणि माचणूर येथे मोठे वाडे, घरे बांधले गेले. त्यावेळी औरंगजेब बादशहाने आपल्या कुटुंबाच्या संरक्षणासाठी माचणूर येथे भीमा नदीच्याकाठी किल्लेवजा गढी बांधली.[२६] याच गढीत बादशहाची मुलगी आणि शहजादा आज्जम याची सख्खी बहीण नवाब कुदसीया जीनतुन्नीसा बेगम, शहजादा कामबक्ष याची आई उदेपुरी बेगम यांचे वास्तव्य होते. वजीर जुम्दतुल्मुक आसदखान याला छावणीचा मुख्य अधिकारी म्हणून तैनात करण्यात आले.





या गढीला तीन प्रवेशद्वारे आणि चार बुरूज होते. मुख्य प्रवेशद्वार पूर्वेला असून उत्तर आणि दक्षिणेला इतर प्रवेशद्वारे आहेत. गढीच्या पश्चिम बाजुला भीमा नदी वाहते. सध्या या गढीची ढासळलेली तटबंदी, बुरूज आणि प्रवेशद्वारे शिल्लक आहेत.

मध्ययुगीन इतिहासात ब्रह्मपुरीची छावणी, औरंगजेब बादशहाने माचणूर येथे बांधलेली ही ऐतिहासिक किल्लेवजा गढी अजूनही इतिहासाची साक्ष देते. तेथे अजूनही काही वस्तू व इतर अवशेष मिळतात. त्यामुळे मध्ययुगीन इतिहासाचा अभ्यास करीत असताना हे पुरातत्वीय स्थळ महत्त्वाचे आहे.

गुरसाळे येथील कवडे घराण्याचा गढी :

सोलापूर जिल्ह्यातील तालुका पंढरपूर येथील गुरसाळे हे गाव पंढरपूर–टेंभुर्णी रोडवर आहे. सोलापूरपासून पस्तीस किलोमीटर अंतरावर असलेल्या गुरसाळे गावाचा इतिहास मराठ्यांच्या राजकारणात महत्त्वाचा आहे.

पहिले बाजीराव पेशवे यांनी ज्या मराठी माणसाच्या अंगचा पराक्रम पाहून राज्य विस्तारासाठी उपयोग करून घेतला त्यात गुरसाळ्याचे कवडे घराण्यातील आवजीचा पराक्रम महत्त्वाचा आहे.[२७] बाजीराव पेशव्याने शिंदे, होळकर, पवार, गायकवाड, जाधव हे नवीन सरदार निर्माण करून आपले राज्य विस्ताराचे कामासाठी उपयोग करून घेतला. त्यामध्ये गुरसाळ्याच्या कवडे घराण्याचा समावेश आहे. आवजी कवडे हा सरदार बाजीराव पेशव्यांच्या खास मर्जीतले होते. पराक्रमी, साहसी, शूर निधड्या छातीचा आणि धन्याशी एकनिष्ठ असा होता.[२८] पेशवेच त्यांचे धनी होते. त्यांनी सांगितलेली कामगिरी ही शिरोधार्य मानून त्यासाठी येणारी सर्व प्रकारची संकटे सहन करून धन्याची कामगिरी पार पाडणारा असा सरदार होता. आवजी कवडे आणि त्याचा पुत्र महिपतराव कवडे यांनी केलेले ऐतिहासिक कार्य मोठे आहे. मिरजेपासून बुंदेलखंडपर्यंत या गुरसाळ्याच्या कवडे घराण्याचा संचार होता. त्यांच्या कामगिरीबाबत शाहूने व पेशव्याने त्यांस बहुमान पालखी, हत्ती, घोडे देवून त्यांचा गौरव केलेला आहे.[२९]

बाजीराव पेशव्यांना शाहू छत्रपतींकडून सन १७२० साली पेशवे पदाची वस्त्रे मिळाली आणि त्यापुढील वर्षी बाजीराव पेशव्याने आवजीच्या घराला तारीख ३ जून १७२१ रोजी भेट देऊन अजनुज या गावी मुक्काम केला.[३०] यावरून दोघांचे जवळचे संबंध होते हे दिसून येते. मराठ्यांच्या इतिहासात बाजीराव पेशवे आणि निजाम यांचा अनेक वेळा संघर्ष झालेला आहे. निजामाला पायबंद घालण्यासाठी बाजीराव पेशव्यांनी आवजी कवडे आणि नागपूरकर रघुजी भोजले यांच्यावरही कामगिरी सोपविली होती.[३१] त्यावेळी प्रत्यक्ष निजामाबरोबर नाही; परंतु त्याचा सरदार जमालखानाशी या कवडे घराण्यातील आवजी कवड्यांनी अनेक वेळा झुंज दिलेली आहे. प्रत्येक कामगिरीसाठी पेशव्यांनी आवजी कवड्यांच्या तुकडीला आघाडीला ठेवलेले दिसून येते. तसेच भोपाळच्या संग्रामाच्या वेळेसही निजाम बाजीराव यांचे युद्धारंभी आवजी कवड्यास पेशव्याने नर्मदापार होवून बुंदेलखंडात धुमाकूळ घालण्यास पाठवून दिले होते.[३२] त्यावेळेस आवजी कवड्यांकडे ऐंशी हजार घोडे होते. या कामगिरीत मिळालेल्या यशाबद्दल इतर सरदारांबरोबरच आवजी कवडे यांना पंचवीस हजाराचे बक्षीस छत्रपतींकडून मिळाले होते. तसेच पालखीचाही मान मिळाला होता.[३३]

आवजी कवड्यास छत्रपतींकडून ६ सप्टेंबर सन १७३३ रोजी बहुमानाची वस्त्रे मिळाली होती.[३४] आवजी कवड्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या मुलाकडे म्हणजे महिपतरराव कवडे याकडे सर्व कारभार गेला. एकूण नव्वद महालांची कमाविसी पेशव्यांनी महिपतराव कवड्यांना दिली होती. त्यामध्ये २३ महाल नांदेड सरकारमधील, सरकार धारुरमधील ३ महाल, सरकार वासीममधील ८ महाल, सरकार पाथरीमधील १० महाल, सरकार माहूर, सरकार मेहेकर १ महाल प्रत्येकी, सरकार बेदर वगैरे ११ महाल.[३५] आवजी कवड्यांकडे जो शिक्का मिळालेला होता तो महिपतराव कवडे यांनी तसाच पुढे चालू ठेवला होता.[३६]

त्यानंतरच्या काळात म्हणजे पेशवे माधवराव व राघोबा त्यांच्यातील संघर्षात झालेल्या आळेगावच्या लढाईत महिपतराव कवडे हे राघोबांच्या बाजूने रणांगणावर उतरले.[३७]

सन १७६३ साली निजामाला धडा शिकविण्यासाठी माधवराव पेशव्यांनी राक्षसभुवन येथे निजामाशी जंगी लढाई केली. त्यापूर्वी मराठ्यांकडून नाराज होऊन निजामाकडे जे सरदार गेले

होते, त्यांची समजूत घालून त्यांच्या मागण्या मान्य करण्याची खटपट सखाराम बापू आणि राघोबा पेशवा करीत होते. त्यात महिपतराव कवडे यांची समजूत करून त्यांना परत आणलेचा उल्लेख दिसून येतो. त्यावेळी पेशव्यांनी महिपतराव कवडे यांना करकंब आणि भोसे परगण्याच्या सनदा तयार करून देण्याबाबत रामचंद्र गणेश यांना सांगितले होते.[३८] भोसे परगण्यात गुरसाळे हे गाव असलेने आपले गावची व परगण्याची सनद मागणी त्यांनी केली असावी. त्यानंतर माधवराव पेशव्यांकडे महिपतराव कवडे परत आल्यानंतर हैदरअल्लीवरील स्वारीत आपल्या पथकासह सामील झाले होते. कर्नाटकात मराठ्यांचे 'स्वराज्य' म्हणून जितके होते ते शिवरायांनी व त्यांचे वडील शहाजीराजे यांनी दक्षिणेकडे कमाविलेले राज्य होते. परंतु हैदरअलीने पानिपत येथे मराठे पराभूत झाल्याने ते स्वत:च्या अंमलाखाली आणले होते. त्याचे पारिपत्य करण्यासाठी माधवराव पेशव्यांनी पाच स्वाऱ्या केल्या. या स्वाऱ्यात गुरसाळे येथील महिपतराव कवडे यांनी प्रथमपासून या स्वाऱ्यात भाग घेऊन शत्रूस नामोहरम करण्यास मोठे योगदान दिले, ही एक तितकीच भूषणावह बाब आहे.[३९]

आवजी कवडे आणि महिपतराव कवडे या बापलेकांनी पेशव्याची चाकरी सलग पन्नास–साठ वर्षे केली. पेशव्यांशी त्यांनी दिलेले इनाम वचन कधी भंग होवू दिले नाही. बाजीराव पेशवा, चिमाजी अप्पा, नानासाहेब पेशवा, राघोबा पेशवा, माधवराव पेशवा या सर्वांचे हाताखाली निष्ठेने चाकरी केली. प्रसंगी सातारचे शाहू छत्रपती यांचा पुतण्या मदनसिंग भोसले याचा पुत्र संभुसिंग याचाही उच्छेद करण्यास त्यांनी कुचराई केली नाही. बाजीराव पेशव्यांच्या साथीने चंबळ नदीपर्यंतचा माळवा प्रांतातील मुलुख मराठ्यांच्या ताब्यात आणण्यात बाजीराव पेशव्याला मोलाची मदत करून सेवा चाकरी केली. बाजीराव पेशव्याने परकी शत्रूंशी सामना करण्यासाठी जसा आवजीचा वापर करुन घेतला, तसा बाजीरावा पेशव्याला काही वेळा स्वकियांबरोबरही सामना करण्याची वेळ येई त्यावेळी त्याने आवजी कवडेचाच उपयोग करुन घेतला. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे नागपूरकर भोसले यांचेकडून आवजी कवडे पराभूत जरी झाले तरी नंतर पुन: पेशव्याने अशा कामगिरीसाठी त्याची पुन: पुन: रवानगी केल्याचे दिसून येते.[४०]

आज कवडे घराण्याचा अजनुज येथील वाडा सुस्थितीत आहे. निजामाचे दप्तर हैद्राबाद येथील कागदपत्रांमध्ये ही गुरसाळ्याचे इतिहासाचे साक्ष देतात. महिपतराव कवडे यांचा पुत्र आवजी कवडे यांनी पंढरपूर विठ्ठल मंदिरात देवाचे, दक्षिण बाजूस लक्ष्मीचे मंदिर बांधलेले असून हे मंदिर दररोज हजारो भाविकांचे श्रद्धास्थान बनलेले आहे. पुण्यातही कवड्यांचा वाडा होता.[४१]

या कवडे घराण्यांचा इतिहास सांगणारी गुरसाळे येथील गढी जरी आज भग्नावस्थेत असली तरी वाड्याचा तट आणि काही थोड्या स्मृती सांभाळून आहेत. या घराण्याने संपूर्ण हिंदुस्थानात केलेला पराक्रम विस्मृतीत गेला आहे. गुरसाळे येथील कवडे घराण्यातील लोकांकडे जास्त माहितीही मिळत नाही. कागदपत्रे मिळणे तर लांबच.

मुख्य प्रवेशद्वार :

पश्चिमेस गढीचे मुख्य प्रवेशद्वार आहे. याची उंची साधारणपणे पंधरा फूट आहे. गढी जमीनदोस्त झाली असली तरी प्रवेशद्वार शाबूत आहे. दरवाज्याला वापरलेले सागवानी लाकूड अजूनही चांगल्या स्थितीत आहे. मुख्य प्रवेशद्वारावरील हत्ती, कमान आजही प्रतिक्षेत उभी असल्यासारखी भासते. प्रवेशद्वारासाठी वापरलेले दगड भक्कम अवस्थेत आहे तर भिंतीची रुंदी ५ ते ६ फूट इतकी आहे. यावरून वाड्याच्या बांधकामाचा भक्कमपणा दिसून येतो.



गढीचे बुरुज :

गुरसाळे येथील कवडे यांच्या गढीला एकूण पाच बुरूज होते. परंतु सध्या दोनच बुरूज पडलेल्या अवस्थेत शिल्लक आहेत.

या गढीचे एकूण क्षेत्रफळ जवळ–जवळ एक ते दीड एकर आहे. ही गढी उंचीवरील टेकाडावर उभी होती.

पाणी पुरवठ्याची सोय :

गुरसाळे येथील कवडे घराणे यांच्या गढीत पाणीपुरवठ्याच्या सोयीसाठी दोन विहिरी होत्या. त्या अजूनही चांगल्या अवस्थेत आहेत. एक विहीर वाड्यामध्येच होती. तर दुसरी विहीर गढीच्या पायथ्याशी पूर्व दिशेला आजही अस्तित्वात आहे.

गढीतील बांधकामे :

सध्याच्या परिस्थितीत गढीची पाहणी केली असता वरील भागामध्ये दहा ते बारा खोल्या असल्याचे दिसून येते. कारण तशाच प्रकारच्या खोल्या खाली सध्या अस्तित्वात असलेल्या तळमजल्यात दिसून येतात.





गढीचे वैशिष्ट्ये :

इतर गढींप्रमाणे ही गढी भक्कमतर होतीच परंतु संरक्षणाच्या दृष्टीने जे गढीचे तळघर व त्यातील जो जिना आहे तो वैशिष्ट्यपूर्ण आहे. जमिनीवरील खड्ड्यातून पाहिले असता तळघराच्या आतील भागाचा अंदाज येतो.

तसेच गढीत असलेल्या विहिरीत जर पाणी नसेल किंवा काही कारणाने ती विहीर कोरडी पडली असेल तर वाड्याच्या आतील जिन्यातून गढीच्या पायथ्याशी असलेल्या विहिरीपर्यंत जाता येत होते. तो भुयारी मार्ग व त्याच्या दगडी पायऱ्या आज अजूनही सुस्थितीत आहे आणि आजही त्या पायऱ्यांवरून गढीच्या पायथ्याशी असलेल्या विहिरीपर्यंत जाता येते. अडीचशे ते तीनशे वर्षांपूर्वी हा बांधलेला कवडे यांची गढी आजही इतिहासाची साक्ष देते.



सुरडी येथील निंबाजी नाईक निंबाळकर यांची गढी :

सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील सुरडी हे गाव ऐतिहासिक गाव आहे. सुरडी हे गाव मध्ययुगीन काळात परांडा सरकारात येत होते. यामध्ये सतरा गावचा समावेश होता. त्यामधील सुरडी एक गाव होते. तसेच या सरकारात कसबे पानगाव, कोरफळे दडशिंगे, मालवंडी, पिंपरी, हिंगणी काळेगाव उंडेबाव तडवळे, वैराग, घाणेगाव, मानेगाव, इ. गावांचाही समावेश होता.[४२]

नंतरच्या काळात पानगाव परगणा हा वैरागचे सरलष्कर निंबाजी नाईक निंबाळकर व दर्याबाई नाईक निंबाळकर यांच्या अंमलाखाली होता. त्यावेळी सुरडी, वैराग, पानगाव व इतर गावे नाईक निंबाळकरांकडे होती. त्यानंतर पेशवे माधवरावांच्या काळात पानगाव परगणा पानसे घराण्याकडे गेला.[४३]

पानगाव व वैराग या दोन्ही गावांच्या मध्ये सुरडी गाव येते. येथेही मोठी गढी होती. परंतु सध्या ही गढी पूर्णत: ढासळलेली असून ती एका टेकाडाच्या स्वरुपात अस्तित्वात आहे. तिथे अजूनही जुन्या वस्तू, भांडी सापडतात. या गढीवरुन आसपासचा परिसर हा गढी म्हणूनच ओळखला जातो.[४४]





सुरडी हे गाव वैराग व माढा रोडवर आहे. सुरडी गावातून जो पानगावला रस्ता जातो त्या रस्त्यापासून थोड्या अंतरावर या गढीचे टेकाड आहे. हे टेकाड एक मध्ययुगीन पुरातत्त्वीय स्थळ आहे. या टेकाडाचे उत्खनन केल्यास गढीची संपूर्ण रचना, बांधकाम तंत्र लक्षात येईल तसेच मध्ययुगीन पुरातत्त्वीय अनेक साधने येथे मिळतील. या टेकाडावर बांधकामासाठी वापरलेले दगड व दगडी शिळा सगळीकडे विखुरलेल्या दिसतात. तिथे अजूनही दगडी स्वरुपात मारुतीची पूजा केली जाते.

मध्ययुगीन पुरातत्वीय स्थळ, आष्टी, ता. मोहोळ :

सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील आष्टी हे गाव सोलापूरपासून पंचेचाळीस किलोमीटर अंतरावर आहे. मध्ययुगीन इतिहासातील महत्त्वाचे ठिकाण म्हणून आष्टीला ओळखले

जाते. ते २० फेब्रुवारी १८१८ ला इंग्रज–मराठा यांच्यात झालेल्या युद्धामुळे. या युद्धात मराठी सत्तेचा शेवट झाला आणि इंग्रजांनी संपूर्ण महाराष्ट्र स्वत:च्या अधिकाराखाली आणला.[४५]

१७ नोव्हेंबर १८१७ रोजी इंग्रजांनी बाळाजीपंत नातूस रॉबीन्सन बरोबर पाठवून पुणे येथे शनिवारवाड्यावर ब्रिटिश झेंडा रोवला. त्यानंतर दुसरा बाजीराव पेशवा पुणे शहरातून निघून सासवडला पोहचला. संपूर्ण लवाजम्यासह बाजीराव पेशवे जेजुरी, तांबवे, देहूर, पाडळी, हिंगणगाव, कलेढोणे, भाळवणी, पंढरपूर, गुरसाळे, करकंब, जिंती, बाभुळगाव अशी दौड करीत पेशवा १४ डिसेंबर १८१७ रोजी सिद्धटेक येथे पोहचले. त्यावेळी इंग्रजी अधिकारी स्मिथ इंग्रजांच्या फौजा घेऊन बाजीरावाचा पाठलाग करीत होता.[४६] सेनापती बापू गोखले हे पेशव्यांचे सैन्य घेऊन त्यास तोंड देत होता. ज्यावेळी पेशवे पंढरपूरकडे वळले त्यावेळी वाखरीच्या मैदानात इंग्रज फौजांशी मातब्बरपणे लढाई केली. दीड महिना पेशवांनी चारशे मैलांची पायपीट केली होती. तरी इंग्रज अधिकारी स्मिथ त्यांची पाठ सोडायला तयार नव्हता.

बाजीराव पेशव्याने बापू गोखले यांना इंग्रजांच्या मुकाबल्यासाठी सर्वाधिकार देऊन सेनापती नेमले होते. पेशव्यांच्या पूर्ण संरक्षणाची जबाबदारी त्यांच्यावर होती.[४७] साताराहून पेशवे सोलापूर येथील भुईकोट किल्ल्यावर पोहचले, तेव्हा इंग्रज फौजांच्या बरोबर लढाई करण्याचा पेशव्यांचा विचार होता. ती लढाई सोलापूरच्या बाजूला द्यावी असा बापू गोखले आणि बरोबरचे सर्व सरदार यांचा विचार झाला होता. त्यासाठी पानशांचा तोफखाना सोलापूर येथे पोहोच झाला होता. पटवर्धनांची फौजही सोलापूर येथे पोहचली होती. परंतु सोलापूर येथे लढाई होण्याअगोदरच पेशव्यांनी सोलापूर किल्ल्यातून आपला मुक्काम हलवला.[४८] सोलापूर किल्ल्यामधून ते परांड्याच्या किल्ल्यावर जाण्यासाठी निघाले तेव्हा ते आष्टी, ता. मोहोळ येथे मुक्कामाला आले. सोलापूर येथे जर बापू गोखले आणि इतर सरदार यांच्या ठरलेल्या विचाराप्रमाणे इंग्रज सैन्याशी लढाई झाली असती तर इंग्रजांना या ठिकाणी यश मिळणे अवघड होते. कारण पानशांचा तोफखाना आपली चांगली कामगिरी करून इंग्रजांना परास्त करू शकला असता.[४९]

१९ फेब्रुवारी १८१८ रोजी पेशव्यांचा मुक्काम गोपाळ आष्टीच्या तळावर होता. त्यांच्याबरोबर सातारा छत्रपतींचे मातोश्री माईसाहेब, छत्रपती प्रतापसिंह महाराज, त्यांचे बंधू

भाऊसाहेब महाराज आणि अप्पासाहेब महाराज हे हजर होते, तसेच छत्रपतींचे दिवाण विठ्ठलपंत होते. तसेच बापू गोखले यांची पत्नी यमुनाबाई याही पेशव्यांच्या छावणीत मुक्कामास होत्या. आष्टी हे पंढरपूर पासून दहा ते बारा किलोमीटर अंतरावर आहे. आष्टी गावाच्या पूर्व बाजूस ओढ्याजवळ पाण्याची सोय पाहून पेशव्यांचा तळ होता. पश्चिम बाजूने जनरल स्मिथचे इंग्रज सैन्य पेशव्यांच्या छावणीवर छापा घालण्यासाठी आले असल्याची बातमी सेनापती बापू गोखले यांना मिळाली तेव्हा बापू गोखले तयारीनिशी इंग्रजांच्या सैन्यास सामोरे गेले. प्रत्यक्ष ही लढाई ओढ्याच्या पश्चिम बाजूस झाली. हा ओढा दक्षिणेकडील भीमा नदीस मिळतो.[५०]

सेनापती बापू गोखले हे शरीराने धिप्पाड तसेच कर्तबगार होते. तसेच इंग्रजांच्या सैन्यातील शिस्त त्यांना माहीत होती. जनरल स्मिथ यांचेशी लढाई देण्यासाठी जे कौशल्य आणि शौर्य त्यांनी दाखविले ते वाखाणण्यासारखेच आहे. त्यामुळे प्रथम पेशव्यांच्या सैन्याने इंग्रज फौजावर पुढून आणि पिछाडीकडून असा एकदम हल्ला चालू केला आणि मराठी युद्ध कौशल्याची चुणूक इंग्रज फौजेला दाखविली. परंतु त्यानंतरच्या इंग्रजांच्या फलटणी बरोबर लढता लढता बापू गोखलेंना गोळ्या लागल्या, त्यामुळे ते धारातिर्थी पडले आणि मराठ्यांच्या सैन्याची मानसिकता खचली. एवढेच काय तर दुसरे बाजीराव पेशवे देखील सेनापती बापू गोखल्यांच्या मृत्यूच्या बातमीने घाबरून गेले. ते पळून गेले. त्यांनी सातारचे छत्रपती प्रतापसिंग आणि त्यांच्या मातोश्री माईसाहेबांची देखील फिकीर केली नाही. छत्रपती प्रतापसिंग आणि त्यांच्या कुटुंबियांना इंग्रजांच्या फौजेने पकडले तेव्हा स्मिथने त्यांना आष्टी तळावर मुक्कामास नेले. त्यावेळी २० फेब्रुवारी १८१८ च्या झालेल्या लढाईत बापू गोखले याचा मृतदेह आष्टी येथील ओढ्याच्या कडेला दहन केला गेला. स्मिथ ही सेनापती बापू गोखले यांच्या वाराने जखमी झालेला होता. या आष्टीच्या तळावर इंग्रज फौजांना आपले तलवारीचे पाणी दाखवून बापू गोखले मराठ्यांचा शेवटचा सेनापती धारातीर्थी पडले.[५१]

मध्ययुगीन इतिहासात आष्टीला राजकीय दृष्टिकोनातून महत्त्वाचे स्थान आहे. ज्या ठिकाणी ओढ्याच्या कडेला आष्टीची लढाई झाली, तेथे सध्या मोठे तळे झाले आहे. त्यास येवतीचे तळे म्हणून ओळखले जाते. उन्हाळ्याच्या दिवसात ज्यावेळी येथील पाणी आटते,

त्यावेळी या या तळ्यातील गाळ काढून शेतकरी आपल्या शेतात घेवून जातात. तसेच येथे काही शेतकरी तात्पुरती शेतीही करतात. त्यावेळी अनेक शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात शस्त्रे सापडलेली आहेत. ती त्यांनी मोहोळ पोलीस ठाण्यात जमा केल्याची नोंद आहे. अर्थातच आष्टीचे हे पेशव्यांचे तळ असलेली जागा आणि इंग्रज–मराठा युद्धाची जागा हे पुरातत्वीय स्थळच आहे. येथे अजूनही मध्ययुगीन इतिहासाची साक्ष देणारी सेनापती बापू गोखल्यांची समाधी आहे. या युद्धानंतरच या आष्टी गावाला गोपाळ आष्टी म्हणून ओळखले जावू लागले. येथे अजूनही अनेक मध्ययुगीन इतिहासाची साक्ष देणारे पुरातत्त्वीय अवशेष मिळतील.

मध्ययुगीन सोलापूरच्या इतिहासात भर टाकणारी पुरातत्त्वीय स्थळे महत्त्वाची आहेत, त्यामध्ये बादशहा औरंगजेबची छावणी असलेले ठिकाण ब्रह्मपुरी व माचणूर, ता. मंगळवेढा, गुरसाळे येथील कवडे–पाटील यांची गढी, पानगाव आणि सुरडी येथील सरलष्कर नाईकनिंबाळकर यांच्या जमिनदोस्त झालेल्या गढ्या आणि मराठे व इंग्रज यांच्यात झालेल्या शेवटच्या लढाईचे ठिकाण आष्टी, ता. मोहोळ ही सर्व पुरातत्त्वीय स्थळे ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची आहेत.

ब्रह्मपुरी, ता. मंगळवेढा येथे औरंगजेब बादशहा साडेचार वर्षे मुक्कामास होता, त्यानंतरची आणखी काही वर्षे बादशहाचे कुटुंब माचणूर येथील किल्लेवजा गढीमध्ये राहिले. त्या काळातील दिल्लीच्या बादशहाचे केंद्र हे ब्रह्मपुरी हे ठिकाण होते, तेथूनच बादशहा अफगाणिस्तानचा कारभार व प्रशासन ठरवित असे. त्यामुळे ब्रह्मपुरीला मध्ययुगात राजधानीचे स्वरुप प्राप्त झालेले होते. तसेच त्याच काळात छत्रपती शाहू महाराज त्यांच्याबरोबर प्रतापराव गुजरसारखे मराठा सरदार व कुटुंबीय बादशहाच्या कैदेत होते. त्यावेळी मराठे–मोगल संबंधातील घडलेल्या अनेक राजकीय घडामोडींचे ठिकाण ब्रह्मपुरी होते. म्हणूनच या ऐतिहासिक ठिकाणाचा मध्ययुगीन पुरातत्त्वीय स्थळांमध्ये समावेश केला आहे.

गढ्यांमध्ये पानगाव, सुरडी, गुरसाळे येथील गढ्या जमिनदोस्त झाल्या असल्या तरी तेथे अजूनही ऐतिहासिक पुरावेत मिळतात. दर्याबाई निंबाळकर यांची पानगाव येथील गढीचे मातीच्या टेकाडात रूपांतर झाले असले तरी तिचा इतिहास मोठा आहे. पेशवेकाळात मराठ्यांच्या

राजकारणाशी संबंधीत घटना या गढीमध्ये घडलेल्या आहेत, तसेच त्यांची सुरडी येथील गढीही पडलेली असली तरी तेथील तटबंदी व अर्धे बुरुज शिल्लक आहेत. तेथे गढीतील काही अवशेष अजूनही मिळतात.

गुरसाळे, ता. पंढरपूर येथील कवडे–पाटलांची गढी गावाकुसाच्या बाहेर उंचीवरील भागात आहेत. या गढीचे फक्त प्रवेशद्वार व तटबंदीचे बुरूज उभे आहेत. प्रवेशद्वारातून आत गेल्यावर डाव्या हाताला बारव लागते. त्यापुढे गढीतील तळघर आणि भुयारी मार्ग दिसतात. गढीतील भुयारी मार्ग दगडी पायऱ्यांचा चांगल्या अवस्थेत असून तो दोन मार्गामध्ये विभक्त होतो, एक तळघराकडे जातो व दुसरा गढीच्या पायथ्याशी असलेल्या बारवेकडे जातो. ज्यावेळी गढीतील विहीरीचे पाणी पुरेनासे होते, त्यावेळी गढीच्या पायथ्याशी असलेल्या बारवमधून पाणी गढीत आणले जात असे. तसेच संरक्षणाचा एक मार्ग म्हणूनही या मार्गाचा उपयोग गढीबाहेर पडण्यासाठी केला जात असावा.

तिसरे आणि शेवटचे इंग्रज–मराठा युद्धाचे ठिकाण आष्टी, ता. मोहोळ हे मध्ययुगीन ऐतिहासिक पुरातत्त्वीय स्थळ आहे. येथील युद्धात सेनापती बापू गोखले यांना मरण आले. त्यांचे समाधीस्थळ हे येथील युद्ध झालेल्या ठिकाणी आहे. सध्या या जागेत मोठा तलाव आहे. उन्हाळ्यात या तलावातील पाणी कमी होते, तेव्हा येथील शेतकरी तात्पुरती जमीन कसतात किंवा काहीजण विहीरीही खोदतात. तेव्हा तेथे अजूनही शस्त्रास्त्रे मिळतात. सेनापती बापू गोखल्यांबरोबर अनेक मराठे सैनिक येथील युद्धात मरण पावले होते. येथेच मराठी सत्तेचा शेवट पेशवा दुसरा बाजीराव यांच्या काळात झाला. तेव्हापासून या ठिकाणाला गोपाळआष्टी या नावाने ओळखले जाते. ही गोपाळआष्टी, ता. मोहोळ मध्ययुगीन इतिहासात महत्त्वाचे असल्याने या ठिकाणाचा समावेश मध्ययुगीन पुरातत्त्वीय स्थळांमध्ये केलेला आहे.

संदर्भ ग्रंथ

१) पाटील माया, पुरातत्व : एक पर्यालोचन, सुविद्या प्रकाशन, सोलापूर, २०११, पृ.क्र. २.

२) गायधनी रं. ना., प्राचीन भारताचा इतिहास, के. सागर पब्लिकेशन्स, पुणे, २००१, पृ.क्र. ३७०.

३) पाटील नि. रा., जळगाव जिल्ह्यातील किल्ले आणि गढ्या, सुमेरू प्रकाशन, डोंबिवली, पृ.क्र. ७.

४) कित्ता, पृ.क्र. १०.

५) देशमुख गोपाळराव, दोन राजधान्या, मंगळवेढा ब्रम्हपुरीचा इतिहास, कौसल्या पब्लिकेशन, २०१४, पृ.क्र. १७६.

६) महाराष्ट्रातील काही ताम्रपट व शिलालेख, संपा. डॉ. वि. भि. कोलते म.रा.सा.सं. मंडळ, मुंबई, १९८७, पृ.क्र. ३४०.

७) कुंटे भ. ग., औरंगजेबाचा इतिहास, म.रा.सा.सं. मंडळ, मुंबई, १९७८, पृ.क्र. ७०३.

८) भारत इतिहास संशोधन मंडळ, त्रैमासिक ३२ अंक १–४, पुणे, १९५७–५८, पृ.क्र.२८.

९) उपरोक्त, कुंटे भ. ग., औरंगजेबाचा इतिहास, पृ.क्र. ३८८.

१०) कित्ता, पृ.क्र. ३८१.

११) सरदेसाई गो. स., मराठी रियासत खंड २, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७८, पृ.क्र. ८८.

१२) उपरोक्त, कुंटे भ. ग., पृ.क्र. ६४६.

१३) कित्ता, कुंटे भ. ग., पृ.क्र. ७०६.

१४) सरदेसाई गो. स., मुसलमानी रियासत खंड २, १९९३, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृ.क्र. २९६.

१५) पगडी सेतु माधवराव, मोगल दरबारची बातमीपत्रे, म.रा.सा.सं.मं., मुंबई, १९७८, पृ.क्र. २५.

१६) कित्ता, पृ.क्र. २५.

१७) कित्ता, पृ.क्र. १४, १५.

१८) पगडी सेतु माधवराव, मोगल दरबारची बातमीपत्रे, १६८५–१६९९, म.रा.सा.सं.मं., मुंबई, १९७८, पृ.क्र. १९.

१९) कित्ता, पृ.क्र. १७.

२०) आवळसकर शा. वि., रायगडची जीवनकथा, म.रा.सा.सं.मं., मुंबई, १९६२, पृ.क्र. ९७.

२१) कित्ता, पृ.क्र. ९७.

२२) कित्ता, पृ.क्र. ९७.

२३) उपरोक्त, देशमुख गोपाळराव, पृ.क्र. १८८.

२४) खरे वा. वा., ऐतिहासिक लेखसंग्रह खंड १ ला, मिरज, पृ.क्र. ३०७.

२५) उपरोक्त, देशमुख गोपाळराव, पृ.क्र. ५७८.

२६) उपरोक्त, कुंटे भ. ग., पृ.क्र. ७४७.

२७) उपरोक्त, देशमुख गोपाळ, पृ.क्र. ३७४.

२८) सरदेसाई गो. स., संपादक गर्गे स.मा., मराठी रियासत खंड ३, पॉप्युलर प्रकाशन, १९८९, पृ.क्र. ६४४.

२९) कित्ता, पृ.क्र. ६४४.

३०) खोबरेकर वि. गो., मराठ्यांच्या स्वाऱ्यांचा मुक्काम, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या इतिहास संशोधन मंडळाची ग्रंथमाला २५, १९७७, दादर, मुंबई, पृ.क्र. १०४.

३१) उपरोक्त, सरदेसाई गो. स., पृ.क्र. ५०१.

३२) कित्ता, पृ.क्र. ५०७.

३३) कित्ता, पृ.क्र. ५११.

३४) सरदेसाई गो. स., पेशवे दप्तरखंड ३०, गव्हर्नमेंट प्रेस, मुंबई, लेखांक ३६४.

३५) पारसनीस द. ब., बाळाजी बाजीराव यांची रोजनिशी भाग ३, लेखांक ९०.

३६) उपरोक्त, देशमुख गोपाळ, पृ.क्र. १६१.

३७) खरे वा. वा., ऐतिहासिक लेखसंग्रह खंड १, लेखांश ८७.

३८) कित्ता, लेखांक १५९.

३९) कित्ता, लेखांक २२२.

४०) खरे वा. वा., ऐतिहासिक लेखसंग्रह खंड २, पृ.क्र. ७१३.

४१) पानसे के. र., पानसे म. भा., पानसे घराण्याचा इतिहास, भारत इतिहास संशोधन मंडळ पुरस्कृत ग्रंथमाला क्र. २०, १९७८, पृ.क्र. ११.

४२) उपरोक्त, देशमुख गोपाळ, पृ.क्र. ५९७

४३) प्रत्यक्ष भेट, छायाचित्रे.

४४) उपरोक्त, देशमुख गोपाळ, पृ.क्र. ६०१.

४५) Optic, Bombay Gazetteer, Page No.

४६) पगडी सेतुमाधव, मोगल दरबारची बातमीपत्रे, १६८५–१७००, म.रा.सा.से. मंडळ, मुंबई, १९७८, पृ.क्र. १२१.

४७) कित्ता, पृ.क्र. १३१.

४८) कित्ता, पृ.क्र. १३६.

४९) कित्ता, पृ.क्र. १३९.

५०) कित्ता, पृ.क्र. १५०.

५१) कित्ता, पृ.क्र. १५८.

प्रकरण ६ वे

उपसंहार

महाराष्ट्रात निर्माण झालेले मराठेकालीन स्थापत्य वैशिष्ट्यपूर्ण आहे. बौद्धधर्मियांनी भेडसे, भाजे येथे अशा अनेक ठिकाणी शिल्पकलेला सुरुवात केली. त्यानंतर अजंठा, वेरूळ येथे निर्माण झालेले स्थापत्य जगप्रसिद्ध आहे. कृष्णा, तुंगभद्रा नदीखोऱ्यात उगम पावलेल्या चालुक्य काळात अनेक मंदिरे निर्माण झाली. उत्तरेकडील माळव्यात परमार राजांनी देवालय बांधणीचा एक विशेष घाट जोपासला. नागर किंवा हिंदुस्थानी पद्धतीचा म्हणजेच 'भूमिज' मंदिरशैली शिलाहार राजांनी आणि त्यानंतर यादव राजांनी हाच मंदिर विशेष पत्करला. तीच यादव शैली म्हणून ओळखतात. यास हेमाडपंथी शैली असेही म्हणतात.

मराठेशाहीतील वास्तूशिल्पाचा, स्थापत्याचा अभ्यास करण्याचे प्रमुख साधन म्हणजे आतापर्यंत तग धरून राहिलेले गढ्या, प्रासाद, मंदिरे व इतर वास्तू होत. आज जे वाडे शिल्लक आहेत ते तत्कालीन शिल्पाचे वा स्थापत्याचे पुरावे आहेत. छत्रपतींच्या काळापासून बांधलेले वाडे शिल्लक नसले तरी त्या धर्तीवर बांधलेले नंतरच्या पेशवे काळातील वाडे अस्तित्वात आहेत. तसेच गढ्याही अस्तित्वात आहेत. त्यावरून त्यांची आखणी, बांधणीची पद्धती याविषयी कल्पना करता येते तसेच स्थापत्याच्या विविध अंगाचा शोध घेणे शक्य आहे. लावणी व पोवाडे हे शाहिरी वाङमय आणि बखरी यातून शहरांच्या, वाड्यांच्या मंदिराच्या वर्णनाचा खूपच भाग येतो. एक एका शहरासंबंधी रचलेले पोवाडेही उपलब्ध आहेत. राम जोशी याने पुणे शहराचे वैभव वर्णन करण्यासाठी लिहिलेला पोवाडा फार प्रसिद्ध आहे. याच काळात युरोपीय प्रवासी, कारभारी असे पुण्यात येत असत. त्यांच्या वर्णनावरूनही मराठेकालीन वास्तूंविषयी माहिती मिळते.

या संशोधनाद्वारे संशोधिकेने सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन काळातील जहागिरदारी व वतनदारी आणि त्यामुळे निर्माण झालेल्या गढ्या आणि वाडे यांचा अभ्यास केलेला आहे. यामध्ये वास्तुकलेचे मानवी जीवनातील महत्त्व आणि गरज याविषयी विवेचन केले आहे. वास्तुकला म्हणून मान्यता प्राप्त होण्यासाठी आवश्यक असणारे मुलभूत निकष सांगितले आहेत. दर्जेदार

वास्तुनिर्मितीमध्ये त्यांचा भक्कमपणा व टिकाऊपणा हे महत्त्वाचे असते. मानवाने गुहेतून बाहेर पडून घरांच्या निर्मितीस सुरुवात केली आणि त्यातून वास्तुशास्त्राची निर्मिती होत गेली. संरक्षणाच्या दृष्टीकोनातून मजबूतीपणा आणण्यासाठी वास्तुनिर्मितीमध्ये बदल होत गेले. त्यासाठी नवनवीन तंत्रे वापरली जाऊ लागली. यातूनच वास्तुशैली आणि त्या शैलीसंस्कृतीचा उगम झाला. वास्तुनिर्मितीच्या प्रक्रियेमध्ये कला, शास्त्र आणि तंत्र या तीन पातळी नियंत्रित केली जाऊ लागली. या वास्तुनिर्मितीतून त्या ठिकाणचे धार्मिक, तांत्रिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि वैचारिक अशा विविध चैतन्यस्त्रोताचे प्रतिबिंब हे प्रकट झालेले दिसून येते.

मध्ययुगीन काळात शत्रूंपासून संरक्षण करण्यासाठी दुर्ग, गढ्या, कोट अशा वास्तूंची निर्मिती मोठ्या प्रमाणात झाली. सोलापूर जिल्ह्यात अनेक गढ्या व वाडे आहेत. त्यांचा आजपर्यंत अभ्यास झालेला नाही. काही गढ्या व वाडे या संपूर्णपणे नष्ट झालेल्या असल्या तरी ज्या गढ्या आणि वाडे उभे आहेत, त्या आजही इतिहासाची साक्ष देतात. काळाच्या ओघात त्याही नष्ट होत चाललेल्या आहेत. म्हणून यावर अभ्यास करण्यासाठी संशोधिकेने हा विषय निवडला आहे.

संशोधन प्रबंधातील पहिले प्रकरण सोलापूर जिल्ह्याची भौगोलिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी लिहिली आहे. सोलापूर जिल्ह्याला प्राचीन काळापासूनचा इतिहास लाभलेला आहे. त्यामुळे प्राचीन काळातील वास्तू, शिल्पे अस्तित्वात आहेत. सोलापूर जिल्ह्यावर सातवाहन घराण्यानंतर वाकाटक घराणे, राष्ट्रकूट घराणे, चालुक्य घराणे, शीलाहार घराणेची देखील सत्ता होती. त्यानंतर मध्ययुगात सोलापूर जिल्हा देवगिरीच्या यादवांच्या ताब्यात होता. यादव राजा रामदेव यांच्या काळात सोलापूर जिल्ह्यात हेमाडपंथी मंदिरशैली विकसित झाली. औरंगजेबाने आपल्या दक्षिण स्वारीत सोलापूर जिल्हा व सोलापूरच्या किल्ल्याची निवड केली होती. त्यावेळी औरंगजेबला हा भाग भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाचा वाटला. भीमा नदीच्या काठी ब्रह्मपुरी येथे इ.स. १६९५ ते १६९९ या काळात तो साडेचार वर्षे राहिला होता. औरंगजेब बादशहाच्या मृत्युनंतर कैदेत असलेल्या शाहू महाराजांची सुटका झाली आणि त्यानंतर सोलापूर जिल्हा मराठ्यांच्या ताब्यात आला. पेशव्यांच्या काळातही सोलापूरचा विस्तार झाला. शिवाजी महाराजांच्या

काळापासून सोलापूर जिल्हा वैवाहिक संबंधाने जोडला गेला होता. पेशव्यांच्या काळात पुण्यातील घडामोडींचा प्रभाव सतत सोलापूर प्रशासनावर देखील पडलेला दिसून येतो. सोलापूर जिल्ह्यात असणारे जहागिरदार आणि वतनदार यांच्या संबंधाावर परिणाम होत असे. महत्त्वाचे म्हणजे मराठेशाहीचा शेवट हा सोलापूर जिल्ह्यात आष्टी या गावी इ.स. १८१८ ला झाला. कॅप्टन स्मिथ आणि सेनापती बापू गोखले यांच्यात लढाई होऊन बापू गोखले आष्टी येथे मरण पावले. तेथे बापू गोखले यांची समाधी आहे.

प्रस्तुत शोधप्रबंधात मध्ययुगीन काळातील वतनदारी पद्धती आणि सोलापूर जिल्ह्यातील जहागिरदार आणि वतनदार या दुसऱ्या प्रकरणामध्ये मराठेकालीन प्रशासन पद्धती विषयी मांडणी केली आहे. मराठेकालीन प्रशासन पद्धतीवर मुस्लिम प्रशासनाचा प्रभाव दिसून येतो. राज्यामध्ये शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्याकरिता केंद्रीय प्रशासनापासून ते ग्रामप्रशासनापर्यंत महत्त्व असलेले दिसून येते. मुस्लिम राजवटीपासून मराठी राजवटीपर्यंत प्रशासनात बदल झालेलेही दिसून येतात. आदिलशाही काळात महाराष्ट्रात बरेच जहागिरदार व वतनदार निर्माण झालेले दिसून येतात. जहागिरी आणि वतनदारी पद्धतीत लष्करी व मुलकी असे दोन्ही अधिकार जहागिरदार किंवा वतनदारांच्या हाती येत असत. मध्ययुगीन काळातील केंद्रीय प्रशासनापासून ग्राम प्रशासनापर्यंत देशमुख, देशपांडे, पाटील, कुलकर्णी, चौगुला, कमाविसदार, मामलेदार इ. वतनदारांचे अधिकार हे कमी–अधिक प्रमाणात असले तरी त्यांना महत्त्वाचे स्थान होते. या वतनदारांच्या कार्यामुळे काही दोष वगळता प्रशासन चालविण्यास मदत होत असे.

सोलापूर जिल्हा किंवा मध्ययुगीन सोलापूरमध्ये अनेक जहागिरदार होते, त्यामध्ये ता. मंगळवेढा येथील जहागिरदार मेघ:श्याम पटवर्धन, भाळवणी, ता. पंढरपूर येथील सरलष्कर नाईक निंबाळकर, ता. मोहोळ येथील कमळोजी देशमुख, कासेगाव, ता. पंढरपूर येथील वतनदार गोदाजी देशमुख, ता. माढा येथील जहागिरदार रावरंभा निंबाळकर, वैराग, ता. बार्शी येथील सरलष्कर निंबाजी नाईक–निंबाळकर आणि अक्कलकोट, ता.द. सोलापूर येथील फत्तेसिंग भोसले इ. जहागिरदार आणि वतनदार होऊन गेले. सोलापूर जिल्ह्यातील जहागिरदार आणि वतनदार हे

आपापल्या परगण्यातील राजेच होते. केंद्रीय प्रशासनात त्यांना महत्त्वाचे स्थान होते. त्यांना समाजात मानाचे स्थान होते. त्यामुळे राजकारणातीलही त्यांचे स्थान महत्त्वाचे होते.

सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन काळात अनेक राजकीय घडामोडीत जहागिरदारांनी महत्त्वपूर्ण भूमिका निभावली होती. मराठी राज्याची इमानी इतबारे सेवा करणारे प्रसंगी प्राणार्पणही करणारे भाळवणीचे खंडेराव नाईक निंबाळकरांसारखे जहागिरदार, राजाराम महाराजांचे संरक्षण करणारे वैराग येथील दर्याबाई नाईक निंबाळकरांचे पती निंबाजी नाईक–निंबाळकर तसेच माढा येथील रंभाजी नाईक निंबाळकर यांनी शाहू महाराजांना राज्यासाठी खूप मदत केल्याचे दिसून येते.

प्रस्तुत शोधनिबंधात सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन काळातील गढ्या या तिसऱ्या प्रकरणात सोलापूर जिल्ह्यात असलेले जहागिरदार आणि वतनदार यांनी निर्माण केलेल्या गढ्या, तसेच गढी म्हणजे काय सांगून गढीच्या निर्मितीचे उपयोजन, इतिहास, बांधकाम पद्धती याविषयी चर्चा केली आहे. गढी आणि किल्ला यातील फरक म्हणजे गढी ही खास राहण्यासाठी बांधलेली वास्तू होय. गढी ही सर्व सोयींनी युक्त अशी होती. तिचा आकर व शक्ती ही जहागिरदारांच्या / वतनदारांच्या सामर्थ्यांवर अवलंबून होता. किल्ला आणि गढी हे तसे सामान्यत: पाहिले तर सारखेच वाटतील, परंतु आकाराच्या दृष्टिकोनातून किल्ला मोठा असतो. त्यामानाने गढी ही लहान असते. कधी–कधी गढीचे उपयोजन हे किल्ल्याप्रमाणेच संरक्षणाच्या दृष्टिकोनातून केलेले दिसून येते. उदा. पिलीवची गढी ही संरक्षणाच्या दृष्टिकोनातून निर्माण केलेली दिसून येते. हे तेथील बांधकामाची रचना, शस्त्रास्त्र साठा ठेवण्याचे ठिकाण, भव्य तटबंदी व बुरुजावर असलेले तोफांचे अवशेष पाहिले की लक्षात येते.

गढ्यांमध्ये काही बाबतीत समानता दिसून येते. गढ्या बांधताना गावकुसापेक्षा जास्त उंचीवर बांधल्या जात असत. गढीच्या बुरुजावरून पाहिल्यास साधारणपणे आसपासचा प्रदेश दृष्टिक्षेपात येत असे. काही गढ्यांचे बुरूज हे चौकोनी आकारांचे घडीव दगड, चुना आणि माती तर काही बुरूज हे निम्म्यांपर्यंत किंवा बुरुजाचा एक चतुर्थांश भाग हा दगडी तर तेथून वरपर्यंतचे बांधकाम हे बारीक विटांमध्ये केलेले दिसून येते. गढ्यांच्या बांधकामामध्ये चुन्याचा जास्त

प्रमाणात वापर केला जात होता. त्यामध्ये डिंक मिसळला जात असे. असा चुना एकजीव करण्यासाठी चुन्याच्या घाणी असत, त्या पिलीव, ता. पंढरपूर येथील गढीच्या समोर पहायला मिळतात. प्रत्येक गढीमध्ये पाणीपुरवठ्यासाठी आड आणि सांडपाणी वाहून जाण्यासाठी दगडी गटारांची योजना दिसून येते. विशेष उल्लेखनीय म्हणजे गढीत निर्माण केलेले आड हे अगदी खाली १०० ते १५० फूटांपासून बांधीव दगडी असे आढळून येतात की जे अजूनही सुस्थितीत आहेत.

मध्ययुगीन प्रशासनात गढ्यांना किंवा तेथे राहणाऱ्या वतनदार, जहागिरदारांना महत्त्वाचे स्थान होते. मध्यवर्ती सत्ता आणि रयत अशी सर्व पातळीवर व्यवहार करणारे हे ग्रामीण प्रशासकीय केंद्र म्हणून गढीला स्थान होते. प्रशासनात आर्थिक, सामाजिक, राजकीय केंद्र म्हणून तेथे कार्य चालत असे. सामान्य जनतेला आपली गाऱ्हाणी आणि समस्या मध्यवर्ती सत्तेपर्यंत पोहचविण्यासाठी एक पर्यायी व्यवस्था म्हणून या सत्ताकेंद्राचा वापर होत असे. ज्याप्रमाणे इंग्रजांच्या काळात स्थानिक स्वराज्य संस्था होत्या, त्याप्रमाणे मध्ययुगात गढी व वाड्यांना स्थान होते. म्हणजेच या जहागिरदार आणि वतनदारांकडे प्रशासनातील आर्थिक लष्करी जबाबदारी बरोबरच न्यायव्यवस्थेचीही जबाबदारी असे. त्यामुळे सामान्य रयतेला हे वतनदार किंवा जहागिरदारच आपले मायबाप सरकार वाटत असे. त्यांच्याकडे लष्कर असे, शस्त्रास्त्र साठा असे त्यामुळे ते स्वत:ला स्वत:च्या प्रदेशातील राजाच समजत असत.

लष्करीदृष्ट्या संपन्न प्रशासकीय केंद्र म्हणून गढींना व वतनदारांना, जहागिरदारांना मान होता. त्यामुळे वतनदारांच्या किंवा जहागिरदारांच्याकडे असलेल्या लष्करामध्ये ग्रामीण भागातील तरुणांना चांगले काम मिळत असे. तसेच ग्रामीण भागातील अनेक लोक गढीमध्ये इतर कामासाठी म्हणूनही नेमणूक केली जात असे, त्यामुळे रयत आणि गढी यांचा जवळचा संबंध होता.

प्रस्तुत शोधप्रबंधात प्रकरण चार हे सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन काळातील वाड्यांविषयी आहे. मध्ययुगीन केंद्रीय प्रशासनात जसे गढीला महत्त्व होते तसेच वाड्यांना महत्त्व असल्याचे स्पष्ट होते. केंद्रीय प्रशासनापासून ग्रामप्रशासनापर्यंतचा दुवा म्हणजे गढी व वाडे होत. प्रस्तुत प्रकरणात मराठेकालीन नागर शिल्पकलेमध्ये वाड्यांची वैशिष्ट्यपूर्ण रचना केलेली दिसून येते. यातूनच पंढरपूर येथे होळकर आणि शिंदे यांनी भव्य वाडे बांधले. या वाड्यात असलेले

लाकडी खांब अतिशय मजबूत आहेत. खांबांचे तळखडे दगडी आहेत. स्तंभ व हस्तांवर मण्यांची माळ, कमळाची फुले, पाने कोरलेली आहेत. वाड्यांमध्ये तळघर आहे. अजूनही ते जास्तीचे सामान ठेवण्यासाठी वापरले जाते. वाड्याच्या खिडक्यांचे सौंदर्य वाढविण्यासाठी खिडकीच्या दोन्ही बाजूला स्तंभ आणि त्यावर आकर्षक कमान आहे. भिंतीच्या बांधकामात विटांचा जास्त वापर केलेला आहे. पाठीमागून पहिल्या मजल्यावर जाण्यासाठी नागमोडी, लोखंडी आकर्षक असा जिना आहे. त्याचे वैशिष्ट्य म्हणजे तो अखंड नसून त्याची एक–एक पायरी वेगळी करता येते.

असाच एक वैशिष्ट्यपूर्ण वाडा कोरफळ, ता. बार्शी येथे आहे. तो होळकरांच्या वाड्याइतका भव्य नाही, परंतु वाड्याचे मुख्य प्रवेशद्वार व त्यावरील पहिल्या मजल्याचे बांधकाम, सज्जा अतिशय सुंदर आणि आकर्षक आहे. वाड्याला पाणीपुरवठ्यासाठी बांधीव आड आहे, अजूनही रहाटाने पाणी काढले जाते. वाड्यामधील स्वयंपाक घरातील चुलीवर लोखंडी चिमणी बसविलेली आहे, चुलीमधून निघणारा धूर हा या चिमणीतून तो छताच्या वरती असणाऱ्या लोखंडी पाईपमधून बाहेर पडतो. आज आधुनिक स्वयंपाक घरामध्ये देखील गॅस शेगडी वरती चिमण्या बसविल्या जातात, तशाच प्रकारची चुलीवर बसविलेली चिमणी आढळून आली. वाड्यातून निघणारा भुयारी मार्ग सध्या बुजविलेला आहे. वाड्याच्या नान्हीघरातील कोरीव दगडी पाट, तसेच दगडी गटारांची योजना केलेली आहे.

वैराग येथे व्यापारी श्री. गणपत धोंगडे यांचा वाडाही वैशिष्ट्यपूर्ण आहे. या वाड्याची प्रवेशद्वारे भव्य आणि आकर्षक आहेत. वाड्याचा विस्तार मोठा आहे. साधारणपणे पाच एकरांमध्ये असलेल्या वाड्यात तटबंदीच्या आतमध्ये वेगवेगळ्या वास्तू दिसून येतात. या वाड्याचे वेगळेपण म्हणजे या वाड्याचे बांधकाम तंत्र होय. वाड्याच्या मधोमध जो चौक आहे, त्यास चारी बाजूंनी १० × १० मध्ये लाकडी नक्षीकाम करीत लाकडी स्तंभाच्या आधारे दुसऱ्या मजल्यापर्यंत लाकडी चौकोन केलेला आहे. ज्यावर छत नाही, त्यातून सरळ सूर्यप्रकाश खाली तळमजल्यापर्यंत पोहचतो. म्हणजे आपण जर त्या चौकात उभे राहिलो तर वरती आकाश पाहू शकतो. वाड्यांमध्ये भरपूर सूर्यप्रकाश यावा आणि वातावरण कोंदट राहू नये यासाठी ही सोय

केलेली दिसून येते. आणखी एक वैशिष्ट्ये म्हणजे हे धोंगडे व्यापारी धान्याचा व्यापार करीत असत. त्यांचे धान्याचे कोठार हे दुसऱ्या मजल्यावर होते. तेथे पश्चिमेच्या बाजूस असलेल्या खोलगट भागात धान्य टाकले तर ते धान्य सरळ तळमजल्यावरील ओसरीला लागून असलेल्या खोलीत येत असे. हे व्यापारी अनेकांना कर्जही देत असत. त्यांच्याकडे मोडीमधील हिशोबाच्या वह्या अजूनही आहेत. तसेच ईस्ट इंडिया कंपनीची नाणीही त्यांच्याकडे पहायला मिळतात.

अशा वाड्यांमुळे मराठी स्थापत्य शास्त्रांमध्ये वैशिष्ट्यपूर्ण भर पडली. वाड्याचे ठरलेले आकारमान, पारंपारिक बांधणी पद्धती, त्यांना गावात मिळणारा मान या सर्वांमुळे ग्रामीण जनतेचे राजकीय प्रशासनाचे प्रमुख असे केंद्रस्थान बनले होते.

प्रकरण पाच हे सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन काळातील पुरातत्त्वीय स्थळांविषयी आहे. सोलापूर जिल्ह्याला प्राचीन काळापासूनचा इतिहास आणि संस्कृती लाभलेली आहे. सोलापूर जिल्ह्यात अनेक पुरातत्त्वीय अवशेष मिळतात, त्यामध्ये मंदिरे, मुर्ति, किल्ला, विरगळ, शिलालेख इ. मुळे सोलापूर जिल्ह्याच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक इतिहासावर प्रकाश पडलेला आहे. मध्ययुगीन काळात सोलापूर परगण्यात अनेक गढ्या व वाड्यांची निर्मिती झालेली दिसून येते. मध्ययुगीन काळातील केंद्रीय प्रशासनात जहागिरदार व वतनदार बरोबरच गढ्या व वाड्यांना महत्त्व होते. परंतु नंतरच्या काळात जहागिरदारी आणि वतनदारी संपुष्टात आली. परंतु त्यांनी निर्माण केलेल्या गढ्या आणि वाडे ही मध्ययुगीन पुरातत्त्वीय स्थळे निर्माण झाली. कारण या गढ्या आणि वाड्यातून अनेक मध्ययुगीन ऐतिहासिक पुरावे उपलब्ध आहेत. आज काही गढ्या मोडकळीस आलेल्या आहेत, तर काही गढ्या जमीनदोस्त होवून फक्त मातीचे ढिगारे बनल्या आहेत.

औरंगजेब बादशहाची छावणी असलेले ठिकाण ब्रह्मपुरी भीमा नदीकाठचे गाव आहे. बादशहा औरंगजेबाची लष्करी छावणी या गावी चार–साडेचार वर्षे राहिली होती. 'चोपन्न पादशाहीचा धनी' असे त्याचे वर्णन इतिहासकारांनी केलेले आहे. आशिया खंडातील बलाढ्य सम्राटाचा तळ चार वर्षांपेक्षा अधिक काळ येथे राहिला. त्यानंतर बादशहा मोहिमेसाठी तेथून बाहेर पडला तरी पुढील आणखी चार वर्षे त्याचे कुटुंबीय याच ब्रह्मपुरीच्या तळावर राहिले. म्हणजे एकूण

नऊ वर्षांपर्यंत बादशहाच्या कारभाराचे ब्रह्मपुरी केंद्र बनून राहिले. तेथून एक मैलाच्या अंतरावर असलेल्या माचणूर येथे आपल्या कुटुंबाच्या व नातेवाईकांच्या संरक्षणासाठी एक गढीवजा किल्ला बांधला. सध्या या गढीची तटबंदी व प्रवेशद्वार, बुरूज ढासळलेल्या स्थितीत आहेत. या गढीविषयी ग्रामस्थांच्या मनात भितीचे वातावरण आहे. संध्याकाळनंतर गढीच्या बाजूला कुणी फिरकतही नाही. परंतु या गढीच्या तटबंदीच्या आत ठिकठिकाणी खड्डे दिसून आले. काही लोकांनी गुप्त धनाच्या आशेने येथे केलेले खड्डे दिसून येतात. तटबंदीच्या आत आतील बांधकामाचा पाया दिसून येतो.

सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यातील गुरसाळे येथील पहिल्या बाजीराव पेशव्यांच्या काळात आपल्या पराक्रमाने आवजी कवडे हे नावारुपाला आलेले सरदार होते. पेशव्यांशी एकनिष्ठ असणारे श्री आवजी कवडे आणि त्यांचा पुत्र महिपतराव कवडे यांची ऐतिहासिक कामगिरी मोठी आहे. या कवडे घराण्यांच्या परगण्यातील गुरसाळे, ता. पंढरपूर येथे मोठी गढी होती. गावकुसापेक्षा जास्त उंचीवर अशी गढीची जागा आहे. पाणीपुरवठ्यासाठी या गढीवर एक आड आहे. परंतु या आडातील पाणी आटल्यास गढीच्या पायथ्याशी एक बारव आहे. तेथून गढीत पाणी पुरवठा होत असे. त्यासाठी गढीतून त्या बारवेवर जाण्याचा भुयारी मार्ग अजूनही आहे. लांबून उंच टेकाड दिसत असले तरी या गढीच्या जागी तळघरे, भुयारी मार्ग, बारव अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहेत. म्हणून मध्ययुगीन इतिहासाचा अभ्यास करीत असताना या पुरातत्त्वीय स्थळास महत्त्व आहे.

प्रस्तुत प्रबंधात पुरातत्त्वीय स्थळांमध्ये सुरडी, ता. बार्शी येथील निंबाजी नाईकनिंबाळकर यांची गढी मध्ययुगीन काळात परांडा सरकारात येत होती. छत्रपती शाहू महाराजांच्या काळात ही गावे सरलष्कर निंबाजी नाईकनिंबाळकर यांच्याकडे होती. कोल्हापूरचे शिवाजी महाराज पहिले यांची कन्या तर राजाराम महाराज व महाराणी ताराबाई यांची नात दर्याबाई निंबाळकर आणि त्यांचे पती सरलष्कर निंबाजी नाईकनिंबाळकर हे येथील वतनदार होते. त्यांच्या काळात सुरडी, पानगाव व वैराग येथे गढ्या बांधल्या गेल्या. पैकी पानगाव येथील गढीत जिचे अस्तित्वही शिल्लक नाही अशा ठिकाणी महाराणी ताराबाईंचा नातू रामराजा हा बहिण दर्याबाई नाईकनिंबाळकर यांच्या

बरोबर अज्ञातवासात राहिला. कारण कोल्हापूरच्या राजसबाईंकडून त्यांच्या जीवाला धोका होता. म्हणून महाराणी ताराबाई यांनी इ.स. १७४५ मध्ये रामराजास पानगाव, ता. बार्शी येथे ठेवले होते. ऐतिहासिक पानगाव येथील गढीचे रुपांतर मातीच्या ढिगाऱ्यात झाले आहे. याच घराण्याची सुरडी येथील गढीचे देखील एका टेकाडात रुपांतर झाले आहे. तिचे अर्धवट बुरुज पहायला मिळतात. या गढीच्या टेकाडावर अजुनही काही वस्तू, मुर्ती सापडतात.

पुरातत्त्वीय स्थळांमध्ये इंग्रज–मराठा यांच्यात झालेल्या शेवटच्या लढाईचे ठिकाण आष्टी, ता. मोहोळ ऐतिहासिक आहे. २० फेब्रुवारी १८१८ रोजी ब्रिटिश कॅप्टन स्मिथ आणि मराठ्यांचे सेनापती बापू गोखले यांच्यात युद्ध होवून सेनापती बापू गोखले यांना आष्टी येथे वीरमरण आले. तेथे सेनापती बापू गोखले यांची समाधी आहे. ज्या ठिकाणी हे युद्ध झाले होते, तेथे मोठा तलाव आहे. तलावातील गाळाने सेनापती बापू गोखले यांची समाधी पूर्णपणे बुजली गेली आहे. उन्हाळ्याच्या दिवसात ज्यावेळी तलावातील पाणी कमी होते, त्यावेळी त्या गाळातील जमिनीत शेतकरी तात्पुरती शेती करतात किंवा काही शेतकरी तेथील सुपीक गाळ स्वत:च्या शेतात टाकण्यासाठी म्हणून घेऊन जातात, त्यावेळी तेथे अनेक शस्त्रे सापडतात. आष्टीतील ग्रामस्थांनी काही शस्त्रे ता. मोहोळ येथील पोलीस ठाण्यात जमा केल्याची नोंद आहे.

मध्ययुगीन इतिहासात ज्या गढ्या निर्माण झाल्या त्या गढ्यांना राजकीय इतिहासात तर स्थान आहेच, परंतु सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक इतिहासातही यांना महत्त्व आहे. सामान्य जनता किंवा रयत आणि गढी यांचे एक नातं असे. परगण्यामध्ये जे काही सण उत्सव साजरे केले जात असत, त्यावेळी या वतनदारांना मोठा मान असे. गढ्यावर किंवा वाड्यावर गुढीपाडव्याला, पंचमीला मोठे सण साजरे केले जात असत, त्यावेळी गावातील लोकांना निमंत्रण असे, जेवणही दिले जात असे. त्यामुळे गढीमालक किंवा जहागिरदार–वतनदार यांचा प्रत्यक्ष प्रजेशी संबंध येत असे. केंद्रीय प्रशासनामध्ये महसूल वसूलीचे काम करणारा या वतनदार वर्गावर समाजाची आर्थिक परिस्थितीही अवलंबून असे. काही वेळेला दुष्काळ पडे किंवा इतर आपत्तींमुळे शेतीतील उत्पादने घटली तर जमीनमहसूलामध्ये सूट देण्याचा अधिकार त्यांना होता. त्यामुळे प्रजेची आर्थिक

परिस्थिती या वतनदारांच्या धोरणांवर अवलंबून होती. त्यामुळे गढ्यांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय जीवनात स्थान होते.

मध्ययुगीन काळात न्यायव्यवस्थेचे महत्त्वाचे काम जहागिरदार व वतनदार करत होते. गढी किंवा वाड्यामध्येच कचेरी असे. त्यामध्ये न्यायदानाचे काम चालत असे. त्यामुळे समाजातील तंटे सोडवून शांतता प्रस्थापित करण्याची जबाबदारी जहागिरदार व वतनदार यांच्यावर होती. अर्थातच गढी व वाडे हे स्थानिक कोर्टच होते.

आर्थिक बाबींचा विचार करता शेती महत्त्वाची होती. वतनदार हे जमीन महसूल गोळा करीत असत आणि त्याद्वारे प्रशासन चालवित असत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या अडी–अडचणी व त्यांचे शत्रूपासून संरक्षण तसेच दुष्काळ यासारख्या अडचणींच्या वेळी शेतकऱ्यांना संरक्षण देण्याची जबाबदारी ही या वतनदारावरच असे. आर्थिक परिस्थितीमध्ये व्यापारी, सावकार यांनाही महत्त्व होते. वैराग, ता. बार्शी येथील धोंगडे व्यापारी यांनी अनेकांना कर्जपुरवठा केलेला दिसून येतो.


स्वातंत्र्योत्तर काळात वतनदारांचे हक्क संपुष्टात आल्यामुळे त्यांच्या उत्पन्नाची साधने कमी झाल्यामुळे, गढीतील वारसदारांकडे ऐतिहासिक दृष्टीचा अभाव असल्यामुळे या गढ्या नष्ट होत चालल्या आहेत. काही वतनदारांच्या वारसदारांची अवस्था दयनीय झाल्याने त्यांनी गढ्या विकल्या, काहींनी गढीची माती विकली तर काही वारसदार नोकरीसाठी शहरांकडे निघून गेले. तसेच भाऊबंदकीमुळे, वाटण्यांमुळे अनेक गढ्या नष्ट झालेल्या आहेत. या मोठ्या वास्तूंचा देखभालीचा खर्च जास्त असल्याने त्याकडे दुर्लक्ष केले जाते. मध्ययुगीन काळातील अनेक ऐतिहासिक घटनांचे साक्षीदार असलेल्या या गढ्या काळाच्या ओघात नष्ट होत आहेत. त्यांचे संवर्धन होणे गरजेचे आहे. अशा ऐतिहासिक घटनांची साक्षीदार असलेल्या गढींकडे शासनानेही जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

परिशिष्ट क्र. १
नकाशे

नकाशा क्र. : १
भारतातील राज्ये




नकाशा क्र. : २
महाराष्ट्रातील जिल्हे



नकाशा क्र. : ३
सोलापूर जिल्ह्यातील तालुके



नकाशा क्र. : ४
मध्ययुगीन काळातील परगणे



सरदेशमुख वाडा

अक्कलकोट, जि. सोलापूर.



वाड्याचे चापाकृती उत्तरेकडील प्रवेशद्वार



वाड्याच्या आतील लाकडी स्तंभ



पारंपरिक समई, दिवे आणि पितळी तबक



पितळी सुबक तबक



पारंपरिक मूर्ती / परि



जुने सागवानी लाकडात बनविलेले सुंदर मंदिर



पारंपरिक खलबत्ता



पारंपरिक लोखंडी कड्या

देशपांडे यांची गढी

धोत्री, ता.द. सोलापूर, जि. सोलापूर.



गढीचे उत्तरेकडील मुख्य प्रवेशद्वार



गढीच्या आतील पश्चिमेकडील प्रवेशद्वार



गढीच्या आतील घोड्यांची पागा



गढीच्या आतील चौकोनी आकाराची विहीर



गढीची मुख्य प्रवेशद्वार व समोरील तटबंदी



गढीची पूर्वेकडील बुरुज आणि तटबंदी

देशपांडे यांची गढी

करकंब, ता. पंढरपूर, जि. सोलापूर.



पूर्वेकडील प्रवेशद्वार आणि ढासळलेला बुरुज



गढीचे उत्तरेकडील मुख्य प्रवेशद्वार




दगडी चौकोनाकृती बारव

शंकरराव सुरवसे वाडा

पंढरपूर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर.



वाड्याचा दर्शनी भाग



वाड्याचा दर्शनी भाग

देशपांडे यांचा वाडा

सुरडी, ता. बार्शी, जि. सोलापूर.



पूर्वेकडील मुख्य प्रवेशद्वार व बुरूज



प्रवेशद्वाराची आगळ




मुख्य प्रवेशद्वारापाठीमागील आगळ



पश्चिमेकडील भग्न बुरूज

सरलष्कर नाईक निंबाळकर वाडा

वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर.



जुन्या गढीचा उत्तरेकडील
चाफाकृती हत्ती दरवाजा



नवीन वाड्याचे मुख्य प्रवेशद्वार



दगडी निमुळता जिना



पारंपरिक लाकडी सागवानी देव्हारा



पारंपरिक महिषासुरमर्दिनीची पितळी मूर्ती



पारंपरिक महिषासुरमर्दिनीची पितळी मूर्ती



वाड्यातील गोलाकार बांधीव आड



गावाची जुनी वेस

धोंगडे यांचा वाडा

वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर.



वाड्याचे मुख्य पूर्वेकडील प्रवेशद्वार



मुख्य प्रवेशद्वाराचा वरील भाग




पारंपरिक पूजनीय मूर्ती




वाड्याच्या आतील लाकडी बांधकाम



वाड्याच्या मधोमध असणारी मोकळी जागा जिथून सूर्यप्रकाश व हवा वरून खालच्या मजल्यापर्यंत पोहचेल अशी वैशिष्ट्यपूर्ण रचना




वाड्याचे मुख्य उत्तेकडील प्रवेशद्वार



धोंगडे यांच्याकडे असणारी हिशोबाची मोडी लिपीतील वही

देशमुख यांचा वाडा

सोलापूर



देशमुख वाड्याचे मुख्य प्रवेशद्वार



आतील प्रवेशद्वाराचे छत



वाड्याची ओसरी आणि लाकडी स्तंभ



श्री सिद्धरामेश्वरांची पारंपरिक कावड



वाड्यातील जुन्या जातेच्या पाळीचा उपयोग करून सध्या तयार केलेले कारंजे



बार्शी येथील देशपांडे यांची गढी



धामणगांव येथील बोधले महाराज यांच्या
गढीचे प्रवेशद्वार

परिशिष्ट क्र. ३

सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन गढ्या, वाडे व पुरातत्त्वीय स्थळे यांची यादी

गढ्या –

१) देशमुख–गायकवाड यांची गढी, ता. मोहोळ.

२) देशमुखांची गढी, कासेगाव, ता. पंढरपूर.

३) फत्तेसिंग भोसले यांची गढी, अक्कलकोट, ता. अक्कलकोट.

४) जहागिरदारांची गढी, पिलीव, ता. माळशिरस.

५) रावरंभा निंबाळकर यांची गढी, माढा, ता. माढा.

६) देशपांडे यांची गढी, बार्शी, ता. बार्शी.

७) बोधले यांची गढी, धामणगाव, ता. बार्शी.

८) देशमुख–वाघमोडे यांची गढी, मोहोळ, ता. मोहोळ.

९) धोत्री येथील देशपांडे यांची गढी, ता.द. सोलापूर.

१०) शिरापूर, ता. मोहोळ येथील राजेपांढरे यांची गढी.

११) रोपळे, ता. पंढरपूर येथील गढी.

१२) माळकवठा, ता. द. सोलापूर येथील गढी.

१३) करकंब, ता. पंढरपूर येथील देशपांडे यांची गढी.

१४) कंदर, ता. करमाळा येथील गढी.

१५) पानगाव, ता. बार्शी येथील दर्याबाई नाईक निंबाळकर यांची गढी.

१६) डोंगरगाव, ता. सांगोला येथील बाबर यांची गढी.

१७) गार्डी, ता. पंढरपूर येथील इनामदार यांची गढी.

१८) नातेपुते, ता. माळशिरस येथील साने यांची गढी.

वाडे –

१) होळकर वाडा, ता. पंढरपूर.

२) कोरफळ येथील हागरे–पाटील वाडा, ता. बार्शी.

३) देशपांडे वाडा, टेंभुर्णी, ता. माढा.

४) पटवर्धन वाडा, मोडनिंब, ता. माढा.

५) निंबाळकर वाडा, भाळवणी, ता. पंढरपूर.

६) धोंगडे वाडा, वैराग, ता. बार्शी.

७) देशमुख वाडा, सोलापूर.

८) शेटे वाडा, सोलापूर.

९) देशपांडे वाडा, नेवरे, ता. माळशिरस.

१०) निंबाळकर वाडा, रोपळे, ता. माढा.

११) पटवर्धन सरकार वाडा, पंढरपूर.

१२) रास्ते वाडा, पंढरपूर.

१३) देशमुख गढी / वाडा, भोसे, ता. पंढरपूर.

पुरातत्त्वीय स्थळे –

१) ब्रह्मपुरी (इस्लामपुरी), ता. मंगळवेढा येथील औरंगजेब बादशहाची छावणी

२) माचणूर येथील औरंगजेब बादशहाने बांधलेली किल्लेवजा गढी

३) गुरसाळे येथील कवडे घराण्याची गढी

४) सुरडी येथील निंबाजी नाईकनिंबाळकर यांची गढी

५) मध्ययुगीन पुरातत्त्वीय स्थळ, आष्टी, ता. मोहोळ

परिशिष्ट क्र. ४

प्रश्नावली

१) गढीचे / वाड्याचे ठिकाण किंवा गावाचे नांव?

२) गढी किंवा वाडा कोणाच्या मालकीचा होता किंवा आहे?

३) तटबंदी कशा स्वरूपाच्या आहेत?

४) गढी किंवा वाड्याचे प्रवेशद्वार.

५) गढी किंवा वाड्याचे बुरूज.

६) गढीचा किंवा वाड्याचा आकार, लांबी, रूंदी, उंची.

७) गढी किंवा वाड्याच्या आतील बांधकामे.

८) सध्या वाड्यामध्ये व गढीमध्ये कोण राहत आहे?

९) कोणी राहत नसेल तर इतर कामासाठीचा उपयोग केव्हापासून केला जातो?

१०) गढी किंवा वाड्याच्या मालकाजवळ असणारी कागदपत्रे.

११) गढी किंवा वाड्याच्या बाबतीत कथा किंवा दंतकथा.

१२) गढीमध्ये वास्तव्य करणारे लोक.

१३) गढीमध्ये किंवा वाड्यामध्ये असणारे मंदिर.

१४) गढी किंवा वाड्यामध्ये असलेल्या मूर्ती.

१५) पाणीपुरवठ्याची सोय.

१६) संरक्षणात्मक उपाय किंवा साधने.

१७) गढीमधील किंवा वाड्यामधील इतर खोल्या किंवा इमारती.

१८) गढी किंवा वाड्याचे बांधकामाचे स्वरूप, वापरलेले मटेरिअल.

१९) बांधकामावर असणारा प्रभाव.

२०) बांधकामास साधारणपणे आलेला खर्च.

२१) गढी किंवा वाड्याचा काळ.

२२) वेगवेगळ्या काळात झालेले गढीमधील किंवा वाड्यामधील बदल.

२३) तळघर.


२४) गढीमध्ये किंवा वाड्यामध्ये राहणाऱ्यांची वंशावळ.

२५) वैशिष्ट्यपूर्ण नक्षीकाम किंवा वास्तुशिल्प.

२६) जतनासाठी मिळालेली शासकीय मदत.

परिशिष्ट क्र. ५

१) शिलालेखाचे लिप्यांतर





श्री

श्री चरणि तत्पर वं

रा. निरंतर वणगोजि नाईक निंबाळकर यांचे पुत्र मुधोजि नाईक, त्यांचे पुत्र साबाजि नाईक, त्यांचे पुत्र तुकाराम नाईक, त्यांचे पुत्र अमृतराव शाहाजी व पिराजि नाईक निंबाळकर, त्यांचे पुत्र साबाजि नाईक निंबाळकर देशमुख प्रांत फलटण देश यांनी श्रीचे आज्ञेवरुन देवास समग्र सिद्ध केले. शके १६५१

२) वैराग येथील नाईक निंबाळकरांना मिळालेली वतनी गावांचे कुलमुखत्यार पत्र





संदर्भ ग्रंथ सूची

प्राथमिक साधने :

१) **मोडी कागदपत्रे –** कासेगाव, ता. पंढरपूर, मोहोळ, ता. मोहोळ, वैराग, ता. बार्शी, सोलापूर, पंढरपूर, ता. पंढरपूर, भाळवणी, ता. पंढरपूर, अक्कलकोट, ता. अक्कलकोट, धामणगाव, ता. बार्शी.

२) **वंशावळी –** मोहोळ, ता. मोहोळ, पिलीव, ता. माळशिरस, भाळवणी, ता. पंढरपूर, कासेगाव, ता. पंढरपूर, वैराग, ता. बार्शी, अक्कलकोट, ता. अक्कलकोट, कोरफळ, ता. बार्शी, धामणगाव, ता. बार्शी.

३) **शिलालेख –** कुरकुंभ, ता. दौंड, जुने फिरंगाई मंदिर.

४) **कुलमुखत्यार पत्र –** वैराग येथील नाईक निंबाळकरांना मिळालेली वतनी गावांचे पत्र.

५) **ताम्रपट –** पंढरपूर, ता. पंढरपूर, होळकर वाडा.

६) **गढ्या (स्थापत्य) –**

अ) देशमुख–गायकवाड यांची गढी, ता. मोहोळ.

ब) देशमुखांची गढी, कासेगाव, ता. पंढरपूर.

क) फत्तेसिंग भोसले यांची गढी, अक्कलकोट, ता. अक्कलकोट.

ड) जहागिरदारांची गढी, पिलीव, ता. माळशिरस.

इ) रावरंभा निंबाळकर यांची गढी, माढा, ता. माढा.

ई) देशपांडे यांची गढी, बार्शी, ता. बार्शी.

उ) बोधले यांची गढी, धामणगाव, ता. बार्शी.

ऊ) देशमुख–वाघमोडे यांची गढी, मोहोळ, ता. मोहोळ.

ए) धोत्री येथील गढी, ता.द. सोलापूर.

७) गढीतील मंदिरे, मूर्ती, मध्ययुगीन परगण्यातील शिक्के, नाणी.

८) **वाडे (स्थापत्य)–**

अ) होळकर वाडा, ता. पंढरपूर.

ब) कोरफळ येथील हागरे–पाटील वाडा, ता. बार्शी.

क) देशपांडे वाडा, टेंभुर्णी, ता. माढा.

ड) पटवर्धन वाडा, मोडनिंब, ता. माढा.

इ) निंबाळकर वाडा, भाळवणी, ता. पंढरपूर.

ई) धोंगडे वाडा, वैराग, ता. बार्शी.

उ) देशमुख वाडा, सोलापूर.

९) **प्रत्यक्ष मुलाखती–**

१) कवडे आबासाहेब उत्तरेश्वर (गढी मालक), गुरसाळे, ता. पंढरपूर.

२) गावडा सदाशिव गुरबस (वाड्याचे मालक), कोरफळ, ता. बार्शी.

३) गुंड पोपटराव (माजी सरपंच), आष्टी, ता. मोहोळ.

४) जहागिरदार रणजितसिंह बाळासाहेब (गढी मालक), पिलिव, ता. माळशिरस.

५) जहागिरदार अजितसिंह बाळासाहेब (गढी मालक), पिलिव, ता. माळशिरस.

६) देशमुख गोपाळराव मारुती (महाराष्ट्र विकास सेवा वर्ग, निवृत्त अधिकारी व प्रसिद्ध लेखक), पंढरपूर, ता. पंढरपूर.

७) देशमुख आण्णासाहेब बाळासाहेब (गढी मालक), मोहोळ, ता. मोहोळ.

८) देशमुख सुभाषराव जगदेवराव (गढी मालक), मोहोळ, ता. मोहोळ.

९) देशमुख वसंतराव दौलताराव (गढी मालक, सरपंच कासेगाव), कासेगाव, ता. पंढरपूर.

१०) देशमुख सोमशेखर (वाड्याचे मालक), सचिव, सिद्धेश्वर देवस्थान, सोलापूर.

११) देशपांडे प्रसन्न विलास (गढीत वास्तव्य), बार्शी, ता. बार्शी.

१२) देशपांडे माई गोविंद (गढी मालक), टेंभूर्णी, ता. माढा.

१३) देशपांडे सखाराम राजाराम (ग्रामस्थ), करकंब, ता. पंढरपूर.

१४) दंडवते चंद्रकांत पुरुषोत्तम (ग्वाल्हेर ट्रस्ट प्रतिनिधी, वाड्याचे देखभाल करणारे), पंढरपूर, ता. पंढरपूर.

१५) धोंगडे गणपत (वाड्याचे मालक), वैराग, ता. बार्शी.

१६) नाईकनिंबाळकर राजेंद्रसिंह पांडुरंग (वाड्याचे मालक), भाळवणी, ता. पंढरपूर.

१७) नाईकनिंबाळकर कृष्णराव (वाड्याचे मालक, माजी पोलीस अधिकारी), वैराग, ता. बार्शी.

१८) नाईकनिंबाळकर मकरंद (वाड्याचे मालक, जिल्हा परिषद सदस्य, सोलापूर), वैराग, ता. बार्शी.

१९) नाईकनिंबाळकर राजेंद्रसिंह पांडुरंग (वाड्याचे मालक), भाळवणी, ता. पंढरपूर.

२०) नाईकनिंबाळकर सुवर्णा कृष्णराव (लेखिका), पुणे.

२१) पाटील कैलास जनार्धन (शिक्षक, आश्रमशाळा, माढा), वडशिंगे, ता. माढा.

२२) बोधले विवेकानंद, धामणगाव (मालक व ट्रस्टी), ता. बार्शी.

२३) भोसले सुनिताराजे (गढी मालक), अक्कलकोट, ता. अक्कलकोट.

१०) **गॅझेटियर**

1) Gazetteer of the Bombay Presidency Solapur District (Facsimile Reproduction) Volume XX, The Government of Maharashtra, Mumbai, 1997.
2) Kunte B. G., Sholapur District Gazetteer, Bombay, 1977.
3) The Gazetteer of India, Maharashtra State, Solapur District, 1977.

मराठी दुय्यम संदर्भ ग्रंथ :

१) कुंभार आनंद, संशोधन तरंग, नवभारत प्रकाशन संस्था, मुंबई, १९८८.

२) खरे ग. ह., मूर्तिविज्ञान, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे.

३) खरे गणेश हरी, शिव चरित्र साहित्य खंड-६, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे.

४) खरे गणेश हरी, मराठी इतिहासाची विस्तृत शकावली खंड–१, पत्रकाल सुधारणा, भारतीय इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९७७.

५) खरे गणेश हरी, ऐतिहासिक फारसी साहित्य खंड–२, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे.

६) खरे गणेश हरि, दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने खंड–१, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे.

७) खरे ग. ह., कुलकर्णी गो. त्र., ऐतिहासिक फारसी साहित्य खंड ६ वा, औरंगजेबाच्या दरबारचे अखबार, भा.इ.सं.मं., पुणे.

८) जामखेडकर अ. प्र., महाराष्ट्र गॅझेटिअर (महाराष्ट्र इतिहास – प्राचीन काळ) खंड १ ला, भाग २ रा, स्थापत्य व कला, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९६७, २००२.

९) पगडी सेतु माधवराव, मोगल दरबारची बातमीपत्रे खंड १ ला, म.रा.स.सं. मंडळ, मुंबई, १९७८.

१०) पगडी सेतु माधवराव, मोगल दरबारची बातमीपत्रे, १६८५–१७००, म.रा.सा.से. मंडळ, मुंबई, १९७८.

११) पारसनीस द. ब., शाहू महाराज रोजनिशी, भाग–१, परिच्छेद ३४५.

१२) मिराशी वा. वि., संशोधन मुक्तावली, मध्य प्रदेश संशोधन मंडळ, नागपूर, १९५४.

१३) मिराशी वा. वि., कालिदास, महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ, मुंबई, १९३४.

१४) मिराशी वा. वि., शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख, खंड १ ला, डॉ. मु. चा. देवपुजारी प्रकाशन, नागपूर, १९७४.

१५) महाराष्ट्र राज्य जिल्हा परिचय, सोलापूर जिल्हा महाराष्ट्र सरकारच्या प्रसिद्ध खात्याचे प्रकाशन.

१६) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, इतिहास – प्राचीन काळ खंड १ ला, संपादक– चंद्रपाठक अरुण, दार्शनिक विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २०१०.

१७) राजवाडे वि. का. (संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड १५, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९१४.

१८) राजवाडे वि. का., मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड २०, राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, २००३.

१९) सरदेसाई गो. स., पेशवे दप्तर, खंड २, ३, मुंबई सरकार, सन १९३०.

२०) सरदेसाई गो. स., पेशवे दप्तर, खंड ४, मुंबई सरकार, १९३०.

२१) सरदेसाई गो. स., गर्गे स. मा., मराठी रियासत, पॉप्युलर प्रकाशन, १९९०.

संदर्भ ग्रंथ सूची :

१) अकलुजकर लता, किल्ले सोलापूर, संकल्प प्रकाशन, सोलापूर, २००९.

२) अकलुजकर सरस्वतीबाई, वैद्य सरोजिनी, आठवणी काळाच्या ..... माणसाच्या, राजहंस प्रकाशन, २०००.

३) आपटे कोतुरकर, महाराष्ट्राचा पत्ररुप इतिहास, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे.

४) ओतुरकर रा. वि., मराठ्यांच्या साम्राज्याचे स्वरुप, मराठ्यांचा इतिहास, खंड–२, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, ३०, १९८५.

५) कठारे अनिल मुरलीधर, मराठेकालीन सरकारी अधिकारी आणि त्यांचे गैरवर्तन, सुगावा प्रकाशन, पुणे, १९९५.

६) कोट्टूरशेट्टी ए. बी., शिवयोगी सिद्धरामेश्वर, कर्नाटका विद्यापीठ, धारवाड, २००४.

७) कुलकर्णी एल. जी., सोलापूर जिल्ह्याची माहिती पुस्तिका, अभय प्रकाशन, १९८८.

८) कुलकर्णी गणेश पंढरीनाथ, सोलापूर नगरपालिका शतसंवत्सरिक ग्रंथ, सोलापूर, १९३५.

९) कुलकर्णी सतीश, अक्कलकोट स्वामी दर्शन स्मरणिका, २०१०.

१०) कुलकर्णी अ. रा., शिवकालीन महाराष्ट्र – मराठ्यांचा इतिहास खंड–१, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, ३०, १९८४.

११) कुलकर्णी अ. रा., खरे ग. ह., मराठ्यांचा इतिहास खंड– १, २, ३, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, ३०.

१२) खरे वा. य., ऐतिहासिक लेखसंग्रह, खंड–१३, मिरज.

१३) खरे यशवंत वासुदेवशास्त्री, मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड–२, गजानन मुद्रणालय, मिरज.

१४) खोबरेकर वि. गो., महाराष्ट्राचा इतिहास – मराठा कालखंड, भाग–२ (इ.स. १७०७ ते १८१८), म.रा.सा.सं. मंडळ, मुंबई, १९८८.

१५) गुणे वि. व्यं., मराठ्यांची शासन व्यवस्था : पेशव्यांचा राज्यकारभार, मराठ्यांचा इतिहास खंड २ रा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८५.

१६) गायकवाड, सरदेसाई, थोरात, हनमाने, मराठेकालीन संस्था व विचार, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९०.

१७) घाणेकर प्र. क., पेशव्यांचे अधिकृत निवासस्थान शनिवारवाडा, स्नेहल प्रकाशन, पुणे, २०१३.

१८) जक्कल वि. न., सोलापूर शहराचा इतिहास, संकल्प प्रकाशन, सोलापूर.

१९) जाधवर देवा, सोलापूर जिल्ह्याची माहिती, देवा प्रकाशन, २०१०.

२०) जळकोटकर विलास, कुलकर्णी महेश, सबकुछ सोलापूर, समुह संपादक लोकल मिडिया प्रा. लि., २०१४.

२१) जावजी तुकाराम, ग्रँट डफ – हिस्ट्री ऑफ मराठा, निर्णय सागर प्रेस, पुणे, १९३६.

२२) जोशी शंकर नारायण यांच्या निवडक लेखांचा संग्रह, मराठेकालीन समाजदर्शन, अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे, १९६०.

२३) तेंडुलकर महेश, शिवकालीन दुर्ग व दुर्गव्यवस्था, स्नेहल प्रकाशन, पुणे, २००९.

२४) देवळे एस. आर., महाराष्ट्रातील किल्ले, अभय प्रकाशन, पुणे, १९८१.

२५) देशमुख गोपाळराव, सोलापूर जिल्ह्याचा इतिहास – मराठा कालखंड, भाग–१, रेवू प्रकाशन, पंढरपूर, २०१०.

२६) देशमुख गोपाळराव, दोन राजधान्या, मंगळवेढा, ब्रम्हपुरीचा इतिहास, कौसल्या प्रकाशन, २०१४.

२७) देशमुख विजय, शककर्ते शिवराय (उत्तरार्ध), छत्रपती सेवा प्रतिष्ठान प्रकाशन, नागपूर, १९८६.

२८) पगडी सेतु माधवराव, मोगल आणि मराठे, ठोकळ प्रकाशन, पुणे, १९६३.

२९) पानसे मु. ग., यादवकालीन महाराष्ट्र, मराठी ग्रंथसंग्रहालय प्रकाशन, मुंबई, १९६३.

३०) भिडे गजानन, संपादित शोधनिबंध संग्रह, शिवाजी विद्यापीठ, इतिहास प्राध्यापक परिषद, चवथे व पाचवे अधिवेशन, १९९८.

३१) भिडे गजानन, मध्ययुगीन भारत, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०००.

३२) माटे म. श्री., प्राचीन कलाभारती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

३३) माटे एम. एस., डेक्कन वुडवर्क, पुणे, १९६७.

३४) मिराशी वा. वि., संशोधन मुक्तावली, मध्य प्रदेश, संशोधन मंडळ, नागपूर, १९५४.

३५) मिराशी वा. वि., कालीदास, महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ, मुंबई, १९३४.

३६) मिराशी वा. वि., शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख खंड १ ला, डॉ. मु. चां. देवपुजारी प्रकाशन, नागपूर, १९७४.

३७) मिटीकर नानासाहेब, किल्ल्यासंबंधीची कैफियत, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे.

३८) मोरवंचीकर आर. एस., दक्षिण काशी पैठण, रविराज प्रकाशन, पुणे, १९८७.

३९) मोरवंचीकर रा. श्री., पैठण दर्शन पुरातत्त्व व वस्तूसंग्रहालयाचे विभाग, मुंबई, १९८५.

४०) शर्मा श्याम, प्राचीन भारतीय कला, वास्तुकला एवं मूर्तिकला, रिसर्च पब्लिकेशन्स, जयपूर, २०१२.

४१) शहा जी. बी., दुर्ग जागले जागले, सुमेरु प्रकाशन, डोंबिवली, २००८.

४२) शितोळे हरिभाऊ अंबादास, सोलापूर दर्शन, आय. व्ही. झुंजा, रिगल प्रिंटींग प्रेस, सोलापूर, १९८०.

४३) शिवदे सदाशिव, महाराष्ट्रातील ऐतिहासिक वाडे (वास्तू आणि इतिहास) भाग पहिला, स्नेहल प्रकाशन, पुणे, २०१३.

४४) सहस्त्रबुद्धे पु. ग., महाराष्ट्र संस्कृती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजया नगर, ३०, २००३.

४५) सरकार जे. एम., औरंगजेबाचा इतिहास, म.रा.सा.सं. मंडळ, १९७८.

४६) सावंत बी. एस., जाधव व्ही. के., मराठ्यांचा प्रशासकीय, सामाजिक व आर्थिक इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, १९९७.

४७) हलगणे स. गो., बसवेश्वर चरित्र, अमोल प्रकाशन, पुणे, २००४.

मराठी कोश :

१) जोशी महादेवशास्त्री (संपादक), भारतीय संस्कृति कोश खंड–७, अनमोल प्रकाशन, पुणे, १५ मे २००४.

२) जोशी लक्ष्मणशास्त्री (संपादक), मराठी विश्वकोश खंड–१४ वा, महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ, मुंबई.

नियतकालिके :

१) भारत इतिहास संशोधन मंडळ, त्रैमासिक, पुणे.

२) भारत इतिहास संशोधन मंडळ, त्रैमासिक, मुंबई.

३) मुजूमदार जी. एल. (त्रैमासिक), भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९३८, अंक–४.

अप्रकाशित शोधप्रबंध :

१) अकलुजकर लता, ''किल्ले नळदूर्ग व त्याचा परिसर एक पुरातात्त्विक व ऐतिहासिक सर्वेक्षण'', अप्रकाशित शोधप्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, १९९४.

२) गायकवाड संजय, ''कुडलसंगम (जिल्हा सोलापूर) येथील मंदिर समुह आणि शेजारील जिल्ह्यातील मध्ययुगीन मंदिरांचा तौलनिक अभ्यास'', डेक्कन कॉलेज पदव्युत्तर आणि संशोधन संस्था, अप्रकाशित शोधप्रबंध, नोव्हेंबर २०११.

३) निंबाळकर विलास, ''पेशवेकालीन परगणे सोलापूर'', अप्रकाशित शोधप्रबंध, पुणे विद्यापीठ, २००७.

४) देवकर सदाशिव रामचंद्र, ''वेळापूर येथील मंदिर समुहांचा आणि पुरातत्त्वीय अवशेषांचा अभ्यास'', अप्रकाशित लघुशोध प्रबंध, २०१०.

हिंदी दुय्यम संदर्भ ग्रंथ सूची :

१) महाजन व्ही. डी., मध्यकालीन भारत (इ.स. १००० से इ.स. १७६१ ई तक), एस. चन्द, दिल्ली, २००९.

२) सय्यद नस्सीम फारुख, सोलापूर तारिख के आयने में ईलाही व फलाही तनजीम, सोलापूर, १९९९.

इंग्रजी संदर्भ ग्रंथ :

1) Gopal B. R., Minor Dynastics of South India, Karnataka, Vol.-I, New Era Publication, Madras, 1982.

2) Kamalapur J. N., The Deccan Forts. A study in the Arts of fortification in Medical India, Popular Books Depot, Bombay, 1961.

3) Kulkarni A. R., Maharashtra in Age of Shivaji, Diamond Publication, Pune, 2007.

4) Mate M. S., Maratha Architecture, Continental Publication, Pune, 1959, 2009.

5) Percy Brown, Indian Architecture (Islamic Period), 3rd Edition, Taravporevala Sons and Co. Pvt. Ltd.
6) Pawar Appasaheb, Tarabai Papers Collection of Persian Letters, Shivaji University Publication, Kolhapur, 1971.
7) Ritti Shrinivas, Kumbhar Anand, Inscription from Solapur District, Shrihari Prakashan, Dharawad, 1986.
8) Sen S. N., Administrative System of the Marathas, Calcutta, K. P. Bagchi and Company, 1976.

Website :

1) www.evivek.com
2) www.marathivishwakosh.in
3) www.lokprabha.com
4) www.wikipedia.org
5) www.solapur.nic.in
6) www.solapur.gov.in
7) www.maharashtratourism.gov.in
8) www.templenet.com